# वऱ्हाडसमाचार

Berar Samachar.

१९११ इ० ९

वर्ष ४९ आकोला—सोमवार तारीख ३ माहे जुलई सन १९११ इ०


रुक्कुठार.
— ह्या अप्रतिम
ग विकार—
ं गळणें,
नाट रोग
शांत
त्यानें
नें,

## वर्गणीचे दर

आकोल्यांतील लोकांस........१ रुपया
बाहेरगांवीं ट. हां. ........ २ रुपये
वर्गणी आगाउच घेण्याची वहिवाट ठेविली आहे.

## नोटिशींचे दर

दर ओळीस दीड आणा.

होर्डिंगच्या दोन ओळी धरल्या जातील नोटीस मुद्राच्य असली पाहिजे.

सूचनाः— गुरुवारच्या आंत येणाऱ्या नोटीसा त्याच आठवड्यांत घेतल्या जातील; यापुढें येणाऱ्या नोटिसास स्पेशल चार्ज पडेल


### जाहिरात

**मुंबई ब्यांकेची सेव्हिंग ब्यांक.**

ह्या बँकेंत खालीं दिलेल्या अटीवर ठेवी ठेवितां येतात.

कोणत्याही वर्षाचे १ ले जानेवारी आणि ३१ दिसेंबर याच्या दरम्यान एक हजार रुपये पर्यंत पैसा ठेविला जाईल.

ठेवी दोन अथवा अधिक इसमांच्या नांवावर ठेवतां येतील आणि तो पैसा त्या पैकीं एकास अथवा जास्त इसमांस अगर त्यापैकीं मयताचे मागें राहील त्यांस काढतां येईल.

व्याज दर साल दर शेंकडा तीन रुपये याप्रमाणें दिलें जाईल. व्याजाची आकारणी प्रत्येक महिन्याची जी कनिष्ठ शिल्लक असेल तिजवर केली जाईल. मात्र पांच हजारांवरील शिल्लक रकमेस व्याज नाहीं. नियमांच्या प्रती बँकेंत अर्ज केला असतां मिळतील.

मुंबई ब्यांक
आकोला ९।९।०९ G. A. Phillips.
एजंट
नं. १

## मुंबई बँकचें सोनें.

मुंबई बँकचा छाप असलेल्या उत्तम कसाच्या सोन्याच्या चिपा मुंबई बँकच्या आकोले व उमरावती येथील ऑफिसांत विकत मिळतील. गिऱ्हाइकानें जास्त माहिती कारितां बँकेंत तपास करावा.

एका चिपचें वजन २६ $\frac{२}{३}$ तोळे असतें. साधारण भाव वऱ्हाड समाचार वर्तमानपत्रांत बाजारभाव ह्या सदराखालीं सांपडेल.

मुंबई बँक
आकोला २१-९-१० G. A. Phillips.
एजंट.
नो० न० २


## यंदाचा पाऊस.

यंदा पावसानें लवकरच कंबर बांधल्यामुळें ओला चारा लवकर मिळूं लागेल यांत शंका नाहीं. तथापि तुमच्या गुरांना आतां पासूनच ओला चारा वालणें अपायकारक आहे. कारण पुढें कदाचित पावसानें ओढून धरल्यास हिरवा चाराही नाहींसा होणार आणि हिरव्याची चट लागल्या मुळें वाळलेला कडवा गुरें खाणार नाहींत. बरें ओली वैरण पहिल्या पासूनच मुबलक मिळाली तरी ती एकदम गुरांना सुरु केली असतां ती त्यांना पचत नाहीं. याकरतां या वेळींच वाळलेल्या कडब्याचे अगदीं बारिक तुकडे करून त्यावर मिठाच्या पाण्याचा शिडकाव घाल तर तुमचीं गुरें फार गोडीनें वैरण खातील. या कामा साठीं आमचें सुधारलेलें कडबा कापण्याचें यंत्र वापरा. कारण आमचें यंत्र शेतकऱ्यांनीं, गवळ्यांनीं व पागा आफिसरांनीं ही पसंत केलें आहे. किंमती बद्दल विचाराल तर फक्त १० रु. ९ आणे पडतात.


किर्लोस्कर बंधु,
किर्लोस्करवाडी.
नो. नं २६० पोष्ट कुंडल (सातारा.)

श्री राधावल्लभाजयति

## वर्षफल।

हमारे पास सिर्फ १ पोस्टकार्ड पर किसी फल या फूल का नाम लिख भेजो हम आप के एक वर्ष का सुख, दुःख लोभ, हानि, जीवन, मरण, रोग, सन्तान, तरक्की, मौकूफी, व्यापार में किस वस्तु से लाभ होगा दिसावरी काम में कैसा लाभ होगा और जो महीना हानिकारक उस का उपाय महीनेवार वर्षफल वी० पी० द्वारा ॥ रुपये में भेज देंगे. हमारे हांय जन्म पत्रादि उत्तमोत्तम बनते है, अनेक प्रशंसा पत्र मौजूद हैं, विशेष परिचय के अर्थ ॥ आना का टिकट भेज कर सूचीपत्र मंगो लीजीये.

मिलने का पता:—
गोस्वामी राधामोहन शर्म्मा
चित्तीखाना आगरा.

✻ इकडे लक्ष द्या! ✻

## नाग, नरसे व पिठोरी

आम्ही येथें विक्रीकरितां नग, नरसे, जिवत्या, पिठोरी, पाठोडा, गणपती बुध, बृहस्पती व तुळशीचें लग्न वगैरे चित्रांचे कागद फारच सुरेख छापले आहेत. चित्रें दर शेंकडा १ रुपया. चित्रें पांचशें घेतल्यास दर शेंकडा ॥४ आणे प्रमाणें देऊं.

बाळकृष्ण अनोबा दलाल,
कंपॉझीटर वऱ्हाडसमाचार
अकोला.
( पत्रें विठ्ठलमंदीराच्या पत्त्यावर पाठवावीं. )


## नोटीस.

नोटीस बेशमी रहिमानशा वल्लद बुवशा फकीर रा० मौजे ल प्रग० दहिहांडा तालुका आकोट जिल्हा आकोला यांसः—

खालीं सह्या करणार रा० मौजे रेल प्रगणें दहिहांडा ता० आकोट यांजकडून या नोटिशीनें कळविण्यांत येतें कीं आम्ही व तुम्ही मिळून तिघे सापत्न बंधु असून आपला बाप ता० २४-९-११ इ० रोजीं मरण पावला तों पावेतो आपण सर्वत्र एके ठिकाणीं असून सर्व स्थावरजंगम इस्टेट एकत्र वहिवाटींत आलों. हल्लीं तुमचा इरादा जिन्नगांची अफरातफर करण्याचा दिसत आहे. तरी खालीं लिहिलेल्या इस्टेटीपैकीं आमचे दोघांचे हिस्से देऊन शिवाय आमचे आईचा हिस्सा मुसलमान शराप्रमाणें भागून द्यावा. इस्टेटीचा तपशीलः—

१ मौजे रेल प्रगणें दहिहांडा ता० आकोट येथील

| शेत सर्वे नं. | एकर गुंठे | आकार | हिस्से |
|---|---|---|---|
| ९७ | ३१ | ९६ | सालीम |
| १४६ पैकीं | १९।१७ | २६॥। | सालीम. |
| २०३ | २९।८६ | ५६ | यांतील पाव हिस्सा |

२ कजबे टाकळी ता० आकोला येथील अजमासें ८ तिफनचें शेत.

बैलांच्या जोड्या २ अजमासें किंमत १५० रुपये, म्हशी २ अजमासें किंमत १२९ रुपये, गाई ४ व गोऱ्हा १ अजमासें किंमत १२९ रुपये, घर १ खांब १८ वर कवेलुचे माडीमुद्धां व ओसरी कवेलुची. घर २ घोडनाटी खांब १२ वर कवेलु समेत व याशिवाय कोठे व बाहेरील खुल्या जागे समेत. रोख नगदी रुपये ६०००, व सोन्याचांदीचे दागीने किंमत रुपये १०००, गहाण मालाचे डागिने किं० १०० रुपये, रोखे १००० रुपयांचे या सर्व इस्टेटीच्या चार पंचा समक्ष नोटीस पावल्यापासून आठ दिवसांचे आंत हिस्सेराशीप्रमाणें वांटण्या करून द्याव्या. असें न केल्यास कोर्टमार्फत दावा करून आम्ही आपले इस्टेटीचा भाग व या नोटिशीचा खर्च तुमचे पासून भरून घेऊं. वर लिहिलेली स्थावरजंगम इस्टेट तुमचा आमचा निकाल होईपर्यंत कोणास खरीदी अगर पट्ट्यानें देऊं नये. दिल्यास आमची सम्मती नसल्यामुळें तें रद्द समजलें जाईल. कळावें ता० २८-६-११ इ.

दस्तुर त्र्यंबक पांडुरंग कुळकर्णी, रेल
सह्या
१ अकबरशा वा महेबुबशा ८० खु०
२ कादरशा वा महेबुबशा नि० खु०
नो. नं. २६४

## नोटीस

रा० सुकदेव वल्लद बापुसा पाटील राहणार मौजे आवार ता० जळगांव यांसः—

खालीं सही करणार बाबन वल्लद राघोजी पाटील राहणार किनखेड ता० अकोट नोटीस देतो कीं तुम्ही माझे गांवीं दिपवाळीचे सुमारास माझ्या लग्नाचे बायकोस नेण्याकरितां आले होते. त्यावेळेस म्यां कांहीं घरगुती कारणासाठीं पाठविलें नाहीं तुमची इतराजी होऊन तुम्ही मी घरीं माझ्या बायकोस तिच्या चिजा-द्दां घेऊन गेला. त्यावर मी १।२ ण्यास तिला आलों असतां तुम्ही देण्य पाठवीत नाहीं व तिची माझी बाळापू देत नाहीं. तिच्या मनांतून ४२ या र करण्याचा असतां तुम्ही अनंदा इचे कमीपणा दाखवून माझ्याशीं याचा प्रत्ये रण्याचें आरंभिलें आहे. निमे हिस्सा अ मैनें कळावितों कीं, तिला शेतांतील निमे हिस्स ८ दिवसांत माझे अजमासें दोन वर्षे तर तिचा काय-७ पिकें ताबेगहाणाचा तुमच्यावर फिर्याद वहितीस दिला होता तिवाईक सबब रुपये तुम्ही आम्हास नगद ख २८ माहे केलें असून त्याप्रमाणें तुम्ही दिली नाहीं व गहाणदाराचा। नाहीं. सबब आम्ही सदर्हू दोन्ही ८० खु० $\frac{१}{२}$ हिस्सा शामराव सखाराम व तुकाराम या दोघांस ताबेगहाणाच्या अ त्याच्या गहाणाची रक्कम रुपये ९०० रोख रजिस्टर समोर ७०० मिळून १६०० रुपयांस खरेदी दिला आहे दोन्ही शेतांत आमचा $\frac{१}{२}$ हिस्सा असतां, सबंध शेता बद्दल तुम्ही शामराव व तुकाराम यांजवर दावा आणला आहे असें आम्हास हल्लीं समजतें त्यावरून तुम्हांस कळवितों कीं तुम्हास आम्ही वर लिहीलेलीं शेतें कौलपट्ट्यानें वहितीस देण्याचा दस्ताऐवज केला असतां तुम्ही विश्वासघातानें आमच्या पासून खरेदी करून घेतलीं आहेत असें हल्लीं आम्हास समजलें आम्हांस रकम मुळींच पावली नाहीं. व खरेदी देण्याचा मुळींच संबंध नाहीं. तुम्हास कौलपट्ट्यानें वहितीस देण्याचा कागद आम्ही करून दिला. तुम्ही केलेली खरेदी निवळ खोटी व बनावट आहे कारण आमचा निमे हिस्सा असता सबंध शेताचा हक्क आम्हास मुळींच नाहीं. तुमची खरेदी रद्द असून त्या खरेदीच्या आधारें तुम्ही दावा वगैरे करून सेताचा ताबा घ्याल तर तुमच्यावर विश्वासघाताबद्दल योग्य तजवीज करणें भाग पडेल व जी जी आमची नुकसानी होईल ती तुमच्या पासून नोटिशीच्या खर्चा सह व कोर्ट खर्चा सह भरून घेतली जाईल कळावें तारीख इसवी. २७-९-११

सही
माणिक वल्लद मारुती ताले
कुणबी मराठे
रा. कळंबेश्वर ता. वाशिम नि. खुद
बनाई मर्द मारुती
ताले रा. कळंबेश्वर नि. खु.

नो. नं. २६९

धर्माचे नांवा खालीं ...समाजातील व्यक्तींवर जो जुलूम होत आहे, अपमान व ... समजुतीनें होणारे दुष्परिणाम, त्यामुळें ... णारा कालाचा राष्ट्रीय उत्साहाचा, बुद्धिमत्तेचा, शक्तीचा वगैरे जो ... आहे त्याचा आह्मी विचार के... काय? सुधारलेले देशांतील लो... सारखी श्रेष्ठता मिळन, श... व्हावें ह्मणून धर्मसभा भ... आमचे येथील प्रकार ... आमचे धर्मकृत्यांत रुळ... नाहीं. आमचे मध्यें आग... कुलाचार, धार्मि... रु०- इतकीं कांहीं ...रांतील ४ आह्मांस वि... पुष्कळ दूर नाहीं. ...ना सोडून दिलें

...न हे खुनी इसम वंची अर्जे आहे. शेणकोटा ...घरांची झडती घेण्यांत ...व्यवहार सांपडला त्यावरून ... तिनवेलीच्या कटांत सामील सुगावा लागला. रिव्हॉल्व्हरचा ...० आहे. परंतु हे रिव्हॉल्व्हर को-...याचा मात्र पत्ता लागत नाहीं. ...जे कित्येक इसम अटकेंत आहेत ...मॅजिस्ट्रेटपुढें ओळख पटाविण्यात येत आहे. ...चाको बॅरिस्टर ॲट लॉ हे ता. २६।६।११ रोजीं मद्रासहून येथें येऊन पोंचले, परंतु त्यांजकडून विशेषशी माहिती मात्र मिळाली नाहीं. खून होण्याचे आदले दिवशीं मि० चाको हे संध्याकाळीं मन्याचीं येथें आले. परंतु त्यांस पुढें जावयाचें असल्यामुळें ते मन्याची येथेंच तुतिकोरिनकडून येणार असलेल्या मेलची वाट पाहत खून झाला ते दिवशींपर्यंत राहिले होते. बंदुकीचा आवाज ऐकतांच मि० चाको हे मि. ॲश यांच्या डब्याजवळ आले व शक्य ती मदत त्यांनीं केली. शेणकोटा येथें पकडण्यांत आलेल्या अलगाप्पा पिले नांवाच्या इसमास काल रोजीं तिनवेली येथें आणण्यांत आलें. त्याच्या घरांत कांहीं पत्रव्यवहार सांपडला परंतु तो स्वतः फरारी झाला होता. पोलिसांनीं अखेर त्याचा पत्ता लावला व त्रावणकोर संस्थानांत पंबुली गांवाजवळ वडगराई येथें त्यास पकडण्यांत आलें. वडगराई यथील मुनशीचे घरांत आरोपी आहे असें पोलिसांस कळल्यामुळें पोलिस मुनशीकडे गेले. परंतु अलगाप्पा हा चार दिवसांपूर्वीच आमचे कडून गेला असें मुनशी यानें सांगितलें. पोलिसांनीं सारा गांव शोधला तेव्हां आरोपी आंब्याच्या एका झाडावर लपून बसलेला आढळला. वडगराई येथें पत्रव्यवहार सांपडला असून त्यावरून पाहतां अलगाप्पा याचें या प्रकरणांत बरेंच अंग असावें असें दिसतें.

✓ नाशिक येथील गुप्त कटांतील आरोपी विनायक दामोदर सावरकर यास जन्मठेप काळे पाण्याची शिक्षा झाली होती. ता. २७।६।११ रोजीं सकाळीं आरोपी सावरकर यास मुंबईहून मद्रास येथें आणून येऊन दुपारीं स्टीमर" महाराजा " बोटीनें अंदमान बेटांत पाठविण्यांत आलें. सावरकर याची प्रकृति चांगली आहे.

**आकोला** · २६ च्या तारे...र्थे व ईशान्य हिंदु-...गपूर व ओरिसा हे प्रांत अपर... व ...भागांत साधारण ...ला आहे. पश्चिम ... दक्षिणेकडील अर्ध्या भागांत पाऊस पडला आहे. पुढील ठिकाणीं पाऊस आहे:—पोर्ट ब्लेअर ... डायमंड आयलंड दीड इंच. खुशाब ... इंच, लुधियाना व सियालकोट अर्धा इंच. हिंदी महासागरांत गेल्या आठवड्यांत मॉरिशस येथें हवेवरील दाब वाढल आहे. व सेचेलिस येथें वारा नेहमींपेक्षां मंद वाहत आहे. ही स्थिति हिंदुस्थानांतील पावसाळयास प्रतिकूल आहे.

गुजराथेंत गेल्या बारा दिवसांत कोठेंही पाऊस पडला नाहीं. व पाऊस पडण्यासारखी अनुकूल परिस्थिति दिसत नाहीं. शेतकरी लोक चिंताग्रस्त झाले असून पावसाची सारखी मार्गप्रतिक्षा करीत आहेत.

पुणें येथें एक आठवडा पर्यंत पाऊस बंद होता. तो गेल्या रविवारीं रात्रीं पुन्हां पडला. अधिक पाऊस पडण्याचीं चिन्हें दिसत आहेत.

ब्रह्मदेशांतील कापडाच्या एकंदर चार कंपन्यांना नुकसान आलें असून पूर्वी अदमास केल्यापेक्षां या व्यापाऱ्यांना आलेली बूड मात्र थोडी अहे असें ता. २८ रोजीं मिळालेल्या बातमीवरून समजतें. बूड आलेल्या कंपन्यांचीं नांवें मेसर्स हरिदास गोपाळ क्रिस्तो, मेसर्स भैरवचरण खेत्रा, मोहम बिसूर, मेसर्स कनयालाल व गणेशदास जयराम हीं असून यांपैकीं पहिल्या तीन कंपन्या बंगाली गृहस्थांच्या असून चौथी मारवाडी कंपनी आहे पाहिल्या दोन कंपन्या कापड व हुंडीचा व्यवहार करीत- व त्यांना आलेल्या बुडीची रक्कम १२ लखांची आहे. तिसरी कंपनी जी भैरवचरण खेत्रा, त्या कंपनीस ७ लाखांची बूड आली असून कनय्यालाल बिसून या कंपनीस ४ लाखांची बूड आली आहे. मारवाडी कंपनी जी गणेशदास जयराम या कंपनीस ९ लाखांची बूड आली आहे. वरील कंपन्यांना ही इतकी बूड कां आली असा प्रश्न एका मारवाडी व्यापाऱ्यास केला असतां स्वदेशी चळवळीच्या उगमापासून परदेशीं कापडाचा व्यापार जवळ जवळ आंतबट्टयाचा आहे असें त्यानें उत्तर दिलें. वरील कंपन्या बुडण्याचेंही हेंच कारण होय, असें यावरून सिद्ध होतें.

प्रोम येथील मा था सा नांवाची एक ब्रह्मी स्त्री कलकत्ता मेडिकल कॉलेजांत होती, ती या वर्षी एल. एम्. ॲन्ड एस. च्या. परिक्षेंत विजयी झाली. एल. एम. ॲन्ड एस. पास होणारी हीच पहिली ब्रह्मी स्त्री होय.

डाका येथील एक बातमीदार लिहितो मयत इसम सब इन्स्पेक्टर राजकुमार राय हा डाका जिल्ह्यांतील विक्रमपूर गांवचा राहणारा. तो आपल्या कामांत फार हुषार असल्यामुळें त्यास खून झाल्याच्या दुसरे दिवशींच इन्स्पेक्टर ऑफ पोलिसच्य जागीं नेमण्यांत येणार होतें. खून झाला त्या ठिकाणीं रेल्वेस्टेशनहून पांचसात मिनिटें जावयास लागतात व ती जागा जुबिली घाट ठाण्यापासून अगदीं जवळ आहे. जूबिली घाटाचे उत्तरेस ब्रह्मपुत्रा नदी असून ती पाण्यानें तुडुंब भरली आहे. जुबिली घाटाचे दक्षिणेकडे एक रस्ता असून त्या रस्त्यावर पुष्कळशीं घरें व कांहीं खाणावळी आहेत. घाटाचे पश्चिमेकडे जवळच तीन रस्ते मिळाले आहेत, पैकीं एक रस्ता स्टेशनकडे ज... खुनी इसम बोटींत बसून पळाला असावा असें दिसतें. कोणी ह्मणतात ते आगगाडींतून गेले असावे. खून झाला त्या ठिकाणीं उजेड नीट नव्हता त्यामुळें खुनी इसमास चांगलें फावलें.

इंग्लडच्या किनाऱ्यांशीं व्यापार करणाऱ्या बोटीच्या मालकांपैकीं ४७ कंपन्यांच्या प्रतिनिधींची आज सभा होऊन खलाशांच्या व मजुराच्या वेतनामध्यें वाढ करण्याला कारण दिसत नाहीं असें त्यांनीं ठरविलें. पी. ॲंड. ओ. कंपनीच्या टिल्बरी येथील बोटीवर पूर्वीच्याच पगारावर कार्टर मास्तर या हुद्याचे लोक लावण्याचा प्रयत्न करण्यांत आला. परंतु तो पगार घेण्याचें नाकारण्यांत आलें असून ते लोक संपांत सामील झाले अद्यापि पी. ॲंड. ओ. तील लोक संपांत सामील झाले नव्हते.

ता० २९ रोजीं सकाळीं कलकत्त्यांतील बोबझार स्ट्रीटमधील एका मिठाईच्या दुकानास आग लागून अर्धें आधिक दुकान जळून गेलें. मिठाई करण्याच्या भट्टीजवळ पडलेल्या लांकडांनी एकदम पेट घेतल्यानें ही आग लागली होती. आग विझविणारे बंब तावडतोब आल्यानें या आगीचा विशेष प्रसार झाला नाहीं. बंबखात्याचे इंजिनीयर मि· फ्रेडरिक्स हे वरील आग विझविण्यासाठीं दुसऱ्या मजल्यावर गेले असता 'रसगुलास' नांवाच्या प्रसिद्ध बंगाली मिठाई तयार करण्याच्य कढईत ते पडले. ही कढई त्या वेळीं विशेषशी गरम नसल्यानें मि फ्रेडरिक्स यांस विशेष इजा झाली नाहीं·

डाका येथील इन्स्पेक्टराच्या खुना संबंधींच्या खटल्याचा निकाल देतांना कलकत्यांतील हायकोर्टाचे जज मेसर्स वुडरॉफ व कार्नडफ यांनीं पोलीस ठाण्यावरील खुनाची नोंद व आरंभीं मिळालेल्या बातमीसंबंधींचा रिपोर्ट यांवर जी टीका केली होती, त्यासंबंधानें चौकशी करण्यासाठीं एक कमिशन बसलें असून डाका येथील कमिशनर व पूर्व बंगालचे पोलीस इन्स्पेक्टर जनरल यांची या कमिशनमध्यें कमिशनर या नात्यानें नेमणूक झाली आहे.

'चित्रमय जगत्'या मासिकाचा जूनचा अंक नुकताच आला. त्यांतली पुरवणी श्रीमंत चक्रवर्ती पंचम जॉर्ज व महाराणी मेरी यांच्या तसबिरांची आहे. या तसबिरा फार चांगल्या सुबक आहेत. हें मासिक उत्तरोत्तर फार चांगलें निघूं लागलें असून यांत मध्यंतरीं येत असलेले शास्त्रीय विषयावरील सचित्र लेख पुनः येऊं लागतील असा आह्मांस ... आहे.

## स्फुट विचार.

आपलाच दाम खोटा तेथें दुसऱ्यास नांवें ठेऊन काय उपयोग. विहिरींत असेल तरच पोहोऱ्यांत येईल. जो उठला तो सरकारास नांवें ठेवतो. नाचायास येत नाहीं अंगण वांकडें. आमच्या नित्य व्यवहारांत सरकारशीं संबंध नाहीं अशा थोड्या गोष्टी आहेत काय? आमच्य धर्मक्रिया, आमची सामाजकि सुधारणा, आमचा नित्य साधारण व्यवहार या सर्व गोष्टींशीं सरकारचा प्रत्यक्ष काय संबंध येतो? आह्मी आमचे शास्त्रानुसार पंचपंच उषःकालीं उठून नित्य कर्में केल्यास आह्मावर कांहीं सरकारी आरोप येईल काय? आह्मी आपले धर्मग्रंथ वाचून त्यांचे रहस्यानुरूप वागल्यास आह्मास प्रतिबंध, कोण करणार आहे? ब्राह्मण, क्षत्रियादिकांचे जे आश्रमधर्म श्रीमद्भगवद्गीतेंत सांगितले आहेत त्यांजकडे लक्ष देऊन कोणी वागण्याचें मनांत आणील तर त्याजवर सरकार खचीत जुलूम करणार नाहीं. आमच्या धर्माचाऱ्यास तुह्मी आपलें कर्तव्य करूं नका. असें कोणी सांगितलें आहे? तुह्मी आपले पोटभेद विसरून जाऊन परस्परांशीं रोटीव्यवहार व बेटीव्यवहार सुरुं करू नका म्हणून सरकारी कायदा झाल्याचें ऐकीवात नाहीं. धर्माचे नांवावर निरनिराळ्या पंथवाल्यानीं परस्परांचीं डोकीं फोडावींत असें कोठें सांगितलें नाहीं. आह्मी श्रेष्ठ व इतर सर्व नीच त्यांचा स्पर्श देखील होऊं नये, परमेश्वराचे आवडते आह्मी, आह्मी पूज्य, आह्मासच सर्वांनीं मान दिला पाहिजे, वेदोक्त कर्माचा अधिकार ब्राह्मणासच, इतरास नाहीं, देवळांत देवापाशीं जाऊन पूजा करण्याचा अधिकार ब्राह्मणाखेरीज इतरास नाहीं. इतराचा स्पर्श झाल्यास देव विटाळतो, भ्रष्ट होतें, अत्यंजाचे सावलीनें देखील विटाळ होतो मग स्पर्श होणें दूरच. या सर्व गोष्टी काय कोणा परक्याचे जुलुमापासून उत्पन्न झाल्या आहेत. ? खचीत नाहीं त्य स्वयंभु नसून अगांतुक आहेत. त्या मनुष्य प्रयत्नानें व सम्यग्ज्ञानानें जाणाऱ्या आहेत. कालवर्तमानास आचारानुरूप नसल्यामुळें आमचा सर्व धर्माचार अत्यंत वेडगळ असा झाला आहे. खरी परंपरा चुकून अंधपरंपरा लागली आहे. ज्या गोष्टीचे अवलंबनानें चारी पुरुषार्थांची प्राप्ती होते तीच गोष्ट, परंतु तिचें रहस्य विसरल्यामुळें तिचा परिणाम सर्व नाशास कारणीभूत होत आहे. आह्मी धर्मभोळेपणाच्या समजुती उराशीं धरून अपाणास सुधारलेल्या जगांत वेडगळ' म्हणवून घेत आहोंत. 'व्यतिपात किंवा अमावास्या याचे वादांत आह्मांमधील उत्तम डोकीं खर्ची पडत आहेत. शंकरउपासना श्रेष्ठ अथवा शक्तिउपासन श्रेष्ठ या भांडणांत आमचे मधील अनेक भक्त मंडळी बळी पडत आहेत. ज्ञानोत्तर कर्म आहे,अथवा अक्रियता चांगली , याबद्दल श्रेष्ठ श्रेष्ठ वेदांती काथ्याकूट करतांना दिसून येतील. कोणी ह्मणेल शमदमादी झाल्याची सहज लक्षणें आहेत तर कोणी ह्मणतो, ज्ञानी कोणत्याही स्थिति विशेषानें बांधला नाहीं तो सर्व करून अकर्ता आहे.

धर्माचे नांवा खालीं समाजातील व्यक्तींवर जो जुलूम होत आहे, अपरा व भ्रष्ट समजुतीनें होणारे दुष्परिणाम, त्यामुळें होणारा कालाचा राष्ट्रीय उत्साहाचा, उत्तम बुद्धिमत्तेचा, शक्तीचा वगैरे जो ऱ्हास होत आहे त्याचा आह्मी विचार केला आहे काय? सुधारलेले देशांतील लोक सर्व धर्मास सारखी श्रेष्ठता मिळन, शांतीचें साम्राज्य व्हावें ह्मणून धर्मसभा भरवीत आहेत, परंतु आमचे येथील प्रकार निराळा. आह्मास आमचे धर्मकृत्यांत राष्ट्रीय संघटनेचें भानच नाहीं. आमचे मध्यें अकारण व व्यर्थ असे कुलाचार, धार्मिक कृत्ये, धर्मसमजुती इतकीं कांहीं अनावर झालीं आहेत कीं आह्मांस विचार करण्यास उसंतच मिळत नाहीं.

ह्या वेडगळ समजुतीनें राष्ट्राची प्रगति न होता राष्ट्र अधोगतीस जात आहे. ही अधोगती थांबविण्यास परक्याची मदत फारशी कामीं येणार नाहीं. याचा विचार ज्याचा त्यानेंच केला पाहिजे. उसनें धन फार दिवस टिकत नाहीं. " आत्मैवह्यात्मनो-बंधुरात्मैव रिपुरात्मनः " आपणच आपले मित्र व शत्रु आहोंत.

स्पष्टवक्ता.

---

वऱ्हाडसमाचार

आषढ शुद्ध ७ शके १८३३ दुर्मतिनाम संवत०

---

## मुलकी खात्याचा रिपोर्ट

आमच्या प्रांताच्या मुलकी ( रेव्हेन्यु ) खात्यानें सन १९०९-१० सालांत केलेल्या कामाचा रिपोर्ट नुकताच प्रसिद्ध झाला आहे. आमच्या प्रांताचें मुख्य जीवन ह्मणजे शेतकी आणि शेतकीचा मुख्य संबंध मुलकी खात्याशीं असल्यामुळें या खात्याच्या अधिकाऱ्यांचे रिपोर्ट हे सामान्यतः या प्रांताच्या देशस्थितीचें मापक यंत्रच होत- निदान सरकारी अधिकारी तरी तसें समजतात. तेव्हां या देशस्थिति मापक यंत्रांतला पारा किती डिग्री उंच किंवा खालीं गेलेला सरकारी अधिकाऱ्यांच्या नजरेस दिसला आहे तें पाहणें हा एक अत्यंत महत्त्वाचा विषय समजून आज या रिपोर्टातली ठळक माहिती देत आहों. ही माहिती देतांना ज्या रिपो... सर्वांशीं भिस्त आहे तो मे० कमिशनरसाहेब प्रांत वऱ्हाड यांनीं लिहिलेला असून त्याचें पर्यालोचन मे० फायनान्स कमिशनरसाहेब यांनीं केलेलें आहे. या दोघाही अधिकाऱ्यांच्या मत रिपोर्टचें ह्मणजे गतसाल अत्यंत भरभराटीचें होतें. पाऊस पुष्कळ आणि अगदीं वक्तशीर पडल्यामुळें आबादी झाली. शेतकऱ्यांची मुद्रा प्रफुल्लित झाली. सरकारी वसूल ही चांगला झाला. लोक समाधानांत राहिले. हें समाधान राहण्याला दुसरें एक कारण असें झालें कीं या वर्षी रयत आणि सरकारी अधिकारी यांच्यांत उत्तम प्रकारचा सलोखा राहिला. ही गोष्ट जशी सरकारी अधिकाऱ्यांना संतोषकारक वाटत आहे तशीच ती रयतेलाही वाटत आहे, इतकेंच नाहीं तर असाच सलोखा सतत कायम राहो आणि मध्यंतरीं एकदोन वर्षें जशीं खराब आणि अधिकाऱ्यांना शंकाग्रस्त आणि रयतेला चिंतायुक्त करणारीं गेलीं तशीं पुनः कधीं न येवोत अशी सर्वांची परमेश्वरास प्रार्थना आहे. ही समाधानकारक स्थिति होण्यास काय कारणें झालीं आणि दडपशाहीचा अंमल लोकांच्या मनाची बिघडलेली घडी पुनः बसविण्याचे कामीं कितीसा यशस्वी होत असतो या गोष्टीची मीमांसा करून आह्मी आपली जागा अडवीत नाहीं. आमचें येवढेंच सांगणें आहे कीं वऱ्हाड-प्रांतांत तरी राजद्रोह किंवा असंतोषवृत्ति ही एखाद्या महासागरांतल्या तरंगासारखी केवळ वरवर आाण ती ही कांहीं व्यक्तींपुरती होती. समुद्राच्या पृष्ठभागावर कोठें एकादे ठिकाणीं क्षुब्धता दिसली ह्मणजे त्यावरून त्या सागराच्या गंभीर शांतस्वरूपाला जसा बाध येत नाहीं, तसें यवतमाळ किंवा दुसऱ्या एकदोन ठिकाणच्या पांचचार व्यक्तींनीं केलेल्या कृत्यांमुळें एकंदर प्रांतांच्या शांततामय परिस्थितीला बाध येऊं पावत नाहीं. शांतता आणि समाधान हा आमच्या प्रांतासंबंधाचा सर्वत्रिक नियम आणि अशांति हा अपवाद समजला पाहिजे. लोकांच्या मनांत सरकारी अधिकाऱ्यांविषयीं विशेष प्रेम उत्पन्न होण्यास आणखी एक कारण अलीकडे झालें आहे. मुंबईप्रांतीं जसें शेतकीखातें लोकांना जवळ बोलावून आणि त्यांना सर्व प्रकारें मदत देऊन शेतकीसुधारणेसाठीं अविश्रांत श्रम करीत आहे, त्याचप्रमाणें आमच्या आकोल्याच्या प्रयोगक्षेत्रांत शेतकीखात्याकडून शेतकऱ्यांना जें शिक्षण मिळत असतें त्यावरून सरकारी अधिकारी ह्मणजे आमचे हितकर्ते, खरे कळकळीचे मित्र व गुरु होत अशी रयतेची समजूत होऊं लागली आहे. अधिकारी ह्मटला ह्मणजे तो अर्वाचीन काळांतला निष्ठुर पेंढारी अशी जो समजूत कित्येक दुष्टबुद्धि लेखकांनीं व वक्त्यांनीं करून ठेविली होती ती पार मावळून त्यांच्याविषयींचें रास्त मत विजयी होत चाललें आहे हें पाहून कोणालाही समाधानच वाटेल. हिंदु व मुसलमान यांच्यांत इतर प्रांतांमध्यें कितीही तीव्र द्वेष असला तरी आमच्या वऱ्हाड प्रांतांतले या दोन्ही जातींचे पुढारी समंजस असल्यामुळें त्यांच्यांत सहोदरभाव पूर्णपणें वसत आहे. आमच्या प्रांतांत मास्लेम लीगचें बंड माजूं शकलें नाहीं हीच या गोष्टीची मोठी साक्ष आहे. सारांश, रयत आणि सरकार यांच्यामध्यें किंवा रयतेंतही हिंदु आणि मुसलमान या जातींमध्यें जो प्रेमसंबंध आहे तो कायम राखण्याची सर्वांची मनापासून इच्छा आहे. या समाधानकारक स्थितीविषयीं अभिनंदन करतांना मे० चीफ कमिशनरसाहेब यांनीं जे उद्गार काढले आहेत ते आमच्यांतल्या सुशिक्षित मंडळीनें विचार करण्यासारखे आहेत. शेतकऱ्यांची स्थिति सुधारणें हें फक्त सरकारी अधिकाऱ्यांचें काम आहे, आपला त्याशीं संबंध नाहीं किंवा आपल्या हातून त्या कामीं मदत होण्यासारखी नाहीं असें समजतां कामा नये. ... काढून त्या कशा ... ह्या अप्रतिम हें उदाहरणानें दाखविणें, विकार- होणारे फायदे लोकांना ... गळणें, बनाच्या पायावर शेतकऱ्यांना ... रोग घेण्याचा मार्ग दाखविणें हें वस्तु शांत क्षितांचें काम आहे. अशा ... त्यानें अवश्यकता या प्रांतीं फार आहे. ... हें काम जिल्हाअधिकाऱ्यांनीं हातीं ... असा इषारा मे० चीफ कमिशनरसाहेबांनीं दिला आहे, तरी तो वस्तुतः सुशिक्षितांनीं आपणांस दिला आहे असें समजून हें काम हातीं घ्यावयास पाहिजे आहे. थोड्या दिवसांपूर्वीं आमच्या पत्रांत को-आपरेटिव्ह क्रेडिट सोसायट्या अथवा परस्परसहायकारी मंडळ्यांविषयीं जी विस्तृत लेखमाला आली होती ती सुशिक्षित बंधूंत या विषयींची जागृति करण्यासाठींच मुद्दाम लिहिली होती. सरकारी अधिकारी आमच्या हिताविषयीं येवढे कळकळीचे प्रयत्न करतात, आणि आह्मी स्वतः मात्र त्याविषयीं उदासीन राहतों ही वृत्ति आमच्या शिक्षणास लाज आणणारी आहे. स्वतःच्या हिताविषयींची प्रवृत्ति अगोदर स्वतःचे ठिकाणींच पाहिजे. निदान दुसऱ्यांनीं तिचा निर्देश केल्यावर तरी माणसानें जागृत झालें पाहिजे. येवढेंही आमच्यानें झालें नाहीं तर गीतेंतल्या 'आत्माह्यात्मनो बंधुरात्माहि रिपुरात्मनः, या वचना प्रमाणें आह्मी स्वतःलाच स्वतःचे शत्रु बनवून घेतल्याचा मूर्खपणा मात्र आमचे पदरीं येईल. असो. वर दर्शित केलेली अत्यंत संतोषकारक स्थिति ज्या अधिकाऱ्यांच्या कळकळीच्या प्रयत्नांनीं घडवून आणली त्यांचा नामनिर्देश केल्यावांचून या लेखाची सांगता व्हावयाची नाहीं. आमच्या प्रांतचे कमिशनर मे० स्लायसाहेब यांना या बद्दलच्या श्रेयाचा मुख्य वांटा दिला पाहिजे. कारण कीं त्यांच्या उत्साहदायी प्रेरणेचा हा सगळा परिणाम आहे. एखाद्या कारखान्यांत ज्याप्रमाणें फ्लायव्हील हें इतर बारीकसारीक चाकांना गति देण्यास अवश्य लागतें, तसें आमच्या प्रांताच्या राज्यव्यवस्थारूपी कारखान्याच्या फ्लायव्हीलचे जागीं मे० स्लाय साहेब हे आहेत. या कारखान्यांतलीं बारीक चक्रें ह्मणजे कर्नल हॉर्सबरोसाहेब, राजश्री जठारसाहेब, मे० क्रॉफर्ड साहेब व त्याचप्रमाणें मेसर्स कीरनांडर, हॅमिल्टन ( वाशीमचे), सोराबजी शापुर्जी, दादीमास्तर, रा० माधो शंकर, गुप्ते, शहामहंमद, मुनीरुद्दीन, चिटणीस, शहामहंमद अब्दुल रहमान, नारगोळवाला इ० होत. या सर्व लहानथोर आफिसरांनीं योग्य प्रकारें बजावलेल्या कामगिरीबद्दल वरिष्ठ अधिकाऱ्यांनीं त्यांची प्रशंसा केलीच आहे, आणि रयतेच्या वतीनें आह्मी ही त्यांचें अभिनंदन करतों, आणि चालू सालाबद्दल लिहितांना पुढच वर्षीही असेच समाधानाचे उद्गार काढण्याचा प्रसंग येवो असें देवाजवळ मागणें मागतों.

## हिंदी पंडितांच्या हक्काचा प्रश्न.

प्राच्यभाषाप्रावीण्यासंबंधानें विचार करण्याकरितां लवकरच सिमला येथें एक परिष- ... खालीं पुराणवस्तुसंशोधनाचे ... झाले. मोठ्या मुष्किलीनें त्यांना ... कल खात्यांत असिस्टंट सुपरिंटेंडेंट ... मिळाली. त्या गोष्टीला तीन वर्षें ... तीन वर्षांत त्यांनीं किती महत्वाचीं ... केलीं, किती नवे शोध लाविले, ... प्रवास केला, वगैरे गोष्टींची साक्ष ... खात्याचे रिपोर्टच देत आहेत. असें असून त्या जागेवर त्यांना अद्याप कायम सुद्धां करण्यांत आलेलें नाहीं; आणि ज्याला संस्कृतभाषेचा गंधही नाहीं अशा एका डच गृहस्थाला मुख्य सुपरिंटेंडेंट नेमलें आहे असें कळतें! एक काळीं एलफिन्स्टन, व डेक्कन कॉलेजांतल्या संस्कृत भाषेच्या प्रोफेसरीच्या जागा अशाच संस्कृत थोडें बहुत नुसतें चावलेल्या युरोपियन पंडितांना देण्याची वहिवाट असे. पण या वहिवाटीवर चांगली चरचरीत टीका चांगल्या सन्मान्य व वजनदार युरोपियनांनीं केल्यापासून सरकारनें त्या जागा लायक हिंदी गृहस्थांना देण्याची पद्धति सुरू केली आहे. तसाच प्रकार या पुराणवस्तुसंशोधनखात्यांतल्या जागांसंबंधानेंही होईल, आणि आज नाहीं उद्यां सरकारचें डोकें ठिकाणीं येऊन हिंदी लोकांचा हक्क ते ओळखतील अशी आमची खात्री आहे. पण हें होई पर्यंत प्राच्यभाषाप्रावीण्याबद्दल शुष्कचर्चा करीत बसणें ह्मणजे निरर्थक कालक्षेप करण्यासारखेंच आहे असें आह्मांस वाटतें.

## नोटीस

रा० सुकदेव वल्लद बापुसा पाटील राहणार मौजे आवार ता० जळगांव यांसः—

खालीं सही करणार बाबिन वल्लद राघोजी पाटील राहणार किनखेड ता० अकोट नोटीस देतो कीं तुह्मी माझे गांवीं दिपवाळीचे सुमारास माझ्या लग्नाचे बायकोस नेण्याकरितां आले होते. त्यावेळेस म्यां कांहीं घरगुती कारणासाठीं पाठविलें नाहीं ... तुमची इतराजी होऊन तुह्मी मी घरीं ... माझ्या बायकोस तिच्या चिजाबस्तां घेऊन गेला. त्यावर मी १।२ ... नेण्यास तिला आलों असतां तुह्मी ... पाठवीत नाहीं व तिची माझी ... देत नाहीं. तिच्या मनांतून ... करण्याचा असतां तुह्मी ... कमीपणा दाखवून माझ्याशीं ... करण्याचें आरंभिलें आहे. ... मैनें कळवितों कीं, तिला ... ८ दिवसांत माझे ... तर तिचा ... तुमच्यावर फिर्याद ...

राह ... अशा ... मार्णे रे... ही जिकडे ... व युरोशियन ... लागलेल्या आहे ... श्रेष्ठ प्रतीच्या ज... अद्याप मिळूं लाग... काय- प्रत्यक्ष उदाहरण रा. ... रकर यांचे आहे. हे ... तिवाईक सबब ... ज्या ह्मणजे डा. भांडारकर ... तारीख २६ माहे

## बिचारा कर्नल प्रेसी !

१०व्या जाट पलटणीचा अधिकारी कर्नल प्रेसी यांची हकीकत वाचून त्यांच्याविषयीं सहानुभूति वाटणार नाहीं असा हिंदी मनुष्य क्वचितच आढळेल. या पलटणींतले कांहीं इसम आर्यसमाजाच्या उपदेशांना व सभांना जात असत. ही गोष्ट सी. आय. डी. खात्याचे मुख्य अधिकारी मि. क्लीव्हलँड यांना कळवून त्यांनीं कर्न

सुख संचारक ... केलेली

...श, ...लुचे ...होत्या. ... कर्नल ... ठिकाणीं ... मिळवून आ- ...वयींच्या सहा- ...ला होता. तीव्र ... कारण झाला. ... एकंदरींत क्षुब्ध झालें ... साहेबांनीं आपलें डोकें ... हा गुन्हा नाहीं तर काय? ... कम्पांडर-इन-चीफ साहेबांनीं यांना शेवटीं राजीनामा देण्यास ... २९ वर्षे उत्तम प्रकारें केलेल्या ...णी ओनण्यास लाविलें, वगैरे ह- ... आणि त्यावर चरचरीत टीका विला...या टुथ-पत्रांत आलेली आहे. विला-पत्रांना सरकारच्या धोरणावर जशी ...पणानें टीका करतां येते तशी हिं...रांना करण्याची मुभा ...नें आमच्या सरल्या ...नीं या विषयीं लिहितांना 'गरीब कर्नल प्रेसी!' इतकें ह्मणूनच बसावें झालें!

---

...लमेंटच्या मेंबरांना पगार देण्याच्या ... बरीच भवति न भवति होऊन अखेर वर्षाचे चारशें पौंड ह्मणजे सहा ... रुपये पगारादाखल देण्याचें ठरलें. सार्वजनिक हिताचें व अतिशय ज...चें कर्तव्य केवळ कर्तव्य ह्मणूनच बांधून करणारा देश पृथ्वीच्या पा... एकटा हिंदुस्थानच राहिला आहे. ...नांत म्युनिसिपालिट्या, लोकलबोर्ड, ...सिट्या, कायदेकौन्सिलें वगैरेचे मेंबरांना पगार ठरवून कामें घ्या अशी सूचना पुढें आणली तर तिला काय उत्तर ...तें सांगावयास नकोच. या उत्त-...मि. रॅमसे मॅकडोनल्ड यांनीं जो ...गीत जबाब दिला आहे तो वाच-...आहे. ते ह्मणतात — 'पगाराची ... ठरविली ह्मणजे मेंबर होण्याचा ... करणारी मंडळी निघेल. होय. ... आहे. पण अशी मंडळी हवी हा ... सध्याच्या स्थितींत गरीबांना मेंबर येत नाहीं. त्यामुळें आस्थेनें काम ...स उत्सुक असलेल्या खऱ्या कर्तृत्ववान् ...तें. पगार ठर-... पुढें येतील, ...स्थानांतून कोतवाली ...शोभिचीं मेंबरें असतात. ... काम करणारीं माणसें ... यांनीं कां होईना पुढें ...ानें देशाचा फायदाच होईल.

---

## हिंदी क्रिकेट टीम.

...तितल्या लोकांशीं क्रिकेट सामने ...साठीं नेलेल्या हिंदी खेळाडूंना आतां ... जो अनुभव आला आहे तो फार ...प्रद आहे. आतांपर्यंत ठळकठळक जे ...चचार सामने झाले त्या सर्वांत हिंदी खेळाडूंची फजीती झाली. हिंदुस्थानांत दहा-पांच वेळां युरोपियन खेळाडूंशीं सामना क-रण्यांत जय पावल्यावरोबर विलायतेंत ही नाव गाजविण्याची जी उतावळेपणाची उ-त्कंठा आमच्या खेळाडूंना लागली होती तिचा फोलपणा चांगला प्रत्ययाला आला. आम-च्या देशांत एखादा चांगला चित्रकार किंवा गवई, नट अथवा, जादूगार जरा वर डोकें काढूं लागला कीं एकदम त्याला हरभऱ्याच्या झाडावर चढविणारे भगत त्यांना भेटतात व त्यांच्या स्तुतिपाठास भुलून ते ही विलायतेस जाऊन विजयश्री संपादण्यासाठीं हुरळून जा-तात. त्यांनीं आमच्या खेळाडूंना आलेला अ-नुभव फार बोधप्रद होईल. या खेळाडूंच्या सामन्या विषयीं लिहितांना एकदोन गोष्टी आह्मांला फार चमत्कारिक वाटतात. या ख-ळाडूंचा ऑक्सफर्ड युनिव्हर्सिटीशीं जो सामना झाला त्यांत राजपुत्र शिवाजीराव गायकवाड यांचें नांव हिंदी खेळाडूंच्या विरुद्ध पक्षांत असलेलें पाहून आह्मांस आश्चर्य वाटलें. हा सामना दोन राष्ट्रांत होता, आणि राज-पुत्र आपल्या विद्यामंदिराविषयींच्या अभि-मानाचे भरांत आपल्या राष्ट्रीयत्वाला विसरले असें ह्मटलें पाहिजे. दुसरी गोष्ट-- आमच्या या खेळाडूंचा जेथें तेथें पराभव झाला असतां तत्संबंधाचीं सिनेमोटाग्राफचीं चित्रें तात-डीनें मागवून एक पारशी कंपनी त्याचा तमाशा मुंबईत दाखवूं लागली आ-गतवर्षी अमेरिकेंत एका नीग्रोनें एका अमेरिकना-ला कुस्तींत चीत केलें त्या प्रसंगाचा देखावा दाखविण्याची हिंदुस्थानांत सुद्धां मनाई झाली होती असें वाचल्याचें आह्मांस स्मरतें. का-रण काय तर अमेरिकन झाला तरी तो गोरा, आणि नीग्रो पडला काळा तेव्हां काळ्यागोऱ्याच्या लढाईंत काळ्याचें वर्चस्व झालेलें दाखविणें हें अशुभ आहे! पण आमच्या पारशी तमासेवाल्याला पैशापुढें शुभ-अशुभ कांहीं दिसत नाहीं. हिंदी खेळाडू-नीं गोऱ्या खेळाडूचा पराभव केला काय किंवा गोऱ्यांनीं काळ्यांना मार दिला काय त्याला सारखेंच! आमच्या लोकांच्या अंगावर-चें स्वदेशाभिमानाचें कातडें किती पातळ आहे तें या उदाहरणावरून चांगलें दिसतें.

---

## देशी अडत.

आमच्या देशाचा विलायतेशीं कापडाच्या व्यापाराचा जो संबंध आहे त्याचें एक समाधानकारक स्वरूप हें आहे कीं परदेशी कापडाच्या आयातीमुळें आमच्या देशांतून बाहेर जाणाऱ्या पैशाचा कांहीं अल्प अंश तरी अडत्यांच्या हातीं जातो आणि या अडत्यांत पुष्कळ लोक आतां देशी आहेत. मुंबईतले म्यांचेस्टरचे अडत्ये बहुतेक बोहरी, खोजे किंवा मारवाडी आहेत. यांची संख्या नक्की किती आहे तें सांगतां येत नाहीं, पण गेल्या दहापांच वर्षांत ती बरीच वाढली आहे हें खास. कलकत्त्याच्या कापडाच्या आयात व्यापाराचे आंकडे प्रसिद्ध झाले आहेत. त्यांवरून असें दिसतें कीं गेल्या बारा वर्षांत युरोपियन अडत्याच्या मार्फत येणारा माल बराच कमी होऊन देशी अडत्यांच्या मार्फत येणारा माल दीडपट किंबहुना पावणेदोनपट वाढला! परदेशी मालाचा खप देशांत वाढणें हें कित्येकांच्या दृष्टीनें देशाचें नष्टचर्य असेल. पण अशा जहाल मताचे लोक सुद्धां हें कबूल करतील कीं परदेशी मालाच्या वाढत्या आयाताची अडत आमच्या लोकांच्या पदरीं ज्यास्त ज्यास्त पडूं लागली तर तो तरी एका दृष्टीनें देशाचा फायदाच ह्मटला पाहिजे. या दृष्टीनें निदान ही गोष्ट सर्वांना अभिनंदनीय वाटावयास पाहिजे.

---

## विवाहाच्या कायद्यांत सुधारणा.

ना. मि. भूपेंद्रनाथ वसु यांनीं विवाहाच्या कायद्यांत सुधारणा करण्याचें जें बिल आणिलें आहे, त्या संबंधानें हिंदुसमाजांतच नव्हे तर इतर समाजांतही चळवळ सुरू आहे. ब्राह्मसमाज, प्रार्थनासमाज किंवा मिश्रविवाह ज्यांस पसंत आहेत असे दुसरे समाज यांना मात्र हें बिल सर्वांशीं पसंत आहे. पण इतर समाजांना हें बिल अत्यंत क्रांतिकारक व भयंकर वाटत आहे. सामाजिक चालीरीतींत सरकारनें कोठपर्यंत हात घालणें योग्य आहे हा प्रश्न सतीचा कायदा, संमति वयाचा कायदा, पुनर्विवाहाचा कायदा वगैरे प्रसंगीं उद्भवून त्याचा निकाल लागला आहे. त्यावरून ज्या ठिकाणीं भूतदयेचा प्रश्न येतो तेथें सरकारनें खुशाल हात घालावा हें तत्त्व बहुतेक ठरल्यासारखें झालें आहे. पण मिश्रविवाहांत भूतदयेचें तत्त्व नाहीं. येथें केवळ सोयीचा प्रश्न आहे, आणि अशा प्रश्नांची व्यवस्था ज्या त्या समाजानें लावावी हेंच इष्ट आहे. ना. मि. वसु यांच्या बिलानें पोटजातींतले बेटीव्यवहार सुलभ होतील असा एक मुद्दा कित्येक पुढें आणतात. पण त्यांत कांहीं अर्थ नाहीं. पुष्कळ पोटजातींतल्या बेटीव्यवहारांना आज सुद्धां धर्माधिकाऱ्यां कडून (श्री शंकराचार्य कडून) परवानगी असतांना ते करण्याचें मानसिक धैर्य लोकांच्या अंगीं नसल्यामुळें ती सुधारणा खोळंबून राहिली आहे. ना. मि. वसु यांचा कायदा पास झाल्यानें अंगीं नसलेलें मानसिक धैर्य येईल अशी जर कोणाची समजूत असेल तर त्याला मनुष्यस्वभावाचें ज्ञान नाहीं असें ह्मणावें लागेल. पोटजातींतल्या बेटीव्यवहाराला कायदेशीर ठरविण्याकरितां अशा कायद्याची मुळींच जरूर नाहीं, आणि आहे अशी घटकाभर कल्पना केली तरी येवढ्याशा सुधारणेकरितां इतका विस्तृत स्वरूपाचा कायदा मागणें ह्मणजे जातक कथेंत सांगितल्या प्रमाणें बापाच्या टाळूवरलें मच्छर उडविण्यासाठीं त्याच्या डोक्यांत कुऱ्हाडीचा घाव घालणाऱ्या मुर्ख पोराचें अनुकरण करण्यासारखें आहे.

---

# वऱ्हाडवृत्त.

**हवामान**-- आर्द्रा नक्षत्र संपत आलें असून पर्जन्य नाहीं. कांहीं कांहीं ठिकाणीं तुरळक पाऊस पूर्वभागा कडून आला. उदयास्ताच्या वेळीं आकाश तांबूस ताम्रवर्ण असतें, वारा वारंवार पडतो व पुनः सोसाट्यानें वाहतो, ढग वरचेवर गर्द जमतात इत्यादि गोष्टींनीं मनाची उल्हासवृत्ती जात नाहीं तथापि आतां पर्जन्या कडे सर्वांचे डोळे एक सारखे वळले आहेत.

रागराई— प्लेग नाहीं. पण उष्मा फार होतो, विहिरींचें पाणी दूषित झालें आहे, व आंबे वाईटसाईट खाण्यांत येतात ह्मणून दोन माणसें पटकीनें मेलीं. या रोगाचा प्रतिकार करण्यासाठीं मुनसिपालिटीचे यत्न जोरानें चालूं आहेत.

रा. रा. एफ. जे. वुडवर्ड आय. सी. एस. आसि. कमि. बुलडाणा यांस जबलपुरास बदलून त्यांचे जागीं रा. रा. डी. सी. आर्कीटेल एक्स्ट्रा असि. कमि. यांस चांद्याहून बुलडाण्यास बदलण्यांत आलें.

आलशान नामदार राजश्री क्रॉडाक चीफ कमिशनर यांची स्वारी पंचमढीहून येत्या रविवारीं निघून पुढील सोमवारीं नागपुरास दाखल होईल.

नागपुरास हस्तकौशल्याचे उद्योग शिकविण्याची जी शाळा निघाली आहे तिच्या हेड मास्तरचे जागीं ३०० रुपये पगारावर रा. रा. इ. कोव्ह यांस नेमण्यांत आलें.

रा. रा. मीरअनवरअली एक्स्ट्रा असि. कमि. माजिस्ट्रेट वर्ग १ यांस समरी माजिस्ट्रेटिचे अधिकार देण्यांत आले.

रा. रा. भगवतीचरण दुबे आसि. इंजिनिअर वर्ग २ आकोला पश्चिम वऱ्हाड यांस गेल्या एप्रिलपासून वर्ग १ ची बढती देण्यांत आली.

खांडवा-आकोला-वाशीम रेल्वेसंबंधाच्या पूर्व तयारीचीं कामें झपाट्यानें चालू आहेत. ही रेल्वे लवकरच उभारण्यांत येणार आहे.

रा. रा. केशवराव दिक्षीत लांडरिकार्डचे सुपरिन्टेंडंट, यवतमाळ यांस २ महिने २८ दिवसांची हक्काची रजा देण्यांत आली.

आह्मास लिहिण्यास फार दुःख वाटतें कीं येथील तरुण नवे वकील रा. रा. सीताराम लक्ष्मण मुजूमदार यांस कालरोजीं देवाज्ञा झाली. या गृहस्थास पित्तस रोगाची व्यथा होती आणि अलिकडे १९-२० दिवसांत ताप येऊन त्यांतच त्यांचा अंत झाला. मागें पश्चात राहिलेले वृद्ध वडील, तरुण पत्नी, इत्यादि आप्तमंडळींनीं जगाच्या रहाटीकडेस नजर देऊन शांतवन करून घेतलें पाहिजे.

**राजकृपाः**— भंडारा जिल्ह्यांतील रामपायलीचे पेनशनर तहशिलदार रा. रा. शिवराजसिंग यांचें पेनशन राजद्रोहाच्या प्रकरणांत सामील असल्याच्या संशयावरून बंद केलें होतें तें राज्यारोहणाच्या मुहूर्तावर पुनः सुरू करण्यांत आलें आहे. ही दया व क्षमा रा० नामदार क्रॉडाक यांच्या कारकिर्दीला शोभा आणिते.

## सुधासिन्धु

सुख संचारक कंपनी मथुरा यांचीं तयार केलेलीं व सरकारांतून रजिष्टर झालेलीं औषधें, जीं वीस वर्षापासून लोकात अनुभविलीं आहेत.

हें कफ, खोकला, दमा, थंडीचा ताप, पटकी, शूळ, संग्रहणी, अतिसार, पोटांत दुखणें, वांत्या, गळमळणें, हात पाय व कंबर दुखणें, मुलांचे हिरवे पिवळे जुलाब, डांग्या खोकला, दूध ओकून टाकणें इत्यादीवर स्वादिष्ट व सुवासिक औषध आहे. किंमत प्रत्येक बाटलीस ०८ आणे.


### [illegible] केसरी

गजकरणास समूळ नाहींसें करणारें हेंच फक्त एक पवित्र औषध आहे. कांहीं सुद्धां जळण अथवा आग होत नाहीं. यासच जर दारू अथवा लिंबाचे अर्कांत मिळविलें तर २ बाटल्या अर्क तयार होतो. किंमत प्रत्येक बाटलीस ०४ आण. १२ बाटल्या एकदम मागविल्यानें त्यांस एजंट समजून नोटिशी, हँडबिलें वगैरे फुकट पाठविलीं जातात, व कमिशनही दिलें जातें. चालू सालचें पंचांगही फुकट मिळतें.

मागविण्याचा पत्ताः—
पंडित क्षत्रपाल शर्मा मालक,
न. १९९ सुख संचारक कंपनी, मथुरा.



अशी संधी पुन्हां येणार नाहीं.



एक घड्याळ बक्षीस.

पोष्टखर्च माफ

दर एकाची किंमत ३।.

जंटलमन इमिटेशन रास्कोप सिस्टिम.

नांवचें खिशांत ठेवण्याचें घड्याळ दिसण्यांत फार सुरेख आहे. सर्व लोकांस ह्या घड्याळाचा लाभ मिळावा ह्मणून मुद्दाम किंमत रुपये ३। ठेविली आहे; पोस्टेज खर्च माफ. घड्याळा सोबत कांच, कमान, पेटी, गोफ, इतकें सामान फुकट मिळेल. अशी अमुल्य संधी पुन्हां येणार नाहीं. व्ही. पी. नें मागवा.

मिळण्याचा पत्ताः—खोजा वलीभाई इस्माल
मुक्काम वर्धा. [ मध्यप्रांत ] WARDA.
नो. नं. ४



चिरकालचा खरा लाभ कोणता ?
पैसा व ज्ञान ज्या योगानें मिळेल तो !
महाराज ! ह्या दोन्ही गोष्टी

वार्षिक वर्गणी ट. ख. स ह रु. १॥ ) **कलाशिक्षण** ( नमुना अंकास ०३आ.

नांवाच्या विविध हुन्नर, शास्त्रीयज्ञान, व्यापार, शेतकी, व इतर शेंकडो विषयांची माहिती शिकविणाऱ्यास वर्गणीदार व्हा. मराठी भाषेंत हें असें एकच पुस्तक आहे. वर्गणी रु. १॥ खरी पण चालू मार्चे अखेर आश्रय देणारास रु. १। पडेल. कारागिरांस, विद्यार्थ्यांस तर हें पुस्तक अवश्य हवें शिवाय ग्राहकांस हिप्नॉटिझम [ Hypnotism] ऊर्फ अमेरिकन वशीकरणविद्या—जिनें दुसऱ्यास निद्रा मोहन, आरोग्यहरण व धनप्राप्ति करतां येते; ती रु. २५ फीची तूर्त रु. ११ न शिकवूं. पैकीं १ रु. प्रथम सही बरोबर पाठवावा. बाकीची व्ही. पी. येईल.

ह्या शिवाय नानाप्रकारच्या पोट भरण्याच्या युक्त्या, औषधी, मंत्रतंत्रक्रिया, जडीबुटी, गुप्त प्रयोगाची माहिती वाजवी फी घेऊन शिकवूं. सर्व पत्रव्यवहार गुप्त राखला जातो,

व्यवस्थापक—कलाशिक्षण, कार्यालय
नो. न. ९ बडोदें.


## नोटीस


विहार आनन्दका सागर रंगीन तसवीरे सहित चारो भाग तथा पांचो अंग सचित्र कोख शास्त्र.

अगली हमसे मंगावो धोकेसे बचो स्त्री पुरुषोंके जात, भेद, लक्षण अनेक देशस्थ स्त्रीनायका, कुमारी प्रकृती, सत्व दुती कुलटा, पतिव्रता, व्यभिचारणी आदिकी पेहचान, रजोधर्म लक्षण, ऋतुविहार समय सहवास स्थान क्रया, शैय्यातिथ, कामस्थान सोलासगारि, वतीसोआभूशण, वस्त्रतअदिवमधान पुत्रदृटीकर्म, नपुंसकविद्या, उपदंश प्रमेह आदि अनेक रोगोकी चिकित्सा औषधि, पशुभाषा जाननेकी रीति, मंत्रतंत्र, यंत्र, वशीकरण सुद्धां विद्या आदि अमुल्य विषयका भंडार किंमत रु० १

पं० गंगाप्रसाद इंजीनियर शहापडा
नो० नं० ७७ अलीगड सिटी.


## विलक्षण नयन रुक्कुठार.


विलक्षण नयन रुक्कुठार – ह्या अप्रतिम औषधापासून डोळ्याचे साधारण विकार—खुपऱ्या पाली, ठणका, पाणी गळणें, कंडू, फुल इ० जोरदार व जुनाट रोग त्वरित बरे होतात. दृष्टी तीव्र होऊन शांत रहाते; शिवाय जागरणानें, उन्हांत फिरल्यानें अग्नितापानें, उपदंशाविकारानें, अतिवाचनानें, कडकीनें इ. अनेक कारणांनीं डोळे बिघडतात ह्यावरही हें अप्रतिम गुणकारी असून लहान मुलांसही हें अत्यंत उपयोगी आहे. हें डोळ्यांत घातल्यानें ठणका वगैरे न लागतां डोळ्यांस थंडावा येऊन मस्तकासही शांतता येते. सदर औषधाचे सकाळीं पांच व सायंकाळीं पांच प्रमाणें थेंब घालणें. साधारण विकारास एक कुपी पुरेल. बरेच दिवसांचा विकार असल्यास तीन कुप्या लागतील; सोबत औषध घालणे करितां कांचेची नळी फुकट मिळेल, एक कुपीची किं. १ एक रुपया. तीन कुप्या एकदम घेणारास टपाल व व्ही. पी. खर्च माफ. एकदम १२ कुप्या घेणारास टपाल खर्च न पडतां दहा रुपयांत मिळतील.

जी. पी. कंपनीची उत्तम निळिकाळी शाई ०६ आण्याची घेणारास पुढील सालची डायरी बक्षीस मिळेल. आमचेकडे शालोपयोगी मराठी व इंग्रजी पुस्तकें व हरएक प्रकारचा स्टेशनरी माल फारच माफक दरानें मिळेल. विशेष माहिती खालील पत्त्यावर,

जी. एन. घारपुरे. पोष्ट- अलिबाग.


## जाहिरात


वर्षफल—प्रत्येक महिन्याचे फलासह लाभालाभ सुखदुःख कळवूं. फी. ३ रुपये वर्ग २ चे २ रुपये. खर्च ०= जन्मकाल, जन्म अथवा चालू नांव कळवावें.

पत्ता— भा० गो० पंडित,
रा- व पो० लोणखेड प. खानदेश.


## जाहिरात.


टेक्स्ट बुक कमिटींत पसंत होऊन मे. डैरेक्टर सा. ब. मध्यप्रांत व वऱ्हाड यांनीं व्ह. आणि अ. व्ह. शाळांतील बक्षिस व लायब्ऱ्या साठीं मंजूर केलेलें प्रसिद्ध धनुर्धारी कृत;-

१ व्यापारी वाचनपाठ. किं० ॥.
त्याच प्रमाणें २ पिराजी पाटील किं०. ॥।
३ उपाशी महाराष्ट्रास उद्योग कि०. ।=
४ धर्मावरील मार्मिक निबंध अंक १ ते १४; १०० बुकांस ।=रु० ( पुर्वी १॥ किं० होती ) १००० अगर ज्यास्त एकदम घेतल्यास ।- व त्याहून ज्यास्त घेतल्यास वरील प्रमाणें देऊं. निदान १०० तरी घेतलीं पाहिजेत.

नंबर १, २ व ३ यांच्या प्रती एकदम १० घेतल्यास अनुक्रमें ॥= व । व ज्यास्त घेतल्यास ॥- व ।. किंमतीस देऊं.

टपाल खर्च निराळा—व्ही. पी. नें मागविल्यास निदान एक त्रितीयांश तरी किं० आगाऊ आली पाहिजे.

ल. वें. मांजरेकर आणि कंपनी
बेळगांव


## नोटीस

रा० सुकदेव वल्लद बापुसा पाटील राहणार मौजे आवार ता० जळगांव यांसः—

खालीं सही करणार बावन वल्लद राघोजी पाटील राहणार किनखेड ता० अकोट नोटीस देतो कीं तुह्मी माझे गांवीं दिपवाळीचे सुमारास माझ्या लग्नाचे बायकोस नेण्याकरितां आले होते. त्यावेळेस म्यां कांहीं घरगुती कारणासाठीं पाठविलें नाहीं ह्मणून तुमची इतराजी होऊन तुह्मी मी घरीं नसतां माझ्या बायकोस तिच्या चिजाबस्तासुद्धां घेऊन गेला. त्यावर मी १।२ वेळां घेण्यास तिला आलों असतां तुह्मी बायकोस पाठवीत नाहीं व तिची माझी भेट होऊं देत नाहीं. तिच्या मनांतून माझ्याशीं संसार करण्याचा असतां तुह्मी तिला कांहीं तरी कमीपणा दाखवून माझ्याशीं तिचा बेबनाव करण्याचें आरंभिलें आहे. सबब आतां नोटिशीनें कळवितों कीं, तिला तिच्या डागडागिन्यांसह ८ दिवसांत माझे घरीं धाडून द्यावें. नाहीं तर तिचा कायदेशीर ताबा मिळवीन व तुमच्यावर फिर्याद करीन. तुह्मी आमचे नातेवाईक सबब कळविलें आहे. कळावें. तारीख २६ माहे जून सन १९११ इ०

सही
बावन वल्लद राघोजी. द० खु०
नो० नं० २६२

## नोटीस

रा० रा० रेणुकादास बळवंतराव जहागिरदार रा० टुनकी जहागिर ता० जळगांव यांसः—

खालीं सही करणार पुंडु वा। लक्ष्मण तेली रा० मौजे लाडनापूर ता० जळगांव नोटीस देतो कीं म्यां आपल्यास मौजे लाडनापूर ता० जळगांव येथील सर्वे नं० १२६ व १७० या दोन शेतांचा भाडेपट्टा पांच वर्षांचे करारानें करून देऊन नोंदून दिला आहे. त्याप्रमाणें मी सदर्हू शेतांची यंदा लागलवड केली. त्यांत पेरण्यास गेलों असतां त्या शेतांचा पूर्वीचा किस्तकार रा० मारुती वा। कडतु यानें मला हरकत केली. त्याचें ह्मणणें मजकडे शेत अगोदर पासून आहे. सबब नोटीस देतों कीं मला तीं शेतें ताब्यांत देऊन उपभोग घेऊं द्यावा. नाहीं तर मला सदरचीं शेतें लागलवड करण्यास लागलेला पैसा व आतां मला पोट भरण्यास दुसरी शेतीं नसल्यानें माझें होणारें नुकसान पंचानुमतें आपण भरून द्यावें. स्वामित्वाचे रुपये आह्मी आपल्यास देणार नाहीं. कारण सदरचीं शेतें आमचे ताब्यांत अद्याप मिळालीं नाहींत. ही नोटीस पावल्या पासून १[illegible] दिवसांत शेत कायदेशीर रीतीनें ताब्यांत द्यावीं अगर एकंदर रकम देऊन पावती घ्यावी. नाहीं तर कायदेशीर इलाज करी[illegible] कळावें ता० २६-६-११

सही
पुंडु वा। लक्ष्मण तेली राह[illegible]
लाडनापूर हल्लीं मुक्काम आको[illegible]
नो० नं० २६३ दस्तुर खु[illegible]

## आर्यवनौषधालय मुर्डी.

व्हाईसराय व हिंदुस्थानचे गव्हर्नर जनरल यांजकडील आनररी असिस्टंट सर्जन मार्जा अ. स. डॉ. विश्राम रामजी घोले यांनीं आमचीं औषधें बारिक हल्लीं वर्तमानपत्रांतून ज्या कांहीं नव्या जुन्या जाहिराती प्रसिद्ध होत आहेत त्याहून आमचीं औषधें त्या त्या रोगावर अत्यंत गुणकारी असल्याचें सर्टिफिकेट आह्मास दिलें आहे. हे अवश्य लक्ष ठेवावें.

आमच्या अत्यंत खात्रीच्या औषधांचा गुण शंभरांतून एक दोन रोग्यास कदाचित आला नाहीं तर पैसे परत देऊनही त्यांचे आरोग्यार्थ आणखी एखाद औषध द्यावें लागल्यास तें फुकटही देऊं परंतु रोग्यास पूर्णपणें बरा करूं अशी प्रतिज्ञा आहे.

### मदनामृत संजविनी

धातुवर्धक, अत्यंत कामोत्तेजक, व पौष्टीक, वीर्यस्तंभक,
रक्तशोधक; मनोत्साहक कांति व बुद्धीवर्धक सुवर्ण माक्षीक
मौक्तिक कस्तुरी व अनेक वनस्पती मिश्र

### अद्भुत गुटिका.

शरीरांतील मुख्य राजा जी धातु ती शुद्ध असेल तरच शरीर निरोगी राहून सर्व सौख्य प्राप्त होतें ती दोषी असेल तर शरीरांत नानाप्रकारचे रोगरूपी शत्रू उत्पन्न होऊन शारीरीक सौख्याचा खरा लाभ मुळींच मिळणार नाहीं. करितां धातू शुद्ध व पुष्ठ होण्यास या गुटीका प्रत्येक वर्षी पाहिजे या दिवसांत एकदां तरी अवश्य सेवन केल्यानें शरीर रोगरहित होऊन सौख्य प्राप्त होतें. हें अवश्य लक्षांत ठेवावें याच्या सेवनानें नपुंसकत्व, स्वप्नजन्य इतर धातुपात उन्हाळें इंद्रियाशिथिलता, कडकी. गर्मीसंबंधीं मुरलेले विकोप मुत्रसंकोच, धातुचा पातळपाणा, स्त्रियाची धुपणी, छातींतील रोग, सठ पाय त्रमांग. व नेत्र यांचा दाह, क्षय, पंडूरोग मुलाची खर, जीर्णज्वर, अग्निमांद्य मस्तकशूळ, मुकव्याधी. वातरोग, निद्रानाश पित्तावर. बाळंतरोग, मधुमेह जूनाट परमा, मुष्टीमैथूननें आलेली कृशता इत्यादि अनेक विकार खात्रीनें बरे होऊन शरीर निरोगी मजबूत व सत्तेज बनतें. पचनशक्ती व स्मरणशक्ती भरपूर वाढून धातु रक्त याची शुद्ध वृद्धी, वीर्यस्तंभ व भरपूर कामोद्दिपक होते व मनास उत्साह देतात. दुध व जडान्न पचूं लागते त्यांत उपयुक्त वनस्पतीचें मिश्रण गुणकारक आहेत करितां गुणाबद्दल असंख्य सार्टिफिकीटें मिळालीं आहेत आणि मिळतात. पथ्य सेवनाची मुळींच गरज नसून स्त्रिया, पुरुष, व मुलें यांस पाहिजे त्या दिवसांत घेण्यास अत्यंत उपयोगी आहेत गुटिका रुपयाचे आंत मिळणार नाहींत एकदम ४ रुपयांच्यावर कितीही घेणारास टपालखर्च माफ आहे ४ रुपयांचे आंत वेगळा टपालखर्च ५ आणे पडेल अनुपानखर्डे सोबत किंवा व्ही. पी. नें खालील पत्त्यावर मिळतील.

दरः—एकदम ३१ गो० १ रु०, ७१ गो० २ रु० ११५ गो० ३ रु० १२५ गो० ४ रु० २७५ गो० ६ रु० ५५० गो० ९ रु०

२ अपूर्व नेत्रांजनः—यानें वडस. साहर, फुल, खुपऱ्या. बिंदु, कांच इत्यादि नेत्राचे सर्व विकार त्वरीत बरे होऊन दृष्टी तीव्र व थंडगार राहते. या रोगांस अंजन खरें रामबाण आहे. १॥ तोळ्याच्या डबीस १ रु०

३ परम्यावर अपूर्व मिश्रणः—कोणताही नवा जुना परमा व अनुपम दहा तिडीक मुत्राची लाली, संकोच पुस्राव, रक्तस्राव, इत्यादि विकार पथ्य नसता सात दिवसांत जातात तिडिक एका घटकेंत जाते असें रामबाण औषध कोठें दिसत नाहीं. बा० किं० १ ।। भार बाटलीस रु० २

३ दंतबलवर्धक पूडः—दंत संबधीं सर्व विकार उत्तम बरे होतात.

५ विंचूचें बिषः—औषध लावतांच उतरतें मुळ्या ३ तो० ८ आणे

६ गजकर्णः—खरूज, नायटे वगैरे सर्व विकार ३ दिवसांत जातात ड. ६ आणे

७ सर्व हिमज्वरः—औषध घेतांच कशाहि प्रकारचे ज्वर असले तरी ते औषध घेतांच जाऊन पुनः उलटत नहींत. १२ पुड्या १ रु०

८ प्लेगावर रामबाण औषधः—आजपर्यंत आमचे औषधानें हजारो लोक बरे झाले आहेत करितां प्लेग सुरूं होतांच सर्वांनीं संग्रहीं तापावर गोळ्या, गाठीस मलम, वात चढू नये ह्मणून वातावर मात्रा ठेवून याचा एकवार अनुभव पहावा गुणाबद्दल खात्री पटेलच, परोपकारार्थ माफक किं० २ आणे ख० शि०

९ सामानाचा मोठा क्याटलाग मागवा तो फुकट पाठवूं, औषधांत अपाय कारक पदार्थ अगदीं नसून पूर्ण खात्रीचे असल्याबद्दल असंख्य सार्टिफिकीटें आहेत. याशिवाय मोठमोठ्या रोगांवर अनेक औषध ग्रंथोक्त रसायनें, भस्म खाक, गुटीका, आसवे, तेलें, सुगंधी अत्तरें माफक दरानें मिळतात. अनुपान खर्डा सोबत टपाल खर्च वेगळा पडेल. रोखीनें किंवा व्ही. पी. नें पाठवूं प्रकृतीचें मान कळविल्यास रोगाचो निदान चिकीत्सा कळवूं.

### अत्यंत आगत्याची सुचना.

हल्लीं वर्तमान पत्रांतून औषधांच्या अनेक जाहीराती सुरूं असून प्रत्येक जाहिरात सुशोभित करून जो तो पुढें येऊं पाहात आहे.

आपला समाज निरुद्योगी आळशी बनल्यामुळें एकदा जो धंदा सुरूं केला त्याचेंच अनुकरण हुबेहुब नकल करून वाटेल त्यानें करावा आमच जाहितीस कोकण, वऱ्हाड, गुजराथ, महाराष्ट्र इ. प्रांतात ऊत आला असून आमच्या आजिले वगैरे गांवातून तो पुणावस्थेत येऊन आणखीही नवीन जाहिराती सुरू होत आहेत. अशा जाहिराती किंवा ते लोक याची आह्मास निंदा किंवा स्तुती मुळींच करणें नाहीं. इंग्रजी राज्यात आपली थोरवी गाण्यास ज्याची तो स्वतंत्र आहे आह्मास ग्राहकांस पुनाविणें हच कीं ज्यांचा कारखाना आज सतत १५।२० वर्षे अव्याहत सुरू असून ज्यांच्या औषधास झाले डाक्टरांनीं सर्टिफिकीट दिलें, ज्यांच्या औषधीनें कल्याबधी ग्राहक रोग मुक्त झाले व नित्य होत आहेत त्यांचींच औषधीं नेहमीं उपयागांत आणणें अत्यंत हितकारक आहे. यापुढें जरी हजारों जाहिराती प्रसिद्ध झाल्या तरी आमची जाहिरात न बदलतां व कोणाचीही निंदा न करता नेहमीच्या रीतीनें कायम राहून हा सार्वजनिक व कल्याणकारीत असले। व्यवसाय नवीन नवीन उपयुक्त सुधारणा करून उर्जितावस्थेस आणण्याची खटपट करूं. आज पर्यंत आमचे खटपटीनें यशहि बरेंच आलें आहे, करितां सकल आर्यबंधंस व ग्राहकांस इतकीच प्रार्थना आहे कीं, रोगमुक्त होण्यास आमचींच औषधें अत्यंत गुणकारक आहेत. तींच सर्वांनीं वापरवीं, एकवार अनुभवानेंच खात्री होईल इतर जाहिरातीशीं आमचा चिलकूल संबंध नाहीं, हें लक्षांत ठेऊन औषधें मागणें ती खालील पत्त्यावर बिनचूक मागवावी ह्मणजे खरीं गुणकारक औषधें मिळून हटकून व त्वरित आरोग्य येईल-

नं. १

नो. नं. २४

**कृष्णशास्त्री पेंडसे वैद्य**

**पत्ताः—मुर्डी ता. दापोली जि० रत्नागिरी.**

---

## Oriental Government security
## LIFE ASSURANCE COMPANY
## Limited

ESTABLISHED IN 1874.
R. Paterson, Berar manager,
HEAD OFFICE—BOMBAY
HEAD —QUARTER — NAGPUR.

**FUNDS Exceed $3\frac{3}{4}$ crores**

CLAIMS PAID FOR OVER 3 CRORES

IMMEDIATE ETTLEMENT OF CLAIMS

If there be one thing of more importance than another in connection with Life Assurance, it is when claims arise, that the amount due under the policy be paid to the Claimants at the earliest possible date. This the Directors of the 'Oriental' keep well before them and act up treating their clients with the utmost liberality.

UNQUESIONABLE SE CURIY.

It is not sufficient to read that a Company's funds amount to a given sum, but it is essential to know how such Funds are invested if in miscellaneous and risky investments or how secured.

The Funds of the 'Oriental' are invested in Government Securities and lodged with the Government Official Trustee of Bombay in terms of the Company's Trust Deed, as Security for Claims arising, through decease of assured lives, and endowmenp policies matured.

Government Officers, professional men, Tradesmen and others by employing a portion of their annual income or profits in effecting life policies, create fund equivalent to the savings of many years.

No man can be sure how long he will live, and although he may save money yet, if he dies early before he had time to save much, his wife and family may be in distress. Life Assurance is a means by which this danger is got over. Life being so uncertain, the sooner a man makes up his mind to assure his life the better. Once satisfied of the propriety of the step, do not delay. There are numerous instances in the records of the 'Oriental' where the delay of a month or less, has left the family without the intended provision.

INFLUENTIAL AND ENERGETIC AGENT WANTED. For terms please apply to the undersigned.

Prospectuses, forms and any further information can be obtained on application—

M. DESOUZA,
CHIEF AGENT, Nagpur.

CHIEF AGENCY FOR C. P., BERAR & KHANDESH


हें पत्र आकोला येथें कैलासवासी खंडेराव बाळाजी फडके यांच्या वऱ्हाडसमाचार छापखान्यांत नारायण खंडेराव फडके यांनीं सदाशिवआश्रमांत छापून प्रसिद्ध केलें.

# वऱ्हाडसमाचार.

Berar Samachar.

Registered No N. 4

वर्ष ४५ आकोला—सामवार तारीख १० माहे जुलई सन १९११ इ० [ अंक २७ ]


## वर्गणीचे दर

आकोल्यांतील लोकांस........१ रुपया
बाहेरगांवीं ट. हां. ........ २ रुपये
वर्गणी आगाउच घेण्याची वहिवाट ठेविली आहे.

## नोटिशींचे दर

दर ओळीस दीड आणा.
हेडिंगच्या दोन ओळी धरल्या जातील
नोटीस सुवाच्य असली पाहिजे.

सुचनाः— गुरुवारच्या आंत येणाऱ्या नोटीसा त्याच आठवड्यांत घेतल्या जातील; यापुढें येणाऱ्या नोटिसास स्पेशल चार्ज पडेल.

## मुंबइ बँकचें सोनें.

मुंबई बँकचा छाप असलेल्या उत्तम कसाच्या सोन्याच्या चिपा मुंबई बँकच्या आकोले व उमरावती येथील ऑफिसांत विकत मिळतील. गिऱ्हाइकानें जास्त माहिती कारितां बँकेंत तपास करावा.

एका चिपचें वजन २६ $\frac{२}{३}$ तोळे असतें. साधारण भाव वऱ्हाड समाचार वर्तमानपत्रांत बाजारभाव ह्या सदराखालीं सांपडेल.

मुंबई बँक आकोला २१-९-१० G. A. PHILLIPS. एजंट.

नो० न० २

---

### नोटीस

ती० रा- रा- विष्णुबावा खुंटे राहणार पेठ देऊळगांवराजा तालुके चिखली जि० बुलडाणा- वडिलांचे सेवेशीं सेवक अपत्य बालके भाऊ बापुराज खुंटे यांनीं त्रिकाल चरणीं मस्तक ठेवून शीरसा० नमस्कार उपरो विशेष. ता० २-४—१९०४ इ.-चे गहाणखताबद्दल वारंवार आपण लिहितां कीं बंकट शेट जवळ फोल पडून आहे; वाटेल तेव्हां परत घेता येईल असें म्हणू म्हणू सात वर्षें लोटलीं. भिजत कांबळा जड करण्यांत काय अर्थ ? आपले लिहिण्यावर मला आतां विश्वास न राहिल्यामुळें मी वेगळी शेट बंकटलालचे नांवें एक नोटीस वर्तमानपत्रांतून दिली आहे. तुह्मी व ते शेट एक विचारें मला बुडवूं पाहतां हें चांगलें नाहीं. [illegible] वडील आहांत मी अज्ञानानें आपणा[illegible]स्त लिहावें हा माझा धर्म नाहीं. तरी धीट होऊन मी तुमच्या न विचारतां बंकटशेटला नोटीस दिली आहे ह्याबद्दल माफी असावी. तरी आपण लक्ष पुरवून ह्या पेचांतून मला मुक्त करवाल तर माझें माप माझ पदरांत पडून माझें आपण संगोपन केल्यासारखें होईल. फार काय लिहणें ही विनंती.

मु०मंडला आज्ञांकीत
त.३०-६-११ आपला भाऊराव

नो. नं. २८३

---

### नोटीस.

सर्व लोकांस जाहिर नोटीस देण्यांत येतें कीं लक्ष्मी जवजे गणोबा घाटे व साळु जवजे भाईजी कृष्णपक्षी ही माझी वडील भावजई आहे त्यांचे ताब्यांत जी स्थावर किंवा जंगम मिळकत शेती वगैरे ती त्याचे अन्नवस्त्राचे पोशणा करितां ठेविली आहे त्या मिळकतीवर त्याचा अन्नवस्त्राशिवाय दुसरा कांहीं एक मालकीचा संबंध नाहीं करिता कोणी खरेदी अगर गहाण अगर पट्ट्यानें घेऊं नये. घेतल्यास सदरहू मिळकत कोणतेही प्रकारें खरेदीचे रकमेस,गहाणखताचे रकमेस अगर पट्टेखताचे रकमेस जबाबदार होणार नाहीं. त्याचे ताब्यांत असलेली मिळकत आमचे मालकीची आहे कळावें.

ता० ३-७-११ सही

नारायण बाबुजी कृष्णपक्षी घाटे
रा० आडगांव हल्लीं नेहुरी बुजरूख

नो० नं० २७९

---

### नोटीस

नोटीस बेशमी हबीबखा वल्लद ईसफखा मुसलमान वस्ती कजबे अडगांव तालुके आकोट यांसः—

नोटीस देणार नारायण बाबुजी कृष्णपक्षी वस्ती कजबे अडगांव हल्लीं नेवरी बुजरूक तालुके आकोट यांजकडून नोटीस देण्यांत येतें कीं माझी वडील भावजई नामें साळु जवजे भाईजी इजपासून तुह्मी माझे मालकीचें शेत कजबे अडगांव येथील शेत सर्वे नंबर ९६ यांतील एक त्रितीयांश आंब्याचे झाडांसुद्धां तुह्मी खरेदी घेतलें आहे असें हल्लीं मला समजलें आहे. कारितां नोटिसीनें कळविण्यांत येतें कीं जी शेती तीचे ताब्यांत ठेविली ती केवळ अन्नवस्त्राचे ऐवजीं ठेविली आहे. त्या शेतीवर तीचा गहाण किंवा खरेदी अगर पट्ट्यानें देणें वगैरे प्रकार कोणतेही प्रकारें तिला अधिकार नाहीं. कोणी घेतल्यास स्थावर मिळकत गहाणाचे किंवा खरेदीचे किंवा पट्ट्याचे रकमेस जबाबदार होणार नाहीं. तुह्मी जो दस्तऐवज लिहून घेतला आहे त्याचा हक्क सोडून देत असल्यास सोडून द्यावा. दस्तऐवज रद्द करण्याविषयीं तुमचेवर दावा कोर्टांत केला जाऊन त्याचे पैसे भरून घेतले जातील व नोटिसीचा खर्च तुमचेवर बसेल कळावें. ता० ३।६।११

सही

नारायण बाबुजी घाटे रा० अडगांव
हल्लीं नेहुरी बुजरूक आज मु. आकोला.

नो० नं० २८०

---

### नोटीस

बेशमी राजाराम सावरकार कुणबी रा० कावस ता० आकोट यांसः—

नोटीस देणार विठोबा वल्लद गोशी कुणबी रा० कारले ता० दर्यापूर यांजकडून नोटीस देण्यांत येतें कीं तुमची मुलगी माझी बायको पार्वती इजला तुह्मी दिवाळी वगैरे सणाचे निमित्तानें तुह्मी आपले घरीं माझे घरून नेलें. तीचे अंगावर आमचे मालकीचे दागीने सोन्याचांदीचे असमासें किंमत रुपये २०० दोनशें या सह नेलें मी माझे नातलग असे मिळून माझे बायकोस माझे घरीं आणण्यास आह्मी तुमचे घरीं आलों असतां तुह्मी पाठविलें नाहीं. तुमचे मनांत आमचे बायकोसंबंधी व तीचे अंगावरील आमचे मालकीचे दागन्यांसंबंधीं कांहीं तरी विश्वासघात करण्याचें खास नजरेस येत आहे. याजकारितां ही नोटीस पावल्यापासून ४ दिवसांचे आंत आमचे दागीन्यासह आमची बायको आमचे घरीं पोहचती करावी. तसें न केल्यास विश्वासघाताची फिर्याद तुमचेवर करणें भाग पडेल. मग त्याचा परिणाम तुह्मांस भोगावा लागेल तुमचे आमचे सोयरेपणांत अंतर पडूं नये याजकरितां ही नोटीस दिली आहे कळावें. दस्तुर विष्णु प्रभूराम पेनशनर. तारीख २९।६।११ मुक्काम आकोला.

सही

विठोबा वल्लद गोशी दस्तुर खुद्द.

नो० नं० २८१

---

### नोटीस

रा. रा. महमद वा॥ जिरा कच्छी, शेगांव
देवीदयाल सुरसप्रसाद, कवठें ता. बाळापूर
मोहनलाल वा॥ नंदराम, कारंजारमजानपूर
सुरजमल गणुलाल, अंदुरा ता. बाळापूर
सतीदान बालमुकूंद, तळेगांव [ बाभुळगांव ] ता. आकोट

व सर्वत्र लोक यांना—

मी अर्जून वा॥ तुकाराम पाटील रा० कारंजारमजानपूर ता० बाळापूर नोटीस देतों कीं माझा मुलगा जगू हा अविचारानें माझ्या वडिलार्जित स्थावरजंगम इस्टेटीवर पैसा काढून आपल्या स्वतःचे उपभोगाकडे उधळपट्टीनें लावतोसें दिसतें. सबब जाहिर रीतीनें कळवितों कीं मी हयात आहे तोंपावेतों त्याला कोणी कपर्दीक हि देऊं नये. तो फक्त अन्नवस्त्राचा मालक आहे. त्यास तें आह्मी पुरवीत आहोंत. यापुढें त्यास माझ्या संमतीवांचून कांहीं दिल्यास अगर मागें दिलें असल्यास त्याबद्दल मी किंवा माझी इस्टेट कोणत्याही प्रकारें जोखीमदार नाहीं. त्यास आह्मी पैसा त्याच्या संबंधानें देवाल नाहीं. कळावें. ता. ३०।६।११ इ.

सही

अर्जून वल्लद तुकाराम निशाणी आंगठा.

नो० नं० २८२.

---

### नोटिसीचें उत्तर

नोटीस बेशमी नामदेव वल्लद [illegible] ठाकरे राहणार भांबेरी तालुके [illegible] यांस

खालीं सही करणार इजकडून ने[illegible] देण्यांत येतें कीं तुह्मी दिलेली नो[illegible] ऐकण्यांत आली. जो मजकूर तुह्मी लि[illegible] तो सर्व खोटा आहे. माझा नवरा [illegible] झाल्यापासून आज तारखे पर्यंत मला अन्नवस्त्र दिलें नाहीं व नवऱ्[illegible] हातचें कर्ज हि मीच दिलें आहे. मा[illegible] येथील सर्वे नंबर ६७ यांतील [illegible] ३४२० गुंठे जमीन माझे नवऱ्याचे [illegible] शाला आली. त्याचे मागें तिचा उपभे[illegible] आजपावेतों मीच घेत आहे. तुम[illegible] ह्या शेतावर कांहीं संबंध नाहीं. मा[illegible] मुलगी भुली इचे येथें मी राहते शेता[illegible] व्यवस्था मी वाटेल ती करीन. तुम[illegible] शेतावर कांहीं हक्क नाहीं. माझे पश्चात[illegible] शेतावर मालकी माझी मलगी भुली इची कायद्याप्रमाणें आहे. तुह्मी विनाकारण तंट[illegible] बखेडा उपस्थीत कराल तर रितीप्रमा[illegible] फौजदारींत काम चालविलें जाईल व [illegible] नुकसानी होईल ती सर्व भरून घेत[illegible] जाईल. कळावें तारीख ३।७।११ इस[illegible]

सही

पुंजाई मर्द माधोजी ठाक[illegible]
वस्ती बोरगांववैराग[illegible]
ता० बाळापूर नि० खु[illegible]

नो. नं. २८४ आंगठा

---

### जाहिरात

सर्वत्र लोकांस प्रासिध्द करण्यांत येतें कीं मौजे धारपिंपरी ता० वाशिम जि० आकोला येथील माझी जिन्नगी असून माझी सापत्न बहीण यशवदा मर्द महा[illegible] घेऊं इच्छीत होती त्यामुळें दिवाणी मुलकी कोर्टांत काम चालविण्या कारितां भवानराव दाजीबाराव रा० रेगांव यास कुलमुखत्यारपत्र दिलें असून अधिकार दिला होता परंतु आतां मी सदर्हू मुखत्यारपत्र रद्द करून मुखत्यार मजकुराकडून काम घेऊं इच्छीत नाहीं. कारितां मुखत्यार मजकुरानें माझेसंबंधानें कोणताहि कागदोपत्रीं व्यवहार करून सही केल्यास तो व्यवहार रद्द समजला जावा. कळावें ता. ४-७-११ इ.

सही

दवलत वा॥ शामजी अ० पा० आई कमळाई जवजे माधोजी तायडे रा० धारपिंपरी ता० वाशिम जि० आकोलें नि० रेव बांगडी.

नो० नं० २८५

# वर्तमानसार.

तांजोर येथें गणपती आय्यर नांवाच्या इसमाच्या खाणावळींत असलेल्या महादेव आय्यर नांवाच्या ब्राह्मणास तिनेवेलीच्या कलेक्टरांच्या खुनाच्या बाबतींत ता० ५ रोजीं पकडण्यांत आलें व त्यास तिनेवेलीस नेण्यांत आलें. मे महिन्याच्या ता० १६ पासून आपण तांजोर येथें आहों व आपण दुसरीकडे कोठेंही गेला नाहीं असें पकडलेल्या महादेव आय्यर याचें ह्मणणें आहे.

बिस्तु चरणमण्डल नांवाच्या श्रीमान सावकाराच्या घरीं टोलीगंज ठाण्यापासून मैलावर असलेल्या चौबगन गांवीं मंगळवारीं रात्रीं दरोडा पडला. पोलीस दरोड्याच्या ठिकाणीं तावडतोब गेले. बिस्तु व त्याचे घरांतील बऱ्याच मंडळींना जबर दुखापती झाल्या असून घरांतील वस्तु अगदीं अस्ताव्यस्त पडल्या आहेत असें त्यांना आढळून आलें. अठरा किंवा एकोणीस हत्यारबंद दरोडेखोरांच्या टोळीनें बरावर हल्ला केला आणि बाहेरील दारें फोडून ते झनान्यांत शिरले तेव्हां घरांतील कांहीं पुरुष मंडळी त्यांना आडवी आली. त्यांच्यावर दरोडेखोरांनीं क्रूर रीतीनें हल्ला केला. नंतर ते सर्व घर लुटून व रोख रकम जडजवाहिर मिळून सुमारें ३५०० रुपयांचा माल घेऊन निघून गेले. घरांतील कांहीं मंडळींनीं त्या दरोडेखोरांपैकीं कांहींजणांना ओळखलें असून पोलिस त्यांच्या तपासांत आहेत.

पोलिसांच्या गोळीबारास न जुमानता ता० ५ रोजीं मँचेस्टर येथील संपवाल्यांनीं दगड, विटा, गज, काठ्या यांचा वर्षाव करून रेलवे आवारांतून लॉरींनीं मार्केटकडे माल नेऊं दिला नहीं. पोलिसांपैकीं कांहीं स्वार होते व कांहींच्या जवळ तलवारी होत्या. मंगळवारीं व बुधवारीं मिळून एकंदर शंभर लोक पादव झाले. ता० ५ रोजीं संध्याकाळीं स्कॉटस ग्रेजची एक तुकडी, स्टाफोर्डशायरचे ४०० व लंडन पोलिसचे ३०० लोक मँचेस्टरकडे पाठविण्यांत आले आहेत.

ई. बी. एस. रेलवेवरील उतारूंची गाडी गेल्या रविवारीं सकाळीं उलथून पाडण्याचा प्रयत्न करण्यांत आला, पण तो साधला नाहीं. भ्यारावारा स्टेशनावर गाडी जाणाऱ्या रूळावर तीन मोठे दगड ठेवण्यांत आले होते परंतु परमनंठ वे इन्स्पेक्टरांच्या नजरेस वरील गोष्ट येतांच त्यांनीं गाडी येण्यापूर्वींच कांहीं मिनिटें ते काढून टाकिले.

डंगापूर येथील नाकु मीहा नांवाच्या इसमास सहा वर्षांच्या आपल्या मुलीचा खून केल्याच्या आरोपावरून नैाखाली येथील सेशन्स जजांनीं फांशीची शिक्षा फर्माविली. खटल्याची हकीकत अशी आहे कीं, हसनअली नांवाचा एक सावकार बेलिफाबरोबर आरोपी (कूळ)च्या घरीं त्याचें सामान वगैरे जप्त करण्यासाठीं गेला असतां दुसऱ्यांदा आलेल्या जप्तीमुळें आरोपीस अतिशय राग आला व त्या रागाच्या भपाट्यांत जप्तीसाठीं आलेल्या इसमांवर खोटा आरोप लादण्यासाठीं त्यानें आपल्या मुलीचा खून केला. दोन्ही असेसरांनीं आरोपी दोषी आहे असें आपलें मत दिल्यावर जजसाहेबांनीं त्यास फांशीची शिक्षा फर्माविली.

पोर्तुगालचें सरकार क्रांतिकारक चळवळ धुमसत असल्यामुळें उत्तर सरहद्दीवर सक्त नजर ठेवित आहे. मेलच्या तारेवरून कळतें कीं, अतिशय भयंकर स्वरूपाचीं हत्यारें व दारुगोळा स्पेननें पकडला आहे.

काल रोजीं लिस्बन येथें पोर्तुगालच्या पदच्युत राजाच्या पक्षाच्या लोकांनीं बंडाचें निशाण उभारून प्रजासत्ताक सैन्याशीं युद्ध आरंभलें अशी अफवा पसरली आहे, पण तिला अद्याप दुजोरा मिळालेला नाहीं.

सिरामपूर जवळील छत्रा गांवीं मृणालिनी दासी नांवाच्या बाईच्या घरावर नुकताच एक दरोडा पडला. मृणालिनी ही आपल्या दोन लेंकरांसह आपल्या खोलीपुढील पडवींत स्वस्थ झोंपली होती. तो पहांटेस १–४० वाजतां कांहीं दरोडेखोर तिच्या घरांत शिरले. पैकीं विनोद नांवाच्या दरोडेखोरानें मृणालिनीच्या गळ्यांतील सोन्याची माळ काढली त्यामुळें तिच्या गळ्यास हिसका बसून ती जागी झाली. दरोडेखोर आलेले पाहून मृणालिनीनें एकच ओरड केली परंतु चारु नांवाच्या एका दरोडेखोरानें तिला धरली व तो तिच्या छातीवर बसला, व दुसऱ्या एका दरोडेखोरानें तिचें तोंड घट्ट दाबून धरलें इतकेंच नव्हे तर तिला काठीनें झोडपून काढली. इतका प्रकार झाल्यावर दरोडेखोरांनीं तेथून पळ काढला. मृणालिनीचें रडणें ऐकून राधिकाप्रसाद नांवाचा एक शेजारी गृहस्थ इतर कांहीं मंडळीस आपले बरोबर घेऊन तेथें आला तों मृणालिनीचे डोळे भरले आहेत असें त्यास आढळून आलें. पोलिसांस बातमी कळतांच ते तेथें आले तेव्हां दोघे दरोडेखोर जवळच एके ठिकाणीं लपून बसलेले त्यांस आढळले. या दोघां हरामखोरांस पोलिसांनीं मृणालिनीसमोर नेलें तेव्हां तिनें त्यांस ओळखलें. या दोघांचे सांगण्यावरून तिसऱ्याही एका दरोडेखोराचा पत्ता लागला आहे. या तिसऱ्याचें नांव प्रभास हें आहे. एकंदर पांच दरोडेखोर होते. पैकीं तीन सांपडले असून दोघांचा मात्र अद्याप पत्ता नाहीं. तिघे इसम सध्यां पोलिसच्या ताब्यांत असून चौकशी पुढें चालूं आहे.

हिंदुस्थानांतील निरनिराळ्या भागांतून राजनिष्ठाप्रदर्शक तारा व मानपत्रें स्टेट सेक्रेटरीकडे आलीं आहेत त्या सर्वांचें एक पुडकें करून तें आतां बादशहांकडे रवाना होईल. मानपत्रें घालून आलेलीं कित्येक रौप्य करंडकें अत्यंत प्रेक्षणीय असून हिंदी कारागिरांच्या अप्रतिम कौशल्याची साक्ष पटविणारी आहेत.

जमीनमहसूल व तरमबंदी या संबंधानें अधिकारविभागणी कमिशननें केलेल्या रिपोर्टांतील (भाग ५) शिफारशी संबंधानें प्रांतिक सरकारचे अभिप्राय हिंदुस्थान सरकारनें मागविले आहेत. मुंबई व मद्रास या प्रांतिक सरकाराप्रमाणेंच इतर प्रांतिक सरकारास जमीनमहसूल व तरमबंदी या विषयींचे अधिकार असणें जरूर आहे कीं काय, व हा धोरेबंदीचा प्रश्न प्रांतिक सरकारच्या कायदेकौन्सिलच्या नियंत्रणाखालीं द्यावयाचा कीं काय असे दोन महत्वाचे मुद्द या प्रश्नांत विशेषतः अंतर्भूत करण्यांत आलेले आहेत.

आरबी समुद्रावरील हवेंत पर्जन्यास अनुकूल असे फेरफार झाले आहेत. गोव्यापासून दक्षिणेकडे बरसातीचें मान वाढत चाललें आहे. पश्चिम किनाऱ्यावरील वाऱ्याच्या वहाण्याच्या झोंकावरून पर्जन्य अद्याप दूर अंतरावर आहे असें दिसतें. मुंबई व डेक्कनमध्यें बरा पाऊस पडला. मध्यहिंदुस्थानांत किंचित् पर्जन्य झाला. बर्मा, आसाम, पूर्वबंगाल इकडे सर्वत्र पाऊस आहे. पश्चिम किनाऱ्यावरील पाऊस वाढत आहे पण मुंबई व डेक्कनमधील कमी झाला आहे.

बिनपरवाना हत्यारें बाळगल्याच्या आरोपावरून आनंद मोहनराय व इतर कांहीं इसम यांजवर खटला करण्यांत आला आहे हा खटला कलकत्ता येथें सुनावणीस निघाला. आनंद मोहन यांस पूर्वी हत्यारें बाळगण्याबद्दल परवाना घ्यावा लागत नसे. परंतु सरकारनें मागाहून हा त्याचा हक्क काढून घेतला. नंतर कांहीं हत्यारें त्याच घरांतील पाण्याच्या टाक्यांत सांपडलीं असा पुरावा कोर्टापुढें मांडण्यांत आला.

जर्मन कौंट हररूडोल्फ स्टालमन हे कलकत्ता येथें स्पेन्सेस हॉटेलामधील आपल्या खोलींत ता० ५ रोजीं सकाळीं अत्यवस्थ स्थितींत असलेले आढळून आले. त्यांनीं कारेल नांवाचा विषारी पदार्थ घेतला असें कळून आलें. त्यांस हॉस्पिटलमध्यें नेण्यांत आलें आहे. टेबलावर कित्येक पत्रें सांपडलीं. पैकीं एक पत्र पोलिसांस लिहिलेलें आहे. या पत्रांत आपल्या इस्टेटीची कशी काय व्यवस्था लावावयाची या संबंधानें त्यांनीं सूचना केल्या आहेत. त्यांनीं हा आत्महत्येचा प्रयत्न केला असें ह्मणतात.

मु. येथील गुप्त पोलिस खात्यांतील चाणाक्ष अधिकारी मि० व्हिन्सेंट यांना कांहीं सुगावा लागल्यानें ते नवसरी येथें गेले होते. त्यांना येथें मिळालेली बातमी ह्मणजे कांहीं जप्त केलेलीं पुस्तकें नवसरी येथें दडवून ठेवण्यांत आलीं आहेत ही होती. या माहितीप्रमाणें पोलिसनें नवसरी येथें चौकशी करून एका विहिरींत दडवून ठेवलेलीं अशीं ५०० जप्त केलेलीं पुस्तकें हुडकून काढिलीं झडतीचें काम पुढें चालू करण्यांत येऊन एका हिंदु गृहस्थाच्या घरीं ड्रावरमध्यें ठेवलेलीं वीस जप्त केलेलीं पुस्तकें बाहेर काढलीं. या पुस्तकांवरील मळपृष्ठावर ‘ साबणाची कृति,’ ‘शाकाहार’ अशीं नांवें लिहिलेलीं आहेत. हीं पुस्तकें कोठें छापलीं व तीं कोठून आलीं याबद्दलची चौकशी पोलिस करीत आहे.

---

## महमद पैगंबराचीं बोधवचनें.

अबदुल सरवर्दी यांनीं कुराणांत न सांपडणारीं अशीं महमद पैगंबराचीं वचनें एकत्र करून छापलीं आहेत. त्यांचेंच भाषांतर जर्मनमध्यें एडॉल्फ हेस यांनीं केलें आहे. या भाषांतरापैकीं कांहीं वेंचे प्रसिद्ध राशियन तत्त्ववेत्ता काऊंट टाल्स्टोयी यानें मरणापूर्वीं प्रसिद्ध केलें व त्याचें भाषांतर डॉक्टर केरस यांनीं ‘ओपन कोर्ट’ नांवाचे मासिक पुस्तकांत जानेवारीचे अंकांत प्रसिद्ध केलें आहे. तीं वचनें अत्यंत अर्थपूर्ण असल्यावरून त्यांतील कांहींचें भाषांतर आपलेकडे पाठविलें आहे. परमेश्वर ह्मणाला “ मी सकल ऐश्वर्याचा निधि आहे हें कोणास माहीत नव्हतें. हें समजावें [illegible] मी ‘ मनुष्य ’ निर्माण केला. ”

२ परमेश्वरावर भरंवसा ठेव, परंतु आपल्या ‘ उंटास ’ चांगले डांबून ठव.

३ मृत्यु हा मुक्तीची पहिली पायरी होय.

४ मजुराचा घाम सुकण्याचे अगोदर त्याची मजुरी दे.

५ सुखाचे मागून दुःख व मेहनत आणि कष्टाचे मागून सुख येतें.

६ जे स्वकष्टानें आपली भाकर मिळवितात त्यांजवर परमेश्वर प्रेम करतो.

७ पैगंबर ह्मणाला “ माता आपले अर्भकास अग्नींत टाकील असें तुह्मांस वाटतें काय ? ” नाहीं. फिरून पैगंबर ह्मणाला “ परंतु परमेश्वर सर्व जीवांवर मातेपेक्षां जास्त प्रेम करतो ”

८ परमेश्वर ह्मणाला “ जो मनुष्य परोपकाराचें काम करतो त्याचें मी दसपट व दसपटीपेक्षां जास्त कल्याण करतों; जो दुसऱ्याचें वाईट करतो त्यास त्याचा तसाच बदला मिळतो. जो मजकडे एक टीचभर येईल त्याजकडे मी एक यार्ड जातो, जो एक यार्ड येतो त्याजकडे मी बारा यार्ड धावतों, जो मजकडे चालत येतो त्याजकडे मी धावत जातों व जो मजपुढें श्रद्धायुक्त येतो तो कितीही पापी असला तरी मी त्याजला क्षमा करतों. ”

९ जो परमेश्वरास स्मरून क्रोधवचन सहन करतो त्याचे पेक्षां मधुर असें पेय दुसरें कोणीही सेवन केलें नाहीं.

१० एक वर्षाचे अंध भक्तीपेक्षां एक घंट्याचें ध्यान श्रेष्ठ आहे.

११ जसे कष्ट सोसावें तसेंच फल भोगावें, ह्मणजे जितका जितका मनुष्य हतभागी व कष्टी राहील तितकें तितकें त्यास फल अधिक आणि पूर्ण असें मिळतें.’ हें खरें आहे कीं [illegible] ज्यावर प्रेम करतो त्यास शिक्षाही [illegible] देतो.

१२ धर्माबद्दल अश्रद्धा कशानें होते हें तुह्मांस ठाऊक नाहीं. धर्माचा फैलाव करणाऱ्यांच्या चुका ढोंगी लोकांचीं भांडणें, व राजशासनकर्ते पुरुषांनीं केलेले धर्मनियमाचे अर्थ यानेंच मनुष्य सत्य धर्मापासून चाळित होतो.

१३ ईश्वराची इच्छा प्रत्येक सश्रद्धानें ज्ञानप्राप्तीसाठीं झटलें पाहिजे.

१४ शक्य तितकें मूक[illegible] समाध[illegible]वृत्ति ठेवणें यापेक्षां अधीक [illegible]लें [illegible] आहे?

१५ उपवास दान आणि प्रार्थना यापेक्षां श्रेष्ठ काय आहे हें तुह्मास सांगू काय? मित्रानें मित्राचा स्नेह संपादन करणें. द्वेष आणि शत्रुत्व हीं परमेश्वराच्या प्रत्येक देणगीचा अपहार करतात.

१६ एक दिवस महमद पैगंबर म्हणाला 'मला या जगाशीं काय कर्तव्य आहे? मी या ठिकाणीं प्रवासी आहे. वृक्षाचे छायेखालीं आलों आहे व आतांच मी छायेच्या पली[illegible] जाईन.

[illegible] तुमचेपेक्षां श्रीमान आणि विशेष सुंदर [illegible]शा पुरुषाची भेट झाल्यास तुह्मापेक्षां गरीब व तुमचेपेक्षां कमनशीबी मनुष्याचा विचार करा.

१८ जो माझी भक्ती करतो त्याजवर संकटें समुद्रांत वाहणाऱ्या प्रवाहाप्रमाणें खात्रीपूर्वक येतात.

१९ माझा भक्त ज्या कर्णानें श्रवण करतो ते कर्ण मी आहे, तो ज्या नेत्रानें पाहतो ते त्याचे नेत्र मी आहे, तो ज्या हस्तानें ग्रहण करितो व ज्या पायानें चालतो ते मी आहे

चिं० ह० मराठे

## वऱ्हाडसमाचार

आषाढ शुद्ध १४ शके १८३[illegible] दुर्मतीनाम संवत०

## पायोनियरचे प्रलाप

हिंदी वर्तमानपत्रें बेसुमार लेख लिहून इंग्रज अधिकाऱ्यांविषयीं अप्रीति किंवा जातीजातींत वेबनाव उत्पन्न करतात यासाटीं राजद्रोहाच्या कायद्यासारखे कायदे करून त्यांची कडक अंमलबजावणी करावी लागते असें नेहमीं सांगण्यांत येतें. सगळ्या देशी वर्तमानपत्राविषयीं सरसकट असा आरोप करणें हें जसें मूर्खपणाचें आहे तसेंच सगळीं आंग्लोइंडियनपत्रें आपल्या वरली जबाबदारी सोळखून व डोकें थंड ठेवून लेख लिहितात आणि राजद्रोहाच्या कायद्याचें किंवा शिष्टाचाराचें उल्लंघन करीत नाहींत असें ह्मणणेंही वस्तुस्थितीस सोडून होईल. सिव्हिल आणि मिलिटरी ग्याझेटचें उदाहरण सर्वांच्या डोळ्यांपुढें आहेच. आंग्लो इंडियनपत्राचे मुकुटमणी जें पायोनियरपत्र त्यांत त[illegible] लॉर्ड मोर्ले यांजवर अतिशय भयंकर आर[illegible] करण्यांत आला आहे. मिनाक्षी येथें जो कलेक्टरसाहेबाचा खून झाला त्याला जबाबदार लॉर्ड मोर्ले आहेत, खुद्द मोर्ले साहेबांनींच जणूं काय आपल्या हातांत पिस्तूल धरून मि. ॲश यांस ठार मारलें इतका भयंकर अपराध त्यांनीं केला आहे असें त्या लेखांत स्पष्ट ह्मटलें आहे. आणि असा हा भयंकर अपराध कोणता? तर तिनेव्हेलीचे सेशन्स जज्ज मि. पिन्हे यांना त्यांनीं मद्रास हायकोर्टाच्या जज्जाची जागा दिली नाहीं हा! लॉर्ड मोर्ले यां[illegible]सारख्या अधिकाऱ्यावर असा बेसुमार हल्ला करण्यास [illegible]ची [illegible]वणी [illegible] नाहीं त्याला सुशिक्षित हिंदी गृहस्थांच्या राजनिष्ठेंत खरेपणा बिलकुल दिसला नाहीं तर त्याबद्दल मोठेंसें आश्चर्य वाटावयास नको. अशा प्रकारच्या लेखांविषयीं आंग्लो-इंडियन समाजांतसुद्धां कोणाची सहानुभूति असेल असें आह्मांस वाटत नाहीं. अगदीं सौम्य भाषेनें बोलावयाचें ह्मणजे सदर लेख मूर्खपणाचे, उद्दामपणानें, अविचारानें व बेजबाबदारीनें लिहिलेले आहेत इतकें ह्मटलें ह्मणजे पुरें आहे. सदर लेखकाच्या मतें हिंदुस्थानचा राज्यकारभार न्यायाच्या पद्धतीनें व इंग्रज सरकारचा लौकिक कायम राहील व हिंदुस्थान देश हा ब्रिटिश साम्राज्याचें एक मुख्य अंग राहील अशा धोरणावर करण्यांत येत आहे ही मोठी, चूक आहे. न्यायाच्या कोर्टावर त्याची अत्यंत वक्रदृष्टि दिसते. हिंदुस्थानांत यत्किंचित् कोठें कांहीं युरोपियनांच्या इच्छेच्या विरुद्ध घडलें कीं मग न्याय अन्याय न पाहतां किंवा कोर्टमार्फत चौकशी न करतां कोणा तरी सुशिक्षिताला पकडावें आणि उचलून एकदम फांशीं द्यावें ह्मणजे देशांत दरारा बसून शांतता होईल, इंग्रज सरकारची इभ्रत वाढेल, लोकांमध्यें संतोष पसरेल, आणि ब्रिटिश राज्य हिंदुस्थानांत चिरायु होईल अशी त्याची समजूत दिसते. ज्याला त्याला या काळांत मतस्वातंत्र्य आहे तेव्हां पायोनियर मधल्या लेखकाचीं अशी विचित्र मतें असलीं ह्मणून हरकत नाहीं. पण नुसतें मत असणें निराळें आणि तें जाहिर करणें निराळें आहे. विचारस्वातंत्र्य अमर्याद आहे, पण उच्चारस्वातंत्र्याला कायद्याच्या मर्यादा आहेत, आणि त्या मर्यादा समाजाच्या हितासाठीं अवश्य ही आहेत. पायोनियरच्या लेखकानें या कायद्याच्या मर्यादेचा उघड उघड अतिक्रम केलेला आहे. इतकेंच नाहीं तर शिष्टाचाराची मर्यादा सुद्धां पाळली नाहीं. असे लेख लिहिल्यापासून आपण समाजाचें कोणतें हित करावयास पाहत आहों हें तें लेख लिहीणारासच माहित पण अशा लेखापासून लॉर्ड मोर्ले सारखे हिंदुस्थानाविषयीं सहानुभूति ठेवणारे अधिकारी आणि हिंदुस्थानांतले लक्षावधि सुशिक्षित लोक यांची केवढी भयंकर बदनामी होत आहे हें सदर लेखकाला व त्याचे लेख प्रसिद्ध करणाऱ्या पायोनियर पत्राला सरकार योग्य उपायांनीं लवकर समजावून ताळ्यावर आणील अशी आह्मांस आशा आहे. मागें सिव्हिल ॲंड मिलिटरी ग्याझेटची क्षमा सरकारनें केल्यामुळे पायोनियर मधल्या लेखकानें उद्दामपणांत एक पाऊल पुढें टाकलें आहे हें लक्षांत ठेवून देशीपत्रकर्त्यांचे लेख जसे डोळ्यांत तेल घालून पाहाण्यांत येतात तशीच समदृष्टि आंग्लो-इंडियन पत्रांतल्या लेखांविषयीं ही असते, सरकारपाशीं आपपरभाव नाहीं, सापत्नभाव नाहीं असा लोकांचा ग्रह होण्यासारखें वर्तन सध्याचे प्रसंगीं सरकारकडून घडेल अशी आह्मी उमेद बाळगतों.

—

## श्री० शिं सरकार.

शिंद्यांचें घराणें पुरात[illegible] काळापासून शिपाईगिरी बद्दल प्रसिद्ध आहे. घोड्यावर बसण्याची विद्या ही गायनकलेप्रमाणें अद्याप ग्वालेर येथें हयात आहे. परलोकवासी श्री० जयाजीराव महाराज हे अश्वविद्येंत निपुण होते. त्यांच्या पदरीं श्री० बाबासाहेब आपटे यांच्यासारखे सगळ्या हिंदुस्थानांत अव्वल प्रती[illegible] अश्वविद्यानिपुण असे सरदार होते. सध्याचे श्री० महाराज माधवराव शिंदे यांनीं हा आपला पूर्वजांचा शिपाईगिरीचा लौकिक पूर्णपणें राखिला आहे. यांचें सैन्य कवायतींत आज जितकें तयार आहे तितकें हिंदुस्थानांत दुसऱ्या कोणाही संस्थानिकाचें नाहीं असें तज्ञ लोक ह्मणतात. याचें कारण महाराज स्वतः खरे अस्सल शिपाई आहेत. हा त्यांच्या अंगच्या गुण गेल्या आठवड्यांत विलायतेंतल्या लोकांच्या प्रत्ययाला येऊन त्यांच्या गुणांची अत्यंत प्रशंसा झाली हें ऐकून आह्मांस अत्यंत संतोष होतो. महाराज शिंदे हे बिकानेरच्या महाराजासह कांहीं लष्करी खेळ घोडा भरधाव सोडून खेळत असतां त्यांची पगडी घसरली. ती सावरावयाला गेले इतक्यांत घोडा काबूतून जाऊन ग्रीव्हेक्स्‌‌कांग्डेस जाऊं लागला. हें पाहून महाराजांनीं तेरा फूट उडी मारून हातचा लगाम न सोडतां भरधाव सुटलेल्या त्या घोड्याला अडकवून धरलें! ही त्यांची बहादुरी पाहून प्रेक्षकांनीं तर टाळ्यांचा गजर करून त्यांचें अभिनंदन केलेंच, पण ह्या त्यांच्या गुणाचें चीज गुणज्ञ अशा आमच्या बादशहाकडून ही सन्मानाच्या रूपानें होईल अशी आह्मांस खात्री आहे.

—

श्री० शिंदे सरकारच्या बहादुरीचें वर्णन आह्मी इंग्रजी वर्तमानपत्रांत वाचलें. त्याच वेळीं मुंबईच्या "इंडियन सोशल रिफार्मर" पत्रांत श्री० महाराज यांचा विवाह बडोद्याच्या राजकुमारी इंदिराराजा यांच्याशीं होण्याचें ठरल्या विषयींची बातमी ही पण वाचली आणि 'खऱ्या शूरमर्दांनाच सुंदर स्त्रिया मिळणें योग्य' अशा अर्थाच्या ड्रायडन कवीच्या उक्तीची आह्मांस आठवण झाली. श्री० गायकवाडसरकारासारख्या बुद्धिमान्, धोरणी, आणि विचारी पित्याच्या प्रेमछत्राखालीं वाढलेल्या आणि जगाच्या प्रवासानें मिळालेल्या शिक्षणानें सुसंस्कृत झालेल्या राजकन्येस श्री० शिंदे महाराजासारखा कुलशीलवान् आणि जवानमर्द हिंमतबहादर पति मिळणें ही खरोखर भाग्याची गोष्ट ह्मटली पाहिजे. पण अशा विवाहाला ही नांवें ठेवणारे आहेत. हा विवाह त्यांना नापसंत आहे. कां? तर श्री० इंदिराराजासारख्या सुशिक्षित वधूला सपत्नी असणें ठीक नाहीं. बहुपत्नीकत्व हें श्री० शिंदे सरकारांनीं ही करणें चांगलें नाहीं. निवळ तत्त्वाच्या दृष्टीनें ही गोष्ट कोणीही कबूल करील. श्री० सयाजीराव महाराजांनीं सुद्धां बहुपत्नीक विवाहपद्धतीचा आपल्या एका भाषणांत स्पष्ट निषेधच केला आहे. पण तात्विक दृष्टिही जगापासून अलिप्त राहणाराळाच योग्य संसारी माणसानें तात्विक दृष्टि व व्यावहारिक दृष्टि यांच्बांत विरोध [illegible]ल तेथें दुसरीलाच मानलें पाहिजे. श्री० शिंदे महाराज यांचा प्रपंच फार मोठा आहे. एखाद्या सामान्य व्यक्तीप्रमाणें त्यांना नुसते कुटुंबहित पाहावयाचें नाहीं. सगळ्या संस्थानच्या हिताकडे दृष्टि दिली पाहिजे. श्री० महाराजांना अपत्यसुख दुर्दैवानें लाभलें नाहीं. त्यांच्यमागें गादीला कायदेशीर औरस असणें जरूर आहे. महाराजांना दत्तकाचा अधिकार आहे, पण पोलिटिकलखात्यांत शब्दांचे अर्थ केव्हां कसे फिरतील यांचा नेम नसतो. गादीला औरस वारस असला ह्मणजे पोलिटिकलखात्याची लटपट फारशी चालत नाहीं. अशी दूरपर्यंत दृष्टि पोंचवून पाहिलें ह्मणजे श्री० शिंदे सरकारचा होणारा विवाह समाजसुधारणेच्या तत्त्वाला विरोधी असला तरी तो ग्राह्य ठरतो, आणि त्याबद्दल श्री० गायकवाडसरकार किंवा शिंदेसरकार या दोघांना ही दोष लावतां येत नाहीं येवढें टीकाकारांनीं लक्षांत ठेवावें.

—

## (मराठी भाषेंत नवीन ग्रंथ.)

अलीकडे मराठी भाषेंत कित्येक चांगले ग्रंथ होऊं लागले आहेत हें पाहून आह्मांस संतोष वाटतो. रा० पांगारकर यांचें मोरोपंताचें चरित्र, रा० अजगांवकर यांचे महाराष्ट्र कवि चारित्र, रा० नरसिंह चिंतामण केळकर यांचें, 'सुभाषित आणि विनोद,' रा० सरदेसाई यांचा 'मुसलमानी रियासती'ची नवी आवृत्ति, रा० मोडक यांचें 'सुख आणि शांति' हीं पुस्तकें मराठी वाचकांच्या समोर सदोदित राहणारी आहेत. रा० मोरो केशव दामले यांच्या 'शास्त्रीय व्याकरणा'चा सुमारें ९०० पृष्ठांचा पूर्वार्ध गेल्या आठवड्यांतच बाहेर पडला. यांत मराठी व्याकरणांतल्या अनेक मुद्यांची चर्चा व उद्घाटन व्यवस्थित रीतीनें दिलेलें आहे. रा० पांगारकराचे ज्ञानेश्वरमहाराज, एकनाथ, वगैरे साधूंची चरित्रमाला तयार होत आहे. (रा. ए. सी. भट आणि मंडळी ही 'ऐतिहासिकपर्वमाला नांवाची एक पुस्तकमाला तयार करीत असून तींत हिंदुस्थानच्या इतिहासाच्या एकेका युगावर चारशें पानांचा एकेक ग्रंथ विद्वानाकडून लिहवून प्रसिद्ध करण्याचा प्रकाशकांचा उद्देश आहे. या मालेंत वैदिकपर्व, ऋषिपर्व, बौद्धपर्व, मराठेपर्व, मुसलमानपर्व, ब्रिटिशपर्व अशीं अनेक पर्वे यावयाचीं असून त्यांपैकीं कांहीं पर्वे लिहिण्याचें काम रा० ब० अण्णासाहेब महाजनि, प्रो० भानु, रा० वासुदेवराव आपटे वगैरे मंडळीकडे देण्यांत आलें आहे.) या पुस्तकमालेंतलें पहिलें पुस्तक बौद्धपर्व हें रा० आपटे यांनीं लिहिलें असून त्यांत बौद्धधर्माचा साद्यंत इतिहास इंग्रजी, संस्कृत, पाली, तिबेटी, जपानी, सीलोनी वगैरे भाषांतल्या ग्रंथांचे आधारें देण्यांत येणार आहे असें कळतें. बौद्धकाळ हा हिंदुस्थानच्या इतिहासांत अत्यंत महत्त्वाचा काळ असतां त्या काळाची सामान्य माहितीसुद्धां मराठी ग्रंथांतून मिळत नाहीं. रा० आपटे हे बहु भाषाभिज्ञ असल्यामुळें त्यांचे पुस्तकांत पुष्कळ नवी

माहिती वाचकांस मिळेल अशी अपेक्षा करणें गैरवाजवी होणार नाहीं. प्रो० भानू हे चतुःसूत्रीचें मराठी भाषांतर करून छापवीत आहेत. याशिवाय रा. यंदे आणि मंडळी सार्थ उपनिषदें व पुराणें वगैरे काढण्याच्या खटपटात आहे. सारांश, हें १९११ चें साल महाराष्ट्र वाङ्मयांत बरीच महत्त्वाची भर घालील असें वाटतें.

## औरंगजेब बादशहा विषयीं नवी माहिती.

ऐतिहासिक व्यक्तींच्या स्वभाववर्णनासंबंधानें फार जपून लिहिण्याची व बोलण्याची अवश्यकता असते कारण त्यांच्याविषयींचें पुढच्या पिढ्यांचें ज्ञान मर्यादीत असतें. शिवाजी महाराज अक्षरशत्रु होते असा गैरसमज इंग्रज इतिहासकारांनीं करून ठेविला आहे. पण रा० राजवाडे यांनीं 'सरस्वती मंदिरांत' तत्कालीन कागदपत्र प्रसिद्ध करून तो घालविला. श्री. सवाई माधवराव पेशव्यांच्या आत्महत्येची ही गोष्ट अशीच आहे. मागाहून लागलेल्या शोधांनीं ती आत्महत्या नव्हती असें ठरवून नाना फडणिसावरचा छळाचा आरोप दूर केला. यानंतर हैदरअलीची पाळी आली. तो ही बिचारा हिंदूंचा छळ करीत असे अशा विषयींच्या आरोपांतून निर्दोषी ठरला. आतां अवरंगजेब बादशहावरला कलंक घालविणारे एक बंगाली शोधक गृहस्थ पुढें आले आहेत हिंदूंचीं देवालयें फोडून मूर्तींचा उच्छेद करण्याचें पाप आजपर्यंत औरंगजेब बादशहाचे पदरीं बांधण्यांत येत होतें. पण राजा विरंजन सेन नामक एका हिंदु बंगाली जमीनदारानें फारशी कागदपत्रावरून असें दाखविलें आहे कीं मूर्ती व मंदिरें वगैरे फोडण्याचें कृत्य मुसलमानांनीं केलें ही गोष्ट खरी असली तरी तें कृत्य औरंगजेब बादशहाच्या हुकुमावरून झालेलें नाहीं; इतकेंच नाहीं तर असा उच्छेद करण्याविषयींची सक्त मनाई असतां ती गोष्ट घडलेली आहे. राजा विरंजनसेन यांनीं असे मनाईचे हुकुम कितीसे जमा केले आहेत तें आह्मांस ठाऊक नाहीं. त्याचप्रमाणें हुकुमाविरुद्ध हिंदूंना छळणाऱ्या कामदारास बादशहानें कडक शिक्षा केल्या कीं नाहींत तें ही कळत नाहीं. आमचें ह्मणणें येवढेंच आहे कीं असा एकाद दुसरा हुकुम मिळविला असला, तर तेवढ्यावरून बादशहाचें एकंदर धोरण हिंदूविषयीं सहानुभूतिपर नसलें तरी न्यायाचें होतें असें ह्मणतां येणार नाहीं. कारण, पूर्वींचे राजे व बादशहा यांचे हुकुम त्या त्या वेळच्या लहरीप्रमाणें सुटत असत, आणि त्यामुळें त्यांच्या हुकुमांत नेहमींच मुसंगततेचा गुण आढळत नसे. एकाददुसऱ्या वेळीं एकाद दुसऱ्या हिंदु राजाच्या विनवणीवरून एखाद दुसरा देवाचें मंदिर भ्रष्ट करण्यासंबंधानें मनाईचा हुकुम बादशहानें सोडला असला तरी तेवढ्यावरून औरंगजेब बादशहाच्या एकंदर कारकीर्दींचे स्वरूपाविषयीं प्रचलित मत पालटण्याला पुरेसें कारण मिळणार नाहीं. बाकी इतर ऐतिहासिक व्यक्तीप्रमाणें औरंगजेब बादशहाच्या नांवावरला हा कलंक साफ धुतला जाऊन त्याच्या कारकीर्दींचे खरें स्वरूप उज्वल होतें असें ठरलें तर त्यांत आह्मांला आनंदच वाटणार आहे.

## संपदकांतले भीष्माचार्य,

'इंडियन मिरर' पत्राचे आज पंनास वर्षें असलेले संपादक राय नरेंद्रनाथ सेन बहादुर हे गेल्या आठवड्यांत मरण पावले हें शोचनीय वर्तमान वाचून दुःखोद्गार निघणार नाहींत असे इंग्रजी वाचक फार थोडे सांपडतील. ब्रह्मानंद बाबू केशव चंद्रसेन व त्या काळचीं दुसरीं थोर, कर्तृत्ववान्, करारी आणि जोमदार माणसें यांच्यांत नरेंद्रनाथ यांची गणना होती. हे विद्वान तर होतेच पण यांच्या विद्वत्तेला धार्मिक श्रद्धेची जोड मिळाल्यामुळें त्यांचे विचारांत भारदस्तपणा, कळकळ, गंभीरता आणि पूर्णपणा हे गुण विशेषतः दिसत. बौद्धधर्माचें पुनरुज्जीवन करणें हा त्यांच्या जीवितोद्देशांपैकीं एक होता. राजकीय बाबतींत हे नेमस्तपक्षाचे अग्रगण्य असत. यांनीं अलीकडे सरकारी द्रव्यसाह्य घेऊन 'सुलभ समाचार' नांवाचें एक बंगाली साप्ताहिक काढलें होतें. ह्मणून त्यांच्यावर टीकेचा भडिमार झाला होता. पण त्या भडिमारानें ते कृतनिश्चयापासून यत्किंचित ही ढळले नाहींत व तरुणपिढीच्या विचारांना व वर्तनाला चांगलें वळण लावण्याचें व्रत त्यांनीं आमरण पाळलें. गेल्या दिल्ली दरबाराचे वेळीं देशी पत्रकर्त्यांकडून लॉर्ड कर्झन यांना जें मानपत्र देण्यांत आलें तें संपादकांचे हे भीष्माचार्य ह्मणून यांच्या हस्तें अर्पण करण्यांत आलें होतें. यांच्याविषयीं नव्या जुन्या, जहाल नेमस्त, आंग्लो—इंडियन व देशी सर्व प्रकारच्या लोकांचे ठायीं अत्यंत आदर असे. असे हे भीष्माचार्य आपलें संपादकीय कर्तव्य बजावीत असतां गेल्या आठवड्यांत मरण पावले. ह्मणून बंगाल सरकारनें मुद्दाम त्यांच्या स्तुतिपर ठराव काढून त्यांचा सन्मान केला आहे.

## खरें नीतिशिक्षण हेंच.

खरें नीतिशिक्षण पुस्तकाच्या द्वारें देतां येणें अशक्य आहे, तें शिक्षकानें स्वतःच्या उदाहरणानेंच दिलें पाहिजे. याबद्दल वाद नाहीं. पण गंमत अशी आहे कीं शिक्षकांच्या वर्तणुकीसंबंधानें जितकी शहानिशा व्हावयास पाहिजे तितकी बहुधा होत नाहीं. पण जी गोष्ट एखाद्या इलाखाधिपतीस किंवा प्रांताधिपतीस करतां येत नाहीं ती एखाद्या लहानशा संस्थानिकांस सहज करतां येते. फरिदकोटच्या संस्थानिकानें असा हुकुम फर्माविला आहे कीं त्या संस्थानांतील कोणाही शिक्षकानें मद्य, भांग, अफू वगैरे मादक पदार्थांचें सेवन करूं नये. ज्यांना करावयाचें असेल त्यांनीं एकदम जागेचा राजीनामा द्यावा. फार काय पण हुक्का जो त्या प्रांतांत सर्वसाधार आहे तो सुद्धां पिऊं नये. या हुकुमाची बजावणी कशी काय होते तें पाहणें आहे. प्रथम कदाचित् ती फारशी कडक रीतीनें होऊं शकणार नाहीं, पण कालांतरानें या हुकुमाचा सुपरिणाम भावी शिक्षकावर व विद्यार्थ्यांवर झाल्यावांचून राहावयाचा नाहीं. कांहीं शिक्षकांच्या अंगीं नीतिमत्तेचा इतका अभाव हल्लीं दृष्टीस पडतो कीं अशांना नीतिशिक्षणच काय पण कोणतेंही शिक्षण देण्यासाठीं नेमणें व मुलांना त्यांच्या संसर्गांत राहूं देणें ह्मणजे भयंकर पाप आहे. अशीं ठळक अनीतिमत्तेचीं उदाहरणें तरी यापुढें लहान मुलांच्या डोळ्यांसमोर न येतील अशी तजवीज होणें अत्यंत अवश्य आहे. आणि त्यासाठीं फरीदकोटचें उदाहरण ब्रिटिश सरकार व इतर संस्थानिक अनुकरणासाठीं घेतील अशी आशा आह्मी करतों. शिक्षणाचा मूळ झराच गढूळ असला तर पोहोऱ्यांतलें पाणी गढूळ होईलच. हा झरा निर्दोष व स्वच्छ ठेवणें हें अत्यंत जरूरीचें कर्तव्य आहे.

## समाज सुधारणेला सरकारचें पाठबळ.

ना. मि० बसु यांच्या विशिष्ट विवाहाच्या बिलासंबंधानें देशांत सर्वत्र जोराची चर्चा चालूं आहे. जी सुधारणा घडवून आणण्याचा त्या बिलाचा उद्देश आहे तिच्या विषयीं जुन्या मताचा हिंदीसमाज विरुद्ध असला तरी ख्रिस्ती सरकारची सहानुभूति असलीच पाहिजे, तथापि तें बिल लोकमताविरुद्ध सरकार पास करून टाकील असा संभव नाहीं. पण समाजांत दुसऱ्या अशा कित्येक दुष्ट चाली आहेत का त्यांना लोकमत अनुकूळ असलें तरी नीतिभ्रष्टतेच्या कलमाचा आधार घेऊन त्यांचा उच्छेद करणें हें सरकारचें कर्तव्य आहे व अशा गोष्टींकडे स्टेट सेक्रेटरी साहेबांचें लक्ष गेलें आहे हें पाहून आह्मांस संतोष होतो. मुलींना मुरळ्या करून खंडोबाला वाहण्याची चाल महाराष्ट्रांत आहे, तशीच मद्रास इलाखा व म्हैसूर प्रांत या भागांत देवदासी ह्मणून एक वर्ग आहे. पुष्कळ ठिकाणीं अनीतीच्या मार्गाला लावण्यासाठीं वेश्या मुलींना विकत घेतात. या व इतर कित्येक गोष्टींत सुधारणा घडवून आणण्याचे सुधारकांचे यत्न आज कित्येक वर्षें चालले आहेत. त्यांना आतां सरकारचें पाठबळ मिळण्याचा संभव दिसतो. निर्दिष्ट निंद्य प्रघातांचा बंदोबस्त करण्यास पीनल कोडांतलीं ३७२ व ३७३ हीं कलमें पुरेशीं आहेत कीं त्याकरितां कायद्यांत फेरफार होणें अवश्य आहे असें स्टेट सेक्रेटरी साहेबांनीं हिंदुस्थान सरकारास विचारलें असल्याचें कळतें. यावरून या प्रघातांचा लवकर नायनाट करण्याचा स्टेट सेक्रेटरी साहेबांचा स्तुत्य हेतु व्यक्त होतो.

## भारत सेवक

वरील नांवाची संस्था पुण्यास चांगली जागृत आहे. तिचे संस्थापक व पहिले सेवक नामदार गोपाळ कृष्ण गोखले बी. ए. सी. आय. इ. कौंसिलदार हे आहेत. या संस्थेनें राष्ट्रसेवेसाठीं स्वयंसेवक तयार करण्याची शाळा घातली असून तिची एक उपशाखा गेल्या मंगळवारीं उमरावतीस स्थापण्याचा समारंभ जाहिरसभेच्या द्वारें झाला. अध्यक्षस्थानीं आमच्या प्रांताचे बडे कौंसिलदार नामदार रावबहादूर मुधोळकर हे होते. त्यांनीं लोकसेवेकडे आपला सर्वकाल अर्पण केला आहे तेव्हां त्यांच्याच प्रेरणेनें पुण्याचे भारतसेवक रा. रा. नटेश अप्पाजी द्रविड एम. ए., श्रीनिवास शास्त्री बी. ए. एल. सी. हृदयनाथ कुंझरु बी. ए. बी. एस. सी. एल. व्ही कैकिणी एल. ए. जी हे वऱ्हाडांत येऊन त्यांनीं मध्यप्रांत व वऱ्हाड या प्रांतांतील लोकोपयोगी सार्वजनिक कार्यभार आपल्या शिरीं उचलला आहे हे त्यांचे मोठे उपकार होत. आमच्याकडील भागांत सहकारी पतपेढ्या अधिकाधीक प्रचारांत आणाव्या, म्युनिसिपल व लोकल बोर्ड या संस्थांमध्यें [illegible] जीव ओतून लोकमताला स्थैर्य आणा[illegible] आणि प्राथमिक शिक्षण सक्तीचें करण्या[illegible] बाबतीनें सर्व बाजूंनीं प्रयत्न करावे अशी कार्ययोजना या संस्थेनें आपल्या पुढें मांडली आहे. उद्देश फार स्तुत्य आहेत आणि पुण्याच्या गृहस्थांनीं आपलें कार्यक्षेत्र इकडे लांबवर प्रसृत केलें आहे हें त्या संस्थेच्या भरभराटीचें द्योतकच होय.

## वऱ्हाडवृत्त.

**हवामानः—** पुनर्वसु नक्षत्रानें अगदीं बहार करून सोडली. ही सुवर्णवृष्टी ह्मणजे भावी समृद्धीचा श्रींग होय. एकंदर या सप्तकांत ४ इंचांवर पर्जन्य झाला. पेरण्या चालू आहेत. रोगराई ह्मणण्यासारखी कोणतीच नाहीं.

आम्हास लिहिण्यास दुःख वाटतें कीं रा० रा० मनोहरपंत रत्नपारखी एक्स्ट्रा असि० कमिशनर उमरावती यांस देवाज्ञा झाली. अलिकडे हे पुष्कळदां आजारी होत असत आणि पेनशन मिळण्या पूर्वींच त्यांचा देहान्त झाला. हे गृहस्थ मध्यप्रांतांतले जुने अधिकारी असून अलिकडे त्यांचा परिचय वऱ्हाडच्या मंडळीशीं पुष्कळ झाला होता.

**नवे फीचे दरः—** उच्च प्रतीचे शिक्षणामध्य तीन दर्जांच्या शाळांचा समावेश होतो. मिडल स्कूल, हायस्कूल व कॉलेज या तिन्ही विद्यासंस्थांतील फीचे दर वाढविले असून शिष्यवृत्तींची संख्या वाढविली आहे. या संबंधीचा सरकारी ठराव गेल्या गॅझिटांत प्रकाशित झालेला असून त्यांत सर्व बाजूंनीं उच्च विद्यादानाचा विचार केलेला आहे.

## आकोला बाजारभाव

| | | |
|---|---|---|
| हुंडी दर्शनी | | १००॥८= |
| मुंबई व्यांकेची सोन्याचे [illegible] | | [illegible]स |
| | | [illegible]=॥ |
| चांदीचा | | |
| जवारी नवी | ५५ | ६० |
| गहूं | | ८२॥ |
| गहूं बनशी | | ९२॥ |
| चणे | | ३१ |
| तेल | | ८ |
| सरकी | | १०१ |
| तुप | १० | ११॥ |
| कापुस | ७० | ८० |

सुधासिन्धु सुधासिन्धु

सुख संचारक कंपनी मथुरा यांचीं तयार केलेलीं व सरकारांतून रजिष्टर झालेलीं औषधें, जीं वीस वर्षांपासून लोकात अनुभविलीं आहेत.

सुधासिन्धु


हें कफ, खोकला, दमा, थंडीचा ताप, पटकी, शूळ, संग्रहणी, अतिसार, पोटांत दुखणें, वांत्या, मळमळणें, हात पाय व कंबर दुखणें, मुलांचे हिरवे पिवळे जुलाब, डांग्या खोकला, दूध ओकून टाकणें इत्यादीवर स्वादिष्ट व सुवासिक औषध आहे. किमत प्रत्येक बाटलीस ०८ आणे.

दद्रुगज केसरी

गजकरणास समूळ नाहींसें करणारें हेंच फक्त एक पवित्र औषध आहे. कांहीं सुद्धां जळण अथवा आग होत नाहीं. यासच जर दारू अथवा लिंबाचे अर्कांत मिळविलें तर २ बाटल्या अर्क तयार होतो. किंमत प्रत्येक बाटलीस ०४ आण. १२ बाटल्या एकदम मागविल्यानें त्यांस एजंट समजून नोटिशी, हँडबिलें वगैरे फुकट पाठविलीं जातात, व कमिशनही दिलें जातें. चालू सालचें पंचांगही फुकट मिळतें.

मागविण्याचा पत्ताः—
पंडित क्षेत्रपाल शर्मा मालक,
न. १९९ सुख संचारक कंपनी, मथुरा.

अशी संधी पुन्हां ये[illegible] नाहीं.



सहा घड्याळें घेणारांस एक घड्याळ बक्षीस.

पोष्टखर्च माफ

दर एकाची किंमत ३।

जंटलमन इमिटेशन रास्कोप सिस्टिम.

नांवचें खिशांत ठेवण्याचें घड्याळ दिसण्यांत फार सुरेख आहे. सर्व लोकांस ह्या घड्याळाचा लाभ मिळावा ह्मणून मुद्दाम किंमत रुपये ३। ठेविली आहे; पोस्टेज खर्च माफ. घड्याळा सोबत कांच, कमान, पेटी, गोफ, इतकें सामान फुकट मिळेल. अशी अमुल्य संधी पुन्हां येणार नाहीं. व्ही. पी. नें मागवा.

मिळण्याचा पत्ताः—खोजा वलीभाई इस्माल
मुक्काम वर्धा. [ मध्यप्रांत ] WARDA.
नो. नं. ४

चिरकालचा खरा लाभ कोणता ?
पैसा व ज्ञान ज्या योगानें मिळेल तो !
महाराज ! ह्या दोन्ही गोष्टी

वार्षिक वर्गणी ट.ख.स ह रु.१॥ ) कलाशिक्षण ( नमुना अंकास ०॥ आ.

नांवाच्या विविध हुन्नर, शास्त्रीयज्ञान, व्यापार शेतकी, व इतर शेंकडा विषयांची माहिती शिकावणाऱ्यास वर्गणीदार व्हा. मराठी भाषेंत हें असें एकच पुस्तक आहे. वर्गणी रु. १॥ खरी पण चालू मार्च अखेर आश्रय देणारास रु. १। पडेल. कारागिरांस, विद्यार्थ्यांस तर हें पुस्तक अवश्य हवें शिवाय ग्राहकांस हिप्नॉटिझम [ Hypnotism] ऊर्फ अमेरिकन वशीकरणविद्या—जिनें दुसऱ्यास निद्रा मोहन, आरोगहरण व धनप्राप्ति करतां येते; ती रु. २५ फीची तूर्त रु. ११ त शिकवूं. पैकीं १ रु. प्रथम सही बरोबर पाठवावा. बाकीची व्ही. पी. येईल.

ह्या शिवाय नानाप्रकारच्या पोट भरण्याच्या युक्त्या. औषधी. मंत्रतंत्रक्रिया, जडीबुटी, गुप्त प्रयोगाची माहिती वाजवी फी घेऊन शिकवूं. सर्व पत्रव्यवहार गुप्त राखला जातो

व्यवस्थापक—कलाशिक्षण, कार्यालय
ना. न. ५ बडोदें.

### नोटीस

**विहार आनन्दका सागर रंगीन तसवीरे सहित चारा भाग तथा पांचो अंग सचित्र कोख शास्त्र.**

असली हमसे मंगावो धोकेसे बचो स्त्री पुरुषोंके जात, भेद, लक्षण अनेक देशस्थ स्त्रीनायका, कुमारी प्रकृती, सत्व दुती कुलटा, पतिव्रता, व्यभिचारणी आदिको पहचान, रजोधर्म लक्षण, ऋतुविहार मय सहवास स्थान क्रम, शैय्यातिथ, कामस्थान सोलासगारें, बतीसोआभूषण, वस्त्रतओर्दवमधान पुत्रस्टीकर्म, नपुंसकविद्या, उपदंश प्रमेह आदि अनेक रोगोकी चिकित्सा औषधि, पशुभाषा जाननेकी रीति, मंत्रतंत्र, यंत्र, वशीकरण मुद्रा विद्या आदि अमुल्य विषयका भंडार किंमत रु० १

पं० गंगाप्रसाद इंजीनियर शहापडा
ना० नं० ७७ अलीगड सिटी.


## जाहिर नोटीस

जाहिर नोटिस बेशमी जागेश्वर रामदेव गोऱ्हे ब्राह्मण दु० कजवे वरुड ता. मोर्सी जि० उमरावती यांसः—

आह्मीं खालीं सही करणार याजकडून नोटीस देण्यांत येतें कीं, आमचा साधा खांदेखत दस्तावज चार किस्तीचा ता. १८।६।१९०८ ई॥ रोजींचा होता. त्याचा ता. ३।४।१९११ ई॥ रोजीं वरूडांत केदारेश्वरीं मुशाफरखान्यांत यंदा प्लेगचे वेळीं तुह्मीं आमचा आपसांत रा. रा. बळवंत गड्याजी कुकडे, नागेंद्र गड्याजी कुकडे, बाजीराव मल्हारराव काळे, विठोबाजी मराठी हे सर्व रा० कजवे वरुड ता. मोर्सी जि. उमरावती व भगवान वल्दद साबुजी घोरमाडे रा. मौजे रोसनखेड ता० मोर्सी जि. उमरावती या पंचमंडळीच्या समक्ष निकाल केला त्यावेळीं तुमचा मुखत्यार गणपती गुरव हाहि हाजर होता. निकाल ठरला तो खालीं लिहिल्या प्रमाणें:-

२ तुह्मीं आमचे सावकार असून तुमचें आमचें देणेंघेणें आज अंदाज २५ पंचवीस वर्षांपासून असल्यावरून तुह्मीं आमचे जवळून ता. १८।६।१९०८ ई॥ रोजीं कांहीं मागील दस्तावजावरून हिशोब करून घेऊन वसूल वजा जातां निघाले रुपये ४००० चार हजार त्या चार हजार मुद्दल रुपयांस आणखी पुढच्या व्याजा बद्दल २००० दोनहजार रुपये कसर लावून एकंदर ६००० सहा हजार रुपयांचा चार किस्तीचा खांदेखत दस्तावज करून घेतला होता. त्याचा तुह्मी वरील प्यारिग्राफ मधील पंचमंडळीच्या विनंतीस मान देऊन मुद्दल चार हजार रुपयांस दरमाहा दरशेंकडा १ एक रुपया व्याजा प्रमाणें ता० १८।६।१९०८ ई॥ ते ता. ३।४।१९११ ई॥ पावेतों दोन वर्षें नऊ महिने पंधरा दिवसांचा हिशोब करून निघालेल्या बाकींत आह्मीं आपल्या खुद्द मालकीचीं शेतें पांच ५ आमच्या वहिवाटींत असलेलीं तुमच्या इच्छेप्रमाणें आह्मीं आपल्या स्वसंतोषानें तुह्मास नेहमीं फरोक्त देऊन प्यारिग्राफ मधील पंचा समक्ष तुह्मी आह्मांस कर्जमुक्त या निकाला अन्वयें केलें. व मोर्सीस जावून स्टांप आणून फरोक्तनामा करून द्यावा व स्टांपाचा व इतर खर्च दोघांनीं ही निमे निमे लावावा. आणि या निकालाचे वर जागोबा नाना यांस एक गुळाचा भेला द्यावा. या प्रमाणें पक्का निकाल होऊन आह्मीं आपले गांवीं पलट आलों. निकालांतील शेतांचें वर्णन खालीं लिहिल्या प्रमाणेंः—

३ १ कजवे वरूड ता० मोर्सी जि० उमरावती येथील शेत ठिके चिकन सर्वे नंबर १४० एकर ३८७ गुंठे आकार रुपये ८ चें शेत सालीम याचें खातें महादेव शंकर याचे नांवें आहे.

२ कजवे वरुड ता० मोर्सी जि० उमरावती येथील शेत मोठी वाडी सर्वे नंबर १९८ एकर ४८२२ गुंठे आकार रुपये ११ चें शेत सालीम याचें खातें माहादेव शंकर याचे नांवें आहे.

३ कजवे वरुड ता० मोर्सी जि० उमरावती येथील शेत अमराईची वाडी सर्वे नंबर २८९ एकर ४८१७ गुंठे आकार रुपये ११ चें शेत सालीम याचें खातें माहादेव शंकर याचे नांवें आहे.

४ मौजे सिरपूर प्र. वरुड ता० मोर्सी जि. उमरावती येथील सेत भक्तिनचें सर्वे नंबर २० पैकीं २ एकर गुंठे आकार रु० ८८२ १० चें शेत सालीम याचें खातें सिताराम वल्लद आनंदा वानखेडे याचे नांवें आहे.

५ मौजे सिरपूर प्र० वरुड ता० मोर्सी जि० उमरावती येथील शेत टेंभ्याचें सर्वे नंबर १० एकर १०८१३ गुंठे आकार रुपये चें सेत निम्मे एकद्वितीयांश (आठ आण्याचा) हिस्सा दाक्षिणेकडील बाजूचा याचें खातें सखाराम वल्लद मिठु टेंभे याचे नांवें आहे.

५ येणे प्रमाणें वर लिहिलेलीं पांच [illegible] निकालांत देऊन निकाल तुह्मास कबूल है,

४ त्या प्रमाणें तुह्मास आह्मी ता० १२।४।१९११ ई॥ रोजीं बुधवारीं मोर्सीहून स्टांप आणण्यास स्टांपखर्चाचे व इतर खर्चाबद्दल निम्मे रुपये मागितले असतां तुह्मीं एकदम बदलून जाऊन रुपये दिले नाहींत. व मी सेतेंहि घेत नाहीं व मजला मागें झालेला निकाल कबूल नाहीं असें सांगितलें. त्या नंतर तुमचे कडेस त्याच दिवशीं रा. रा. माहादेव नीलकंठ पाटील, प्रभाकर राजेश्वर तानको, नागेंद्र गड्याजी कुकडे, विठोबाजी मराठी, व भगवान वल्लद साबुजी घोरमाडे या मंडळीस पहिल्यानें घेऊन आलों व नंतर दुसऱ्यानें एक दिवस रा रा. रामभटजी काशिकर, वामनराव गोविंद मुळे, बलवंत गड्याजी कुकडे, अनंत दाजी देशमुख, नीळकंठ यादोराव पांडे निपाने या गृहस्थांस घेऊन आलों असतां तुह्मी मानलें नाहीं. ५ सबब या जाहिर नोटिशीच्या द्वारें तुह्मास असें कळवितण्यांत येतें कीं जर मागें पुढें आमचेवर तुह्मी दिवाणी कोर्टांत दावा केल्यास त्याचे जबाबदार आह्मी मुळींच राहणार नाहीं. सर्व जबाबदारी तुमचे कडेसच राहील. आह्मी आरंभापासून करार पुरा करून तुह्मास फरोक्तनामा करून देण्यास तयार होतों व आतांही आहोंत. तरी तुह्मी ही जाहिर नोटीस पावल्या पासून पंधरा दिवसांचे आंत तुह्मी आपला फरोक्तनामा आमचे जवळून करून घ्यावा. व निम्मे स्टांप खर्चाचे व इतर खर्चाचे रुपये द्यावेत. तुह्मास यापूर्वीं वरूड पोष्टांतून रजिष्टर नोटीस केली होती, ती तुह्मी न घेतां पलट केली आहे. पहिल्यानें निकाल कबूल करून नंतर तुह्मी निकाल मोडल्यामुळें आमचे दोन हजार २००० रुपयांचें नुकसान होत आहे तें नुकसान उलट तुमचेवर दिवाणी कोर्टांत दावा करून कोर्ट खर्चासुद्धां भरून घेतलें जाईल. व मग पुढें तुमची [illegible] यांचें ऐकली जाणार नाहीं कळावें. ता० १-[illegible]-११ इ.

दस्तुर माधव माहादेव देशपांडे रा० वरूड हल्लीं रा. रोसनखेड ता. मोर्सी द. खु.

सह्या

१ माधव माहादेव देशपांडे रा० वरूड हल्लीं मु० रोसनखेड ता० मोर्शी जि० उमरावती द० खु०

१ महादेव शंकर देशपांडे रा० वरूड हल्लीं मु० रोसनखेड द० खु०

नं. २७२

## नोटीस

रा० सीताराम वल्लद सुदामसा रंगारी लेके राहणार पातुर्डा यांसः—

नोटीस देण्यांत येतें कीं तुमची मुलगी पारू ही माझा सखा भाऊ आकाराम याची बायको. आकाराम मरण्यास वीस दिवस झाले. काल तुह्मी पंच व पाटील यांचे समक्ष तुमचे मुलीस तुह्मी घरीं नेलें. तिचे आंगावर डागीने एकंदर चांदी २०७ तोळे व सोनें ८ तोळे १॥ मासा, रोख रुपये २४९ एक लांकडी गाडा व घर एकंदर ६९९ रुपयांची जिनगी तुमचे स्वाधीन आहे. मुलगी नेण्याचे वेळेस मी तुह्मास सर्वां सम[illegible] सांगितलें कीं तुमचे मुलीस दरमहा रु[illegible] ४ खाण्यास देण्यास, ती गंधर्व करणार नाहीं तर मी तिजला अन्नवस्त्राबद्दल देतों. परंतु तुह्मी ऐकिलें नाहीं. तरी आतां तुह्मांस कळवितों कीं आज पासून पंधरा दिवसांचे आंत वरील जिन्नगी माझे स्वाधीन करावी. व पंचा समक्ष माझे जवळून अन्नवस्त्राबद्दल तुह्मी लेख करून घ्यावा. असें न केलें तर मी कायद्याप्रमाणें कोर्टांत फिर्याद करीन. कळावें. तारीख ३ माहे जुलै सन १९११ इ०

दस्तुर गोपाळ आनंदराव सही

मारुती परशराम रंगारी मामडे

राहणार पातुर्डा नि० खु०

नो० नं० २७३ हातची.

## नोटीस

रा. रा. जयराम सदू पोहरे राहणार उरळ बुजरूख ता० बाळापूर यांसः—

या नोटिशीनें कळविण्यांत येतें कीं उरळ बुजरुख येथील बारभाईचा नंबर ५१ मधील एक त्रितीयांश उत्तर भागचा हिस्सा ताब्यांत घेण्याबद्दल मी तुह्मावर दिवाणी दावा केला आहे. निशाणी महालीचा सर्व्हे नं० ३२ मधील एक षष्ठमांश हिस्सा तुह्मी आपला वाहवा. तो न वाहिल्या बद्दलच्या नफानुकसानीबद्दल मी तुह्माला काडीमात्र जबाबदार नाहीं. या नोटिशीचा खर्च तुह्मावर पडेल. कळावें. ता० २०।६।११ इ०

सही

पंढरी वल्लद रायसिंग पोहरे

राहणार उरळ बुजरुख

नो० नं० २७४ नि० खु० रेघ.

## नोटीस

जाहिर नोटीस सर्वत्र लोकांस कळविण्यांत येतें कीं, संपतराय शिवकरणदास या नांवानें दानापूर ता. आकोट जि. आकोला येथें दुकान आहे, सदर्हू दुकानचे मालक संपतराय शिवकरणदास हे वारल्यानंतर त्यांची विधवा जीवनाबाई जवे[illegible]पतराय हिनें मजला कायदेशीर रीतीनें व [illegible]प्रमाणें दत्तक घेतलें आहे. सदर्हू दुकानचे स्थावरजंगम जिन्नगीचा व देण्या घेण्याचा मालक मी रामकिसन संपतराय हा आहे. हल्लीं माझी दत्तक आई जीवनाबाई ही लुच्चे लोकांचे नादी लागून माझे इस्टेटीची अफरातफर करीत आहे, व माझा चुलता गणेश नारायण व चुलतभाऊ श्रीनिवास यांचेशीं एगनमत करून माझे जिन्नगीचा अपहार करूं पाहत आहे, व दुकानच्या आसाम्यांवर फिर्यादी करून रकमा वसूल करीत आहे व आपसात तडजोडी करून पैसे वसूल करून माझी नुकसानी करीत आहे. करितां सर्वत्र साहूसावकार व आसाम्या यांस जाहिर करण्यांत येतें कीं, त्यांनीं संपतराय शिवकरणदास दुकान दानापूर या नांवानें माझी दत्तकआई जीवनाबाई अगर माझा चुलता गणेश नारायण अगर माझा चुलतभाऊ श्रीनिवास याचेशीं कोणताही देण्याघेण्याचा अगर खरेदीविक्रीचा व्यवहार करूं नये, केल्यास तो मला बाधक होणार नाहीं. तसेंच आसामी लोकांनीं वरील तीन इसमांस वसूल वगैरे देऊं नये. दिल्यास त्याजबद्दल मी जबाबदार राहणार नाहीं. वरील त्रिवर्ग इसमांवर मी संपतराय शिवकरणदास याचे सर्व जिन्नगीचा ताबा घेण्याबद्दल दावा केला आहे व हल्लीं चालू आहे. करितां आसामी पट्टेवाले, अगर साहूसावकार यांना सदर्हू त्रिवर्ग लोकांस पैसा वगैरे अगर कर्ज वगैरे दिल्यास त्या रकमा बुडतील. करितां ही जाहिरखबर मुद्दाम छापून गांवोगांवीं प्रसिद्ध केली आहे. ता. ३०।६।१९११ इ. सही

रामकिसन संपतराय अगरवाले दुकान

नो. नं. २७५ दानापूर द. खुद्द.

## नोटीस

बेशमी शेट बंकटलाल गणेशदास साहू दुकान पेठ देऊळगांवराजा ता. चिखली जि. बुलढाणा प्रांत वऱ्हाड

खालीं सही करणार भाऊ बापुराज खुंटे रा. पेठ मजकूर हाल स्टेशन मास्तर मदा मंडाळा बी. एन. रेल्वे. सी. पी. याजकडून कळविण्यांत येतें कीं, आमचे चुलते विष्णु मारुती खुंटे यांना मी आपले बापाचे दस्तऐवजाबद्दल तडजोड करण्याकरितां कोणतेही रीतीनें अधिकार दिला नसून तुह्मी व ते मिळून ता. २।४।०४ इ. रोजीं जो रोखा करून घेतला त्याची नक्कल मागें मला विष्णुबाबानें दाखविली. त्या संबंधीं मला पत्रोत्तरीं वारंवार असा जबाब मिळत आहे कीं, सदरील दस्तऐवजांत लिहिलेल्या शर्तीप्रमाणें कांहीं एक अंमलबारी झाली नसून तिची गरजही पण उरली नाहीं. व तो कागद तुमचे जवळ फोल ह्मणून पडून आहे. वाटेल ते वेळीं वापस घेतां येईल. त्या कागदाला ह्मणतां ह्मणतां सात वर्षें झालीं व आतां अमर्याद वेळ पर्वेतों रकमी दस्तऐवज जरी फोल झाला तरी तुमचेजवळ उगीच पडून असूं देणें मला पसंत नसून त्याचे कांहीं तरी निराकरण व्हावें असें मला वाटतें, अलिकडे आमचे मौजे आरंभी ता. दारव्हा येथील स्थावर मिळकत आमचेकडे येऊन चुकली व नंबराप्रकरणीं तुमचे पैरवी अगर खटपटीचें मुळींच प्रयोजन उरलें नाहीं. तरी कृपा करून वरील फोल दस्ताऐवज एक महिन्याचे आंत आपण मजकडेस टपाल मार्गानें वापस करावा. माझे चुलते विष्णुबाबा यांना माझे वडिलांचे जिन्नगी ह्मणजे घर, वाडगे आणि जांभोरे येथील शेत वगैरेवर कांहीं एक हक्क नसून मी दूर देशीं असल्यानें त्यांना तुमच्याशीं संगनमत करण्याला बरेंच फावलें आहे. व ते तुम्हांस आपलेसें करून घेऊन मजला नुकसान पोहचूं पाहतात. याचा पडताळा खुद्द तुह्मांस दिसून येत आहेच. जास्त लिहिणें नको. तरी आपण सूज्ञ आहांत पोक्त विचार करून लौकर विनंती मान्य कराल अशी आशा आहे. कळावें. ता. ३०।६।११

सही

भाऊ बापुराज खुंटे स्टेशनमास्तर

नो. नं. २७६ मंडाला बी. एन. रेल्वे.

## नोटीस

माहादु वल्लद बाबाजी चांभार राहणार वालवाड तालुके बार्शी जिल्हा सोलापूर मौजे तांदळवाडी यांसः—

खालीं सही करणार हिजकडून नोटीस देण्यांत येतें कीं मी तुमची लग्नाची बायको असून सुमारें ६ वर्षां पासून तुह्मी मजला सोडून दिलें व दुसरी बायको करून तुह्मी संसार करीत आहांत व मी दोन वेळां तुमचे येथें नांदण्यास आली असून तुह्मी नांदविलें नाहीं. त्यामुळें आजपावेतों खाण्यापिण्याबद्दल मजवर २५० रुपये कर्ज झालें आहे. तरी ही नोटीस पावल्यापासून ८ दिवसांचे आंत तुह्मी तें कर्ज देऊन त्याजबद्दल लेखी पावती घेऊन मजला नांदविण्यास घेऊन जावें. असें तुह्मी केलें नाहीं तर हीच फारकती समजून मी दुसरा नवरा करीन. मग तुमचा मजवर नवरेपणाचा कांहींच हक्क राहणार नाहीं कळावें. तारीख १ जुलई सन १९११ इसवी दस्तुर शेखइस्माईल अर्जनवीस रा० वाशीम.

सही

लक्ष्मी मर्द माहादु चांभार राहणार

सारसी ता० मंगरूळपीर इची

निशाणी बांगडी.

नो० नं० २७७

## नोटीस

किसन्या वल्लद माहादु चांभार राहणार भवरत प्रगणें व तालुका व जिल्हा आकोला यांसः——

खालीं सही करणार इजकडून नोटीस देण्यांत येतें कीं मी तुमची लग्नाची बायको असून सुमारें ७ वर्षांपासून तुह्मी मजला सोडून देऊन दुसरी बायको करून संसार करीत आहात व मी दोन वेळां तुमचे येथें नांदण्यास आले असूनही तुह्मी नांदविलें नाहीं. त्यामुळें आजपावेतों खाण्यापिण्याबद्दल मजवर ३०० तीनशें रुपये कर्ज झालें आहे तरी तुह्मी ही नोटीस पावल्यापासून ८ आठ दिवसांचे आंत माझेवर झालेलें कर्ज तीनशें रुपये देऊन लेखी पावती ध्यावी. व मजला नांदविण्यास घेऊन जावे. जर तुह्मी या प्रमाणें केलें नाहीं तर हीच फारकती समजून मी दुसरा नवरा करून संसार करील. मग तुमचा मजवर नवरेपणचा बिलकूल हक्कसंबंध राहणार नाहीं कळावें. तारीख १ माहे जुलई सन १९११ इ. दस्तुर शेखइस्माईल अर्जनवीस राहणार वाशिम. सही

मंजुळाबाई मर्द किसन चांभार राहणार सारसी तालुके मंगरूळपीर पोष्ट मंगरूळपीर इच्या हातची निशाणी बांगडी.

नो० नं० २७८

Oriental Government security

LIFE ASSURANCE COMPANY

Limited

ESTABLISHED IN 1874.

R. Paterson, Berar manager,

HEAD OFFICE—BOMBAY

HEAD —QUARTER— NAGPUR·

FUNDS Exceed $3\frac{3}{4}$ crores

CLAIMS PAID FOR OVER 3 CRORES.

IMMEDIATE ETTLEMENT OF CLAIMS

If there be one thing of more importance than another in connection with Life Assurance, it is when claims arise, that the amount due under the policy be paid to the Claimants at the earliest possible date. This the Directors of the 'Oriental' keep well before them and act up treating their clients with the utmost liberality.

UNQUESIONABLE SECURIY.

It is not sufficient to read that a Company's funds amount to a given sum, but it is essential to know how such Funds are invested if in miscellaneous and risky investments or how secured.

The Funds of the 'Oriental' are invested in Government Securities and lodged with the Government Official Trustee of Bombay in terms of the Company's Trust Deed, as Security for Claims arising, through decease of assured lives, and endowmenp policies matured.

Government Officers, professional men, Tradesmen and others by employing a portion of their annual income or profits in effecting life policies, create fund equivalent to the savings of many years.

No mān can be sure how long he will live, and although he may save money yet, if he dies early before he had time to save much, his wife and family may be in distress. Life Assurance is a means by which this danger is got over. Life being so uncertain, the sooner a man makes up his mind to assure his life the better. Once satisfied of tha propriety of the step, do not delay. There are numerous instances in the records of the 'Oriental' where the delay of a month or less, has left the family withous the intended provision.

INFLUENTIAL AND ENERGETIC AGENT WANTED. For terms please apply to the undersigned.

Prospectuses, forms and any further information can be obtained on application—

M. DESOUZA,

CHIEF AGENT, Nagpur

CHIEF AGENCY FOR C. P., BERAR & KHANDESH

हें पत्र आकोला येथें कैलासवासी खंडेराव बाळाजी फडके यांच्या वऱ्हाडसमाचार छापखान्यांत नारायण खंडेराव फडके यांनीं सदाशिवआश्रमांत छापून प्रसिद्ध केलें.

# वऱ्हाडसमाचार.

Berar Samachar.

Registered No N. 4

वर्ष ४५ आकोला—सोमवार तारीख १७ माहे जुलई सन १९११ इ० [ अंक २८ ]


## वर्गणीचे दर

आकोल्यांतील लोकांस........१ रुपया

बाहेरगांवीं ट. हां. ........ २ रुपये

वर्गणी आगाउच घेण्याची वहिवाट ठेविली आहे.

## नोटिशींचे दर

दर ओळीस दीड आणा.

हेडिंगच्या दोन ओळी धरल्या जातील नोटीस सुवाच्य असली पाहिजे.

सुचनाः– गुरुवारच्या आंत येणाऱ्या नोटीसा त्याच आठवड्यांत घेतल्या जातील; यापुढें येणाऱ्या नोटिसास स्पेशल चार्ज पडेल.

## मुंबइ बँकचें सोनें.

मुंबई बँकचा छाप असलेल्या उत्तम कसाच्या सोन्याच्या चिपा मुंबई बँकच्या आकोले व उमरावती येथील ऑफिसांत विकत मिळतील. गिऱ्हाइकानें जास्त माहिती करितां बँकेत तपास करावा.

एका चिपचें वजन १६ $\frac{२}{३}$ तोळे असतें. साधारण भाव वऱ्हाड समाचार वर्तमानपत्रांत बाजारभाव ह्या सदराखालीं सांपडेल.

मुंबई बँक G. A. PHILLIPS.<br>
आकोला २१.९.१० एजंट.<br>
नो० न० २

## जाहिरात

### मुंबई ब्यांकेची सेव्हिंग ब्यांक.

ह्या बँकेंत खालीं दिलेल्या अटीवर ठेवी ठेवितां येतात.

कोणत्याही वर्षाचे १ ले जानेवारी आणि ३१ दिसेंबर याच्या दरम्यान एक हजार रुपये पर्यंत पैसा ठेविला जाईल.

ठेवी दोन अथवा अधिक इसमांच्या नांवावर ठेवतां येतील आणि तो पैसा त्या पैकीं एकास अथवा जास्त इसमांस अगर त्यापैकीं मयताचे मागें राहील त्यांस काढतां येईल.

व्याज दर साल दर शेंकडा तीन रुप याप्रमाणें दिलें जाईल. व्याजाची आकारणी प्रत्येक महिन्याची जी कनिष्ठ शिल्लक असेल तिजवर केली जाईल. मात्र पांच हजारांवरील शिल्लक रकमेस व्याज नाहीं. नियमांच्या प्रती बँकेंत अर्ज केला असतां मिळतील.

मुंबई ब्यांक G. A. Phillips.<br>
आकोला ९.१९.०९ एजंट<br>
नं. १

## यंदाचा पाऊस.

यंदा पावसानें लवकरच कंबर बांधल्यामुळें ओला चारा लवकर मिळूं लागेल यांत शंका नाहीं. तथापि तुमच्या गुरांना आतांपासूनच ओला चारा घालणें अपायकारक आहे. कारण पुढें कदाचित पावसानें ओढून धरल्यास हिरवा चाराही नासा होणार आणि हिरव्याची चट लागल्या मुळें वाळलेला कडबा गुरें खाणार नाहींत. बरें ओली वैरण पहिल्या पासूनच मुबलक मिळाली तरी ती एकदम गुरांना सुरू केली असतां ती त्यांना पचत नाहीं. याकरतां या वेळींच वाळलेल्या कडब्याचे अगदीं बारिक तुकडे करून त्यावर मिठाच्या पाण्याचा शिडकाव घाल तर तुमचीं गुरें फार गोडीनें वैरण खातील. या कामा साठीं आमचें सुधारलेलें कडबा कापण्याचें यंत्र वापरा. कारण आमचें यंत्र शेतकऱ्यांनीं, गवळ्यांनीं व पागा आफिसरांनीं ही पसंत केलें आहे. किंमती बद्दल विचाराल तर फक्त १० रु. ९ आणे पडतात.

किर्लोस्कर बंधु,<br>
पोष्ट किर्लोस्करवाडी, औंध.<br>
नो. नं २९० ( औंध संस्थान. जि. सातारा )

श्री राधावल्लभाजयति

## वर्षफल।

हमारे पास सिर्फ १ पोस्टकार्ड पर किसी फल या फूल का नाम लिख भेजो हम आप के एक वर्ष का सुख, दुःख लाभ, हानि, जीवन, मरण, रोग, सन्तान, तरक्की, मौकूफी, व्यापार में किस वस्तु स लाभ होगा दिसावरी काम में कैसा लाभ होगा और जो महीना हानिकारक उस का उपाय महीनेवार वर्षफल वी० प० द्वारा ॥ रुपये में भेज देंगे. हमारे हांय जन्म पत्रादि उत्तमोत्तम बनते हैं, अनेक प्रशंसा पत्र मौजूद हैं, विशेष परिचय के अर्थ ८॥ आना का टिकट भेज कर सूचीपत्र मंगा लीजीये.

मिलने का पताः —<br>
गोस्वामी राधामोहन शर्म्मा<br>
चित्ताखाना आगरा.

### ✻ इकडे लक्ष द्या ! ✻

## नाग, नरसे व पिठोरी

आह्मी येथें विक्रीकरितां नाग, नरसे, जिवत्या, पिठोरी, पाठोडा, गणपती बुध, बृहस्पती व तुळशीचें लग्न वगैरे चित्रांचे कागद फारच सुरेख छापले आहेत. चित्रें दर शेंकडा १ रुपया. चित्रें हजार घेतल्यास दर शेंकडा ८१४ आणे प्रमाणें देऊं.

बाळकृष्ण अनोबा दलाल,<br>
कंपॉझीटर वऱ्हाडसमाचार<br>
अकोला.

( पत्रें विठ्ठलमंदीराच्या पत्त्यावर पाठवावें. )

## जाहिर नोटीस

सर्वत्र लोकांस खालीं सही करणार यांजकडून कळविण्यांत येतें कीं मौजे सावरगांव डुकऱ्याचें तालुके चिखली जिल्हा बुलडाणें येथील स्थावर माल १ शेत सर्वे नंबर ६० आकार रुपये २४ यांतील निमे हिस्सा १ शेत सर्वे नंबर ८९ आकार रुपये १८ यांतील हिस्सा ॥=८ १ शेत सर्वे नंबर ११ यांत आंब्याचें झाड १ त्यांतील एकषष्ठांश हिस्सा; १ शेत सर्वे नंबर २६ यांत आंब्याचीं झाडें २ यांतील एकषष्ठांश हिस्सा १ गढींतील धाब्याचें घर खांड ६ दुजोडी १८ खांब ओरी खांड ६ खांब १२ तसेच ६ पुढें खुलें अंगण लांब २५ रुंद १६ हात सदहू जागा १ घर धाब्याचें खांड ६ दुजोरी खांब १८ लांब २० रुंद १६ हात येणें प्रमाणें स्थावर जिनगी माझी वडिलोपार्जित मालकीची आहे ती चिमी मर्द पांडु जात कुणबी राहणार सावरगांव डुकऱ्याचें इनें कोणास गहाण, खरेदी किंवा बक्षीस देऊं नये. तिजपासून माझे विचारा शिवाय गहाण, खरेदी किंवा बक्षीस घेतल्यास तीं सर्व कागदपत्रें रद्द समजलीं जातील. नंतर सदर्हूसंबंधानें मात्र कोर्टांत कोणत्याही इसमाची कांहीं एक तकरार चालणार नाहीं ही नोटीस दिली कळावें ता० १०-७-११ इसवी दस्तुर रघुनाथ शामराव दलाल राहणार बुलडाणा.

सही

सखाराम वल्लद विठोबा राहणार<br>
सावरगांव डुकऱ्याचें याचे<br>
नो. नं. २८६ हातची निशाणी रेघ<br>
मुक्काम बुलडाणा

## नोटीस

विठू वल्लद बहिराजी चौधरे रा० कुरळ ता० वाशीम यांसः–

मी तुकी मर्द विठू रा० बार्शिटाकळी नोटीस देते कीं मी तुमची लग्नाची बायको असून मला सांगून न जातां तुह्मी ६।७ वर्षें नापत्ता झाले होते. हल्लीं तुह्मी रा० धोंडबा रिपोरकर वणजारी याचे घरीं असल्याचें समजतें. मी आतां सज्ञान झालें आहे सबब मला टाकून घातलेले मुदतीचे पैसे पंचानुमतें देऊन एक महिन्यांत घेऊन जावें. नाहीं तर तुह्मांस मला वागविणें नाहीं असें समजून हीच फारकत गणली जाईल व मी दुसरा घरठाव करीन. मग तुमचा माझेवर व माझ्या दुसऱ्या नवऱ्यावर कोणत्याच प्रकारचा हक्क राहणार नाहीं. कळावें. ता० ९।७।११ इ०

सही

तुकी मर्द विठू नि० खु० आंगठा आज<br>
नो. न. २८७ मुकाम अकोला.

## नोटीस

नोटीस बेशमी पन्नालाल सालीकराम आगरवाले राहणार पंचगव्हाण तालुके आकोट जिल्हा आकोला व राहणार मंगरुळ तालुके मूर्तिजापूर जिल्हा आकोला यासः—

मी खालीं सही करणार जवालाबाई जवजे गोपालदास आगरवाले साहू दुकान कजबे बार्शीटाकळी तालुके व जिल्हा आकोला या नोटिसीनें कळवीते कीं माझे तर्फे माझ्या दुकानचें सरकारी काम सर्व तऱ्हेचें काम करण्याकारितां तुम्हाला कुलमुखत्यारपत्र दिलें होतें तें तारीख १ माहे फेब्रुवारी सन १९११ इसवी पासून तुम्ही आमचे दुकानचें काम करणें बंद केलें व कामांत लक्ष दिलें नाहीं सबब वरील तारखेपासून मुखत्यारपत्र रद्द केलें आहे. कळवें तारीख ९ माहे जुलई सन १९११ इसवी सही

१ जवालाबाई जवजे गोपालदास द० खु०<br>
नो. नं. २९४

## नोटीस

सर्वत्र लोकांस जाहीर नोटीस देण्यांत येत आहे कीं, आमचे पक्षकार श्री राजेश्वर-संस्थान अकोला यांचे वहिवाटदार गोपाळ हरी सावरकर राहाणार अकोला कजबे अकोला ता० व जिल्हे मजकूर येथील खालीं लिहिलेल्या वर्णनाचें घर भागाबाई मर्द विठोबा हिचे मालकीचें असून ते तीनें मरणसमई श्री राजेश्वर संस्थानास मृत्युपत्र करून दिलें आहे. सदर्हू बाई मरून आज सुमारें एक वर्ष झालें आहे. सदर्हू घरावर श्री राजेश्वर संस्थानाशिवाय कोणाचाही हक्कसंबंध नाहीं करितां घराचे सामानासंबंधीं अगर इमल्या संबंधीं कोणताच व्यवहार श्री राजेश्वर संस्थानाशिवाय दुसरे कोणाबरोबर केल्यास कायद्याप्रमाणें व्यवस्था केली जाईल. व तो बेकायदेशीर समजला जाईल.

कजबे अकोला व जिल्हे अकोला येथील माझें घर माझे मालकीचें असलेलें धाब्याचे खांब २७ पुढें ओसरी व वर माडी कवेलुची व पुढें आंगण, घराचा दर्शनीभाग उत्तरेस आहे. याची पू० प० हात अजमासें २३ व द० उ० हात अजमासें ४० याची चतुःसिमा पू० भाऊराव मुनसी याचें घर प० गल्ली असून पलीकडेस बुटीचें दुकान, द० हरि रामचंद्र अनवीकर यांचें घर आणि उ० गोपाळराव पुराड याचें घर या चतुःसिमेंतील सालीम घर दगडमातीइमल्यासुद्धां. कळावें. ता० १९।७।११ इ० सही

दत्तात्रय विनायक गाडगीळ वकील<br>
श्री राजेश्वर संस्थान तर्फे.

नो० नं० २९९

## नवे फीचे दर.

(आकोलें येथील जाहिर सभा.)

आमच्या स्थानिक सरकारांनीं उच्च शिक्षण अधीक तेजोमय करण्यासंबधानें प्रयत्न चालविले आहेत हा मोठ्या आनंदाची गोष्ट होय. असल्या प्रयत्नांत चुका होतच असतात तथापि सामान्य धोरण फार उच्च कोटिचें आहे हें आह्मी प्रांजलपणें कबूल करितों.

अँग्लोव्हर्न्याक्युलर आणि हायस्कुलांतील मुलांचे फीचे दर वाढविण्याविषयीं व इतर बाबतींत मध्यप्रांत आणि वऱ्हाडचे सरकारानीं अलीकडेस एक ठराव प्रासिद्ध करून ता० १-७-१९११ पासून अंमलांत आणिला त्यासंबंधानें लोकमत काय आहे तें पाहण्यासाठीं ता० १४-७-११ रोजीं अकोलें येथें श्रीराम थिएटरमध्यें जाहिर सभा भरली होती त्या सभेंत अध्यक्ष रावबहादूर देवराव विनायक यांनीं केलेले भाषणाचें तात्पर्य.

१ उच्च प्रतीचें शिक्षण सुधारावें, उच्च प्रतीच्या शाळांतून उगीच मुलांची भरती होऊन मास्तर लोकांकडून त्यांचेवर योग्य नजर ठेवितां न येईल अशी संख्या वाढूं न द्यावी हा जो प्रांतिक सरकारचा हेतु आहे तो स्तुत्य आहे त्याजबद्दल व गेल्या १५ वर्षांत सरकारचा खर्च उच्च प्रतीच्या शिक्षणाकडेस पुष्कळ वाढला आहे. याजबद्दल हि सरकारचे आभार आहेत. सन १८९५-९६ सालांत अँग्लो-व्हर्न्याक्युलर आणि हायस्कुलाकडेस खर्च ४४८००, होत होता तो १९०९-१० सालांत २३९००० झाला व खाजगी शाळांस मदत देण्याकडेस जो ६८००० रुपये खर्च होत होता तो २९६००० झाला आहे ही आनंदाची गोष्ट आहे.

२ ज्या लोकांचीं मुलें या शाळेंतून अभ्यास करित असतात ते बहुतेक मध्यम प्रतीचे लोक असतात परंतु अशा लोकांचें वर्षाचें उत्पन्न किती असावें हा प्रश्न आहे. ज्याचें उत्पन्न वर्षाचें ५०० पांचशांहून अधिक असेल तो मध्यम प्रतीचा म्हटल्यास अकोलें येथील हायस्कूल आणि अँग्लो-व्हर्न्याक्युलर स्कूल यांत शिकत असलेल्या ४७७ मुलांपैकीं ३४४ मुलें गरीब ह्मणून शाळेंतून बाहेर निघूं शकतात आणि उत्पन्न वर्षाचें ३०० धरून पाहिलें असतां २९४ मुलें गरीबांचीं ठरतात. हिंदूंची स्थिति शोचनीय तर आहेच परंतु मुसलमानांची त्याहून फारच शोचनीय आहे.

३ इंग्लिश पाहिली, दुसरी, तिसरी व चौथी या चार यत्तांची फी आजपावेतों ।।- आठ आणे होती ती १ रुपया होणार व इंग्लिश पांच, सहा व सात या तीन यत्तेंत २ रुपयांची ३ रुपये होणा ह्मणजे दुप्पट व दीडपटीचें प्रमाण होत आहे व ही वाढ निदान ५-६-७ या यत्तेंत तरी फार जरब होत आहे. पाहिल्या ४ यत्तेंत आठ आण्याचा एक रुपया- हें प्रमाण दुप्पटीचें होतें. परंतु एक रुपया पासून एकदम तीन रुपये वाढ ही मध्यम स्थितीच्या लोकांस असह्य होईल कीं नाहीं हें पाहिलें पाहिजे.

४ अलीकडेस मध्यम स्थितीच्या लोकांचें उत्पन्न बरेंच वाढलें आहे असें सरकार समजत आहे. तसें जरी मान्य केलें तरी महर्गतेचें मान पाहतां त्यांचे खर्च हि मर्यादे बाहेर वाढले आहेत, त्यांतच हा अधिक फीचा खर्च सोसवेल कीं नाहीं हें पाहिलें पाहिजे.

५ कदाचित अधिक फी देऊनाहि गरिबांची आणि मध्यम स्थितीच्या लोकांचीं मुलें शाळेंतून राहतील परंतु त्याजवरून त्यांना हे दर सुखाचे होतील असें मानणें योग्य होणार नाहीं. कारण तरुण मुलांस उनाड फिरूं देणें इष्ट नाहीं. खासगी शाळा स्थापन करून त्यांत मुलें घातलीं तर फी कमी होत नाहीं व अशा मुलांस दुसरें कांहीं शिक्षण मिळण्याची व्यवस्थाहि नाहीं तेव्हां अर्थात पोटमारा करून मुलें शाळेंत ठेवणेंच पुष्कळ आईबापांस जरूर होईल.

६ नामदार चीफ कमिशनर साहेब यांचें ह्मणणें रास्त आहे कीं आजकाल इंग्रजी शिकणारे विद्यार्थीं निवळ पोटाकरितां शिकतात. पूर्वीं प्रमाणें चैनीखातर इंग्रजी शिक्षण नव्हे. हल्लींच्या परिस्थितींत कोणत्याहि दिशेनें तरुण लोकांस उद्योग पहावयाचा झाल्यास इंग्रजी ज्ञान थोडें बहुत तरी पाहिजेच. व धंदेशिक्षणांतहि त्याची अवश्यकता आहचे. सारांश, आज गरीब असो, मध्यम स्थितीचा असो, किंवा श्रीमंत असो इंग्रजी शिक्षण हें सर्वांस अवश्य आहे व तें एकदम इतकें महाग करणें इष्ट होईल कीं नाहीं. मुलें उनाड होणें हें सरकारास व प्रजेस सारखेंच घातक आहे. नामदार मेहेरबान बटलरसाहेब हे हिंदुस्थानसरकारचे मोठे सल्लाकार आहेत, ते ह्मणतात कीं "अज्ञान हें चांगल्या राज्याचें शत्रु होय" त्याच प्रमाणें लोकदृष्टीनें पाहतां अशा अज्ञान लोकांपासून साधारण प्रजेस प्रत्यक्ष संकट भोगावीं लागतात हें आपण नेहमीं पाहतों. सर्वसाधारण प्रजेची दैना होण्यास अज्ञान हेंच कारण आहे. जर कोणत्याहि प्रजेस अनेक प्रकारचीं संकटें भोगण्यास कोणी एक कारण शोधणें असल्यास "अज्ञान" हेंच होय.

७ उच्च प्रतीचे शिक्षणाचा सर्व बोजा सरकारावर टाकणें योग्य नाहीं. त्याचा बराच भाग लोकांनीं उचलावा हें सर्वांस मान्य आहे व याप्रमाणें उच्च शिक्षणास लोकसाह्य आहे ही गोष्ट नामदारसाहेब हि कबूल करितात. ज्यांना अनुकूल असेल तशा सुखी लोकांनीं गरीब मुलांस विद्यार्जनास साह्य करावें हें ठीक. परंतु गरीब मुलांच्या आईबापांनीं आपल्या शक्तीबाहेर फी देण्याचें त्यांना भाग पाडणें बरें नाहीं. त्यांतून जें शिक्षण आज सरकारच्याहि पसंतीला उतरत नाहीं तशाबद्दल फीचे दर वाढविले तर न्यायाचें होईल कीं काय?

८ नवीन ठरावाप्रमाणें एक वर्षांत मुलगा नापास होऊन त्याच वर्गांत पुढें राहिला तर त्याजपासून पुन्हां जास्त फी घेतली जाणार ही गोष्ट हिंदुस्थानांत इतरत्र असेल असें वाटत नाहीं. कारण मुलगा नापास होण्यांत केवळ मुलाचाच अपराध असेल असें ह्मणतां येत नाहीं. व असला जरी तरी त्याच्या एकाकीं त्याबद्दल शिक्षा कां भोगावी?

९ एक वर्ष मुलगा नापास होऊनहि जर मास्तर त्यास पुढील वर्गांत घेईल तर मे० डायरेक्टर साहेबांनीं त्या मुलाची अभ्यासस्थिति पाहून त्याजला शाळेंतून अजीबात काढून टाकण्याचा त्यांना अधिकार दिला आहे. अर्थात मे० डायरेक्टर साहेब सर्व प्रांतभर फिरून सर्व शाळांतून अशीं वर घेतलेलीं मुलें स्वतः पाहूं शकणार नाहींत हें उघड आहे. हें काम कोणा तरी परिक्षकाचें होईल व त्यांनीं ज्या मुलाविषयीं वर्गाच्या मास्तरास उमेद आहे तशा मुलाविषयीं हात घालणें बरें होणार नाहीं व असा मुलगा विद्यार्जनास सर्वस्वीं आंचविला जावा हें इष्ट आहे कीं काय?

१० नामदार साहेबांचे ठरावांत फीचे दर वाढवून पगारी जागा बऱ्याच ठेविल्या आहेत असें ध्वनित केलें आहे. परंतु पूर्वींच्या पगारी जागा आणि हल्लींच्या पगारी जागा यांत फार अंतर आहे. पूर्वींच्या पगारी जागा कोणत्याच प्रसंगीं चार रुपयांहून कमी पगाराच्या नव्हत्या. व त्या मुलांना फी माफ असे. आतां पगारी जागा एक रुपयापासून सहा रुपयांपर्यंत केल्या असून त्यांना फी माफ नाहीं. शिवाय त्यापूर्वीं इतक्या नाहींतहि असें पुष्कळांस वाटतें.

११ आजपर्यंत जी गोष्ट वऱ्हाडांत झाली नाहीं ती आतां होणार ह्मणजे सरकारी नोकरांच्या मुलांकरिता "सरकारी नोकरांचीं मुलें" ह्मणूनच विशेष पगारी जागा ठेविल्या आहेत व त्या एकंदर ५७ आहेत. प्रथमतः सरकारी नोकर आणि इतर लोक अशी निवड विद्यार्जनांत करण्याचें कारण नाहीं. दुसरें, किती पगाराच्या नोकरापर्यंत ही सवलत मिळावयाची हेंहि ठरावांत लिहिलें नाहीं. एखाद्या डेपुटी कमिशनरच्या किंवा सेशन्स जजाच्या व अशाच दुसऱ्या मोठ्या हुद्देदाराच्या मुलांस उभे वर्षांत १००।२०० रुपये उत्पन्न करणाऱ्या सरकारी नोकरास सारखें लेखणें चमत्कारिक आहे. सरकारी नोकर. संबंधानें विशेष मेहरबानगी दाखविणें असल्यास कांहीं कमी पगाराच्या नोकरांस व पेनशनरांस ही सवलत दाखविल्यास शोभेल. विशेषेंकरून कमी उत्पन्नाच्या मेलेल्या नोकरांच्या मुलांकरितां सवलत ठेवणें विशेष दयाळुपणाचें होईल. तसेंच मुसलमान लोकांच्या मुलांकरितां आतां फक्त २४ पगारी जागा वऱ्हाडांत ठेविल्या आहेत परंतु ह्या पूर्वींच्यापेक्षां पुष्कळ कमी योग्यतेच्या अशा ह्मणतां येतील. त्याचप्रमाणें मागसलेल्या लोकांच्या मुलांसाठीं डायरेक्टर साहेबांच्या मर्जीवर ठेविलें आहे. परंतु ह्या एकंदर गोष्टींचा विचार करितांना नामदार साहेबांनीं माफीचे विद्यार्थी यांच्यासंबधानें कांहींच केलें नाहीं असें दिसतें. मुसलमान वर्ग हा फार गरीब आहे त्याचप्रमाणें अलीकडेस मागसलेल्या वर्गाचींहि मुलें शाळेंत बरींच येऊं लागलीं आहेत. आणि आजकाल इंग्रजीवांचून तरुणोपाय नाहीं ही गोष्ट सरकारलाहि मान्य आहे. यास्तव अशा लोकांकरितां विशेष सवलत देणें जरूर आहे. वऱ्हाडांत माफीचीं मुलें घेतलीं जात होतीं तीं केवळ गरीबीच्या सबबीनेंच घेतलीं जात नव्हतीं. मुलगा होतकरू असून गरीब आहे तरच त्याजला माफी मिळत असे. व तसें होणें आतांहि इष्ट होईल.

१२ सरकारचा उद्देश उच्च शिक्षणास लोकसाह्य व्हावें व होई तों पर्यंत उच्च शिक्षणाच्या शाळा खाजगी व्हाव्या असा जर असेल तर खाजगी शाळेंत आणि सरकारी शाळेंत फीचे दर सारखे ठेविल्यानें हा हेतु सिद्धीस कसा जावा?

यास्तव आजच्या सभेंत विशेषेंकरून विचार करण्यासारख्या गोष्टी खालीं लिहिल्याप्रमाणें आहेत.

१ जो मुलगा चवथ्या यत्तेपर्यंत आजपावेतों आठ आणे माहिना देत होता त्यानें आतां १ रुपया देऊन वरील ३ यत्तेकरितां सरसकट ३ रु० महिना देणें योग्य होईल कीं काय? व जी फी ५व्या यत्तेला तीच ७ व्या यत्तेला योग्य होईल कीं काय?

२ एक वर्षांत मुलगा नापास झाल्यास त्याचवर्गांत त्याजला दुसऱ्या वर्षीं शिक्षेदाखल आधिक फी मागणें योग्य होईल कीं काय?

३ एक वर्ष मुलगा नापास झाला असतांना व त्याजला वरील वर्गाच्या मास्तरनें त्याची बुद्धिमत्ता पाहून त्याजला डिसमिस करणें याजबद्दलचा अधिकार वरिष्ठ अधिकाऱ्यास असावा कीं काय?

४ (विद्येनें किंवा सांपत्तिक स्थितीनें) मागसलेल्या लोकांच्या मुलांकरितां कांहीं विशेष सवलती नको आहेत कीं काय?

५ सरकारी नोकरांच्या मुलांसंबंधानें हल्लीं जो सरसकट ठराव केला आहे तो योग्य आहे कीं काय?

६ सरकारास उच्च शिक्षणाची जबाबदारी लोकांवर टाकणें आहे तर फीचे दर सरकारी शाळेंत आणि खाजगी शाळेंत सारखेच ठेवणें योग्य होईल कीं काय?

७ ज्यांचें उत्पन्न ३०० किंवा ५०० पेक्षां कमी असेल अशांच्या मुलांस फीचे दर असह्य होऊन त्यामुळें उनाड म्हणून फिरूं देणें एकंदर लोकस्थितीस किंवा सरकारच्या राज्यपद्धतीस तरी चांगलें होईल कीं काय?

'उच्च प्रतीचें शिक्षण द्यावयाचें नसल्यास दुसरी कांहीं तरी शिक्षणपद्धती सुरू करून नंतर हे नियम अंमलांत आणणें अधिक सुखकर झालें नसतें कीं काय?

याप्रमाणें मुद्दे लोकांपुढें मांडल्यावर रा. रा. रामचंद्र विष्णु महाजनि यांनीं भाषण केलें कीं सरकारचा सदर ठराव लोकस्थितीकडेस पाहतां घातक होईल. पहिले वर्षीं नापास झालेला मुलगा दुसरे वर्षास शाळेंत ठेविला असतां त्याचा अभ्यास पाहून शाळेंतून काढण्याचा अधिकार हेडमास्तरास जरी दिला नाहीं तरी त्याचा परिणाम चांगला व्हावयाचा नाहीं. शाळाखातें पवित्र खातें आहे. त्यांत मास्तरास मुलांच्या पालकास जेरीस आणण्याची संधी देणें बरी नाहीं. वायव्य प्रांतांत फी वाढविण्याचा ठराव करण्यापूर्वीं लोकमत समजून घेण्यासाठीं कांहीं पुढाऱ्यांची एक कमिटी नेमली तशी इकडे

स व्यवस्था झाली नाहीं यामुळें आज आपल्यास ही सभा भरविणें जरूर पडलें आहे. सुखी लोकांनीं निराश्रित मुलास साह्य करणें हें इष्ट आहे. परंतु अशा साह्यासही कांहीं एक वळण देऊन त्या साह्याचा दुरुपयोग न होईल अशी व्यवस्था असावी असें आग्रहानें त्यांनीं सूचविलें.

नंतर आकोलें येथील वृद्ध व प्रतिष्टित गृहस्थ मे० मिर्झा आबासबेग यांचे व अशाच हजर असलेल्या कित्येक गृहस्थांचीं समयोचित व सुश्राव्य भाषणें होऊन सरकारास अर्ज करण्यासाठीं मि० देवराव विनायक, मि० रामचंद्र विष्णु, मि० अमानखा सलीमखा व मि० रामचंद्र मार्तंड गुप्ते यांची कमिटी नेमून अर्ज इंग्रजी व मराठी तयार करून अनुकूल लोकांच्या सह्या घेऊन तो अध्यक्षांनीं सरकाराकडे पाठवावा ह्मणून ठरलें.

---

## वऱ्हाडसमाचार

आषढ वद्य ६ शके १८३३ दुर्मतिनाम संवत०

### फी वाढविण्याचा प्रश्न.

थोड्या दिवसांपूर्वीं मुंबई इलख्यांतल्या कमिशनरांच्या कान्फरन्सनें तिकडील हायस्कुलांची फी वाढविण्यासंबंधाची शिफारस सरकारला केल्याचें जेव्हां बाहेर आलें, तेव्हां त्या शिफारशीचा प्रतिध्वनि आमच्याही प्रांतांत लवकरच उठेल असें दुःस्वप्न आह्मांस पडलें होतें, आणि दुर्दैवानें लौकरच तें खरें झालें. आमच्या प्रांताधिपतींनीं नुकताच एक ठराव काढून कॉलेजें, हायस्कूल व मिडलस्कूल यांची फी वाढविण्याचें जाहिर केलें आहे. कॉलेजची फी ५ रु. च्या जागीं ६। रु, हायस्कूलची २ रु. चे जागीं ३ रु. व मिडलस्कूलची ८ आण्याचे ऐवजीं १ रु. केली आहे. हिंदुस्थानांत दिल्या जाणाऱ्या मध्यम प्रतीच्या ( हायस्कुलांतल्या ) शिक्षणांत सुधारणेला पुष्कळ जागा आहे ही गोष्ट निर्विवाद आहे, आणि ती सुधारणा घडवून आणण्यास लागणारा पैसा फीचें उत्पन्न वाढवून उत्पन्न करण्याचें सरकारी धोरण ठरलें आहे असें दिसतें. शिक्षणाच्याप्रीत्यर्थ सुधारलेलीं राष्ट्रें ज्या प्रमाणांत खर्च करतात ती प्रमाणाची हद्द हिंदुस्थानांत येऊन पोंचली असती तर तिच्याहून ज्यास्त लागणारा खर्च रयतेनें सोसला पाहिजे, अर्थात् फीचे दर वाढविले पाहिजेत असें ह्मणणें सयुक्तिक होतें. पण वस्तुस्थिति तशी नाहीं, इतर देशांच्या मानानें हिंदुस्थानांत शिक्षणाप्रीत्यर्थ होणारा खर्च फारच थोडा आहे, ही गोष्ट सर्वांना ठाऊक आहे. सध्याच्या स्थितींत इंग्रजी शिक्षण केवळ विद्याप्रीतीस्तव, किंवा भूषणास्तव कोणी फारसें घेत नाहींत, तर ती जरूरीची गोष्ट होऊन बसली आहे ह्मणून घेतात ही गोष्ट सरकारलाही मान्य आहे. उदरनिर्वाहाला अवश्य होऊन बसलेल्या अशा गोष्टी रयतेला होतील तितक्या स्वस्त द्यावयाच्या किंवा उलट महाग करून ठेवावयाच्या यांपैकीं उदार राजनीति कोणती आहे हें सांगणें फारसें कठीण नाहीं. गरीब, पण तरतरीत बुद्धीच्या विद्यार्थ्यांसाठीं स्कालर्शिपांची संख्या वाढविली आहे, आणि ज्यांची बुद्धि स्कॅालर्शिप मिळविण्या इतकी तरतरीत नसेल त्यांना मदत करण्याचें काम नागरिकांचें आहे; किंबहुना लोकांना शिक्षणाची कितीशी अवश्यकता वाटत आहे त्याची ती एक कसोटीच आहे असें ही ठरावांत ह्मटलें आहे. लोकांची ज्ञानतृष्णा कसोटीला लावण्याचें वस्तुतः कारणच नाहीं. कारण कीं हायस्कुलांतल्या प्रत्येक वर्गांत मुलांची संख्या मर्यादेच्या बाहेर गेली आहे ही गोष्ट सरकारनेंही कबूलच केली आहे सरकारनें स्कॅालर्शिपांची संख्या वाढविली आहे या त्यांच्या मेहरबानीबद्दल एकंदर रयत विशेषतः गरीब विद्यार्थी व त्यांचे पालक सरकारला हमेषा दुवाच देतील. पण फीचे दर वाढविल्यापासून होणारें हजारों गरीब विद्यार्थ्यांचें नुकसान दहापाच स्कॅालर्शिपांनीं कसें भरून येईल तें आह्मांस कळत नाहीं. स्कॅालर्शिपा मिळविण्याची योग्यता अंगीं असेल त्याच गरीब मुलांनीं शाळेंत यावें असें ह्मणणें ह्मणजे ज्यांना पंन्नास बुंदीचे लाडू पचविण्याचें सामर्थ्य असेल त्यांनींच रोज जेवावें, इतरांनीं दुशाळ उपाशीं राहावें असें ह्मणण्यासारखें आहे. विद्या ही अन्नासारखीच जर अवश्यक वस्तु आहे तर ती इतक्या प्रमाणांत पचविण्याचें सामर्थ्य असेल त्यांनींच घ्यावी, इतरांनीं नाहीं, असें कसें ह्मणतां येईल? गरीब विद्यार्थ्यांच्या शिक्षणाची सोय करून देण्याची जबाबदारी सरकारनें आपल्यावरची काढून नागरिकांवर घातली आहे ती कोणत्या तत्त्वावर तें आह्मांला कळत नाहीं. रयतेला निर्वाहाचीं साधनें मिळवितां येतील इतकें शिक्षण देण्याची जबाबदारी सरकारावरच आहे हें तत्त्व पृथ्वीवरील सर्व सुधारलेल्या राष्ट्रांत मान्य झालेलें आहे, आणि कॉलेजांतलें नसलें तरी हायस्कुलांतलें शिक्षण हें आजकाल पोट भरण्याला किमानपक्षीं अवश्य आहे. त्याअर्थीं सेकंडरी एज्युकेशन किंवा मिडल व हायस्कूल यांत दिल्या जाणाऱ्या शिक्षणाची जबाबदारी सरकारला दुसऱ्यावर टाकतां येत नाहीं.

फीचे दर वाढविण्याला आणखी एक कारण असें सांगण्यांत आलें आहे कीं सरकारच्या हायस्कूलच्या शिक्षणाचा खर्च पूर्वींच्या प्रमाणाहून फार वाढला आहे. १८९५-९६ सालीं म्हणजे पंधरा वर्षांपूर्वीं सरकारी हायस्कुलें व मिडलस्कुलें यांच्या प्रीत्यर्थ खर्च ४४००० रु० होता, तो १९०९-१० सालीं २३९००० रु. झाला आहे, व खाजगी शाळांना मदत ह्मणून पूर्वीं ६८००० रु. दिले जात, त्या जागीं आतां २५६००० रु. दिले जातात. ही खर्चांत झालेली वाढ मोठी दिसते खरी; पण त्या वाढीबरोबर दुसऱ्याही कित्येक गोष्टींचा विचार केला पाहिजे. सरकारचें वाढतें उत्पन्न, लोकांत शिक्षणाची वाढती रुचि, शिक्षणाची वाढती अवश्यकता, इ० गोष्टींच्या मानानें सरकार योग्य प्रमाणांत शिक्षणाप्रीत्यर्थ खर्च करीत आहे कीं उधळपट्टी चालली आहे हें पाहिलें तर उधळपट्टीचा आरोप सरकारावर करतां येईल असें कोणास ही वाटणार नाहीं. अमेरिका किंवा जपान, फ्रान्स किंवा जर्मनी यांच्याशीं तुलना केली तर हिंदुस्थानच्या खर्चाचें प्रमाण पुष्कळच मागें आहे असें दिसून येईल. शिवाय हायस्कुलांतून शिकणाऱ्या विद्यार्थ्यांच्या पालकांची सांपत्तिक स्थिति व सध्याची महागाई याही गोष्टी विचारांत घेतल्या, तर या काळांत हायस्कूल व मिडलस्कूल यांच्या फीचे दर वाढविण्यासंबंधाची सल्ला ज्यांनीं सरकाराला दिली असेल त्यांनीं लोकस्थितीचा दूरवर पोक्त विचार केला नाहीं असें ह्मणणें भाग पडतें. आमचे दयाळु अधिकारी यासंबंधांत अधिक माहिती मिळवून व पोक्त विचार करून सध्याचा ठराव फिरवितील निदान त्याला पुष्कळसें सौम्य स्वरूप देतील लोकांचा दुवा घेतीच अशी आह्मांस अद्याप आशा आहे.

---

### पूर्व आणि पश्चिम

या महिन्यांत विलायतेंत भरणाऱ्या सर्ववर्ण परिषद् पुढें वाचण्यासाठीं ना. गोखले यांनीं ' पूर्व आणि पश्चिम ' या विषयावर जो निबंध लिहून पाठविला आहे तो ' हिंदुस्थान रिव्ह्युच्या ' ताज्या अंकांत आगाऊ प्रसिद्ध झाला आहे. हा ना० गोखले यांच्या नेहमींच्या भाषणपद्धतीप्रमाणें राज्यकर्त्यांचें मन न दुखवितां हिंदी लोकांचें राजकीय ध्येय सरळ आणि स्पष्ट शद्बांनीं मांडणारा असल्यामुळें विचारी माणसांस त्याची योग्य किंमत कळल्यावांचून राहणार नाहीं. नामदारसाहेबांचा हेतु हिंदुस्थानापुरताच पूर्व आणि पश्चिम यांचा विचार करण्याचा होता, व तिकडे दुर्लक्ष न करतां त्यांनीं इंग्रज लोक हिंदुस्थानांत आल्यापासून तो आज तागाईत त्यांचे संबंधानें लोकांच्या हृदयांत वागणाऱ्या विचारांत कसकसें अंतर पडत गेलें तें थोडक्यांत फार चांगलें दाखविलें आहे. प्रथम इंग्रज लोकांच्या कर्तृत्वशक्तीविषयीं पूर्ण आदर व त्यांच्या सद्धेतूविषयीं पूर्ण विश्वास लोकांच ठायीं आरंभीं पूर्ण असल्यास काय कारणें झालीं व पुढें तो विश्वास डळमळण्यास कित्येक इंग्रज अधिकाऱ्यांचें वर्तन कसें कारण झालें, इंग्रजी शिक्षणानें हिंदी लोकांच्या वाढत्या आकांक्षाबरोबर त्या पूर्ण करणाऱ्या सवलती राज्यकारभारांत न दिल्या गेल्यानें मध्यंतरी राजद्रोहाची लाट कशी उद्भवली व लॉर्ड मोर्ले व लॉर्ड मिंटो यांच्या मुत्सद्दीपणामुळें ती लाट परावर्तन पावून आतां पुनः राज्यकर्त्याविषयींचा विश्वास प्रजेच्या मनांत कसा स्थापित झाला आहे याचें थोडक्यांत ऐतिहासिक विवेचन करून नामदार साहेबांनीं राज्यकर्त्यांना पुढचा सोपा सरळ आणि निष्कंटक मार्ग ह्मणजे प्रजासत्ताकसंस्था हिंदुस्थानांत सुरू करणें हा आहे असें स्पष्ट सांगितलें आहे. हा मार्ग स्वीकारणें ह्मणजे पोरासोरांच्या हातांत तीक्ष्ण धारेचें शस्त्र देण्यासारखें धोक्याचें आहे असें आंग्लोइंडियन ह्मणतील पण त्यांनीं हें लक्षांत ठेवावें कीं इंग्रजी अंमलाखालीं पंनास वर्षें राहून हिंदी लोकांना या तीक्ष्ण शस्त्राच्या योग्य उपयोगाविषयीं अज्ञान असणें हें ब्रिटिश सरकारला कोणत्याही रीतीनें भूषणास्पद नाहीं. हिंदी लोकांवर पूर्ण नजर ठेवा, त्यांना दिलेल्या देणग्यांचा दुरुपयोग होणार नाहीं अशी खबरदारी ठेवा, पण त्या देणग्यांना ते पंनास वर्षांनंतरही पात्र नाहींत असें ह्मणणें ह्मणजे त्या आपणास कधींच मिळणार नाहींत अशी निराशा त्यांचे ठायीं उत्पन्न करण्यासारखें आहे, आणि अशा निराशेचे परिणाम कधीं चांगले होत नसतात

---

### विवाहस्वांतत्र्य

ना० मि० बसु यांच्या विवाहाच्या बिलाविषयीं मोठ्या जोराची चर्चा चालू आहे. अशा वेळीं त्या बिलाची वाट काय लागेल तें न पहातां मिश्र विवाहाला सध्या असलेले कायद्याचे व सामाजिक प्रतिबंध दूर करण्याच्या उद्देशानें ' आर्यन ब्रदरहुड ' नावाची एक संस्था निर्माण झाली आहे. या संस्थेंत ज्या कित्येक गृहस्थांचीं नावें आहेत ते सामाजिक सुधारणेच्या बाबतींत नीतिधैर्यासाठीं विशेष प्रसिद्ध आहेत असें नाहीं. अशा स्थितींत ही संस्था इष्ट सुधारणा कोणत्या मार्गानें घडवून आणिते तें पाहणें आहे. नुसते कागदावरले ठराव कृतींत न आणतां कागदावरच ठेवावयाचे असले तर अर्ध्या अधिक हिंदुस्थानाची सहानुभूति कदाचित त्यांना मिळेल. पण तिच्या योगानें विवाहस्वांतत्र्याचा मार्ग कितीसा निष्कंटक होईल तें मात्र आज सांगतां येत नाहीं.

---

### प्रेमाचा नजराणा

आमचे प्रिय बादशहा पांचवे जॉर्ज यांना नुकत्या झालेल्या राज्याभिषेकाचे प्रसंगीं विलायतेंतल्या प्रजाजनांकडून कोणत्या प्रकारचा नजरनजराणा मिळाला त्याविषयींची माहिती अद्याप बाहेर आली नाहीं. हिंदुस्थानांत दिल्ली दरबारचे वेळीं राजेरजवाडे व संस्थानिक, म्युनिसिपालिट्या, व इतर संस्था यांचेकडून त्यांच्या त्यांच्या ऐपतीप्रमाणें व बादशहाच्या योग्यतेप्रमाणें प्रेमाचे निदर्शक नजराणे, मानपत्रें, वगैरे देण्यांत येतलिच आपल्या स्वागताप्रीत्यर्थ पैशाची उधळपट्टी होऊ नये अशी आपली इच्छा बादशहांनीं दयाळुपणानें आगाऊ कळवून आम्हा प्राच्यलोकांच्या खर्चिक स्वभावाच्या उमाळीस मर्यादा घालून दिली आहे. पण खऱ्या प्रेमाचा नजराणा भारी किंमतीचा असलाच पाहिजे असें नाहीं. या संबंधांत माजी प्रिय बादशहा सप्तम एडवर्ड यांच्या राज्यारोहणाच्या वेळच्या एका गोष्टीचें स्मरण होतें. सदर बादशहांना एक विलक्षण नजराणा मिळाला होता. हे बादशहा युवराज असतांना १८७६ सालीं इकडे आले होते, तेव्हां सीलोनबेटांत त्यांनीं लोकांच्या आग्रहावरून तेथें आपल्या हातानें एक नारळाचें झाड लाविलें होतें. या झाडाचें फळ त्यांच्या राज्याभिषेकाचे वेळीं सीलोनच्या लोकांच्या वतीनें त्यांना अर्पण करण्यांत आलें होतें. तें ग्रहण करतांना बादशहांना जो आनंद झाला त्याची बरोबरी रत्नकरंडक अर्पण करण्यानें ही झाला नसता. प्रेमाला मोल नाहीं. श्रीकृष्णांनीं विदुराच्या घरच्या कण्या प्रेमा-

नें खालुया. त्याप्रमाणें आमचे नूतन बादशहाही गरीबें हिंदीप्रजेनें प्रेमपुरःसर दिलेल्या क्षुद्र वस्तूंचा स्वीकार आदरपूर्वक करतील यांत शंका नाहीं.

---

## लॉर्ड डफरिन व मि० सेन.

कै० बाबू नरेंद्रनाथ सेन, संपादक इंडियन मिरर,, व माजी व्हाइसराय लॉर्ड डफरीन यांच्यांत उडालेल्या एका खटक्याची हकीकत मुंबईच्या टाइम्स पत्रानें दिली आहे. तिजवरून मि० सेन यांच्या तेजस्वितेबद्दल कोणाला ही आदर वाटल्यावांचून राहणार नाहीं. मि० सेन यांना एकदां लाटसाहेबांनीं बोलावून त्यांच्याशीं कांग्रेस विषयीं बोलत असतां कांग्रेसला अनुकूल असें त्यांचें मत पाहून अपमानकारक शब्द उच्चारले. मि० सेन यांना तें सहन न होऊन त्यांनीं तत्काळ जबाब दिला कीं असला अपमान करून घेण्यासाठीं मी येथें आलों नाहीं. लाटसाहेबांना आपली चूक तत्काळ कळून आली आणि त्यांनीं माफी मागून ही गोष्ट बाहेर फोडूं नका असें विनवणी करून सांगितलें. मि० सेन यांनीं ही आपलें वचन पाळलें, आणि आमरण या गोष्टीचा उच्चार कोणाजवळ केला नाहीं. ही गोष्ट टाइम्ससारख्या प्रमुख आंग्लोइंडियन पत्रकर्त्यानें बाहेर काढल्यामुळें सध्याचे काळीं तिला विशेष महत्त्व आहे. नेमस्तपक्षाचीं मतें असलीं ह्मणजे तो मनुष्य सरकारी अधिकाऱ्यांचा मिंधा किंवा त्यांच्या लाथा खाणारा असतो अशी जी समजूत कित्येक मतलबी पत्रकर्ते उठल्या बसल्या फैलावीत असतात, त्यांनीं मि० सेन यांच्या चरित्रांतला हा भाग विशेष विचार करण्यासारखा आहे.

---

## एक नवी अभिनंदनीय संस्था

हिंदुस्थानांत आज जर एखाद्या ज्ञानाची विशेष जरूर असेल तर ती शास्त्रीय ज्ञानाची होय. या ज्ञानाच्या अभावीं आमची प्रगति क्षणोक्षणीं कुंठित होत आहे. आमच्या घरांतल्या स्वैपाकाच्या चुलीपासून तों थेट लोखंडाच्या मोठाल्या कारखान्यापर्यंत प्रत्येक गोष्टींत सुधारणेला विपुल जागा असतां ती कशी करावी तें न कळल्यामुळें आमचे व्यापार व उद्योगधंदे साफ बुडाले आहेत. ही आमच्यांतली उणीव घालविण्याचे उद्देशानें परलोकवासी टाटा यांनीं सायन्स इन्स्टिटयूट नांवाची संस्था मोठ्या प्रमाणावर उभारली आहे. पण एकतीस कोटी लोकांच्या गरजा भागविण्यास एक संस्था कितीशी पुरणार ? त्यासाठीं जागोजाग लहानलहान संस्था व्हावयास पाहिजेत. शिवाय शास्त्रीय विषयांचें ज्ञान असणारांत सहकारित्व ही पाहिजे आहे. तें उत्पन्न करणाऱ्या संस्थाची ही उणीव कांहीं लहान नाहीं. ही दुसरी उणीव कांहीं अंशानें तरी भरून काढण्याचें काम नवीनच स्थापन होऊं पाहत असलेल्या इंडियन गिल्डचे हातून झाल्यास महत्कार्य होईल. ही संस्था शिक्षणाचे हेतूनें इंग्लंडमध्यें जाऊन राहिलेल्या कित्येक तरुण हिंदी गृहस्थांनीं स्थापिलेली असून तिचे उद्देश शास्त्रीय विषयाचें एखादें मासिकपत्र चालविणें, शास्त्रीय शोधाचा मार्ग सुगम करणें, हिंदुस्थानचें आरोग्य व उद्योगधंदे यांच्या सुधारणेवर जाणत्या लोकांकडून निबंध वगैरे लिहविणें, आणि शास्त्रीय शिक्षणाच्या मार्गांत विद्यार्थ्यांना ज्या वारंवार अडचणी येतात त्या दूर करून त्यांना मदत करणें हा आहे. या कामीं इंग्लंडांतले नामांकित शास्त्रज्ञ लॉर्ड एअरंडेल, सरहेनरी रास्को, प्रो० रॅमसे, गेलराथ, प्रो० स्मिथेल्स वगैरे मंडळीचें साह्य आहे असें कळतें. या संस्थेच्या हस्तपत्रकावरून संस्थेची उमेद तर मोठी दिसते. त्याप्रमाणें हातून कार्य घडेल तेव्हां खरें.

---

## पेशव्यांची रोजनिशी.

पुण्याची डेक्कन व्हर्नाक्युलर ट्रा० सोसायटी वल्गना न करतां हातीं घेतलेलें पेशव्यांच्या रोजनिशी छापण्याचें काम मुकाट्यानें करीत आहे हें पाहून आह्मांस संतोष वाटतो. या सोसायटीनें यापूर्वीं सहा रोजनिशा छापल्या. सातवी गेल्या महिन्यांत प्रसिद्ध झाली आहे. या रोजनिशींत थोरले माधवराव पेशव्यांच्या वेळीं, मुलकीखाशी, न्यायखातें, इनामदार, जहागिरदार वगैरेंची स्थिति कशी होती, कोणकोणते कर होते, व ते कसे वसूल होत, टपालखात्याची व्यवस्था कशी होती, बाजार कसे बसवीत, व्यापाऱ्यांस कसें उत्तेजन मिळे, कोणकोणत सार्वजनिक उत्सव कशा प्रकारें करीत, इ० नानाविध विषयाचे ज्यांत उल्लेख आहेत असे अस्सल कागदपत्र इंग्रजी अर्थासह दिले आहेत. यांतली माहिती किती गमतीची व बोधपर आहे. याचा थोडासा मासला येथें देतों. जमिनीचा धारा ऐनजिन्नसीं घ्यावा, पैशाच्या रूपानें घेऊं नये म्हणून हल्लीं कित्येक सरकारापाशीं मागणी करीत आहेत. पण त्यावेळीं लोकांची उलट मागणी असे. वे०मू०रा० बाळंभट व नारो चिमणाजी यांनीं १० बिघे जमीन ऐनजिन्नस धाऱ्यानें केली, पण धारा देण्याची ताकद नसल्यामुळें नक्ती धारा देण्याची परवानगी व्हावी म्हणून अर्ज केला, व तो श्रीमंतांनीं मंजूर केला. मद्यपानाचे संबंधांत सध्या बरीच चळवळ सुरु आहे. अशा वेळीं पुढील माहिती लोकांना गमतीची वाटेल. नागोठणें येथील खारीबरील मजुरदारांनीं अर्ज केला कीं दारूखेरीज आपलें चालत नाहीं व ती तर सरकारनें बंद केली. तेव्हां दुप्पट पैसे देऊन ती परमुलुखांतून आणावी लागते. यासाठीं दारू गाळण्याची परवानगी पूर्वींप्रमाणें द्यावी. त्यावेळीं मद्यपाननिषेधक सभा होत्या कीं नाहीं व असल्या तर त्यांचें या अर्जावर काय म्हणणें होतें तें कळण्यास कांहीं साधन नाहीं ही दुर्दैवाची गोष्ट आहे सध्यां राजद्रोह या शब्दाला फारच संकुचित अर्थ आहे. ब्रिटिशसरकाराविषयीं अप्रीति उत्पन्न करण्यासारखें बोलणें किंवा कृत्य करणें याला राजद्रोह म्हणतात. पण पेशव्यांचे वेळीं विरुध्दपक्षाच्या कंपूंत नुसतें जाणें हा सुद्धां राजद्रोह समजला जाई व त्याची सगळी मालमत्ता जप्त होई. मोगल, महादजी शिंदे, शहाजी भोसले, जंजिरेकर वगैरेंच्या लष्करांत जाऊन मिळाल्याबद्दल पेशव्यांनीं अनेकांचीं इनामें व इस्टेटी जप्त केल्या आहेत. प्रभुलोक अत्यंत राजनिष्ठ म्हणून गाजत आले आहेत. विष्णु प्रभु व गांज प्रभु या दोघांनीं पेशव्यांविरुध्द तुळाजी आंग्रे यांजकडे राजकारण केल्यावरून त्यांचीं वतनें जप्त झालीं असा दाखला सांपडतो. गोवध कसबांनींमुध्दां करतां कामा नये असा सक्तीचा मनाई-हुकूम होता. हा हुकुम तोडल्याबद्दल एका कसाबाला पायांत बेड्या घालून किलुयावर अटकेंत टेविलें होतें. त्यावेळेस बेड्याची इस्पितळें नव्हतीं, तरी पण बेड्यांना अटकेंत ठेवून त्यांना पोटाम देत असत. याप्रमाणें अनेक गोष्टींची फार मनोरंजक माहिती आहे. या सर्व रोजनिशांवरून तत्कालीन लोकस्थिति व राज्यव्यवस्था यांचें उत्कृष्ट चित्र कुशल लेखकाला काढतां येईल.

---

## वऱ्हाडवृत्त.

**हवामान**—पाऊस व उघाडी यांच्या फेरपालटानें या सप्तकांत कृषिकार्याला चांगलीच मदत मिळाली. पर्जन्याचीं लक्षणें अत्यंत अनुकूळ आहेत. पाऊस मधून मधून चांगला जोराचा पडत आहे. रोगराई उद्भवण्याचीं चिन्हें दिसत होतीं पण तीं पावसानें, थंड हवेनें व इतर आकाशांतील फेरफारांनीं अगदीं लयास गेलीं.

मुंबई युनिव्हरासिटीच्या दुसऱ्या एल एल. बी. च्या परीक्षेंत वऱ्हाडचे दोन गृहस्थ पसार झाले. आमच्या येथील अगदीं जुने वकील रा. रा, माधव विष्णु ओक यांचे नातु रा. रा. यशवंत रामचंद्र ओक हे असून उमरावतीचे आडव्होकेट रा. रा. गणेश श्रीकृष्ण खापर्डे यांचे जेष्ठ चिरंजीव राजश्री बाबासाहेब हे आहेत.

रा. रा. रंगनाथ श्रीराम जठार डेपुटी पोलीस सुपरिन्टेंडंट हे प्रकृतीच्या अस्वास्थ्यामुळें रजेवर होते ते आतां चांगले ताजेतवाने उमरावती येथें आपल्या जागीं दाखल झाले.

रा. रा. गोविंद बळवंत जोशी सबजज्ज यांस आणखी ६ महिन्यांची रजा देण्यांत आली.

रावबहादूर एस. श्रीनिवासलू नायडू फारेस्ट कडील एक्स्ट्रा डिपुटी कानसरव्हेटर यांस आणखी २ महिन्यांची फर्लो देण्यांत आली.

रा. रा. सयद अब्दूल कादर, तहशीलदार मूर्तिजापूर यांस ६ महिन्यांची रजा मिळाली आणि त्यांच्या जागीं रा. रा. साठे तहशीलदार यांस नेमण्यांत आलें.

रा. रा. रघुनाथ प्रसाद सब इनस्पेक्टर, यवतमाळ यांस पोलीस इनस्पेक्टर करून भंडाऱ्याकडे बदललें.

सागर येथील पोलीस–शाळेंत घेण्यासाठीं विद्यार्थी पसंत करण्याची तारीख मे. कमिशनर यानीं ३१ अक्टोबर नेमिली आहे.

आकोल्यास एक फ्याशनेबल कपडे शिवणारी नवीन 'चमन' नांवाची कंपनी निघाली आहे. ही गोष्ट सर्वश्रुत करण्याची तिच्या उत्पादकांची फार इच्छा आहे.

---


## नोटीस

रा० आबदुला बीन शेलम आरब रा० उमरी ता० मूर्तिजापूर यांसः –

खालीं सही करणार याजकडून नोटिस देण्यात येतें कीं आमचे कामरगांवचें दुकान आफुची विक्री करण्याकरितां तुह्मी भाड्यानें त. १।४।१० पासून घेऊन तें ता० ३०।६।११ पावेतों तुह्मी त्यांत राहिला असून दरमहा रुपये ३ प्रमाणें तुमचें कडून पंधरा महिन्यांचें भाडे ४५ पंचेचाळीस रुपये घेणें आहेत ते नोटीस पावल्यापासून ८ दिवसांचे आंत देऊन आमची पावती घ्यावी. तसें न केल्यास फिर्याद करून कोर्टखर्चासुद्धां घेतले जातील. कळावें. ता० ११।७।११

सही

बाजीराव आकाजी देशमुख रा०
कामरगांव आज मुक्काम आकोला

नो० नं० २९६ द० खुद.

---

## जाहिर खबर.

मी किसनसिंग वल्द भवानासिंग जात रजपूत राहणार बावनबीर तालुके जळगांव सर्व लोकांस कळवितों कीं, सदाराम शालिग्राम मारवाडी दुकान बावनबीर याचे तर्फे खालील शेताचा हरास होणार आहे तरी हरासांत विकत घेऊं इच्छिणारांस मी कळवितों कीं सदर्हू शेत माझ्या मालकीचें असून तें माझेच ताब्यांत आहे. ज्या दिवाणी दाव्याच्या हुकूमनाम्याच्या बजावणींत हें शेत सदाराम शालिग्राम हरासांत काढीत आहेत त्या दि. मु. नं. १२१ सन १९०९ च्या दाव्यांत माझें नांव प्रतिवादींत सामील केलें होतें त्यावेळीं मी त्या शेताचा मालक आहे असें दिवाणी कोर्टास दाखविल्यावरून दिवाणी कोर्टानें मजवरचा दावा काढून टाकला आणि वादी सदाराम शालीग्राम याजकडून मला माझा कोर्टखर्च देवविला. शेताचा मालक मी असल्यामुळें शेतावरील मालकीचे सर्व हक्क माझे स्वत चे आहेत. ज्या इसमावर ह्मणजे नथूसिंग वल्लद माधोसिंग याजवर सदाराम शालिग्राम यानें हुकूमनामा मिळविला त्या इसमाची या शेतावर कधींच मालकी नव्हती ह्मणून वादी सदाराम शालिग्राम यांनीं मिळविलेला हुकूमनामा निरर्थक आहे. नथूसिंग याचे जे हक्क या शेतावर असतील ते कोर्टानें विक्रीस काढले आहेत परंतु नथूसिंग यांचे शेतावर कांहींच हक्क नाहीं हें स्पष्ट आहे. कारितां हरासांत विकत घेऊं इच्छिणारांनीं या सर्व गोष्टींचा विचार करून हें शेत विकत घेणें असल्यास स्वत चे जोखमावर त्यांनीं विकत घ्यावें. हें शेत माझे मालकीचें आहे तेव्हां माझे हक्क विक्री होत नाहींत. म्हणून असल्या तऱ्हेनें विकत घेणारास विनाकारण तसदी पडूं नये व त्याचें नुकसान होऊ नये म्हणून मुद्दाम सर्वांस जाहीर रीतीनें कळवित आहे. मौजे पंचाळखुर्द तालुके जळगांव जिल्हा बुलढाणा येथील शेत सर्व्हे नंबर ३ टिके उंडाबोळीचें एकरगुंठे २४।१९ आकार रु. ४१ हें सालीम शेत काळी जमीन झाडझडुल्यासुद्धां यांत आंब्याची झाडें २ व विहीर आहे त्यासुद्धां. कळावें. तारीख १६ जुलै सन १९०११ इ० सही

किसनसिंग भवानसिंग रा० बावनबीर.
नो० नं० २९७ दस्तुर खुद.

सुधासिन्धु सुधासिन्धु

सुख संचारक कंपनी मथुरा यांचीं तयार केलेलीं व सरकारांतून रजिष्टर झालेलीं औषधें, जीं वीस वर्षांपासून लोकात अनुभविलीं ओहेत.

**सुधासिन्धु**

हें कफ, खोकला, दमा, थंडीचा ताप, पटकी, शूळ, संग्रहणी, अतिसार, पोटांत दुखणें, वांत्या, मळमळणें, हात पाय व कंबर दुखणें, मुलांचे हिरवे पिवळे जुलाब, डांग्या खोकला, दूध ओकून टाकणें इत्यादीवर स्वादिष्ट व सुवासिक औषध आहे. किंमत प्रत्येक बाटलीस ०८ आणे.

**दद्रुगज केसरी**

गजकरणास समूळ नाहींसें करणारें हेंच फक्त एक पवित्र औषध आहे. कांहीं सुद्धां जळण अथवा आग होत नाहीं. यासच जर दारू अथवा लिंबाचे अर्कांत मिळविलें तर २ बाटल्या अर्क तयार होतो. किंमत प्रत्येक बाटलीस ०४ आणे. १२ बाटल्या एकदम मागविल्यानें त्यांस एजंट समजून नोटिशी, हॅंडबिलें वगैरे फुकट पाठविल्यें जातात, व कमिशनही दिलें जातें. चालू सालचें पंचांगही फुकट मिळतें.

मागविण्याचा पत्ताः—
पंडित क्षेत्रपाल शर्मा मालक,
नं. १९९ सुख संचारक कंपनी, मथुरा.

सिन्धु सुधासिन्धु सुधा



अशी संधी पुन्हां येणार नाहीं.

सहा घड्याळें घेणारांस पोष्टखर्च माफ



एक घड्याळ बक्षीस.

दर एकाची किंमत ३।

**जंटलमन इमिटेशन रास्कोप सिस्टिम.** नांवचें खिशांत ठेवण्याचें घड्याळ दिसण्यांत फार सुरेख आहे. सर्व लोकांस ह्या घड्याळाचा लाभ मिळावा ह्मणून मुद्दाम किंमत रुपये ३। ठेविली आहे; पोस्टेज खर्च माफ. घड्याळा सोबत कांच, कमान, पेटी, गोफ, इतकें सामान फुकट मिळेल. अशी अमुल्य संधी पुन्हां येणार नाहीं. व्ही. पी. नें मागवा.

मिळण्याचा पत्ताः—**खोजा वल्लीभाई इस्माल**
मुक्काम वर्धा. [ मध्यप्रांत ] WARDA.
नो. नं. ४



चिरकालचा खरा लाभ कोणता ?
पैसा व ज्ञान ज्या योगानें मिळेल तो !
महाराज ! ह्या दोन्ही गोष्टी

वार्षिक वर्गणी ट.ख.स ह रु.१॥ ) **कलाशिक्षण** ( नमुना अंकास ०≡आ.

नांवाच्या विविध **हुन्नर**, शास्त्रीयज्ञान, व्यापार शेतकी, व इतर शेंकडा विषयांची माहिती शिकावणाऱ्यास वर्गणदार व्हा. मराठी भाषेंत हें असें एकच **पुस्तक** आहे. वर्गणी रु. १॥ खरी पण चालू मार्च अखेर आश्रय देणारास रु. १। पडेल. कारागिरांस, विद्यार्थ्यांस तर हें पुस्तक अवश्य हवें शिवाय ग्राहकांस हिप्नॉटिझम [ Hypnotism] **ऊर्फ अमेरिकन** वशीकरणविद्या—जिनें दुसऱ्यास निद्रा मोहन, आरोगहरण व धनप्राप्ति करतां येते; ती रु २९ फीची तूर्त रु. ११ न शिकवूं. पैकीं १ रु. प्रथम सही बरोबर पाठवावा. बाकीची व्ही. पी. येईल.

ह्या शिवाय नानाप्रकारच्या पोट भरण्याच्या युक्त्या. औषधी, मंत्रतंत्रक्रिया, जडीबुटी, गुप्त प्रयोगाची माहिती वाजवी फी घेऊन शिकवूं सर्व पत्रव्यवहार गुप्त राखला जातो

व्यवस्थापक— कलाशिक्षण, कार्यालय
ना. न. ९ बडोदे.



## नोटीस

**विहार आनन्दका सागर रंगीन तसवीरे सहित चारो भाग तथा पांचो अंग सचित्र कोख शास्त्र.**

असली हमसे मंगावो धोकेसे बचो स्त्री पुरुशोके जात, भेद, लक्षण अनेक देशस्थ स्त्रीनायका, कुमारी प्रकृती, सत्व दुती कुलटा, पतिव्रता, व्यभिचारर्णी आदिको 'पहचान, रजोधर्म लक्षण, ऋतुविहार मय सहवास स्थान क्रया, शैय्यातिथ, कामस्थान सोलासगारें, बतीसोआमूशण, वस्त्रतअर्दिवमधान पुत्रस्टीकर्म, नपुंसकविद्या, उपदंश प्रमेह आदि अनेक रोगोका चिकित्सा औषधि, पशुभाषा जाननेकी रीति, मंत्रतंत्र, यंत्र, वशीकरण सुद्धां विद्या आदि अमुल्य विषयका भंडार किंमत रु० १

पं० गंगाप्रसाद इंजीनियर शहाफ्डा
नो० नं० ७७ अलीगड सिटी.



## विलक्षण नयन रुक्कुठार.

**विलक्षण नयन रुक्कुठार** – ह्या अप्रातिम औषधापासून डोळ्याचे साधारण विकार— **खुपऱ्यां, लाली, ठणका, पाणी गळणें, कंडू, भूर, फुल** इ० जोरदार व जुनाट रोग त्वरित बरे होतात. दृष्टी तीव्र होऊन शांत रहाते; शिवाय जाग्रणानें, उन्हांत फिरल्यानें अग्नितापानें, उपदंशाविकारानें, अतिवाचनानें, कडकीनें इ. अनेक कारणांनीं डोळे बिघडतात ह्यावरही हें अप्रातिम गुणकारी असून लहान मुलांसही हें अत्यंत उपयोगी आहे. हें डोळ्यांत घातल्यानें ठणका वगैरे न लागतां डोळ्यांस थंडावा येऊन मस्तकासही शांतता येते. सदर औषधाचे सकाळीं पांच व सायंकाळीं पांच प्रमाणें थेंब घालणें. साधारण विकारास एक कुपी पुरेल. बरेच दिवसांचा विकार असल्यास तीन कुप्या लागतील; सोबत औषध घालणे कारितां कांचेची नळी फुकट मिळेल, एक कुपीची कि. १ एक रुपया. तीन कुप्या एकदम घेणारास टपाल व व्ही. पी. खर्च माफ. एकदम १२ कुप्या घेणारास टपाल खर्च न पडतां दहा रुपयांत मिळतील.

जी. पी. कंपनीची उत्तम निळिकाळी शाई ०६ आण्याची घेणारास पुढील सालची डायरी बक्षीस मिळेल. आमचेकडे शालेपयोगी मराठी व इंग्रजी पुस्तकें व हरएक प्रकारचा स्टेशनरी माल फारच माफक दरानें मिळेल. विशेष माहिती खालील पत्यावर,

जी. एन. धारपुरे. पोष्ट- अलिबाग.



## जाहिरात

**व**र्षफल—प्रत्येक महिन्याचे फलसह लाभालाभ सुखदुःख कळवूं. फी २ रुपये वर्ग २ चे २ रुपये. खर्च ०= जन्मकाल, जन्म अथवा चालू नांव कळवावें.

**पत्ता—** भा० गो० पंडित,
रा- व पो० लोणखेड प. खानदेश.



## जाहिरात.

**टेक्स्ट बुक कमिटींत** पसंत होऊन मे. **डैरेक्टर** सा. ब. **मध्यपांत** व **व्हाड** यांनीं व्ह. आणि अ. व्ह. शाळांतील बक्षिस व लायब्ररी साठीं मंजूर केलेलें प्रसिद्ध धनुर्धारी कृत;-

१ **व्यापारी वाचनपाठ.** किं० ॥.
त्याच प्रमाणें २ **पिराजी पाटील** किं०. ॥।
३ **उपाशी महाराष्ट्रांस उद्योग** किं०. ।=
४ धर्मावरील मार्मिक निबंध अंक १ ते १४; १०० बुकांस ।=रु० ( पुर्वी १॥ किं० होती ) १००० अगर ज्यास्त एकदम घेतल्यास ।- व त्याहून ज्यास्त घेतल्यास वरील प्रमाणें देऊं. निदान १०० तरी घेतलीं पाहिजेत.

नंबर १, २ व ३ यांच्या प्रती एकदम १० घेतल्यास अनुक्रमें ॥= व । व ज्यास्त घेतल्यास ॥- व ।. किंमतीस देऊं.

टपाल खर्च निराळा—व्ही. पी. नें मागविल्यास निदान एक त्रितीयांश तरी किं० आगाऊ आली पाहिजे

ल. वें. मांजरेकर आणि कंपनी
बेळगांव


## नोटीस

रा० हणमंतराव शंकरराव देशमुख रा० हिवरखेड यास खालीं सही करणार यांज कडून नोटिशीनें कळविण्यांत येतें कीं, तुह्मी ता. १८-२-११ रोजीं दिलेली नोटीस पावली. नोटिशींत लिहिल्या प्रमाणें मदनगोपळ मथुरादास याचे दुकाना वर चार संभावीत लोकांसह गेलों असतां तो आह्मास ह्मणाला कीं, चुकती पावती दिल्यास तुम्हास १८०० रु. देतों परंतु आमचे रुपये जास्ती असल्यामुळें चुकती पावती न देता १८०० रुपयांचीच पावती देतों असें सांगितलें. त्यावर तो ह्मणाला कीं, हणमंतराव आल्यावर रुपये घेऊन तुमचे दुकानावर येऊं सन १९०९ सालांत व्याजाबद्दल कांहींही रकम दिली नाहीं. व्याज दिलें, असें जें लिहिले आहे तें खोटें आहे. आम्हास नोटीस पोहचल्यानंतर दोनतीन पत्रें तुह्मास पाठवीलीं होतीं परंतु तुह्मी रुपये दिले नाहींत तरी ही नोटीस पावल्यापासून आठ दिवसांचे आंत शीघ्र व्याजासह रकम आणून देऊन आमची पावती घ्यावी. या प्रमाणें न केल्यास रीतिप्रमाणें तजवीज केली जाईल. नोटिशीचा खर्च तुमचे वर आहे.

ता. १०—७-११

सही

१ सीताराम परशराम रा०
हिवरखेड. द० खु०

नो० नं० २९२

## नोटीस

नोटीस बेशमी नारायण वल्लद तुकाराम कवडे रा० दानापूर ता० आकोट यासः—

खालीं सही करणार याजकडून नोटीस देण्यात येतें कीं कजबे दानापूर येथील आमचें शेत सर्वे नंबर १९४ याचे दक्षिण बाजूस लागून तुमचें शेत आहे. तुमचें शेत आमच्या शेतापासून अगदीं निराळें आहे. असें असतांना तुम्ही आपल्या स्वतःच्या शेताची हद्द सोडून आमच्या शेतांतील १० तासे घेऊन त्यामध्यें कपाशी व तुरी आषाढ शु॥ १२ ता० ८-७-११ रोजीं पेरली आहे. तुमच्या या गैरकायदा पेरणी मुळें आमची पिकाची नुकसान झाली आहे व तुह्मी या शेतांत शिरून अन्यायाची आगळीक ही केली आहे. सबब आपणास या नोटिशीद्वारें कळविण्यांत येतें कीं आज तारखेपासून १५ दिवसांचे आंत आमच्या शेतांतील पेरलेलें पराटीचें पीक काढून टाकावें. न काढिल्यास पिकाचें नुकसानीबद्दल रुपये ३० भरून घेतले जातील. नंतर तुह्मी या नोटिशीचा खर्च वं दाव्याचा खर्च भरून देणें भाग पडेल ही नोटीस दिली तारिख १२-७-१९११ इसवी.

सही

पन्नालाल द्वारकादास मारवाडी तर्फे मुखत्यार जेसीराम राहणार दानापूर
द० खु०

नो० नं० २९३

## नोटीस

नोटीस बेशमी विठोबा वल्लद खंडुजी काळे रा० मौजे कल्याण ता० मेहेकर जि० बुलडाणें

यासः—

नोटिस देणार झिपरी मर्द विठोबा काळे रा० मौजे कल्याण ता० मेहेकर जि० बुलडाणें सुमार सन १३२१ फसली कारणें नोटिस देण्यांत येतें कीं, तुमचा व माझा जनारितीप्रमाणें विवाहसंबंध झाल्यावर मी आपले खुशीनें आपले येथें तीन महिने राहिले होते नंतर माहेरीं आले. पुढें मी वयांत आल्यावर आपणास दोन-तीन वेळां मजला घेऊन जाण्याबद्दल माझे बापानें निरोप पाठविले असतां तुह्मी येऊन मजला घेऊन गेला नाहीं व मजला जनरितीप्रमाणे संसारसुखाचा अनुभवहि दिला नाहीं ह्मणून मी संसारसुखाचा अनुभव घेण्याकारितां दुसरा घरठाव करण्यांस आपणास नोटिस दिली असतां त्याचे जबाबी तुह्मी मजला नेण्यास दोनचार वेळ आले असें खोटें ह्मणणें आपमतलबपणाचें काम आहे. अशानें माझे बापास माझे अन्नवस्त्राबद्दल लागलेला खर्च पुर्वीचे नोटिशीप्रमाणें रुपये ७५० सातशेंपन्नास रुपयं झालेला आहे तो त्यास तुह्मास देणें चुकत नाहीं व असे खोटे प्रयत्न करून माझे खर्चाची रक्कम आपणास पचविली जात नाहीं ती मजला आपल्यावर कायद्याप्रमाणें फिर्याद करून भेरे कोर्टांत घेतां येईल ह्मणून आपणास या नोटिशीनें पुन्हां लिहून कळविते कीं, सदर्हू नोटीस पावल्या पासून एकमहिन्याचे आंत माझे बापास झालेला खर्च देऊन जर आपण मजला घेऊन जाऊन जनरिती प्रमाणें संसारसुखाचा आनुभव दिला तर बरे आहे नाहींतर सदर्हू मुदतीनंतर मी संसारसुखाचा अनुभव घेण्यास बेधडक दसरा घरठाव करील आणि असे केल्यानें तमचा मजवर किंवा माझे बापावर कोणत्याही तऱ्हेचा हक्कसंबध राहणार नाहीं.

मी वयांत येऊनही आठ नऊ ८ ९ वर्षे झालीं असताही तुह्मी मजला आपले घरी नेऊन संसारसुखाचा अनुभव दिला नाही हे माझे मलाच आश्चर्य वाटत आहे परंतु मी दुसरी बायको केली नाहीं असे आपण आपल्या नोटिशींत ह्मणता हे हीं ह्मणणे चमत्कारिक आहे. यावरून असे दिसते कीं, आपल्यांत पुरुषत्वाचे किती पाणी आहे हे माझे लक्ष्यांत येऊन चुकले आहे जर आपणास माझी जरुरी असती तर मजला इतके दिवस माझे माहेरी ठेवणें हे आपणास कधीच पसंत पडले नसते यावर आपला विचार मजला नेऊन संसारसुखाचा अनुभव देणें असल्यास वरील मुदतींत माझे बापाची खर्चाची रक्कम देऊन मजला आपण नेल्यास मी येण्यास तयार आहे परंतु सदर्हू मुदतींत आपले कडून असें वर्तन घडून न आल्यास मग मी आपले वाटेल तसें वर्तन करण्यास तयार राहील आणि असें झालें ह्मणजे मजवर तुमचा कोणत्याही प्रकारें आरोप राहणार नाही हें पक्कें लक्षांत ठेवावें. कळावें. तारीख ३ माहे जुलई सन १९११ इसवी दस्तुर बाजीराव गोविंद देशपांडे आटाणी रा० बुलडाणें.

सही

झिपरी मर्द विठोबा काळे रा० मौजे कल्याण ता० मेहेकर हल्लीं मु० बुलडाणें नि० हातची बांगडी

दस्तुर बाजीराव गोविंद देशपांडे आटाणी बुलडाणें.

नो. नं. २९०

## नोटिसीचें उत्तर

बेशमी बापुजी वा॥ हनवती खुमकर पाटील रा० बेलखेड ता० आकोट यासः

खालीं सही करणार मारुती वा॥ गणाजी कोडे कुणबी रा० आकोली ता० आकोट याजकडून नोटिशीचें उत्तर देण्यांत येतें कीं तुह्मी आपले नोटिशींत बराच खोटा मजकूर लिहिला आहे. तुमचे आमचे दरम्यान असें ठरलें होतें कीं तुह्मी पूर्वी घतलेले इसन्याबद्दल रुपये ५० व आह्मी तुम्हांस देणें असलेले रुपये २९५० एकूण रुपये ३००० तीन हजार तुमचे सावकार हरकचंद गुलाबचंद दुकान तेल्हारा यांस देऊन त्यांची पावती घ्यावी व आमचे जमिनीवरलि त्याणी आपले गहाणाचा हक्क सोडला अशाविषयीं त्यांची पावती आम्हास आणून द्यावी. व आम्हास तुह्मी खरेदीखत लिहून देऊन नोंदून द्यावें. त्याप्रमाणें तुम्हास पुष्कळ वेळां म्हटलें असतां तुह्मी तसें न करितां आम्हास जमिनीचा दिलेला ताबा तुह्मी जबरदस्तीनें हिसकांवून घेतला. करार पुरा करून देण्यास इनकार केला. तुम्हास देण्याकरितां आणलेली खरेदीचे मोबदल्याची रक्कम अद्यापपावेतों रा० केदारनाथ तेजमल दुकान तेल्हारा यांचेकडेस अनामत पडली आहे. तुह्मी आपले वर निर्दिष्ट केलेले कराराप्रमाणें वर्तन करण्यास राजी असल्यास ही नोटीस पावल्यापासून आठ दिवसांचे आंत आम्हास खरेदीखत लिहून नोंदून द्यावें. तसें न केल्यास आमचे इसान्याबद्दलचे रुपये ५० व आम्हास उन्हाळ्यांत जमीन तयार करण्यास लागलेला खर्च रुपये ५० व करार मोडल्याचे नुकसानाबद्दल रुपये ५०० एकूण रुपये ६०० तुमचेवर फिर्याद करून या नोटिशीचे खर्चा सुद्धां व कोर्ट खर्चासुद्धां कोर्टमार्फत भरून घेतले जातील. कळावें. ही नोटीस दिली ता० १०-७-११ दस्तुर त्र्यंबक बापुजी तेल्हारा.

—सही

मारोती वा॥ गणाजी द० खु०

नो० न० २९१

## नोटीस.

रा० रा० प्रल्हाद रामकृष्ण कुळकर्णी नांदरुणकर राहणार मौजे चांदूर ता० व जि० अकोला यांसः—

खालीं सही करणार याजकडून नोटीस देण्यांत येतें कीं आमचा मालकीचा मौजे चांदूर ता० व जिल्हे आकोले एथील सर्वे नंबर १८७ एकर ३८ गुंठे १७ आकार रुपये ८९ हा तुह्मी मजजवळून नफ्यानें वाहात असून सन १९१०-११ सालचे स्वामित्वाबद्दल रुपये १०० दिले नाहीं व शेताची वाही पेरी तुह्मी केली यावरून तुह्मास नोटीस देण्यांत येतें कीं मागील नफ्याचे रुपये १०० व पुढील सालचे नफ्याचे रुपये १०० व शेताचा शेतसारा हे सर्व रुपये दिल्याशिवाय शेतांतील माल तुह्मी नेऊं नये. रुपये न देतां माल नेल्यास तुमचेवर रीतीप्रमाणें तजवीज करणें भाग पडेल व नोटिशीचा खर्च तुह्माजवळून घेतला जाईल, कळावें. ता० ९ जुलै सन १९११ इ०

सही

लक्ष्मण धोंडदेव वाठवेकर राहणार बारशीटाकळी ता० व जि० आकोला द० खु०

नो० नं० २८८

## जाहिर नोटीस

सर्वत्र शेट, सावकार व रहिवाशी

यांस

मी झुगलाई मर्द संभाजी ढोंबळे रा० कोथळी ता० व जि० आकोला नोटीस देते कीं संभाजी वल्लद यमाजी ढोंबळे रा० धानोरे ता० वाशिम हा माझा लग्नाचा नवरा असून याजपासून मला दोन मुलें झालीं होतीं. तीं तो असतांनाच मेलीं. सन १८९८ चे अगोदर पासून कर्जदारी फार झाली ह्मणून मला कोथळीस पोंचती करून संभाजी हा नापत्ता झाला आहे. आजपावेतों वाट पाहिली पण येत नाहीं. सबब नोटीस देते कीं ही नोटीस प्रसिद्ध होतांच १५ दिवसांत त्यानें येऊन मला घेऊन जावें. नाहीं तर मी त्याच्यावती माझे कोणी पाळणपोषण करण्यास नाहीं समजून दुसरा घरठाव करीन. मग त्याचा मजवर नवरेपणाचा हक्क राहणार नाहीं. कळावें ता० ८-७-१९११ इसवी.

सही

झुगलाई मर्द संभाजी नि० आंगठा आज मु० आकोला

नो० नं० २८९


Oriental Govrnment security
LIFE ASSURANCE COMPANY
Limited

ESTABLISHED IN 1874.

R. Paterson, Berar manager

HEAD OFFICE—BOMBAY
HEAD—QUARTER—NAGPUR

FUNDS Exceed $3\frac{3}{4}$ crores

CLAIMS PAID FOR OVER 3 CRORES

IMMEDIATES ETTLEMENT OF CLAIMS

If there be one thing of more importance than another in connection with Life Assurance, it is when claims arise, that the amount due under the policy be paid to the Claimants at the earliest possible date. This the Directors of the 'Oriental' keep well before them and act up treating their clients with the utmost liberality.

UNQUESIONABLE SECURITY.

It is not sufficient to read that a Company's funds amount to a given sum, but it is essential to know how such Funds are invested if in miscellaneous and risky investments or how secured.

The Funds of the 'Oriental' are invested in Government Securities and lodged with the Government Official Trustee of Bombay in terms of the Company's Trust Deed, as Security for Claims arising, through decease of assured lives, and endowmenpt policies matured.

Government Officers, professional men, Tradesmen and others by employing portion of their annual income or profits in effecting life policies, create fund equivalent to the savings of many years.

No man can be sure how long he will live, and although he may save money yet, if he dies early before he had time to save much, his wife and family may be in distress. Life Assurance is a means by which this danger is got over. Life being so uncertain, the sooner a man makes up his mind to assure his life the better. Once satisfied of the propriety of the step, do not delay. There are numerous instances in the records of the 'Oriental' where the delay of a month or less, has left the family without the intended provision.

INFLUENTIAL AND ENERGETIC AGENT WANTED. For terms please apply to the undersigned.

Prospectuses, forms and any further information can be obtained on application—

M. DESOUZA,
CHIEF AGENT, Nagpur

CHIEF AGENCY FOR C. P., BERAR & KHANDESH


हें पत्र आकोला येथें कैलासवासी खंडेराव बाळाजी फडके यांच्या वऱ्हाडसमाचार छापखान्यांत नारायण खंडेराव फडके यांनीं सदाशिवआश्रमांत छापून प्रसिद्ध केलें.

# व्हाडसमाचार.

Berar Samachar.

वर्ष ४५ आकोला—सोमवार तारीख २४ माहे जुलई सन १९११ इ० [ अंक २९ ]


## मुंबई बँकचें सोनें.

मुंबई बँकचा छाप असलेल्या उत्तम कसाच्या सोन्याच्या चिपा मुंबई बँकच्या आकोले उमरावती येथील ऑफिसांत विकत मिळतील. गिऱ्हाइकानें जास्त माहिती करितां बँकेंत तपास करावा.

एका चिपचें वजन २६ $\frac{२}{३}$ तोळे असतें. साधारण भाव वऱ्हाड समाचार वर्तमानपत्रांत बाजारभाव ह्या सदराखालीं सांपडेल.

मुंबई बँक G. A. PHILLIPS.
आकोला २१-९-१०८ एजंट.
नो० न० २

---

### नोटीस

म्युनसिपॅलिट्यांचे हद्दींत मातीचें तेल ठेवण्या-संबंधाचे नियम.

(१) सन १८९९ च्या इंडियन पेट्रोलिअम अक्टाअन्वयें ज्यांस मातीचें तेल ठेवण्याचें लायसेन्स मिळालें असेल अशा लोकांस हे नियम लागू नाहींत. तसेंच ज्यापासून भीति नाहीं असें मातीचें तेल ५०० ग्यालनचे वर ठेवण्याचे बाबतींत व भीतिकारक तेल ३ ग्यालनचे वर ठेवण्याचे बाबतींत ही हे नियम लागू नाहींत.

(२) सन १८८६ च्या वऱ्हाड म्युनासिपल कायद्याअन्वयें अथवा या नियमाअन्वयें लायसेन्स मिळालें नसल्यास म्युनसिपल हद्दीचे आंतः—

(३) सन १८८६ चे वऱ्हाड म्युनासिपल लॉचें कलम ११४ चे शेवटच्या वाक्याप्रमाणें वाटेल तितकें तेल विक्रीकरितां ठेवणें.

(४) तसेंच भीति करणारें तेल ५० ग्यालनचे वर किंवा भीती करणारें १ ग्यालनचे वर विक्री करितां किंवा दुसरे कामाकरितां ठेवणें.

नियमाविरुद्ध समजलें जाईल.

टीपः— १८८६ चे वऱ्हाड म्युनसिपल कायद्याचें कलम ११४ (४) वरून विक्रीकरितां हें तेल ठेवण्याचे लायसेन्साची वार्षिक फी खालील प्रमाणें ठरविण्यात आली आहे.

भीति न करणारें मातीचें तेल.

(अ) ८ ग्यालन पर्यंत काहीं नाहीं-

(ब) ८ पासून १० ग्यालन पर्यंत २ रुपये-

(क) १०० पासून ५०० ग्यालन पर्यंत (दर १०० ग्यालनांस किंवा त्याचे भागास से. २ रुपयांप्रमाणें.)

भीतिकारक मातीचें तेलः—

(३) भीति न करणारें मातीचें तेल ५० ग्यालनचे वर अगर भीति करणारें १ ग्यालनचे वर म्युनसिपालिटीचे हद्दींत कोणाही मनुष्यास दुकानांत विक्रीकरितां ठेवतां येणार नाहीं.

टीप. येथें दुकान ह्मणजे मातीचें तेल किरकोळ विकण्याच्या सर्व जागा समजाव्यात.

(४) वस्तीचे बाहेरचे बाजूस कमेटीनें पसंत केलेल्या इमारतीखेरीज दुसऱ्या इमारतींत भीति न करणारें तेल ५० ग्यालनचे वर व ५०० ग्यालनचे आंत कोणाही मनुष्यास ठेवतां येणार नाहीं.

(५) ज्या हद्दींत तेल साठविण्याचा परवाना मिळाला आहे अशा हद्दीचे महत्वाचे भागांत एक नोटीसबोर्ड टांगला गेला पाहिजे. त्यावर लायसेन्स धारण करणाराचें नांव व तेल साठविण्याचा त्यास परवाना मिळाला आहे ही गोष्ट सुबोध रीतीनें लिहीली गेली पाहिजे.

(६) म्युनसिपल हद्दीचे आत ठेवलेलें भीतिकारक तेल कांचेच्या, दगडाच्या अथवा धातुंच्या वेगळ्या भांड्यात ठेविलें गेलें पाहिजे. प्रत्येक भांड्यात १ पेक्षां ज्यास्त पिंट ठेविलें जाऊं नये. अशा भांड्यास मजबूत झांकण असावें.

(७) वरील २-३-४-५ आणि ६ यापैकीं कोणता ही नियम मोडणारास ५० रुपयांपर्यंत दंड केला जाईल जेव्हा नियम हट्टानें एकसारखा मोडला जात आहे असें दिसून येईल तेव्हां पुढील प्रत्येक दिवसाबद्दल आणखी ५ रुपयां पर्यंत दंड ज्यास्त आकारला जाईल.

फॉर्म (अ)

वरील कलम २ (अ) यांत दाखविल्याप्रमाणें सन १८८६ चे वऱ्हाड म्युनसिपल कायद्याचें कलम ११४ प्रमाणें किरकोळ विक्रीकरितां तेल साठविण्याचें लायसेन्स.

नंबर

खालीं दिलेल्या अटीवर भीति करणारें अगर न करणारें तेल (अमूक) ग्यालन खालीं वर्णन केलेल्या जागेंत ठेवण्याकरितां (अमुक) नांवाचे मनुष्यास लायसन्स दिलें जात आहे.

एक वेळ साठवितां येईल अशी मोठी रक्कम सदरहू लायसेन्स (अमूक) ३१-३-१२ पर्यंत अंमलांत राहील.

मुक्काम तारीख २०-५-११

सेक्रेटरी म्यु० कमेटी.

(वर निर्दिष्ट केलेल्या जागेचें वर्णन)

अटी (१) भीति न करणारें तेल सहज न मोडणारे पिपांत अथवा दुसऱ्या भांड्यांत ठेविलें पाहीजे. प्रत्येक भांड्यांत एक पिंटापेक्षां ज्यास्त ठेऊं नये. व असें भांडें मजबूत केलेलें असावें.

(२] तपासणीचे कामाकरितां नेमलेल्या कोणत्याही अधिकाऱ्याकडून डिपो अगर कोठीघर तापसण्यास पात्र राहील.

[३] लायसेन्साच्या अटीची एक नक्कल व एके वेळीं ठेवतां येणाऱ्या भांड्यांची व पिपांची संख्या दाखविणारा एक बोर्ड कोठीघरांत टांगला पाहिजे.

[४] हें लायसेन्स बदलतां येणार नाहीं. जर लायसेन्स धारण करणाऱ्यास तें बदलावें असें वाटेल तर त्यानें तसें करण्याची परवानगी मिळण्याकरितां म्युनसिपल सेक्रेटरी कडेस अर्ज करावा.

[५] वरील अटींपैकीं एखादी अट मोडल्यास हें लायसेन्स काढलें जाण्यास पात्र होईल.

टीप — ज्या परिस्थितींत लायसेन्स दिलें जाईल त्या परिस्थितीस जरूर दिसल्यास म्युनसिपल कमेटीनें आणखी कांहीं अटी ज्यास्त घालाव्यात.

फॉर्म (ब)

नमुन्यांचे नियम ४ व नियम २ '२' अन्वयें विक्रीकरितां अगर दुसरे कामाकरितां मातीचें तेल साठविण्याकरितां दिलें जाणारें लायसेन्स.

नंबर २

खालीं नमूद केलेल्या अटीवर ज्यापासून भीति आहे अगर नाहीं असें तेल 'अमुक' ग्यालन खालीं वर्णन केलेल्या जागेंत साठविण्याकरितां (अमुक) नांवाचे मनुष्यास सदरहू लायसेन्स दिलें जात आहे.

एके वेळीं साठवितां येईल अशी मोठी रक्कम सदरहू लायसेन्स [अमुक] ३१-३-१२ पावेतों अंमलांत राहील.

मुक्काम तारीख २०-५-११ म्युनसिपल सेक्रेटरी

वर निर्दिष्ट केलेल्या जागेचें वर्णन.

अटी (१) ज्यापासून भिति नाहीं असें तेल सहज न मोडणाऱ्या पिपांत अगर दुसऱ्या भांड्यांत ठेविलें पाहिजे. तसेंच भीतिकारक तेल कांचेच्या, दगडाच्या अथवा धातुच्या वेगळ्या भांड्यांत ठेविलें पाहिजे. प्रत्येक भांड्यांत १ पिंटापेक्षां ज्यास्त ठेवूं नये व प्रत्येक भांडें मजबूत केलेलें असावें.

(२) तपासणीचे कामाकरितां नेमलेल्या कोणत्याही ऑफिसराकडून या लायसेन्सावरून तेल ठेविलेल्या जागा सर्व तपासणीस पात्र राहतील.

[३] या साठविण्याच्या जागा दगडी किंवा न पेटणाऱ्या सामानानें बांधलेल्या असाव्यात परंतु तुळया, कडे, खांब, खिडक्या व दरवाजे लाकडांचे असले तरी चालतील.

[४] लायसेन्स देणाऱ्या अधिकाऱ्यांच्या मनानें परवाना मिळालेल्या कोठीघराचे सुरक्षितपणाकरितां कांहीं दुरुस्ती करणें जरूर वाटेल आणि तो अधिकारी लायसन्स धारण करणाऱ्यास लेखी नोटीस देऊन तशी दुरुस्ती करण्यास लावील तर नोटिशींत नमूद केलेल्या मुदतींत लायसेन्स धारण करणाऱ्यास ती दुरुस्ती करावी लागेल.

(५) या लायसेन्साच्या अटी आणि एक वेळीं ठेवतां येणाऱ्या भांड्यांची व पिपांची संख्या दाखविणारा एक बोर्ड कोठीघराचे जागेंत टांगला पाहिजे.

'६' आग आणि स्फोट या पासून होणारे धोके टाळण्याकरितां जरूर तेवढी खबरदारी घेतली पाहिजे.

'७' हें लायसन्स बदलता येणारें नाहीं. जर लायसन्स धारण करणाऱ्यास तें बदलावेंसें वाटेल तर तसें करण्याची परवानगी मिळण्याकरितां लायसन्स धारण करणाऱ्यानें म्युनसिपालिटीचे सेक्रेटरीकडेस अर्ज करावा.

'८' वरील अटींपैकीं एखादी अट मोडल्यास लायसन्स काढलें जाण्यास प्राप्त होईल.

टीपः— ज्या परिस्थितींत लायसन्स दिलें जाईल त्या परिस्थितीस जरूर अशा अटी म्युनसिपल कमेटीनें लायसन्सांत घालाव्यात. नो० नं० ३०७

---

### नोटीस

रा० सीताराम बा॥ सखाराम कुणबी रा० जोगलखड ता० बाळापूर जि० अकोला यांसः—

खालीं सही करणार इजकडून नोटीस देण्यांत येतें कीं तुजला मी ता० २१-२-११ इ० रोजीं नोटीस देऊन 'तूं मजला फसवून मजपासून लिहून घेतलेला लेख मजला कबूल नाहीं व त्या लेखान्वयें तूं मला दत्तकही कबूल नाहींस' असें कळविलें आहे. माझे जिनगीची अफरातफर व दुसरी अयोग्य व बेकायदेशीर व्यवस्था तूं करूं नयेस ह्मणून मीं तुला आगाऊ ही नोटीस दिली होती. असें असून सुद्धां तूं त्या नोटिशीस न जुमानतां ता० २४-१-११ इसवी रोजीं माझे स्थावर जिनगीपैकीं शेतें सर्व्हे नंबर अनुक्रमें १३, ४९ व ४४ मौजे जोगलखेडा येथील रा० भिकाजी बा॥ चंद्रभान पाटील रा० जोगलखेड यास रु. ५०० ला तारणगहाण लिहून दिलीं. असें मजला समजल्यावरून तुजला या नोटिशीनें कळविण्यांत येतें कीं, तुझा माझा कांहीं एक संबंध नाहीं, तूं मला दत्तक कबूल नाहींस, तूं जो हा व्यवहार केला आहेस तो मजला कबूल नाहीं व त्याबद्दलची सर्व जबाबदारी तुजवर आहे. यापुढें तूं हा व असला अयोग्य व्यवहार माझे जिनगीसंबंधीं—ही नोटीस पोंचल्यापासून बंद ठेवावा. त्यायोगें माझ्या हितसंबंधास बाध येत आहे. तरी तुह्मी तसें न केल्यास मला योग्य कायदेशीर दाद मागणें पडेल. कळावें ता० ६-७-११ इ० द० त्रि० ग० वैद्य रा० अकोला.

सही।

गुजाई मर्द मारोती पाटील इचे हातची निशाणी बांगडी

नो. नं. ३०८

(मागील अंक ४ वरून पुढें चालू)

## थिऑसफीची परिषद.

लहान मुलांचे खेळावयाचे जागीं सामान थोडें असलें तरी चालेल, मात्र जें सामान असतें तें तेवढें अवश्य व नीटनेटकें असावें. भिंती एकाच रंगाच्या, परंतु साध्या असल्यास त्यांजवर कांहीं सुबक चित्रें व वेलबुटी काढलेली असावी. जसें, थोर पुरुषांचीं चित्रें अथवा सुबक अशीं फुलें वगैरे काढावीं. जेणेंकरून त्यांजवर दृष्टि जातांच मुलांचें लक्ष वेधलें जाऊन त्यांचे अंतःकरणास कांहीं विशेष वाटलें पाहिजे. घरांतील सामान कोण्या तऱ्हेचें असावें हें देशस्थितीवर अवलंबून आहे. थंड देशांतील सामान उष्ण देशांतील सामानापेक्षां निराळें राहील. बैठकींचें सामान तसेंच घरांतील हर तऱ्हेची वस्तु नीटनेटकेंपणानें स्वच्छ व व्यवस्थीत ठेवल्यानें, त्यांची मांडणी जेथल्या तेथें होऊन त्यास सहज सुबकता व सौंदर्य येतें. घरांतील भांडीं जेथल्या तेथें ठेऊन स्वच्छ ठेवावीं. हिंदु लोकांत यांतील बऱ्याच गोष्टी धार्मिक समजुतीनें सहजच स्वच्छ ठेविल्या जातात, तथापि लोकांची परंपरा सुटली जाऊन अनुकरणांत जुनें नाहींसें होऊन नव्याची योजना विचारपूर्वक होत नाहीं हें ठीक नाहीं.

सौंदर्य हे मानवी प्रगतीस अवश्यक असें एक साधन आहे व जी गोष्ट सृष्टिनियमांत व रानटी लोकांत देखील सहज दिसून येते, ती सुधारलेले लोकांत सहज असली पाहिजे. आईबापानीं ही गोष्ट लक्षांत ठेविली पाहिजे कीं त्यांस उत्तम ह्मणून जें कांहीं वांटतें तें त्यांनीं आपल्या मुलांस देण्याचा प्रयत्न केला पाहिजे व त्या गोष्टी सभोंवारच्या परिस्थितीचे द्वारानेंच दिल्या जातात. घरामध्यें ठेविलेलीं चित्रें वगैरे जीं लावावयाचीं तीं घाणेरडीं, अगर बिभत्स अशीं न लावितां उत्तम उत्तम चित्रें, रंगाचीं कामें थोर लोकांचे पुतळे, व मूर्ती ठेवाव्या. त्यांच्यासंबंधानें लहान मुलांस गोष्टी सांगून त्यांचे मनांत उल्हास उत्पन्न करावा. तसेंच थोर पुरुषांचे तोंडचे शद्ब व ह्मणी मोठमोठ्या अक्षरांत लिहून भिंतीस टांगून ठेवाव्या. अशा तऱ्हेच्या चित्रांनीं व शद्बांनीं त्यांचे अंतःकरणावर जो परिणाम होईल तो शेवट पावेतों त्यांचे अंतःकरणांतून जाणारा नाहीं व बालकांचे अंतःकरणांतील थोर गुणांचे बीजास सहज पोषक होतील

हें लिहिण्याची जरूरी नाहीं कीं मुलांचे सभोंवारची परिस्थिति अत्यंत शुद्ध व प्रेमाची असावी. प्रेम हें सद्गुणांचें व चांगल्यांचें पोषक व वाईटाचें विघतक आहे. बालकाचा जन्म जर प्रेमयुक्त परिस्थितींत झाली असेल, त्याची जोपासना प्रेमरूप पाळण्यांत झाला असेल, त्या मुलाची वाढ प्रेमामध्यें झाली असेल तर तें मूल शांत, आज्ञाधारक व प्रामाणिक असें होईल. जर घरांत मुलास शिक्षा मिळाली नसेल तर त्यास शाळेंत ही शिक्षा होणार नाहीं. कठोर व तीक्ष्ण शब्द व निष्कारण दूषणयुक्त भाषण केल्यानें मुलांचे ठिकाणीं असलेल्या दोषांची वाढ होते. मुलांचा विश्वास व प्रेम संपादन करणें हें पालकांस कठीण नाहीं. व मग तीं सर्वस्वीं तुमचे स्वाधीन राहतील.

मुलांचें शिक्षण केवळ प्रेमानेंच होतें. ज्या शरीरांत बालकास जन्म घालविणें आहे तें शरीर त्याचे स्वाधीन असेल तर त्याची प्रगति होईल. आपले शरिरास मदत मिळावी ह्मणून किती तरी उच्छुकतेनें जीवात्मा आपले पालनपोषण कर्त्याकडे पहात असतो. खरोखरीच बालपणीं त्याचा कांहीं एक उपाय चालत नाहीं. बालपणीं त्याचे त्या कोमल शरिरास कोणी इजा केली, त्याचे अंतःकरणास दुःख दिलें तर जीवात्म्याची निराशा किती तरी होत असेल बरें बालकांचे जीवाचें खरें पोषक काय आहे हें केवळ प्रेमयुक्त अंतःकरणास समजणारें आहे.

त्याचे अंतःकरणांत नित्य उदय पावणाऱ्या नित्य नव्या कल्पना, या नवीन जगांतील वस्तू पाहून त्याचे मनांत नित्य नव्या उत्पन्न होणाऱ्या वासना स्थूल व सूक्ष्म वस्तूपासून अंतःकरणावर होणाऱ्या परिणामापासून झालेला घोटाळा, त्याचे कोमल शरीरावर पडणारे व मनाबद्दलची कल्पना, त्याच मानानें त्याचे सभोंवार असणारे अजस्त्र राक्षसतुल्य लोकाचें येणें जाणें, इत्यादि सर्व उपाधींचा त्यावर परिणाम होतो. नवीन अनोळखी भूमीवर अनोळखी मनुष्य! या नवीन मंडळीस बालवर्गास या नवीन भूमीवर कालक्रमण करण्याकरितां, व या नवीन परिस्थितीशीं योग्य असें आपल्या शरीरास योग्य वळण देण्याकरितां त्याच्या पालनकर्त्याचे सहानुभूतीवर व प्रेमावर पूर्ण हक्क आहे.

नवीन जन्मास येणारें बालक हें एक अभ्यास करण्यासारखी वस्तु आहे. त्याचे मातापितरांनीं व पालकांनीं त्या नवीन जीवात्म्याचे ठिकाणीं गुण व दोष कोणाचे आहेत हें पाहून त्या नवीन जीवनरूपी यात्रेकरूचे इष्ट कार्य आहे, याचा जन्महेतु काय आहे हें लक्षांत आणावें. मुलें अज्ञानानें स्वताचे किंवा दुसऱ्याचे शरीरास दुखापत करितात किंवा त्रास देतात तेव्हांच फक्त त्यास धाकांत ठेवावें नाहीं तर मुलांचे सहज प्रवृतीस कधींही प्रतिबंध करूं नये. जीं मुलें सारखीं धाकांत व दडपणांत असतात तीं गरीबीचें सोंग घेऊन आपल्या आईबापांस फसवूं लागतात, व अशा रीतीनें तीं खोटेपणा करण्यास शिकतात. अगदीं सद्बुध्दीनें मुलास दोष देणाऱ्या आईबापांचे बोलण्यांत निमेपेक्षां अधिक मंडळी "बप असें करूं नको" असें रागानें सांगणारी निरर्थक व अप्रस्तूत भाषण करणारीच असतात.

मुलांचे प्रगतीकरितां मुलांस जी स्वतंत्रता दिली पाहिजे ती स्वतंत्रता न देतां आईबाप स्वतःच्या अरेरावी मर्जीस त्यास बळी देऊन त्यास जुलुमानें आज्ञाधारक बनवितात. कर्तव्यकर्म आणि सृष्टिनियमांचें आज्ञाधारकत्व या दोन गोष्टी त्या मुलास उपदेश देणाऱ्या आईबापांच्या तोंडूनच जणू कांहीं बोलविल्या जातात, व ही गोष्ट अत्यंत महत्वाची आहे. त्यांच्या वागविण्यावरच त्यांचा धर्म, नीति आणि सामाजिक प्रामाणिकपणा अवलंबून असतो.

(अपूर्ण)

वऱ्हाडसमाचार

आषढ वद्य १३ शके १८३३ दुंदुभिनाम संवत्सरे

## शिक्षणाचें ध्येय.

सध्याची शिक्षणपद्धति केवळ यंत्रासारखी आहे, ह्मणजे ती कांहीं तरी काम करण्यांत गुंतलेली आहे खरी, पण तींत प्राण नाहीं, व तिच्या हातून घडणाऱ्या कामाचा व्यवहारांत फारसा उपयोग नाहीं अशा प्रकारचा आक्षेप आमच्या हिंदुस्थानांतच नव्हे, तर ज्या ठिकाणीं शिक्षणपद्धतीचा शास्त्रीय दृष्ट्या विचार करणारे लोक आहेत व शिक्षणपद्धतींत उन्नत प्राप्त करून घेण्यासाठीं सारखी स्पर्धा चालू आहे अशा अमेरिकेंत सुद्धां घेण्यांत येत असतो. कर्मक्षेत्र व शिक्षण यांची फारकत होतां उपयोगाची नाहीं, तीं दोन्ही संयुक्त असावयास पाहिजेत, पण तीं संयुक्त करावयाची कशी हा सध्याचे काळीं मोठा प्रश्न आहे. अमेरिकेंतील हार्वर्ड युनिव्हर्सिटीचे माजी अध्यक्ष प्रो० ईलियट यांनीं अलीकडे या विषयावर एक उत्तम ग्रंथ लिहिला आहे. ते ह्मणतात कीं आमच्या इंद्रियांना लहानपणापासून जसें शिक्षण मिळावयास पाहिजे तसें मिळत नाहीं. यामुळें आमची दृष्टि, श्रवण घ्राण, वगैरे इंद्रियें बाह्य सृष्टीसंबंधानें आपापलें कर्तव्य योग्यरीतीनें करूं शकत नाहींत. आमचे शास्त्रज्ञ प्रयोगशाळेंत नाना प्रकारचे प्रयोग करण्यांत कुशल असतात; पण बाहेरच्या प्रत्यक्ष जगांतल्या वस्तूंशीं त्यांचा यत्किंचित् ही परिचय नसतो. ही इंद्रियांची जडता मनालाही हळू हळू जड करून सोडते. अगोदर जिज्ञासा आणि मग प्रयोग हा स्वाभाविक क्रम आहे. पण हल्लींच्या शिक्षणांत मनुष्याची जिज्ञासा वाढविण्यासारखें काय आहे? अमेरिकेंतल्या सुशिक्षितांची आह्मांला विशेषशी माहिती नाहीं. पण आमच्या इकडच्याविषयीं आह्मी खात्रीपूर्वक सांगूं शकतों कीं ज्यांना कोणत्याही एखाद्या विषयाची मनापासून आवड आहे, व त्या विषयासंबंधानें अनुभवानें माहिती मिळविण्याची ज्याची सारखी खटपट सुरू आहे असा मनुष्य सुशिक्षित समाजांत सुद्धां शेकडा एकादुसरा तरी निघेल कीं नाहीं याची शंकाच आहे. जेथें विद्येचा अंतरात्माच ठिकाणीं नाहीं तेथें ती कार्यकरी व्हावी कशी? पुष्कळ साहित्यशास्त्राचें अध्ययन केलें, पण रसाचा बोध झाला नाहीं, व विचारशक्तीचा उदय झाला नाहीं; शास्त्रीय ज्ञान मिळविलें, पण अंधता गेली नाहीं, किंवा युक्तीनें एखाद्या विषयासंबंधाचे प्रयोग कसे करावे तें कळलें नाहीं; तर्कशास्त्र पढून ही शास्त्रीय पद्धतीनें वाद करण्याची माहिती झाली नाहीं; इतिहासाच्या अध्ययनानें ही देशाच्या अन्तर्गत शक्ति व त्यांची वाढ यांचें सूक्ष्म ज्ञान झालें नाहीं, किंवा इतर देशांच्या इतिहासाचें मर्म कळून त्याची आपल्या देशाच्या इतिहासाच्या तत्त्वाशीं तुलना करण्याचें सामर्थ्य अंगीं आलें नाहीं, तर अशा ज्ञानाचा काय उपयोग? ज्या ज्ञानाचा उपयोग करतां येत नाहीं तें ज्ञान गाढवाच्या पाठीवर दिलेल्या साखरेच्या गोणीसारखें केवळ भारभूत मात्र होतें. यासाठीं लहानपणापासून मुलांना जें शिक्षण द्यावयाचें त्याची पद्धतिच अगदीं बदलली पाहिजे. नुसती माहिती मिळविणें हा शिक्षणाचा उद्देश नाहीं. मानसिक शक्तीचा विकास हा मुख्य उद्देश आहे ही गोष्ट शिक्षक विसरतात.

मग आतां काय करावयास पाहिजे? प्रो० ईलियट ह्मणतात कीं शाळांतून शिक्षण देण्याचा प्रघात एकदम बंद केला पाहिजे सृष्टि आणि मुलें यांचा परिचय लहानपणींच व्हावयास पाहिजे. शिक्षकानें मुलांना रोज कोठें तरी बाहेर फिरावयास नेऊन त्यांना सृष्टींतल्या घडामोडी दाखवून त्या कशा होतात तें शोधून काढण्यास मुलांनाच लाविलें पाहिजे. वर फेकलेला दगड खालीं येण्याचें कारण पृथ्वीच्या अंगची गुरुत्वाकर्षण शक्ति होय हें तत्त्व शिक्षकानें एकदम सांगतां नये. पदार्थांचें अधःपतन ही एक अगदीं सामान्य गोष्ट आहे, तथापि त्याचे मुळाशीं एक शास्त्रीय तत्त्व आहे ही गोष्ट मुलांना अनुभवानें, विचारानें. आणि तर्कज्ञानानें कळली पाहिजे. ती कळण्यास कालावधि लागेल. पण अशा रीतीनें शिक्षण मिळूं लागेल, तेंच खरें शिक्षण. प्रो० ईलिएट यांच्या मतें असा कोणताही विषय नाहीं कीं जो प्रत्यक्ष सृष्टीच्या द्वारें शिकावितां येणार नाहीं. इतिहास, गणीत, तर्क, मानसशास्त्र, धर्म. सगळे विषय शिकविण्याचें खरें उत्कृष्ट साधन ह्मणजे प्रत्यक्ष सृष्टि हें होय. पण या साधनाचा उपयोग करून घेण्याचें कोणी मनांत ही आणीत नाहीं, आणि शिक्षणासाठीं भव्य मंदिरें, विशाल प्रयोगशाला, प्रचंड ग्रंथालयें, वगैरे उपकरणें गोळा करण्यांत मनुष्य व्यर्थ द्रव्याचा अपव्यय करित आहेत. प्रो० ईलियट यांच्या मतें जर शिक्षणपद्धति श्रेयस्कर व्हावी असें वाटत असेल तर त्याला हाच एक उपाय आहे. प्रो० ईलियट यांचा हा उपाय विचाराच्या दृष्टीनें गुणकारी दिसतो खरा; पण यावर आमच्या शिक्षणाधिकाऱ्यांचा जो कांहीं अभिप्राय पडेल त्यावर आमच्या देशाचें भावी दैव अवलंबून आहे. ही प्रत्यक्ष सृष्टिपरिचयाची शिक्षणपद्धति देशांत सुरू झाली ह्मणजे डेप्युटी इन्स्पेक्टर, डायरेक्टर, वगैरे मंडळीची वाट काय होणार? विद्याखात्यासाठीं शिक्षण कीं शिक्षणासाठीं विद्याखातें हा प्रश्न अनेक वेळां [illegible] वाटतो, आणि या प्रश्नाचा निकाल एकदाचा लागे पर्यंत प्रो० ईलियट ह्मणतात त्या प्रमाणें प्रत्यक्ष सृष्टिपरिचयाची शिक्षणपद्धति कोणत्याही देशांत सुरू होईल हा संभव कमी आहे; मग अधिकाऱ्यांनीं अधिष्ठित अशा आमच्या हिंदुस्थान देशांत ती सुरू होण्यास अद्याप कित्येक युगें पाहिजेत असें ह्मटल्यास तो अतिशयोक्ति होणार नाहीं.

## थोडासा खुलासा.

वर्तमानपत्राच्या लहानशा रकान्यांत आपले विचार संकलितरीतीनें मांडावे लागल्यामुळें कित्येक वेळां त्यांच्या लेखाचा स्पष्ट बोध होत नाहीं व त्यामुळें त्याचा विपर्यास होण्याचा संभव असतो. आमच्या संबंधानें असेंच एक उदाहरण घडलेलें नुकतें आमच्या अनुभवास आलें आहे. पांचचार महिन्यांपूर्वीं उमरावतीचे विद्वान् वकील रा० असनारे यांच्या रासक्रीडा विषयक पुस्तकाचें परीक्षण आमच्या पत्रांत येऊन गेलें आहे, आणि रासक्रीडेला रा० असनारे यांनीं जें अध्यात्मिक रूपक बनविलें आहे त्या संबंधानें लिहितांना आह्मीं असें ह्मटलें होतें कीं रासक्रीडा हें जर रूपक असेल तर त्या कथेला ऐतिहासिकत्व नाहीं असें ह्मणावें लागेल. एकच गोष्ट ऐतिहासिक ही आहे आणि रूपक ही आहे असें ह्मणणें तर्कशास्त्राला सोडून आहे, आणि हें दाखविण्यासाठीं शिवाजी व अफजुलखान यांच्या गोष्टीचें उदाहरण आह्मी घेतलें होतें. सात्विक गुणानें तमोगुणाचा नाश केला हें दाखविण्यासाठीं अफजलखानाच्या वधाचें आख्यान हें रूपक आहे ही गोष्ट एकदा कबूल केली ह्मणजे अफजुलखानाचा वध ही खरोखर ऐतिहासिक घटना झालेली नाहीं, निवळ काविकल्पना आहे असें ह्मणावें लागेल. तसें रासक्रिडा हें रूपक असेल तर ती ऐतिहासिक घटना नव्हे, फार काय पण मग कृष्ण हा कोणी पुरुष झाला नाहीं; अर्थात् भागवतांतल्या त्या संबंधाच्या कथा सगळ्या झूट आहेत असें ह्मणण्याचा प्रसंग येईल. रा० असनारे रासक्रीडेचें रूपकत्व किंवा तिचें ऐतिहासिकत्व यापैकीं कोणती गोष्ट पसंत करण्यास तयार आहेत असें विचारण्याचा आमचा रोख होता. पण आमच्या ह्मणण्याचा तो अर्थ अल्पावकाशामुळें जितका स्पष्ट व्हावयास पाहिजे तितका न झाल्यामुळें रासक्रीडा ही ऐतिहासिक घटना आहे असें आमचें मत आहे अशी त्यांची समजूत झाली आहे, आणि 'रंगभूमि' मासिक पुस्तकाच्या गेल्या आठवड्यांत निघालेल्या अंकांत प्रो० भानु यांच्या टीकेला उत्तर देतांना त्यांनीं आमच्या लेखाची ढाल पुढें केली आहे. पण हा सगळा गैरसमजुतीचा प्रकार आहे, अर्थात् त्यावर रा० असनारे यांनीं जे दोन शब्द लिहिले आहेत त्यांना उत्तर देण्याचें आह्मांस कारण नाहीं, येवढें येथें सांगणें अवश्य आहे.

---

## देशी राजकारणी पुरुषांना धडा.

मुंबईचे गव्हर्नर सर जॉर्ज क्लार्क हे फार मोकळ्या दिलाचे आणि स्पष्टवक्ते दिसतात. ता० १८ जुलै रोजीं पुण्याच्या शेतकी कॉलेजाच्या प्रवेशसमारंभाचे वेळीं त्यांनीं देशी राजकारणी पुरुषांना एक धडा घालून दिला त्या वेळच्या भाषणांत ते ह्मणाले कीं शेतकी खात्यानें व कॉलेजानें इतकें चांगलें काम केलें आहे कीं मी देशी राजकारणी पुरुष असतों तर शेतकी सुधारणा व ज्ञानाचा प्रसार याकडे अधिक पैसा खर्च करण्याविषयीं निकड लावून सरकारला पुरेपुरेसें करून सोडलें असतें! ना० गव्हर्नर साहेब जरी हे शेतकी संबंधानेंच बोलत होते तरी हें तत्त्व देशी राजकारणी पुरुषांनीं सर्व बाबतींत अवलंबिलें पाहिजे असें ह्मणण्यास हरकत नाहीं. चिकाटी धरण्याचा गुण राजकारणांत पडणाराचे अंगीं अवश्य हवा आहे. तो असावा तितका नसल्यामुळेंच मद्यपाननिषेध, जंगलखात्यापासून होणारा त्रास, न्याय व अंमलबजावणी खात्यांची ताटातूट स्थानिक स्वराज्यांची सुधारणा, शिक्षणक्रमांत फेरफार करण्याची अवश्यकता इ० गोष्टींत लोकांच्या मागण्या न्यायाच्या व वाजवी असून त्या मिळत नाहींत. 'ठोका ह्मणजे उघडेल' हें तत्त्व इंग्रज लोकांच्या हाडींमासीं जितकें खेळलें आहे तितकें आमच्या खिळलेलें दिसेल तेव्हां ना० सर जॉर्ज क्लार्क सारखे इंग्रज अधिकारी समजतील कीं आह्मी खरोखर मनापासून मागण्या करीत आहों, आणि मग त्या मिळण्यास उशीर लागावयाचा नाहीं. देशी राजकारणी पुरुष हा धडा ना० सर जॉर्ज क्लार्कसाहेबांपासून आतां तरी शिकतील अशी आह्मी आशा करतों.

---

## हिंदु युनिव्हर्सिटी

ना० मदन मोहन मालवीय यांची आपली हिंदु युनिव्हर्सिटी मिसेस ॲनी बिझांट बाईच्या युनिव्हर्सिटीशीं जोडण्याचा विचार आहे ही गोष्ट बाहेर पडल्यापासून लोकांत बरीच चळवळ उडाली होती, आणि निष्कारण गैरसमज झाला होता, तो त्यांनीं नुकत्याच प्रसिद्ध केलेल्या खुलाशानें दूर होईल अशी आमची समजूत आहे. हिंदु युनिव्हर्सिटीची व्यवस्थासूत्रें मुख्यतः हिंदु गृहस्थांच्याच हातीं राहावयाचीं आहेत व या युनिव्हर्सिटींत हिंदु धर्म व नीति याचे हिंदुशास्त्राला धरून शिक्षण मिळेल, जरूरी पुरते सरकारनियुक्त सभासद घेण्यांत येतील, पण 'हिंदु' हें नांव सार्थ होईल या विषयीं हर एक प्रकारची खबरदारी घेण्यांत येईल असें आश्वासन ना० मालवीय देत आहेत. बनारसचे सेंट्रल कॉलेज हें अशा प्रकारचें पहिलेंच कॉलेज आणि तेंही खुद्द हिंदु युनिव्हर्सिटीच्या मुख्य पीठीं बनारस येथें असल्यामुळें हिंदु युनिव्हर्सिटींत प्रविष्ट होणारें तें पहिलें कॉलेज अर्थातच राहील. पण मिसेस बिझांट बाईच्या युनिव्हर्सिटीशीं संलग्न झाल्यामुळें हिंदुयुनिव्हर्सिटीला थिओसफीचा विटाळ होईल अशी जी भीती कित्येकांना वाटत होती ती आतां दूर झाली आहे. तेव्हां आतां हिंदुधर्माचा कडकडीत जाज्वल्य अभिमान धरणारे आतां आपल्या पिशव्यांचीं तोंडें सैल करून ना० मालवीय यांस पाहिजे असलेले एक कोट रुपये हां हां ह्मणतां जमवून देतील अशी त्यांच्या धर्माभिमानाच्या पुरावरून अपेक्षा करणें गैरवाजवी होणार नाहीं.

---

## राजकुलीन व्हाइसराय

विलायतेंतील राजघराण्यांतल्या पुरुषांना हिंदुस्थानांत व्हाइसराय नेमून पाठविण्याची सूचना अलीकडे इतकी वारंवार डोकावूं लागली आहे कीं या गोष्टीचा तेथील राजकीय परिस्थितीशीं कांहीं संबंध आहे काय अशी शंका येणें स्वाभाविक आहे. राजघराण्यांतल्या पुरुषाच्या हातीं हिंदुस्थानच्या राज्यकारभाराचीं सूत्रें गेलीं तर ना विष्णुः पृथिवीपतिः या वाक्याचा जप करणाऱ्या हिंदुस्थानाला त्यापासून आनंदच होईल. पण ही व्यवस्था एकंदरीनें हिंदुस्थानच्या हिताची होईल कीं काय या ही गोष्टीचा विचार अवश्य केला पाहिजे. बदललल्या काळाबरोबर राजनीतीचीं तत्त्वें ही बदललीं आहेत. एकतंत्री राज्य व प्रजातंत्री राज्य यांच्यांतला भेद कळण्याइतका शिक्षणप्रसार हिंदुस्थानांत आतां झाला आहे. शिवाय ही सूचना कितीशी व्यावहारिक आहे हें ही पाहिलें पाहिजे. हिंदुस्थानचा राज्य कारभार चालविण्याचें सामर्थ्य अंगीं असणारे पुरुष राजघराण्यांत नेहमींच निर्माण होतील अशी काय ग्यारंटी आहे? हिंदुस्थानच्या व्हाइसरायाच्या जागीं कोणाची नेमणूक करावयाची या दृष्टीनें सध्याच्याच राजघराण्याकडे पाहिलें तर ड्यूक ऑफ कॅनॉट यांच्या खेरीज अन्य कोणी पुरुष तो भार सहन करण्याजोगा दिसतो काय? ड्यूक ऑफ कॅनॉट हे कानड्यांत आहेत, ते हिंदुस्थानच्या वांट्याला कसे येणार? प्रिन्स ऑफ वेल्स आणि ड्यूक आर्थर ऑफ कॅनॉट हे अद्याप पुरेसे वयस्क झालेले नाहींत. त्यांना अद्याप जगाचा पुष्कळ अनुभव यावयाचा आहे. योग्य कालानें हे दोघे ही पुरुष तीस कोटि लोकांवर राज्य चालविण्यास समर्थ होतील. पण आज ही सूचना व्यवहार्य नाहीं हें उघड आहे. असें असतां ना० आगाखान हे सध्याच्या काळीं ही सूचना कां पुढें करीत आहेत तें कळत नाहीं!

---

## अमेरिकेंतील हिंदी लोक

ट्रान्सवाल, नाताळ, कानडा वगैरे ब्रिटिशसाम्राज्याच्या कांहीं भागांत हिंदुस्थानच्या ब्रिटिश प्रजेस कोणत्यारीतीनें वागविण्यांत येत असतें याविषयीं वर्तमानपत्रांतून इतकी चर्चा झाली आहे कीं त्याची पुनरुक्ति करणें अतिशय कंटाळवाणें होईल. पण अशा कंटाळलेल्या वाचकास उल्हास देणारी माहिती मॉडर्न रिव्ह्यूच्या चालू महिन्याच्या अंकांत मि० हरदयाळ नांवाच्या कोणा लेखकानें दिली आहे. हिंदुस्थानच्या बाहेर जेथून अत्यंत उत्साहपूर्ण व आशायुक्त निरोप हिंदी गृहस्थाला पाठवितां येईल असा पृथ्वीच्या पाठीवर एकच – अमेरिका – देश आहे असें मि० हरदयाळ यांचें ह्मणणें आहे इकडून अमेरिकेंत चोरट्याप्रमाणें गेलेल्या गुप्त पोलिसांकडून हिंदी माणसांना कांहीं उपद्रव होऊं शकत नाहीं. इतर कांहीं युरोपियन राष्ट्रें कोणी हिंदुस्थानच्या पीकपाण्याचें, कोणी तेथील भाषांचें, कोणी तत्त्वज्ञानाचें व कोणी इकडच्या संपत्तीचें कौतुक करणारीं आहेत. पण हिंदुस्थानच्या माणसाला आपल्या बरोबरीनें वागविण्यांत अमेरिकेचा नंबर निःसंशय वर आहे. अमेरिकेंतल्या पुष्कळ संस्थानांत इकडचे शीख जाऊन राहिले आहेत. पण आस्ट्रेलिया किंवा ट्रान्सवाल यांच्याप्रमाणें कृष्णवर्णाचें भय अमेरिकेला अद्याप वाटूं लागलें नाहीं. उलट विवेकानंद व त्यांचे चेले स्वामी यांनीं आपलें उत्कृष्ट वर्तन अमेरिके पुढें ठेवून तेथील लोकांचे मनावर उत्कृष्ट छाप बसविली त्याचा हा परिणाम आहे असें आमचें मत आहे.

---

## साहित्य–समागम.

### श्री हर्ष.

–❋०❋–

महाराष्ट्र साहित्यपरिषदेच्या हातून आजपर्यंत ह्मणण्यासारखी कांहीं प्रत्यक्ष कामगिरी झाली नसली तरी अप्रत्यक्ष रीतीनें तिच्यामुळें महाराष्ट्र वाङ्मय थोडेसें तरी अधिक संपन्न झालें आहे. त्या परिषदेच्या रिपोर्टाला जोडलेले १८ निबंध हे वाङ्मयाच्या अभिवृद्धीच्या दृष्टीनें विचारणीय आहेत. परिषदेच्या एका सेक्रेटरीनें पांचचार वर्षांपूर्वीं मराठी व्याकरणांतले कांहीं वादग्रस्त मुद्दे काढून ते महाराष्ट्रांतील विद्वानांकडे अभिप्रायार्थ पाठविले होते. त्यावरून रा० मोरो केशव दामले यांना मराठी व्याकरणाची शास्त्रीय रचना करण्याची स्फूर्ति होऊन त्यांचाही प्रचंड ग्रंथ तयार झाला आहे; आणि तिसरें फळ के० पांडुरंग गोविंद शास्त्री पारखी यांचा 'श्री हर्ष' राजावरील निबंध हाही बडोद्याच्या साहित्यसंमेलनासाठींच तयार केलेला होता, पण तो स्वतंत्र पुस्तकाच्या रूपानेंच प्रकाशित होण्याइतका मोठा असल्यामुळें रिपोर्टांत त्याचा समावेश करतां आला नाहीं, तरी संमेलनाचे अध्यक्ष डा० कीर्तिकर यांच्या उदार साह्यानें तो आतां प्रकाशित झाला आहे. अलीकडे लोकांची अभिरुचि वाढली आहे खरी, पण ती बहुतेक नाटकेंकादंबऱ्याकडे वळली असल्यामुळें श्री हर्षावरील १७१ पृष्ठांचा निबंध वाचण्या इतका मनाचा धीर फारच थोड्यांच्या ठायीं दृष्टीस पडतो. अशा वाचकांसाठीं शास्त्रीबुवांच्या पुस्तकाचें सार थोडक्यांत देणें इष्ट आहे.

श्री हर्ष नांवाचे तिघेजण एक इ० स. च्या ७ व्या शतकांत व दोघे १२ व्या शतकांत–होऊन गेले. रत्नावलि, प्रियदर्शिका, व नागानंद या नाटकांचा कर्ता व बाण, मयूर इ० कवींचा आश्रयदाता हा त्यापैकीं पहिला होय. चहाडखोरांच्या प्रयत्नानें एकदा या राजाचें मन बाणाविषयीं कलुषित केलें होतें, पण हर्षाचा बंधु कृष्णराज यानें राजाच्या मनांतला वाईट ग्रह काढून टाकला होता. बाण राजाश्रित होता तरी त्यानें स्वाभिमान सोडला नव्हता. याविषयींची एक आख्यायिका पृ० १४ वर दिली आहे ती वाचनीय आहे. श्री हर्षाला त्याचा बाप प्रतापवर्धन यानें मरतांना 'प्रजानुरंजनानेंच राजे बंधुस मान होतात, स्वज्ञातीच्या योगानें नाहींत' हा केलेला उपदेश हल्लींच्या काळीं ही राजे लोकांनीं घेण्यासारखा आहे. तसाच हर्षाचा वडील भाऊ राज्यवर्धन याला गौडराजा शशांक यानें मारल्याबद्दल त्याचा सूड घेण्याविषयीं सेनापतीनें मागील दाखले देऊन केलेला उपदेश वाचनीय आहे पृ० २६।२७. या उपदेशाचा परिणाम हर्षाचें मनावर होऊन त्यानें तो उपदेश कृतीनें सार्थ केला. हर्षाचे मन सुसंकृत होतें. तो शकुन–अपशकुन पाहणारा नव्हता

…त विषयींची आख्यायिका व चिनें … आफ वेलिंग्टनाच्या गोष्टीशीं साम्य पृ० २१ गमतीचें आहे. रा० पारखी यांनीं चिनी प्रवासी हुएन सांग याच्या प्रवासवर्णनांतून हर्षाबद्दलचे विस्तृत उल्लेख दिले आहेत ते अत्यंत मनोरम आहेत. त्यांत बौद्ध लोकांच्या विषयींची माहिती आहे. श्री हर्ष स्वतः बौद्धधर्मी झाला होता तरी त्यानें ब्राह्मणांना अग्रहार दिले आहेत यावरून त्याचें मन उदार होतें असें दिसतें. रा. पारखी शास्त्री यांनीं श्री हर्षाच्या नाटक-ग्रंथांची माहिती भरपूर अवतरणांसह दिली आहे. पण हा त्यांच्या कृतींतला गौणभाग आहे. मुख्य भाग ह्मणजे श्री हर्षासंबंधानें डॉ० हर्नलेसारख्या पाश्चात्य पंडितांनीं केलेल्या चुकीच्या विधानांचें खंडन होय. पाश्चात्य पंडित मोठे शोधक असतात ही गोष्ट खरी आहे, पण त्यांना आमच्या चालीरीती व विचार परंपरा यांची माहिती नसल्यानें त्यांचीं विधानें पुष्कळ वेळां चुकतात. डॉ० हर्नले यांच्या अनेक विधानांचें खंडन यांत इतक्या मार्मिक रीतीनें केलें आहे कीं त्यावरून शास्त्रीबुवांची शोधकबुद्धि, वादपद्धति, आणि सत्यप्रीति यांची चांगली साक्ष पटते. सारांश, सदर पुस्तकानें मराठी भाषेंत निःसंशय फार चांगली भर टाकली आहे.

## राज्याभिषेकाचें महत्त्व.

नुकत्या झालेल्या आपल्या सन्माम्य व प्रिय बादशहाच्या राज्याभिषेकाचीं रसभरित वर्णनें आणि थोर लोकांचे विचार विलायतच्या वर्तमानपत्रांतून प्रसिद्ध होऊं लागले आहेत. त्यांतले कांहीं विचारणीय आहेत. मेरी कोरेली नांवाच्या एका स्वतंत्र बाण्याच्या सुप्रसिद्ध कादंबरीकर्त्रीनें सदर समारंभाचें जें वर्णन केलें आहे. त्यांत शेवटीं या विधीचें राजकीय दृष्ट्या महत्त्व एका वाक्यांत वाणलें आहे. तें असें ती ह्मणते-ज्या वेळीं राज्यक्रांतिकारक आणि प्रजासत्ता युक्त पद्धतीच्या सूचना चोहोंकडून येत आहेत आणि राज्यावर संकट येणार अशी भिति येऊन पडली आहे, अशा वेळीं राज्याचा पाया भक्कम करणारी, आणि लोकांच्या मनांत आशा जागृत करणारी, त्यांना निर्भयतेचें आश्वासन देणारी' आणि प्रजेच्या ठायीं असलेली राजनिष्ठा पूर्णपणें व्यक्त करणारी अशी ही (राज्याभिषेक) गोष्ट आहे. या वाक्यांत इंग्लंडची हल्लींची लॉर्डस सभा बंद करण्याविषयींची चळवळ' युनियनिस्ट-पक्षाचा अधिकार भ्रष्टतेमुळें होत असलेला चडफडाट, लिबरल गव्हरमेंटची उडत असलेली तिरपीट वसाहतीमुळें येऊन पडलेली प्रचंड जबाबदारी वगैरे अनेक राजकारणांचा थोडक्यांत मोठ्या खुबीनें उल्लेख केला आहे. तो अंतर्दृष्टि ठेवून वाचणारांनाच कळण्यासारखा आहे.

## थोरांच्या आख्यायिका

मागच्या दिल्ली दरबारच्या वेळीं व्हाइसराय व ड्यूक ऑफ कॅनॉट यांनीं राजेरजवाड्यांच्या मुलाखती घेतल्या त्यावेळीं महाराष्ट्रांतलि एका प्रमुख ब्राह्मण संस्थानिकांची तिरपिट उडून गर्दीत त्यांच्या कमरेचा शेला सुटून पायांत अडकला होता. लॉर्ड किचनेर यांची परवा राज्याभिषेकाच्या दिवशीं तशीच गंमत झाली होती. त्यांच्या छातीवर लटकणारा स्टार ऑफ इंडियाचा चांद गळून खालीं पडला, पण तो जमिनीवर न पडतां त्यांच्या बुटांत गेला. तें त्यावेळीं कळलें नाहीं. पुढें कांहीं वेळानें त्या चांदाची टाचणी पायाला बोचूं लागली पण बूट काढतां यइना ह्मणून तशीच कट्टानें वेळ मारून नेऊन समारंभ संपतांच बूट काढून पाहतात तों छातीवरला चांद! लॉर्ड किचनेर यांचा हिंदुस्थानाशीं असलेला संबंध सुटल्यामुळें त्या चांदालाही आतां त्यांची छाती भूषित करण्याची विशेष इच्छा राहिली नाहीं असें दिसतें.

## पहिला विजय.

हिंदुस्थानांतून जी क्रिकेटटीम विलायतेंत खेळण्यासाठीं गेली आहे तिला आतां पर्यंत लागोपाठ अपयशच येत गेल्यानें झालेला निरुत्साह तिला नुकत्याच मिळालेल्या पहिल्या विजयानें पार नाहींसा होईल त्याचप्रमाणें आतांपर्यंत अपयश येण्याचीं कारणें कळून आमच्यांत सुधारणा ही होईल अशी आशा ठेविली पाहिजे. आमचे खेळाडु सामान्य प्रतीचे होते असें नाहीं. पण त्यांच्यांत एकी, व्यवस्थितपणा आणि कार्यदृष्टि हे गुण जितके जाज्वल्य असावयास पाहिजेत तितके नव्हते. खेळण्याचे कामांत ही जातिभेद व वर्णभेद किंवा अशाच तऱ्हेचे कोते विचार आड येत गेले तोंपर्यंत हिंदी खेळाडूंना यश आलें नाहीं. विलायतेंत कांहीं आठवडे राहून ठेंचा खाल्यानंतर आपल्या स्वभावांतला हा दोष व्यवस्थापकांना दिसला आणि तो दोष काढून टाकतांच आमच्या लोकांच्या अंगचें तेज विलायतेंत ही प्रकट झालें. हेंच तत्त्व राजकारण, उद्योगधंदे, व्यापार, वगैरे सर्व प्रश्नांना लावण्याला आमचे लोक शिकतील तर हिंदी क्रिकेट टीमची ही पहिली विलायती सफर पूर्णपणें फलद्रूप झाली असें आह्मी ह्मणूं. क्रिकेटप्रमाणें पोलोचा सामना करण्यासाठीं ही विलायतेस एक हिंदी टीम गेली आहे आणि तिला उत्तम प्रकारें यश आलें आहे. या टीममध्यें निरनिराळ्या जातींचे लोक आहेत कीं एकाच जातीचे आहेत हें ठाऊक नाहीं.

## केशव चंद्रसेन यांचें स्मारक

शिक्षणासाठीं येथून विलायतेला गेलेल्या विद्यार्थ्यांची राहण्याची, जेवणाची व शिक्षणाची सोय व्हावी म्हणून लंडन येथें एक संस्था ब्रह्मानंद केशव चंद्रसेन यांच्या दोन मुलीं—कूचबिहारच्या राणीसाहेब व मयूरभंज येथील राणीसाहेब—यांच्याकडून काढण्यात आली आहे व तिला त्यांनीं आपल्या पूज्य पित्यांच्या स्मरणार्थ केशव इंस्टिट्यूट असें नांव दिलें आहे. या संस्थेच्या इमारतींतच ब्राम्हसमाजाच्या ही सभा भरणार आहेत. सध्या येथें थोड्याच विद्यार्थ्यांपुरती सोय आहे, पण सध्या वाढल्यास जवळची एखाददुसरी इमारत भाड्यानें घेऊन ती या संस्थेला जोडण्याचा विचार आहे. शिक्षण आणि धर्मसाधन यांची अशा प्रकारें सांगड घालणाऱ्या या संस्थेपेक्षां अधिक प्रशंसनीय अशी स्मारकाची योजना दुसरी कचितूच असेल.

## वऱ्हाडवृत्त.

हवामान— यंदाचा सर्व पर्जन्य एकंदर ९ इंच झाला असून पुनर्वसु नक्षत्राचे तिन्ही चरण अगदीं कोरडे गेले व पुष्य नक्षत्राचा पाऊस अजून पडूं लागला नाहीं त्यामुळें थोडीशी चळवळ उडाली आहे. पण कालपासून पूर्वपश्चिम क्षितिजें उदयास्तच्या समयीं तांबूस ताम्रवर्ण होणें, पश्चिमेकडून जोराचा वारा सुटणें, अभ्राच्छाया गर्द होत जाणें, सूर्यप्रकाश तीव्रतर व घर्मप्रद होणें इत्यादि अनुकूल लक्षणें पर्जन्य लवकरच येईल असें सांगतात.

रा. रा. नुसरवानजी बेझनजी मेहता सबजज्ज वर्ग १ ला, जज्ज स्माल काज कोर्ट, आकोला यांस भंडाऱ्याचे डिस्ट्रिक्ट जज्ज वर्ग ४ चे नेमण्यांत आलें आणि त्या अन्वयें ते तिकडे रवाना झाले.

रा. रा. जानकी प्रसाद हर्दे, सब जज्ज आकोला यांस येथील स्माल काज कोर्टाचे न्यायाधीश नेमिलें.

रा. रा. अमृत लक्ष्मण दिघे आफि० डिस्ट्रिक्ट जज्ज, उमरावती यांस ३ महिन्यांची आजारीपणाची रजा देण्यांत आली.

त्यांच्या जागीं उमरावतीचे स्माल काज कोर्टाचे जज्ज रा. रा. शंकर बळवंत चिटणवीस यांस अडिशनल डिस्ट्रिक्ट जज्ज नं० २ चे नेमण्यांत आलें.

रा० रा० सदाशिव गणपत सुभेदार डिस्ट्रिक्ट जज्ज यांस रजा संपतांच उमरावतीच्या स्मालकाज कोर्टाचे जज्ज नेमिलें.

मुर्तिजापूरच्या तहशिलदारीच्या जागीं रा० रा० दामोदर पुरुषोत्तम खानझोडे आफी० तहशीलदार यांस नेमल्याअन्वयें ते आपल्या नव्या जागीं रुजूं झाले.

रा० रा० स्लेकॉक आय. सी. एस. पोलीस इन्स्पेक्टर जनरल यांस ३ महिन्यांची हक्काची रजा मिळाल्याकारणानें त्यांच्या जागीं रा० रा० स्पेन्स डिपुटी इन्स्पेक्टर जनरल यांस बढती देण्यांत आली.

## जाहिरात

सर्व लोकांस:— खालीं सही करणार याजकडून कळविण्यांत येतें कीं पेठ खामगांव तालुके मजकूर येथें गांवांत घराचें खांब १९ वर माडी याचा दर्शनी भाग पूर्वपश्चिम याची चतुःसीमा पु० सरकारी सडक, प० रस्ता व पलीकडे केशव सोनार याचें घर, द० रुदामुख सीतारामचें घर, उ० गंगाराम भटाचें घर, येणें प्रमाणें चतुःसिमेंतील घरावर आमची निमेची मालकी आहे. व निम्मे रामप्रताप सेवाराम बागडी यांची आहे तर वरील घर. रामप्रताप सालीम विक्री करणार आहेत. तर सदरहु घर कोणी घेऊं नये. घेतल्यास आमची निम्मे घर जबाबदार नाहीं. सर्व जबाबदारी घेणार याजवर होईल. सबब जाहिरातीनें कळविलें आहे ता० २१।७।११ इ०

सही

सेवाराम सिवरतन मालक सिवरतन सिवप्रताप द० खु०

नं० नं० ३०९

## नोटीस

श्री० जवालाबाई जवजे गोपाळदास रा० बार्शिटाकळी इस:—

सुंदरबाई जवजे गिरधरलाल तर्फे पन्नालाल शालिग्राम रा० पंचगव्हाण ता० आकोट नोटीस देतो कीं तुझी व मी सामायिक कुटुंबातील माणसें असून तुमचा व आमचा वडिलोपार्जित स्थावरजंगम इस्टेटीसंबंधानें आजपावेता व्यवहार सर्व व्यवस्थित रीतीनें चालला होता. आतांशा आपण मला नकळवितां कांहीं लब्ब्डलबाड लोकांचे नादीं लागून आपल्या सामायिक इस्टेटीची अफरातफर करण्यास प्रवृत्त झाल्याचें समजतें. हें आपलें करणें गैरकायदा आहे. तुमचा बहुतेक संसार आटोपला असून माझ्या पोटीं कन्या वगैरे असल्यानें मला देना कोणत्याच गोष्टीची न पडावी ह्मणून मी आपणास माझ्या संमतीशिवाय कांहीं देवघेव केल्यास किंवा आसम्यांचा वसूल घेतल्यास मला तें मान्य न होतां गैरकायदा होईल. याची सर्वैव जबाबदारी आपल्या अंगावर राहील. मी किंवा वडिलार्जित इस्टेट त्याबद्दल जोखीमदार कोणत्याच प्रकारें नाहीं कळावें. ता० २२।७।११

सही

सुंदरबाई जवजे गिरधरलालजी तर्फे मु० पन्नालाल सालिग्राम दस्तुर खुद

नो० नं० ३१०

## जाहिर नोटीस

सर्वत्र शेटसावकार, असाम्या व इतरत्र लोक यांसः—

सुंदराबाई जवजे गिरधरलाल तर्फे पन्नालाल शालिग्राम रा० पंचगव्हाण ता० अकोट नोटीस देतो कीं बार्शिटाकळी ता० व जि० आकोला येथील "गोपाळदास गिरधरलाल" या नांवचे दुकानासंबंधी स्थावरजंगम इस्टेटीबद्दल वहिवाटदार मी व माझी जाऊ जवालाबाई जवजे गोपाळदास ह्या असून त्या व मी आज घटकेस सामायिक कुटुंबापैकीं आहात. आतांशा वरील जवालाबाई कांहीं घरफोड्यांचे नादीं लागून माझ्या सल्ल्यावांचून कांहीं अफरातफर करूं पहाते व आसाम्यांचा वसूल स्वतःच घेऊन आपल्या जेनीकडे उडविते असें दिसून आलें. सबब नोटीस देण्यांत येत आहे कीं या पुढें कोणी या दुकानाशीं घेण्यादेण्याचा, कबुलायती, पट्टे वगैरे करून देण्याचे बाबतींत आह्मास लेखी विचारल्याशिवाय व्यवहार केल्यास तो मला कबूल होणार नाहीं. ज्याचा तो जबाबदार राहून इस्टेट अगर मी त्यासंबंधानें कोणत्याहि रीतीनें बांधली जाणार नाहीं. कळावें ता० २२।७।११

सही

सुंदरबाई जवजे गिरधरलाल तर्फे मु० पन्नालाल शालिग्राम दस्तुरखुद.

नो० नं० ३११

सुधासिंधु

सुख संचारक कंपनी मथुरा यांचीं तयार केलेलीं व सरकारांतून रजिष्टर झालेलीं औषधें, जीं वीस वर्षांपासून लोकात अनुभविलीं आहेत.

सु धा सिं धु

हें कफ, खोकला, दमा, थंडीचा ताप, पटकी, शूळ, संग्रहणी, अतिसार, पोटांत दुखणें, वांत्या, मळमळणें, हात पाय व कंबर दुखणें, मुलांचे हिरवे पिवळे जुलाब, डांग्या खोकला, दूध ओकून टाकणें इत्यादींवर स्वादिष्ट व सुवासिक औषध आहे. किंमत प्रत्येक बाटलीस ०८ आणे.

दद्रुगज केसरी

गजकरणास समूळ नाहींसें करणारें हेंच फक्त एक पवित्र औषध आहे. कांहीं सुद्धां जळण अथवा आग होत नाहीं. यासच जर दारू अथवा लिंबाचे अर्कांत मिळविलें तर २ बाटल्या अर्क तयार होतो. किंमत प्रत्येक बाटलीस ०४ आणे. १२ बाटल्या एकदम मागविल्यानें त्यांस एजंट समजून नोटिशी, हँडबिलें वगैरे फुकट पाठविलीं जातात, व कमिशनही दिलें जातें. चालू सालचें पंचांगही फुकट मिळतें.

मागविण्याचा पत्ताः—
पंडित क्षेत्रपाल शर्मा मालक,
न. १५९    सुख संचारक कंपनी, मथुरा.



अशी संधी पुन्हां येणार नाहीं.



एक घड्याळ घेणारांस    एक घड्याळ बक्षीस.

पोष्टखर्च माफ    दर एकाची किंमत ३।

जंटलमन इमिटेशन रास्कोप सिस्टिम.

नांवचें खिशांत ठेवण्याचें घड्याळ दिसण्यांत फार सुरेख आहे. सर्व लोकांस ह्या घड्याळाचा लाभ मिळावा ह्मणून मुद्दाम किंमत रुपये ३। ठेविली आहे; पोस्टेज खर्च माफ. घड्याळा सोबत कांच, कमान, पेटी, गोफ, इतकें सामान फुकट मिळेल. अशी अमुल्य संधी पुन्हां येणार नाहीं. व्ही. पी. नें मागवा.

मिळण्याचा पत्ताः—खोजा वल्लीभाई इस्माल
मुक्काम वर्धा. [ मध्यप्रांत ] WARDA.
नो. नं. ४



चिरकालचा खरा लाभ कोणता ?
पैसा व ज्ञान ज्या योगानें मिळेल तो !
महाराज ! ह्या दोन्ही गोष्टी

वार्षिक वर्गणी ट.ख.स ह रु.१॥ ) कलाशिक्षण ( नमुना अंकास ०)॥आ.

नांवाच्या विविध हुन्नर, शास्त्रीयज्ञान, व्यापार शेतकी, व इतर शेंकडा विषयांची माहिती शिकावणाऱ्यास वर्गणदार व्हा. मराठी भाषेंत हें असें एकच पुस्तक आहे. वर्गणी रु. १॥ खरी पण चालू मार्च अखेर आश्रय देणारास रु. १। पडेल. कारागिरांस, विद्यार्थ्यांस तर हें पुस्तक अवश्य हवें शिवाय ग्राहकांस हिप्नॉटिझम [ Hypnotism] ऊर्फ अमेरिकन वशीकरणविद्या—जिनें दुसऱ्यास निद्रामोहन, आरोग्यहरण व धनप्राप्ति करतां येते; ती रु. २५ फीची तूर्त रु. ११ त शिकवूं. पैकीं १ रु. प्रथम सही बरोबर पाठवावा. बाकीची व्ही. पी. येईल.

ह्या शिवाय नानाप्रकारच्या पोट भरण्याच्या युक्त्या. औषधी. मंत्रतंत्रक्रिया, जडीबुटी, गुप्त प्रयोगाची माहिती वाजवी फी घेऊन शिकवूं. सर्व पत्रव्यवहार गुप्त राखला जातो

व्यवस्थापक— कलाशिक्षण, कार्यालय
ना. न. ५    बडोदें.



नोटीस

विहार आनन्दका सागर रंगीन तसवीरे सहित चारो भाग तथा पांचो अंग सचित्र कोख शास्त्र.

असली हमसे मंगावो धोकेसे बचो स्त्री पुरुषोंके जात, भेद, लक्षण अनेक देशस्थ स्त्रीनायका, कुमारी प्रकृती, सत्व दुती कुलटा, पतिव्रता, व्यभिचारणी आदिको पहचान, रजोधर्म लक्षण, ऋतुविहार मय सहवास स्थान क्रया, शैय्यातिथ, कामस्थान सोलासगारें, बतीसोआभूषण, वस्त्रतअर्दिवमधान पुत्रस्टीकर्म, नपुंसकविद्या, उपदंश प्रमेह आदि अनेक रोगोंकी चिकित्सा औषधि, पशुभाषा जाननेकी रीति, मंत्रतंत्र, यंत्र, वशीकरण सुद्धां विद्या आदि अमुल्य विषयका भंडार किंमत रु० १

पं० गंगाप्रसाद इंजीनियर शहापडा
नो० नं० ७७    अलीगड सिटी.


## नोटीस

आप्पाई मर्द पांडु बदर मराठे राहणार महागांव ता० वाशीम हिसः—

मी अमृता वल्लद महिपती बदर रा० महागांव नोटीस देतों कीं माझा धाकटा भाऊ पांडू हा गेल्या पौषांत मेला. त्याला तुजपासून दोन मुलें झालीं आहेत. तीं अज्ञान आहेत. त्याच्या वाहिवाटींत आमची वडिलार्जित स्थावरजंगम इस्टेट होती तिचा तूं अफरातफर करूं पाहतेस पण तसें करण्यास मुला मुलींच अधिकार नाहीं. तूं फक्त अन्नवस्त्राची मालकीण आहेस. तें तुला पुरविण्यास तयार आहे. मयत पांडु हा माझ्या सल्लामसलतीनेंच चालत होता. तूं मात्र आईबापाच्या नादीं लागून मयताची इस्टेट विकूं पहातेस व सर्व पैसा करून दुसऱ्या पाटाचे नवऱ्याचे घरीं नेणार आहेस. यामुळें आमच्या भावाचे संततीस दैना प्राप्त होणार आहे. सबब तुला अशी मयताचे इस्टेटीची विल्हेवाट लावण्यास आमची हरकत आहे. मयत भावाच्या वरील इस्टेटीची व्यवस्था आजपावेतों आह्मी करीत आलों तशीच पुढें करणार आहोंत. तूं या पुढें आमच्या परवानगीशिवाय कोणताही व्यवहार केल्यास त्याची जबाबदारी आमचेवर किंवा मयताचे स्थावरजंगम इस्टेटीवर कोणत्याही प्रकारें नाहीं. कळावें. तारीख १९-७-११ इ०

सही
अमृता वल्लद महिपती निशाणी आंगठा.

नो. नं. ३०३

## जाहिर नोटीस

जाहिरात देणार जवाला बाई जवजे गोपालदास अगरवाले साहु दुकान कसबे बार्शीटाकळी तालुके अकोला. हिजकडून सर्व लोकांस व साहूसावकार व दुकानदारांस या जाहिरनाम्याच्या योगानें कळविण्यांत येतें कीं माझ्या तर्फे माझ्या दुकानावर पन्नालाल साळीकराम गुमास्ता कुलमुखत्यार होता त्याचें मुखत्यारपत्र ता० १ माहे फेब्रुवारी सन १९११ पासून रद्द केलें आहे. या करितां या जाहिरातीनें सर्वांस कळविण्यांत येतें कीं माझ्या नांवावर अगर दुकानच्या नांवावर कोणत्याच प्रकारची देवघेव करूं नये. केल्यास मी व दुकान जबाबदार राहणार नाहीं. हा जाहिरनामा दिला. कळावें. तारीख १९ माहे जुलै सन १९११ इ.

सही
जवाला बाई जवजे गोपालदास
द० खु०

नो० नं० ३०४

## नोटीस

रा० शेट उदाराम खेतशीदास मारवाडी दुकान सोनाळें ता० जळगांव.

मी खालीं सही करणार कळवितों कीं माझा भाऊ नामें तुकाराम विठोबा तेल्हारेकर हा तुमचे येथें शेती वगैरे काम करण्याकरितां सालानें होता व त्यास मी जामीन होतों त्यांनीं तुमचे घरीं ६ महिने नोकरी केली व तो प्लेगनें मरण पावला तेव्हां मी दुसऱ्याचे घरीं सालानें होतों माझें साल फिटलें तेव्हां मी तुह्मास दोनतीन वेळ विचारलें कीं मला ठेवून साल फेडून घ्यावें. नाहीं तर आपले सहा महिन्यांचे रुपये ३१॥ व चार महिन्यांचें व्याज घ्यावें. आपण दोन्ही गोष्टींस नाकबूल आहांत तरी मी रुपये देण्यास तयार आहे. मात्र नुकसान देण्यास तयार नाहीं. तरी तुह्मी फिर्याद वगैरे केल्यास त्याचा खर्च वगैरे मी मुळींच देणार नाहीं तरी नोटीस पावल्यापासून आठ दिवसांत आपले रुपये घेऊन घेणें व नोटिशीचा खर्च तुमचेवर आहे कळावें. ता० २०।७।११ इ०

दस्तुर— लक्ष्मण नरहर इंगळे
राहणार तेल्हारें.

सही
नारायण विठोबा तेल्हारेकर वस्ती
सोनाळें ता० जळगांव
जि० बुलढाणें
नि० खु०

नो० नं० ३०५

## नोटीस

श्री० रा० रा० रामचंद्रराव अमृतराव बुटी दु० आकोला तर्फे मुनीम पांडुरंग भालचंद्र टोपले आकोला यांसः—

आमचे पक्षकार श्री राजेश्वर संस्थान अकोला वहिवाटदार गोपाळ हरी सावरकर राहणार अकोला यांजकडून नोटीस देण्यांत येते कीं, कसबे अकोला ता० अकोला येथील खालील वर्णनाचें घर भागाबाई मर्द विठोबा इचे मालकीचें असून तें तिनें मरणसमई श्रीराजेश्वर संस्थानास मृत्युपत्र करून दिलें आहे. सदरहु बाई मरून आज सुमारें एक वर्ष झालें आहे. घरावर श्रीचे शिवाय कोणाचाही हक्कसंबंध नाहीं. करितां घराचे सामानासंबंधीं अगर इमल्यासंबंधीं कोणताच व्यवहार आपण श्रीशिवाय दुसरे कोणाबरोबर करूं नये. केल्यास कायद्याप्रमाणें व्यवस्था केली जाईल.

घराचें वर्णनः—

१ कसबे अकोला तालुके व जिल्हे अकोला येथील माझें घर माझे मालकीचें असलेलें धाब्याचें, खांब २७ पुढें ओसरी व वर माडी कवेलूची व पुढें आंगण, घराचा दर्शनी भाग उत्तरेस आहे. याची पू० प० हात अजमासें २३ व द० उ० हात अजमासें ४० याची चतुःसिमा पू० भाऊराव मुनसी यांचें घर, प० गल्ली असून पलीकडेस बुटीचें दुकान, द० हरी रामचंद्र अनवीकर यांचें घर आणि उ० गोपाळराव दुराड यांचें घर या चतुःसिमेंतील सालीम घर दगडमातीइमल्यासुद्धां. ता० १९ माहे जलई सन १९११

सही
दत्तात्रय विनायक गाडगीळ वकील
श्री राजेश्वर संस्थान तर्फे

नो. नं. ३०६

## जाहिर नोटीस

सीताई मर्द सोनाजी राहणार मौजे मोरधडापिंपरी ता० मूर्तिजापूर इसः-

नोटीस देणार तानी मर्द गणपती अ० पालन करणार सासरा सिंगराजी वल्लद दर्याजी राहणार हल्लीं तांदळी ता० मूर्तिजापूर इजकडून नोटीस देण्यांत येतें कीं तुझा नवरा सोनाजी व माझा बाप लक्ष्मण बाळाजी हे दोघे सखे बंधु असोन या उभयतांची वडिलोपार्जित जिनगी मौजे मोरवडापिंपरी ता० मूर्तिजापूर येथील शेत सर्व्हे नंबर १२ एकर२८ः२१ आकार रुपये २९ हें शेत व घर शिवाय जंगम जिनगी अशी असोन तुझा नवरा सोनाजी मयत झाला व माझा बाप मयत झाला तुजला पुत्रसंतान नाहीं व माझा बाप लक्ष्मण याजला दोन मुली, एक मी व माझी धाकटी बहीण यशोदा अशा आहोत. आम्ही अज्ञान असल्या कारणानें तूं वडील असल्यामुळें खातें तुझे नांवानें लागलें हें आम्हास माहित नाहीं. सदर्हु उभयतांचे वारस आम्ही दोघी मुली कायदेशीर आहोत. सदर्हु स्थावर इस्टेट शेत तूं विकण्यास काढली अशी बातमी आम्हास लागली. यांजकरितां नोटिशीनें कळविण्यांत येत आहे सदर्हु इष्टेट विकण्यास तुजला अधिकार नाहीं. तुझा जिवमान आहे तोंपावेतों अन्नवस्त्राची मालकीण आहेस जर करितां मजला बिनविचारतां कोणास खरेदी अगर गहाण देशील तर तो लेख पोकळीस्त होईल. परभारें काम केल्याबद्दल तुजवर जबाबदारी आहे हें पक्कें समजावें कळावें. ता० १९-७-१९११ इसवी.

सही

तानी मर्द गणपत अ० पा० करणार सासरा झिंगराजी दर्याजी नि० खु०

नों० नं० ३००

## जाहिरात

सर्वत्र गांवोगांवचे साहुकार वगैरे इतर लोकांसः-

खालीं सही करणाराकडून कळविलें जातें कीं मौजे पिंपळगांवकाळे तालुका जळगांव जि० बुलडाणा येथील माझा मुलगा नामें गणपत हा आतां सज्ञान होत आला असून दुसरे वाईट चालीचे लोकांचे संगतीमुळें बिघडून गैरशिस्त रीतीनें वागत असून आमचें ऐकत नाहीं सबब आम्ही त्याला घराबाहेर काढून देऊन आमचे स्थावरजंगम इस्टेटीवर त्याचा हक्क न राहावा या कारणानें मरणोत्तर व्यवस्थापत्र करून ठेविलें आहे तरी या लेखावरून असें कळवितों कीं वर लिहिलेला गणपत याशीं जो कोणी देवघेवीबद्दल व्यापार करून त्याजला कर्ज वगैरे देऊन त्यापासून कोणी खरेदी, गहाण किंवा कर्जरोखा वगैरे करून घेऊं नये व देवघेव त्याशीं कोणी करूं नये. सबब या जाहिरातीवरून कळविलें आहे. जर यापुढें कोणी त्याशीं देवघेव करून कर्ज दिलें तर ही जाहिरात दिल्यानंतर किंवा अगोदर त्याचे कर्जाचा मी कोणतेहि तऱ्हेनें जबाबदार राहणार नाहीं व त्याचा स्थावरजंगम जिनगी माझे मरणानंतर तो अधिकारी होईल या हेतूनें कोणी त्याशीं व्यवहार करील तो बुडेल हें पक्कें समजावें. कारण मी वर लिहिल्याप्रमाणें व्यवस्थापत्र केलें आहे. कळावें जाहिरात लिहून दिली. तारिख १-७-१९११ इसवी.

सही

नरसिंग खुशालसिंग रजपूत बेराडे द० खु०

नों० नं० ३०१

## जाहिरात

मल्हू वा करणाना कराळे रा० सागद ता० बाळापूर

यांसः—

मी पुंडलिक वा सखाराम गोळे रा० सागद ता० बाळापूर नोटीस देतों कीं माझा बाप व आई मेल्यास अजमासें १२ वर्षे झालीं. मी अज्ञान असल्यानें माझ्या बहिणीकडे सज्ञान होईपावेतों होतों. मध्यंतरी माझें लग्न झालें. त्यासाठीं आपण माझ्या बहिणीचे नवऱ्याजवळ कांहीं रकम माझी स्थावर इस्टेट मांडून घेतली ती कोणत्या शर्तीवर मांडून घेतली तें मला आठवत नाहीं. मौजे सागद ता० बाळापूर येथील—

सर्वे नं. १३ पैकीं एकर गुंठे आकार खातें

८ १३ पुंडलिक सखारामचे नांवें.

४२ ६८२६ १२ कचरु वा रावजी पाटील यांचे नांवें असून त्यांतील हिस्सा एकर एक.

२७ १९८३२ ३२ नरी वा केसोजी पाटील यांच्या नांवें असून त्यांतील हिस्सा एकर एक.

येणें प्रमाणें स्थावर शेतें मी हल्लीं आपल्यापाशीं माझा आपल्या कर्जाबद्दल हिशोब करून मागत असतां आपण देत नाहीं. सबब नोटीस देतों कीं नोटीस प्रसिद्ध झाल्यावर ८ दिवसांत तुम्ही आपला हिशोब करून बाकी मजजवळून घ्यावी. नाहीं तर आपलें मजवर कांहीं एक देणें निघत नाहीं समजून मी आपली वरील इस्टेट मिळण्याबद्दल कायदेशीर तजवीज करीन व या नोटिशीचे खर्चामुद्दां पैसा वसूल करीन कळावें ता० १९-७-११ इ.

सही

पुंडलिक वा सखाराम आज मु० आकोला द० खु०

नों० नं० ३०२

## जाहिरात

ऑईल एंजीन, पंप, दळण्यांचीं यंत्रें तेलाचे घाणे, कापूस वटवण्याचे रेचे ह्मणजे जिन, इत्यादि संबंधीं कोणतीही माहिती पाहिजे असल्यास खालील पत्यावर पत्रव्यवहार करावा.

दिवाकर यशवंत फाटक

मेसर्स डंकन स्टेटन कपंनींतील ऑईल रा० केतकर वकील यांचे घरीं, उमरावती.

## नोटीस.

नोटीस बेशमी मुक्ताबाई जवजे चिमणाजी देशमुख रा० राहित ता० आकोलें यांसः-

खालीं सही करणार यांजकडून नोटीस देण्यांत येतें कीं, तूं आमची चुलत भावजई असोन सुमारें सातआठ वर्षे झालीं तुझा नवरा मेल्या दिवसापासून तूं आपले आईचे घरीं राहात आहे. हल्लीं तूं राहित येथें राहण्यास आली आहे. आमची चुलती ह्मणजे तुमची सासू राधीकाबाई ही मरण पावली परंतु हिचे नांवें राहित येथील स० नं० ९४ व यापैकीं ४३८२३ आजपावेतों माहादाजी व आमची चुलती राधीका हिचेतर्फे व आतां ही आमचेच वहिवाटींत आहे. त्याचप्रमाणें गढींतील ही जागा ही आमचे वहिवाटींत आहे. तुह्मी फक्त अन्नवस्त्राची मालकीण असोन त्याजबद्दल पूर्वी दावा ही केला. परंतु तो डिसमास होऊन निकाल झाला. हल्लीं असें समजतें कीं सदरहु शेत व गढींतील जागा तूं कोणास विक्री अगर गहाण देशील तर उपयोगी नाहीं. तुला जरूर असल्यास आमचे घरीं राहून अन्नवस्त्र घेत जावें. परंतु स्थावर मालावर कोणतेच प्रकारें तुझा हक्क नाहीं. त्याच प्रमाणें सर्व लोकांस ही कळविण्यांत येतें कीं सदर्हु मुक्ताबाई हिजपासून सदर्हु स्थावर माल विक्री किंवा गहाण घेऊं नये व तीस कर्ज कोणी देऊं नये. त्याजबद्दल आम्ही व जिनगी जबाबदार नाहीं. तसें केल्यास दाव्यासह व खर्चासह रुपये भरून घेतले जातील कळावें तारीख १९-७-१९११ इसवी. सही

रूपराव विठोबा देशमुख राहणार राहित द० खु०

नों० नं० २९८

## नोटीस.

वि॥ सबजज्ज सा॥ बहादुर आकोला यांचें कोर्टांत

सक्सेशन मोकदमा नंबर १४ सन १९११. सक्सेशनसार्टीफिकेट मिळविण्याचा अर्ज.

विठोजी नारायण गालफाडे रा० आकोलें. अर्जदार

सर्वत्र लोकांस कळविण्यांत येतें कीं, अर्जदार यानें सक्सेशन सर्टिफिकेट मिळण्याबद्दल दिलेला अर्ज आमचे कोर्टांत ता० १४।८।१९११ रोजीं नेमीला आहे. त्या तारखेस ज्यांची कांहीं तक्रार असेल त्यानें सकाळीं १० वाजतां आमचे कोर्टांत हाजर व्हावें. तसें न केल्यास पुढें कोणत्याच प्रकारची तक्रार ऐकली जाणार नाहीं. कळावें ता० १९।७।११

ता० १९ जुलै सन १९११

Jankiprasad Harda
Sub-Judge Akola


## Oriental Govrnment security LIFE ASSURANCE COMPANY Limited

ESTABLISHED IN 1874.

R. Paterson, Berar manager,

HEAD OFFICE—BOMBAY

HEAD —QUARTER— NAGPUR.

**FUNDS Exceed $3\frac{3}{4}$ crores**

CLAIMS PAID FOR OVER 3 CRORES

IMMEDIATES ETTLEMENT OF CLAIMS

If there be one thing of more importance than another in connection with Life Assurance, it is when claims arise, that the amount due under the policy be paid to the Claimants at the earliest possible date. This the Directors of the 'Oriental' keep well before them and act up treating their clients with the utmost liberality.

UNQUESIONABLE SECURITY.

It is not sufficient to read that a Company's funds amount to a given sum, but it is essential to know how such Funds are invested if in miscellaneous and risky investments or how secured.

The Funds of the 'Oriental' are invested in Government Securities and lodged with the Government Official Trustee of Bombay in terms of the Company's Trust Deed, as Security for Claims arising, through decease of assured lives, and endowmenpt policies matured.

Government Officers, professional men, Tradesmen and others by employing portion of their annual income or profits in effecting life policies, create fund equivalent to the savings of many years.

No man can be sure how long he will live, and although he may save money yet, if he dies early before he had time to save much, his wife and family may be in distress. Life Assurance is a means by which this danger is got over. Life being so uncertain, the sooner a man makes up his mind to assure his life the better. Once satisfied of the propriety of the step, do not delay. There are numerous instances in the records of the 'Oriental' where the delay of a month or less, has left the family without the intended provision.

INFLUENTIAL AND ENERGETIC AGENT WANTED. For terms please apply to the undersigned.

Prospectuses, forms and any further information can be obtained on application—

M. DESOUZA.

CHIEF AGENT, Nagpur

CHIEF AGENCY FOR C. P., BERAR & KHANDESH


हें पत्र आकोला येथें कैलासवासी खंडेराव बाळाजी फडके यांच्या वऱ्हाडसमाचार छापखान्यांत नारायण खंडेराव फडके यांनीं सदाशिवआश्रमांत छापून प्रसिद्ध केलें.

# वऱ्हाडसमाचार.

Berar Samachar.

वर्ष ४५ आकोला—सोमवार तारीख ३१ माहे जुलई सन १९११ इ० [ अंक ३० ]


## वर्गणीचे दर

आकोल्यांतील लोकांस........१ रुपया
बाहेरगांवीं ट. हां. ........ २ रुपये
वर्गणी आगाउच घेण्याची वहिवाट ठेविली आहे.

## नोटिशींचे दर

दर ओळीस दीड आणा.
हेडिंगच्या दोन ओळी धरल्या जातील.
नोटीस सुवाच्य असली पाहिजे.

सुचनाः— गुरुवारच्या आंत येणाऱ्या नोटीसा त्याच आठवड्यांत घेतल्या जातील; यापुढें येणाऱ्या नोटिसास स्पेशल चार्ज पडेल.

## जाहिरात

### मुंबई ब्यांकेची सेव्हिंग ब्यांक.

ह्या बँकेंत खालीं दिलेल्या अटीवर ठेवी ठवितां येतात.

कोणत्याही वर्षाचे १ ले जानेवारी आणि ३१ दिसेंबर याच्या दरम्यान एक हजार रुपये पर्यंत पैसा ठेविला जाईल-

ठेवी दोन अथवा अधिक इसमांच्या नांवावर ठेवतां येतील आणि तो पैसा त्या पैकीं एकास अथवा जास्त इसमांस अगर त्यापैकीं मयताचे मागें राहील त्यांस काढतां येईल.

व्याज दर साल दर शेंकडा तीन रुप याप्रमाणें दिलें जाईल. व्याजाची आकारणी प्रत्येक महिन्याची जी कनिष्ट शिल्लक असेल तिजवर केली जाईल. मात्र पांच हजारांवरील शिल्लक रकमेस व्याज नाहीं. नियमांच्या प्रती बँकेंत अर्ज केला असतां मिळतील.

मुंबई ब्यांक आकोला ९।९।०९ } G. A. Phillips. एजंट

नं. १

## नोटीस

विद्यमान सब जज्ज साहेब बहादूर आकोला यांचे कोर्टांत.

सक्सेशन सर्टिफिकेट नंबर १९ सन १२११

सक्सेशन सर्टिफिकेट मिळविण्याचा अर्ज.

चेंडाबाई जवजे बसंतराय गुजराथी राहणार बाळापूर अर्जदार.

...कांस कळविण्यांत येतें कीं अर्ज- ...क्सेशन सर्टिफिकेट मिळविण्या- ... अर्ज आमचे कोर्टांत ता० ...गष्ट १९११ इ० रोजीं नेमिला आहे. त्या तारखेस ज्यांची कांहीं तक्रार असेल त्यानें सकाळीं १० वाजतां आमचे कोर्टांत हाजर व्हावें. तसें न केल्यास पुढें कोणत्यास प्रकारची तक्रार ऐकिली जाणार नाहीं. कळावें. ता० २१।७।११ इ.

सब जज्ज आकोला.
Jankiprasadharda.

नो. नं. ३२३

## नोटीस

ती. रा. गडू व० हरी पाटील, केशव जैराम पाटील व तोताराम व० गजमोल पाटील राहणार मौजे बेलाड ता० मलकापूर यांसः—

खालीं सह्या करणार या नोटिशीनें कळवितो कीं आपण पांच भावंच विस्तार असून आपली सर्व जिन्नगी वडिलोपार्जित असून सर्व एकत्रपणांत मिळविलेली आहे. तिची वांटणी करून देण्यास आह्मी उभयतांनीं आपणास वारंवार गांवकरी पंचां मार्फत विनंती केली पण आपण अद्याप कांहीं केलें नाहीं. तसेंच एर्व भावांचें दुकान ही आहे त्याचा हिशेब मागतला असतां तो ही तुह्मी देत नाहीं. व त्याची ही वांटणी करून देत नाहीं. करितां ह्या नोटिशीनें कळवितों कीं ही नोटीस पावतांच आठ दिवसांचे आंत आमचे हिशेब आह्मांस काढून देऊन आमचा निकाल करावा. तसें न केल्यास वांटणीचा दावा आणावा लागेल व खर्च वढून सर्वांची नुकसानीं होईल. व सर्व खर्चाचा बोजा ह्या नोटिशीचे खर्चासुद्धां तुह्मांस द्यावा लागेल. हें आपणास कळावें. ता० ९ माहे जुलै सन १९११ इ.

सह्या

१ नथू वल्द राजमोल पाटील रा० बेलाड द० खु०
२ देवराव व० लहानू पाटील रा० बेलाड द० खु०

नो. नं. ३२४

## नोटीस

बेशर्मा सुब्रातनबी मर्द खुदाबक्ष लखेरा रा० आकोला हिसः—

खालीं सही करणार याजकडून नोटीस देण्यांत येतें कीं खुदाबक्ष व अबदुलरहीम हे उभयतां साक्षात बंधु असून एकत्र राहत होते. यांनीं समायिक मिळविलेल्या इस्टेटीचे हिस्से न करिता माझा बाप शेखरहीम हा मरण पावला. मी अज्ञान असतांना परतवाडे मुक्कामीं जी जिन्नगी स्वतःची आणि माझे चुलत आज्याकडून जी माझे बापास मिळाली होती त्यासह आकोलें मुक्कामीं आह्मास एकत्र आणून ठेविलें. मी सज्ञान झाल्यावर मिळविलेलें धन हें हि चुलताच घेत आला आणि ज्या समायिक धनावर इस्टेट मिळविली तिची हकीकत कळवून हिस्सा करून घेतोस कां असा प्रश्न मजला केला. मी ह्मटलें तूर्त नाहीं. यानंतर कांहीं महिन्यांनीं ते मयत झाले आणि आजपर्यंत पूर्वीच्या वहिवाटीस अनुसरून माझी वागणुक मालकीच्या हक्काची तुह्मी मान्य केली; परंतु हल्लीं कांहीं लोकांच्या चिथवणीवरून सर्व इस्टेटीवर तुह्मी आपला हक्क करूं पाहतां हें बरोबर नाहीं. याकरितां यांत लिहिलेल्या इस्टेटीचे हिस्से होण्यासाठीं तुह्मास या नोटिशीनें कळविलें आहे. मिळकतीचें वर्णनः—

मौजे लोणी ता० आकोला येथील शेत व मौजे कळंबेश्वर ता० आकोला येथील शेत रु० ३०० शांवर गहाण आहे. घरें ३ कवेलूंचीं किंमत रु० ७००, दुकानें २ गंजाच्या वेशींतील धाब्याचीं अंदाजा किंमत रु० १५०, या शिवाय जवळ असलेली जंगम जिन्नगी ह्मैस १ किं० रु० ५०, गाई २ किंमत रु० ३०, गोऱ्हा १ किं० रु० ३०, कालवड १ किं० रु० ३, बकरी , किं० रु० १०, पिलें २ किं० रु० ५ व घरांतील डागिने सोन्याचीं कडीं ६ अंदाजा किं० रु० १०००, गोफ सोन्याचा तोळे १० अंदाजा किं० रु० २२५, हसळी १ सोन्याची तोळे ५ किंमत रु० १२०, झुमके २ सोन्याचे तोळे ५ किं० रु० १२०, बाळ्या ११ सोन्याच्या ४ तोळयांच्या अंदाजा किं० रु० ९० व नथ १ सोन्याची एक तोळयाची मोत्यांसह अंदाजा किंमत रु० २५ या शिवाय चिल्लर असलेले सोन्याचे डागीने; चांदीचे डागिने— तोड्याचा एक जोड, तोळे ८० अंदाजा किं० रु० ६०, कडीं २ पायांतील तोळे ५० अंदाजा किं० रु० ३७॥, बाजुबंद २ तोळे १२ अंदाजा किं० रु० ९, कडीं २ हातांतील तोळे ८ अंदाजा किं० रु० ६, पायजिव्याचा जोड १ तोळे ५० अंदाजा किं० रु० ३७॥, सरी गळयांतील २० तोळे अंदाजा किं० रु० १५, पोची हातांतील तोळे ८ अंदाजा किं० रु० ६ या शिवाय चिल्लर असलेले डागडागिने आणखी या शिवाय घरांत असलेली धरवर व वेणें वगैरे व शिवाय घरांत असलेलीं भांडींकुंडीं वगैरे सामान वडिलार्जित कमाईचें आहे. त्या इस्टेटी पैकीं १ घर विकण्याला काढलें असें समजतें. करितां या नोटिशीनें कळविण्यांत येतें कीं वडिलार्जित असलेली इस्टेट ही तुह्माला आमचे संमतीवांचून गहाण, बक्षीस, खरेदी पट्टयानें वगैरे देतां येत नाहीं. आणि माझा चुलतबंधु अज्ञानाचा सज्ञान झाल्यावर निम्मे हिश्याची इस्टेट वांटून देण्यांत येईल तोंपर्यंत तुमचें अन्नवस्त्र देण्यास मी तयार आहे. कोर्टाचा अवलंब करणें झाल्यास या नोटिशीसह सालीम खर्च तुमचे जवळून भरून घेतला जाईल. कळावें २७-७-११

सही (उर्दूंत)

शेखरहिमान वा। अबदुलरहिम मुसलमान रा० आकोला द०खु०

नो० नं० ३२१

## नोटीस

नोटीस बेशर्मी जंगल्या जात खेळुले कुणबी अडनांव राऊत मु० व पो० शिराळा ता० व जि० उमरावती यास नोटीस देणार तानु वल्द नथु जात खेळुले कुणबी मु० व पो० खेड ता० मोर्शी जि० उमरावती नोटीस देण्यांत येतें कीं तूं माझा जांवई असून तुला ज्या वेळीं मुलगी देण्याचें ठरलें त्या वेळीं तूं जातीभ्रष्ट झालेला होता. तेव्हां मी तुला शुद्ध करण्याकरितां पैसा लाऊन जातींत घेऊन घरजांवई ठेवण्याचें पंचासमक्ष कबूल केलें. कारण माझा वृद्धापकाळ असल्यामुळें मी अशी खटपट केली. तेव्हां लग्नकार्यास मीच सर्व प्रकारें पैसा लाऊन लग्नकार्य शेवटास नेलें. त्यावरून तूं ही दोन वर्षें माझे घरीं राहिला. पुढें माझी मुलगी नामें तुळजा इला शांतीक आलें आज शांतीक येण्यास पांच वर्षें झालीं आहेत. तेव्हांपासून तूं विरुद्ध रीतीनें वागून माझे घरीं राहण्याचें सोडून अलग एकटा दुसरे ठिकाणीं राहूं लागला. हल्लीं तूं एकटा रा. चंद्रभानजी ढोरे जात कुणबी राहणार शिराळा यांचे घरीं रोज मजुरी करून पोट भरत आहेस. तुला समजावण्याकरितां आह्मी दोनतिनदां आलों परंतु तूं लोकांच्या फुसलावणीनें माझ्या येथें राहण्यास नाकबूल करितोस. त्यावरून आह्मी तुला फारकती मागितली. तेव्हां तूं शिराळें मुक्कामीं, चंद्रभानजी ढोरे, झिंगुजी बापु देशमुख, नागोजी लोहार, लक्ष्मण पारधी यांचे समक्ष फारकती देण्याचें कबूल केलें. व फारकती देण्याचें वरील पंचांनीं ठरविलें. पुढें आह्मी तुला फारकती मागितली असतां नाकबूल केलें. व माझे घरीं राहण्याचें नाकबूल केलें. आज पांच वर्षांपासून मी आपले ह्मातारपणीं मुलीला पोशीत आहे. तिला दरमहा ४ रुपयेप्रमाणें पांच वर्षांचे २४० रुपये खाण्यापिण्याचा व वस्त्रप्रावरणाचा खर्च लागून कर्ज झालें आहे. तरी ही नोटीस पावल्यापासून आठ दिवसांचे आंत खाण्याबद्दलचें वरील कर्ज द्यावें. नाहीं तर कोर्टांत फिर्याद करून खर्चासुद्धां पैसा घेतला जाईल. दुसरें वरील मुदतींत माझे घरीं राहण्यास यावें. न आल्यास हीच फारकती समजून मी आपले मुलीला दुसरा घरठाव करीन. मग पुढें कोणत्याच प्रकारें तक्रार ऐकली जाणार नाहीं. कळावें ता० १८-७-११ इ.

सही

तानु वल्द नथू खेकुले कुणबी मु० व पो० खेड ता० मोर्शी जि० उमरावती नि. खु.

नो. नं. ३२२

॥ श्री ॥

आकोलें तारीख २० माहे जुलई सन १९११ रोज गुरुवार इ० मिती आषाढ वद्य ९ संवत १९६७ इ०

**जाहिर विनंती** केल्याप्रमाणें आज रोजीं श्री राजेश्वर संस्थानचे देउळांत श्री राजेश्वर संबंधानें विचार करण्याकरितां सर्व ग्रामस्थांची साधारण सभा सायंकाळीं ६॥ वाजतां भरली होती. त्या सभेंत झालेले कामाचें टिपण.

रा. रा. परशराम चिंतामण जोगळेकर यांनीं विनंतीपत्र वाचून दाखविलें व सभा भरविण्याचा उद्देशही थोडक्यांत सांगितल्यावर त्यांनीं अशी सूचना केली कीं आजचे सभेचें अध्यक्षस्थान रा. रा. शेट गुरुप्रताप ह्यांनीं स्वीकारावें.

या सुचनेस रा. रा. नारायण राघव बांडी यांनीं अनुमोदन दिल्यावर सद्दहू सूचना सर्वानुमतें पसंत झाली व रा रा. शेट गुरुप्रताप ह्यांनीं अध्यक्षस्थान स्वीकारलें.

रा. रा. परशराम चिंतामण जोगळेकर ह्यांनीं पुढील सूचना सभे पुढें मांडल्या.

१ पुढील सालापासून श्री राजेश्वर संस्थानची एक सर्वसाधारण सभा असावी व त्या सभेंत सभासद होऊं इच्छिणारांचे पांच वर्ग असावेत.

१० रुपये अगर त्याहून जास्त देणारांचा वर्ग १ ला.

५ रुपयापासून ९ पर्यंत रुपये देणारांचा वर्ग २ रा.

३ रुपयापासून ४ रुपयापर्यंत देणारांचा वर्ग ३ रा.

२ रुपये देणारांचा वर्ग ४ थ.

१ रुपया देणारांचा वर्ग ५ वा.

ह्या सभेनें काय काय कामें करावयाचीं तें ती सभा ज्या वेळेस भरेल त्यावेळेस त्यांतील सभासदांनीं ठरवावें.

२ हिंदु लोकांत ज्या ज्या वेळेस लग्नकार्यें होतात त्या त्या वेळेस तेथें ब्राह्मणास जी दक्षिणा वाटतात त्याच वेळेस श्री राजेश्वर संस्थानचे नांवानें पांच दक्षिणा काढून देत जाव्या अशी सर्व हिंदु लोकांना विनंती करावी.

३ श्री राजेश्वर संस्थानचे देवळांत जो कोणी हिंदू इसम लघुरुद्र व महारुद्र वगैरे करील त्या वेळेस तो जी दक्षणा प्रत्येक ब्राह्मणास देण्याचें ठरवील तितकीच दक्षणा [illegible] राजेश्वर संस्थानची ह्मणून त्या इसमानें [illegible]ली पाहिजे.

४ श्री राजेश्वर संस्थानला फारसें उत्पन्न नाहीं व तें वाढविण्याची जरूर आहे. इतक्या करितां सर्व हिंदुलोकांकडून पूर्वीप्रमाणें वार्षिक वर्गणी जमा करीत जावी व ती प्रत्येक इसमाकडून सालीना तीन आण्यापेक्षां कमी नाहीं इतकी तरी वसूल करावी.

चालू सालाकरितां व्यवस्थापक कमेटींत खालीं लिहिलेले गृहस्थ असावेत.

१ रा. रा. नारायण काशीनाथ दाते वकील.
२ रा, रा. शेट मोतीलाल बनसीलाल साहू.
३ रा. रा. शेट गुरुप्रताप गोविंदराम साहू.
४ रा. रा. शेट जानकीदास गंगाधर साहू.
५ रा. रा. रामप्रताप पंडीतजी.
६ रा. रा. राजारामशास्त्री पुराडउपाध्ये.
७ रा. रा. दत्तात्रय नरसिंह गोखले सब्रजि.
८ रा. रा. गोपाळ कृष्ण पाटील.
९ रा. रा. गोपाळ हरी सावरकर.
१० रा रा. नारायण राघव बांडी
११ रा. रा. परशराम चिंतामण जोगळेकर.

व पुन्हां दुसरी सर्वसधारण सभा भरून त्यांत व्यवस्थापक कमेटी नेमेपावेतों हेच इसम व्यवस्थापक कमेटींत राहावेत. व ह्यापैकीं फक्त रा. रा. गोपाळ हरी सावरकर व शेट जानकीदास गंगाधर साहू ह्या दोघांनीं अगर एकानेंच देण्याघेण्याचीं, कोर्टाचीं व कायद्याप्रमाणें जीं जीं कामें करावयाचीं तीं तीं करण्याचा यांना अधिकार असावा सदहू वरील पांचही सूचनांस रा. रा. नारायण भट्ट मुळे यांनीं अनुमोदन दिल्यावर सर्वानुमतें सदहू पांचही सूचना पसंत झाल्या.

गुरुप्रताप गोविंदराम
अध्यक्ष.

ता० २० माहे जुलई सन १९११ इ०

## थिऑसफीची पारिषद.

( मा. अं. पु. चा. )

शरिराचा थिप्पाडपणा, आणि शक्तीचा अधिकपणा या दोहोंच्याच केवळ जोरावर मुलावर होत असलेला जुलुमी अंमल, आईबापांचे बेजबाबदार कल्पनेचा व खुषीचे जुलमानें अथवा अधिकारानें जसें " मी ह्मणतो ह्मणून तुला असें केलें पाहिजे ". यानेंच मुलांचे अंतःकरणांत कायदेशीर अधिकाराबद्दल असलेली न्यायप्रीति व पूज्यबुद्धि नाहींशी झाली असती.

बालकांचे चलनवलनाकडे सूक्ष्म रीतीचें लक्ष ठेवल्यानें मूल पुढें काय धंदा करील, तें कसें निघेल हें समजून त्यास कशा रितीचें शिक्षण दिलें पाहिजे हें कळून येईल. आईबापांनीं फार काळजीपूर्वक बालकांच्या कल्पना, त्यांची अभिरुची, व त्यांच्या स्वभावाचें परिक्षण करीत जावें. त्यांनीं या परिक्षणाचा उपयोग मुलाचे ग्रह वगैरे चांगल्या जोतिष्याकडून पाहून घेऊन मुलाचा स्वभाव आणि मुलाचा साधारण कल कसा आहे हें लक्षांत आणावें. त्यांचें परिक्षण अशा तऱ्हेचें असावें कीं मुलांचे शिक्षणाची दिशा त्यांस ठरवितां येईल व पुढें मुलाचा हेतु काय आहे हें पाहिलें जावें.

मुलास घरांत जें शिक्षण द्यावयाचें त्यांत धर्माच्या अगदीं साध्या अशा गोष्टी शिकविल्या जाव्या. सृष्टि निर्माण कर्ता, संरक्षण कर्ता व संहार कर्ता परमेश्वर एक आहे. सर्व भूतमात्रांचे ठिकाणीं स्थित असलेलें चैतन्य एक आहे. पुनर्जन्म, कर्मानुरूप भोक्तृत्व, तीन लोकांची स्थिति व तेथें राहणारे लोक यांची माहिती करून द्यावी. या ज्ञानास अनुसरूनच नैतिक शिक्षण दिलें जावें व नैतिक गोष्टी मुलांचे मनांत चांगल्या ठसल्या जाव्या ह्मणून पुराण व इतिहास यांतून थोर पुरुष व स्त्रिया यांचीं चरित्रें सांगावीं हे वर सांगितलेले सिद्धांत त्रिकालाबाधित आहेत असें गृहीत धरून तें मुलांस वारंवार समजाऊन देत जावें. सद्वर्तनाचें वळण काळजीपूर्वक लावावें. आपणांपेक्षां कमी दर्जाचे आणि बरोबरीचे लोकांबरोबर सभ्यतेचें वर्तन, आपणांपेक्षां थोर व वडील मंडळीस [illegible] इ० [illegible] वडिलांनीं [illegible] मुलांस समजाऊन दिले पाहिजे, ह्मणजे ते त्यांचे अंगीं चागले बाणतात. शारीरिक व्यायाम आणि स्वच्छता यांची उपयुक्तता मुलांचे मनांत चांगल्या रीतीनें बिंबऊन द्यावी. त्यांस श्वासोश्वासक्रिया ठीक ठीक करण्याची संवय लावावी. प्रातःकाळीं निजून उठतांच शौचमुखमार्जनादि क्रिया वक्तशीर व व्यवस्थीत करण्याची संवय लावावी, तसेंच त्यांस प्रात स्नान घालून प्राणायामाचा त्याजकडून अभ्यास करवावा, व वर सांगितल्याप्रमाणें सर्वांतर्यामीं परमेश्वराची प्रार्थना करवून घ्यावी ज्या प्रार्थनेंत आपणास नित्य ज्या ज्या प्राण्यापासून अथवा जीवापासून मदत होते त्या सर्वांचें कल्याण चिंतन असावें. शारीरिक व्यायाम– जसें नमस्कार, जोर काढणें, बैठकी मारणें वगैरे अगदीं साध्या तऱ्हेचा व्यायाम करून घ्यावा. ज्या व्यायामांत शरीर सुदृढतेकरितां होता होईल तो बाह्य वस्तुंसंग्रहाचा खटाटोप करवा लागणार नाहीं. सकाळीं मुलानें व्यायाम घेतल्यानंतर त्यास पिण्यास दूध द्यावें.

सात वर्षें पावेतों गृहशिक्षण अशा तऱ्हेनें द्यावें कीं त्याचे बुद्धीवर बिलकूल भार पडणार नाहीं. त्यास होईल तोंपावेतों मोकळे हवेंत खेळूं द्यावें, झाडें, लहान लहान जीवजंतु, पशु, पक्षी यांचे संबंधानें त्यास माहिती देऊन त्याची अवलोकनशक्ति वाढूं द्यावी, त्यास बागबगिच्यांत फिरण्याचा नाद लावावा, त्यास जें शिकवावयाचें तें भाषणपद्धतीनें व प्रत्यक्ष जिन्नस अथवा **चित्रें पुढें** ठेऊन शिकवीत जावें. त्यास बाळपणीं ध्यानांत ठेवण्यासारखीं वाक्यें व कविता शिकवीत जाव्या. वर सांगितल्याप्रमाणें व्यायाम करून घेणें अथवा जें शिक्षण देणें तें क्रमःक्रमानें जेणेंकरून त्याचे शारिरिक व मानसिक वाढ चांगली होईल अशा पद्धतीनें देत जावें. ही पद्धत मुलांची परिस्थिति, शरीर, प्रकृति व स्वभाव वगैरे लक्षांत घेऊन निश्चित केली पाहिजे. प्रौढपणीं नागरिक या नात्यानें जे जे अंगीं गूण पाहिजेत त्या सर्वांचें बीजारोपण याच वयांत झालें पाहिजे. मुलांचें जेवण दूध, फळें, Cereals कांहीं गोड पदार्थ इत्यादिक तऱ्हेचें अगदीं साधें सात्वीक व पौष्टीक असावें. अंतःकरण चंचल करील असें नसावें. मांस, कांदे वगैरे जिन्नसा मुलाजवळ येऊं देखील देऊं नयेत.

कल्पना आणि तर्कशक्ति वाढण्याचा खरा काल बालपण हाच आहे व या वेळीं त्यास ती वाढविण्यास उत्तेजन द्यावें. त्यास नाउमेद कधीं करूं नये.

डा. स्टेनिअर यानें ह्मटलें आहे कीं, लहान मुलांचे हातीं पूर्ण तयार केलेले खेळ बाहुल्या इ. देण्यापेक्षां अपूर्ण व अर्धवट, व ओबडधोबड तयार केलेले खेळ त्यांचे हातीं दिल्यानें तर्क वाढविण्यास उपयोगीं पडतात. कारण तसे अपूर्ण जिन्नस मुलें आपले कल्पनेनें पूर्ण करितात. हे खेळांतील जिन्नस मुलांचे अंतःकरणांत " विश्वास " उत्पन्न करतात व तशाच रीतीनें त्यांच्या कल्पना होतात व त्याचें वर्तन घडूं लागतें. मुलास लहान लहान गोष्टी सांगाव्या. तो ज्या ज्या गोष्टीसंबंधानें कल्पना करितो, त्या सर्व गोष्टी त्यास प्रत्यक्ष अशा असाव्या, आणि खरेंच, त्याच्या कल्पनातरंगास त्याचे वाड वडील तोडणार नाहींत, त्या सर्व भूत, कुत्रकामाच्या आहेत असें ठरविणार नाहींत तर त्याच्या त्या कल्पना खऱ्याच आहेत. दुसऱ्या लोकांचा ह्मणजे सूक्ष्म जगाचा प्रकाश त्यास दिसत असतो व ह्मणून त्यास मनोमय जगांत खुशाल संचरू देणें हें ठीक आहे.

( अपूर्ण )

## वऱ्हाडसमाचार

श्रावण शुद्ध ६ शके १८३३ दुंदुभिनाम संवत्सर

## हिंदुस्थानचा व्यापार.

देशांतल्या संपत्तीची वाढ किंवा कमताई मापण्याचें साधन ह्मणजे सालोमालचे व्यापारविषयक रिपोर्ट होत. या दृष्टीनें १९१०-११ सालांतल्या हिंदुस्थानानें परदेशशीं केलेल्या व्यापाराचा जो रिपोर्ट नुकताच बाहेर पडला आहे त्याला एक प्रकारचें महत्व आहे. १९०९-१० सालीं एक अब्ज त्रेपन कोटि रुपयांचा माल आयात झाला होता. तो गेल्या सालीं पांच कोटीनें वाढला. निर्गत मालांत तर यापेक्षां पुष्कळच अधिक वाढ झाली. मागच्या वर्षीं एक अब्ज पंचाण्णव कोटीचा माल परदेशीं रवाना झाला होता, त्या जागीं रिपोर्टाच्या सालीं दोन अब्ज सोळा कोटींचा माल बाहेर गेला. पण या आंकड्यांवरून आयात व निर्यात मालाचें प्रमाण नीट कळतें असें मात्र समजूं नये. कारण आयात झालेला माल ह्मणजे सगळा आपल्या देशांतच राहतो असें नाहीं. आयात मालांतला कांहीं पुनः परदेशीं रवाना होतो. अशा रीतीनें गेल्या सालीं चार कोटींचा माल पुनः परदेशीं गेला, तो वजा केला ह्मणजे निवळ आयात एक अब्ज एकूणपन्नास कोटि रुपयांची झाली असें ह्मटलें पाहिजे. निर्गत झालेल्या मालांत सण, कापड, लाख, सूत, व कमावलेलें चामडें या जिनसा मागल्या वर्षापेक्षां कमी गेल्या. आयात मालाचें वर्गीकरण पाहिलें ह्मणजे असें दिसतें कीं, तंबाखूची आयात मागच्यापेक्षां जवळ [illegible] निम्यानें कमी झाली. याचें मुख्य कारण गेल्या सालीं परदेशी तंबाखूवर वाढविण्यांत आलेली जकात होय हें सांगावयास नकोच. तंबाखूची आयात कमी झाली. पण त्याबरोबर चहाची सवापटीपेक्षां अधिक वाढली. हिंदुस्थानांतल्या खेड्यापाड्यांतून सुद्धां चहाचें व्यसन कसें झपाट्यानें वाढत चाललें आहे तें दरसाल वाढणाऱ्या चहाच्या खपावरून चांगलें व्यक्त होतें. परदेशी औषधें वगैरे जिनसांत शेंकडा ९॥ या प्रमाणांत वाढ झाली आहे. ही ही देशाच्या निकृष्ट आरोग्याच्या स्थितीची निदर्शकच ह्मटली पाहिजे. पण सर्वांत चमत्कार वाटण्यासारखी

गोष्ट झटली ह्मणजे परदेशी साखरेचा वाढता खप ही होय. अलीकडे आमचे देशांत साखरेचे कारखाने पुष्कळ निघाल्याच्या वार्ता कानीं येतात. देशी साखरेवांचून अन्य साखर खावयाची नाहीं अशा व्रताच्या लोकांची संख्या ही पुष्कळ झाली आहे. पण परदेशी साखरेचा खप पाहावा तर दरसाल पुढें पुढें पाऊल टाकीत आहे हें काय गौडबंगाल आहे तें कळत नाहीं. दहा वर्षांच्या पूर्वींचे साखरेच्या आयातीचे आंकडे पाहिले तर असें दिसून येतें कीं तेव्हां आमच्या देशाला लागणाऱ्या साखरे पैकीं शेंकडा ६ येवढीच कायती साखर परदेशांतून आलेली असे. त्या वेळीं स्वदेशी साखरेच्या अभिमानाचा येवढा बोभाट नव्हता; आ... आतां पहावें तर शेंकडा २० या प्रमाणें परदेशी साखर इकडे येत आहे. ह्मणजे आह्मी लोक पूर्वींच्या मानानें तिप्पट अधिक परदेशी साखर खाऊं लागलों आहे. आमच्या स्वदेशाभिमानांत शद्बाचें अवडंबर आणि प्रत्यक्ष कृतींत यांत छत्तीसाचा आंकडा कसा असतो त्याचें हें प्रत्यक्ष उदाहरण आहे. परदेशी साखरेची ही वाढ आमच्या देशाच्या सांपत्तिक स्थितीचा विचार करणारांची मति अनेक प्रकारें गुंग करून सोडणारी आहे. परदेशी साखरेच्या चढाओढीमुळें मागें पडलेले आमचे गूळसाखर करण्याचे धंदे पुनः डोकें वर काढण्यास काय करावें हा एक मोटा प्रश्नच आहे. उंसाची लागवड ज्यास्त करावी तर पर्जन्याचा भरंवसा नसून इरिगेशन पुष्कळ कमी आहे. सुधारलेलीं यंत्रें आणून मोठ्या प्रमाणावर कारखाने काढल्याशिवाय तर साखर स्वस्त देतां येत नाहीं, आणि तसें करण्यास मुख्य अडचण ह्मणजे उंसाची लागवड फार मोठ्या प्रमाणांत व्हावयास पाहिजे ती होत नाहीं ही होय. या अडचणींतून सुटण्याचा मार्ग ह्मणजे बाउंटी ऊर्फ सरकारी मदत होय. जोंपर्यंत आमचें सरकार खुल्या व्यापाराच्या तत्त्वाला चिकटून राहण्यांत पुरुषार्थ मानीत आहे तोंपर्यंत ही गोष्ट अर्थात शक्य नाहीं. खाण्याच्या जिनसा ही अलीकडे विलायतेहून अधिक येऊं लागल्या आहेत. गेल्या वर्षीं शेंकडा ३२ या प्रमाणांत जिनसांची आयात अधिक झाली. ज्या देशांतल्या लोकांना आपल्या खाण्यापिण्याचे जिन्नस परदेशांतून आणावे लागतात, व कच्च्या मालाचा पक्का माल करण्याचें ज्ञान नसतें त्याची स्थिति निकृष्ट ह्मटली पाहिजे. आमच्या येथून गहूं विलायतेला जावे, व तेथें त्याची कणीक व कणिकेचीं बिस्किटें होऊन मूळच्या मालाच्या चौपट किंमतीला तो पक्का माल आह्मी येथें विकत घ्यावा असा प्रकार जोंपर्यंत चालूं राहील तोंपर्यंत हिंदुस्थानची सांपत्तिक स्थिति समाधानकारक होण्याची आशा करावयास नको. गेल्या सालीं परदेशीं कापूस फार थोडा गेला, पण त्याला भाव चांगला आल्यामुळें आमच्या लोकांचें विशेषसें नुकसान झालें नाहीं. पण अशा अनुकूल भावाची स्थिति सालोसाल राहणें संभवनीय नाहीं हें ध्यानांत ठेवून मालाला चांगला भाव येण्याचें स्थायीकारण ह्मणजे त्याचा उत्कृष्टपणा वाढविण्याची कांहीं खटपट आह्मी करावयास पाहिजे. अलीकडे लांब धाग्याचा कापूस पिकाविण्याची कांहीं खटपट सरकार मार्फत सुरू आहे. पण सरकारच्या या स्तुत्य प्रयत्नास लोकांची सहानुभूति व मदत असल्याशिवाय कापसाच्या पिकांत इष्ट सुधारणा घडून येण्याचा फारसा संभव नाहीं. सारांश, गेल्या सालचे आमच्या व्यापाराचे आंकडे कोणत्याही दृष्टीनें समाधान उत्पन्न करणारे नसून आमच्या उद्योगधंद्यांत खरोखर वाढ होण्यास काय करावयास पाहिजे या प्रश्नाचा उलगडा अद्यापही आमच्या लोकांस खरोखर झाला नाहीं असेंच सुचवीत आहेत असें ह्मणण्यास हरकत नाहीं.

## नवीन बंदुका

गुन्हेगारांनीं संत्र्यांच्या तांब्यांतून पळून जाऊं नये ह्मणून संत्र्यांना बंदुका दिलेल्या असतात व प्रसंग विशेषी गोळी घालण्याची ही त्यांना परवानगी दिली असते. या गोळीनें मनुष्य एकदम ठार न होतां फक्त जखमी होईल येवढी कायती खबरदारी घ्यावयाची असते. पण आतां जर्मनींत क्षणिक मृत्यु आणणाऱ्या नवीन बंदुका निघाल्या आहेत. यांत दारूच्या ऐवजीं कांहीं रसायन भरावयाचें असतें. ही बंदुक सोडली ह्मणजे तें रसायन माणसाचे अंगांत शिरून त्यायोगानें तो कांहीं काळपर्यंत अगदीं हतवीर्य होऊन निश्चेष्ट पडतो. पण त्यामुळें त्याला कायमची इजा न होतां तो पुनः शुद्धीवर येतो.

## संमतिवयाची मर्यादा.

आपल्या देशांत संमतिवयाची मर्यादा १२ वर्षांची घातली, त्यावेळीं समाजानें एकच कल्लोळ करून सोडला होता. पण तोच समाज आतां १४।१५ वर्षांपर्यंत मुली अविवाहित ठेवूं लागला आहे. ही १२ वर्षांची मर्यादा हल्लींच्या समाजाच्य मानानें फारच कमी असून ती वाढवून पंधरा वर्षेंपर्यंत तरी निदान नेण्यास आतां हरकत दिसत नाहीं. विलायतेंत ही मर्यादा सध्या १६ वर्षांची आहे. ती वाढवून वीस किंवा एकवीस वर्षांची करण्याविषयींच्या सूचना तिकडे होत आहेत. ही सूचना करण्यांत पुढारीपण एका सुप्रसिद्ध बाईनें घेतलें आहे. तिचें ह्मणणें असें आहे कीं विषयसुखाची इच्छा ही अनिवार आहे अशी समजूत पुष्कळांची आहे. पण ती चुकीची आहे. सर्वांत अनिवार इच्छा म्हणजे भूक. तीसुध्दां कायद्यामुळें आवरून भरण्यास जर मनुष्य शिकतो, तर विषयसुखाची इच्छा त्याला कां आवरून धरतां येऊं नये? भूक अनिवार असते ह्मणून दुकानावर हल्ला करूं देणें हें कायदेकर्त्यांस जितकें लांछनास्पद आहे तितकेंच विषयसुखाची इच्छा अनिवार आहे या कारणासाठीं पुरुषास कोंवळ्या व अपरिणत अंगाच्या स्त्रीच्या मर्यादेचा भंग करूं देणें ही गोष्ट ही लज्जास्पद वाटली पाहिजे. हा विषय हातीं घेऊन आपल्या स्त्रीजातीची दाद कौन्सिलाकडून लावून घेण्याइतक्या सुशिक्षित स्त्रिया आमचे समाजांत थोड्या तरी आहेत. त्यांनीं या कामीं उचल खाल्यावर सुशिक्षित पुरुषांना लाजेकाजेस्तव तरी हा प्रश्न उचलून धरावा लागेल. पूर्वींच्या संमति बिलाला जितका विरोध आला, तितका या वेळीं येण्याचा विशेषसा संभव नाहीं. म्हणून आमची अशी सूचना आहे कीं संमतीच्या वयाची मर्यादा निदान पंधरा वर्षें तरी व्हावी याबद्दलची खटपट सेवासदनासारख्या संस्थेच्या स्त्री चालकांनीं अवश्य करावी.

## सर के० जी० गुप्त.

विलायतेंत झालेल्या बादशहाच्या राज्याभिषेकाच्या दिवशीं ज्यांना किताब देण्यांत आले त्यांत इंडिया कौंसिलेच हिंदी मेंबर मि० गुप्त यांचें नांव पाहून सर्वांना आनंद होईल. मि० गुप्त यांना के. सी. एस. आय. हा किताब मिळाला आहे. नुकत्याच हातीं आलेल्या 'इंडिया' पत्रावरून असें कळतें कीं इंडिया कौंसिलांत बहुतेक सगळे आंग्लोइंडियन अधिकारी आहेत. त्यांच्यापुढें कोणत्या ही प्रश्नाची हिंदुस्थानची बाजू निर्भीडपणानें मांडून डाव जिंकणें हें काम अतिशय बिकट आहे, तरी तें काम मि० गुप्त यांनीं इतक्या चांगल्या प्रकारें केलें कीं लॉर्ड मोर्ले यांनीं परवा एका मेजवानीचे प्रसंगीं मि० गुप्त यांच्या अंगच्या गुणांची जी प्रशंसा केली ती सर्वथा योग्य होती असें ह्मटलें पाहिजे. सर के. जी. गुप्त यांनीं त्या मेजवानीच्या वेळीं तरुण हिंदी लोकांना उद्देशून जे उद्गार काढले त्यांवरून त्यांची हिंदुस्थानाविषयीं कळकळ, दूरदृष्टि आणि मनाची सरळता चांगली व्यक्त होते. ते ह्मणाले कीं सध्यासारख्या आणीबाणीच्या प्रसंगीं राजकारणरूपी नौका अविचाराच्या खडकावर आपटून भंग पावूं न देतां नेमस्तपणा आणि विचार या कर्णधाराच्या अनुसंधानानेंच त्यांनीं चाललें पाहिजे. ब्रिटिश लोकांविषयीं नसते संशय घेऊन स्वतःचें नुकसान करून घेऊं नका; प्रजामताला मान देण्याला इंग्रजसरकारानेंच हिंदुस्थानांत सुरुवात केली आहे, आणि प्रजासत्ता हिंदुस्थानांत वाढणें असेल तर ती इंग्रजांच्याच कृपेनें वाढेल! किती सत्य उद्गार आहेत.

## ऐतिहासिक माहिती,

नुकत्या हातीं आलेल्या 'इतिहास-संग्रहा' च्या अंकांत पुढील नवी माहिती आहे.

१ कर्नाटकचा नबाब अन्वरुदिन खान हा दिल्लीच्या बादशहाच्या पदरच्या यःकश्चित नोकराच्या पदापासून वाढत अर्काटच्या राजपदांपर्यंत जाऊन पोंहोंचला होता. याचें वय मरणसमयीं १०७ वर्षांचें होतें!

( राजकारणांत पडलेल्या थोर माणसांपैकीं दीर्घायुपणांत हे पहिलेच होत. निजाम उलमुल्काचा नंबर दुसरा तो १०६ वर्षांचा होऊन मे.–सं० वऱ्हाड समाचार. ]

२ कान्होजी आंग्रे यांची स्त्री लक्ष्मीबाई ही फार हुशार होती. कान्होजीच्या पश्चात् हिनें आरमाराची नीट व्यवस्था ठेविली होती. पेशव्याचे दरबारीं हिचें चांगलें वजन व प्रतिष्ठा असे. तिला पुत्रशोक झाला, ते वेळीं पेशव्याकडून गेलेल्या दुखवट्याच्या पत्रास तिनें पुढील उत्तर दिलें होतें:–' घडलेल्या गोष्टीबद्दल खेद करण्यांत काय अर्थ आहे; दुःखाचें परिमार्जन करून आमच्या घराण्यानें संपादलेल्या पूर्वापार लौकिकाचें रक्षण करणें हाच माझा स्वधर्म समजतें ........ पुत्रशोकांत गुंतून मी सरदारीचा लौकिक कधींही गमावणार नाहीं. केवढें हें धैर्य!

३ शिवाजी महाराजाच्या व पुढील दोन कारकीर्दींत राविराव शिंदे यांचें घराणें प्रसीद्ध होतें. या घराण्यांतल्या नेमाजी शिंद्याची बायको जिवाऊ शिंदेही मोठी कर्ती बाई होती. हिच्याविषयीं श्रीमंत पहिले बाजीराव पेशवे यांचें मत फार उत्तम होतें. ते तिची खरी योग्यता जाणीत होते.

४ महादजी शिंदे यांचे पराक्रम. व राजकारणपटुत्व प्रसिद्धच आहे. असा योद्धा उघडपणें रणांगणावर एखाद्याला मारण्यांत भूषण मानील. पण कपटानें फसवून एखाद्याचा खून करण्यासारखें अधमपणाचें कृत्य कधीं करणार नाहीं. पण असें एक कृत्य केल्याबद्दलचा आरोप महादजीवर कित्येकांनीं केला आहे. त्याचें साफ निराकरण करण्यासारखा पुरावा आतां उपलब्ध झाला आहे. सदर प्रसंग असा– दिल्लीचा दुसरा शहाअलम बादशहा याच्या वजिरीबद्दल मिर्झा सफी व महमद बेग आमदानी याच्यांत भांडणें लागलीं होतीं, आणि दिल्ली दरबारांत द्वेष, मत्सर व कारस्थानें माजलीं होतीं. त्यांत मिर्झा सफी हा अहमद बेग याचा पुतण्या इस्मायल बेग याचे हातून मारला गेला. पूर्वींच्या वजीराचा [ नजीबखानाचा ] पुत्र आफरासियाबखान हा ही त्या स्पर्धेंत होता. महादजी शिंदे यांचें साह्य घ्यावें ह्मणून महमदबेग व आफरासियाब या दोघांचे ही वकील त्याचे कडे गेले, पण आफरासियाब व बादशहा एका जुटीनें असल्यामुळें महादजीनीं प्रथम आफरासियाबची भेट आग्रा येथें घेतली. यानंतर लवकरच आफरासियाब आकस्मिक रीतीनें मारला गेला. या खुनांत महादजीचें अंग होतें असा कित्येकांचा आक्षेप आहे. हा आरोप खोटा ठरविणारें एक पत्र त्यावेळीं आग्रा येथें हजर असलेला सदाशिव दिनकर नांवाच्या माणसानें नानाफडणिसास पाठविलें आहे. त्यांत तो ह्मणतो:– जैनुल आबदीखान ( आफरासियाबास मारणारा ) आफरासियाबखानाचे डेऱ्यास गेला. दोन चार घटका बरोबर फिरून, आफरासियाबखान एकटा पाहून ........ झटपट करून गळची धरून, कट्यार स्कंधावर चालविली........कारगर झाला........ बावांनीं जैनुल आबदीखानास धरून पाहऱ्यांत तेच समयीं दिलें.'

५ टिपूनें अदवानीचा किल्ला घेतला तेव्हां हंपी विरूपाक्ष यास' तैलादिक वस्त्रें लावून अग्नीचा उपद्रव दिला' अशी बातमी महेश्वर दरबारच्या एका पत्रांत आहे. टिपूनें हिंदुदेवालयें भ्रष्ट केल्याचा हा एक पुरावा आहे.

६ शिवाजी महादेव नांवाचा एक मराठा इसम टिपूसुलताना जवळ चार वर्षें अर्वाच्या(?) कामावर होता. त्यानें टिपूच्या सैन्याबद्दलची

विश्वसनीय माहिती दिली आहे. ती अशी.

७००० पागा
९००० शिलेदार
८७ तोफांपैकीं बाराशेरी १२, लहान ७५
५०० हत्ती
६०० उंट
४०००० बारवाले
३०००० कर्नाटकी प्यादे
८० चोपदार
७०० मलिकरी रुपेरी कटाचे
५०० बर्चीवाले

लष्करांत धारण येणें प्रमाणें:—तांदूळ ८ शेर, तूप १। शेर, तेल २ शेर

## हिंदुस्थानची नैतिक व आधिभौतिक प्रगतीचा रिपोर्ट.

०÷❋÷०

या जंगी नांवाखालीं सरकारकडून दरसाल एक लहानसें पुस्तक प्रसिद्ध होत असतें. ज्यांचा शिक्षणाशीं, नीतीशीं किंवा आधिभौतिक कल्याणाशीं संबंध आहे अशा खात्यांच्या वार्षिक रिपोर्टांचा सारांशापलीकडे या पुस्तकांत कांहीं एक नसतें. हिंदुस्थानची नैतिक व आधिभौतिकस्थिति सुधारण्यास कोणत्या गोष्टींची अवश्यकता आहे, त्यांपैकीं किती व कोणत्या प्रमाणांत साधल्या आहेत, व किती साध्य झाल्या नाहींत, न साध्य होण्याला कारणें काय झालीं, या सुधारणा घडवून आणण्याचे कामीं सरकारला कोणाकोणाची मदत झाली, खाजगी प्रयत्न त्या दिशेनें कोणी केले किंवा नाहींत, केले असल्यास त्यांना कितीसें यश आलें वगैरे गोष्टींविषयींची माहिती या रिपोर्टांत मिळेल या आशेनें जर हा रिपोर्ट कोणी उघडून पाहील तर निराशा ही त्याच्या नशिबीं ठेवलेलीच समजावी. सरकारी रिपोर्टांतला हा दोष आज पहिल्यानेंच आह्मी सरकारच्या नजरेस आणीत आहों असें नाहीं. आह्मी करीत आहों अशा प्रकारची टीका वेळोवेळीं झाली आहे. तथापि सुधारणा करण्याचे बाबतींत सरकार सर्वांच्या मागें असतें. हिंदुस्थानांतले लोक पुराणाभिमानी, जुन्याला चिकटून राहणारे, नवी गोष्ट ग्राह्य वाटली तरी तिचा स्वीकार चटकन् न करणारे असे आहेत. पण हा त्यांचा स्वभाव आज हजारों वर्षांपासून आहे. आमचे सरकारी अधिकारी तर सुधारणाशब्द ज्या ठिकाणीं वातावरणांत अहोरात्र संचरत असतो अशा पाश्चात्य देशांतून आलेले असतात. त्यांच्यावर इतक्या लवकर हिंदुस्थानच्या हवेचा परिणाम व्हावा हें आश्चर्य आहे

असो; १९०९–१० सालीं झालेल्या नैतिक व अधिभौतिक प्रगतीचा रिपोर्ट नुकता बाहेर पडला आहे. यावरून पाहतां पुढील गोष्टी नजरेस येतात:— हिंदुस्थानांत भांडखोरपणा वाढत्या प्रमाणांत आहे. संयुक्तप्रांत, मध्यप्रांत, मुंबईइलाखा व मद्रासइलाखा यांत दिवाणी कज्जांची संख्या वाढली. मद्रासेंत तर कोर्टांची संख्या सरकाराला वाढवावी लागली. फौजदारी गुन्ह्यांची वाढ अशीच झाली नाहीं हें सुदैवच ह्मटलें पाहिजे. बंगाल्यांत राजकीय गुन्ह्यांची संख्या न भूतो न भविष्यति इतकी मोठी झाल्याचें सर्वांना ठाऊकच आहे. मद्रासेंत ही गुन्ह्यांची संख्या फार वाढली. पण हे गुन्हे राजकीय नव्हते. तर दुष्काळ पडल्यामुळें दरोडे, चोऱ्या वगैरेच्या स्वरूपाचे होते. पंजाब, मध्यप्रांत, पूर्वबंगाल, ब्रह्मदेश वगैरे प्रांतांत गुन्ह्यांचें प्रमाण बरेंच कमी होतें. पण सरहद्दीवरील प्रांत आणि कुर्ग अशा दोन टोंकाच्या दोन प्रांतांत उलट स्थिति होती. तेथें गुन्ह्यांची संख्या वाढण्याचें कारण काय असावें तें सांगावयास पाहिजे होतें. मद्यपानासारख्या दुर्व्यसनांना आळा घालण्यासाठीं धर्मशास्त्रांचें बंधन आहेच. पण तें पुरेसें न वाटून मद्यपाननिषेधक सभासारख्या सभा ही जागोजाग स्थापन होऊन यथाशक्ति खटपट करीत आहेत. तरी दारूचा खप वाढतच आहे. याचें कारण सरकार ह्मणतें त्याप्रमाणें लोकसंख्येची वाढ व लोकांची भरभराट हें खरोखर आहे किंवा दारूच्या दुकानांची संख्या व उत्पन्न कमी झाल्यास अबकारीखातें कमी करावें लागेल व आपल्या पोटावर पाय येईल अशा भीतीनें त्या खात्यांतले लोक अप्रत्यक्ष रीतीनें मद्यपानाला उत्तेजन देत असतात अशी जी लोकांची समजूत झालेली आहे तींत कांहीं सत्य आहे कीं काय तें कळत नाहीं.

## तंबी मिळाली.

चित्पावन ब्राह्मणजातीवर विनाकारण तुटून पडणाऱ्या जगद्वृत्तकर्त्यास सरकारच्या पाठिंब्याचा मोठा भरंवसा वाटत असावा असें त्याच्या उद्दाम स्वरूपाच्या लेखांवरून दिसत होतें. पण हा त्याच्या भ्रमाचा भोंपळा ता० २९ जुलै रोजीं पुण्यास भरलेल्या कौन्सिलचे बैठकीनें फोडला आहे. या बैठकीचे वेळीं ना० मि० लल्लुभाई शामळदास यांनीं जगद्वृत्तप्रकरणासंबंधानें सरकारास विचारलें कीं त्या पत्राला सरकारांतून पैशाची मदत आहे त्याअर्थीं त्यांतली चित्पावन ब्राह्मणांबद्दलचीं विधानें सरकारास संमत आहेत काय? आणि नसल्यास तें पत्र पुनः कोणत्याही जातीसंबंधानें असे लेख लिहिणार नाहीं अशी तजवीज सरकार करील काय? या प्रश्नास ना० सर जॉर्ज क्लार्कसारख्या उदारमतवादी गव्हर्नराच्या कारकीर्दीत जशा प्रकारचें उत्तर मिळेल अशी अपेक्षा केली होती, तसेंच उत्तर मिळालें. सरकारनें सदर पत्रांतल्या विचाराविषयीं आपली नापसंती स्पष्टपणें प्रदर्शित केली असून पुढें त्यापत्रकारानें असें कांहीं लिहूं नये याविषयीं ही त्यास सूचना पाठविली आहे. हा सगळा प्रकार संतोषकारक झाला आहे यांत शंका नाहीं. झाल्या गोष्टीबद्दल आमच्या बंधूस खरा पश्चाताप होईल अशी अजून आह्मांला उमेद नाहीं. जगद्वृत्ताला दत्तक घेणाऱ्या जनकानें (अॅडव्होकेट आफ इंडिया पत्रानें) कौंसिलच्या बैठकीची हकीकत देतांना जगद्वृत्ताबद्दलचीं तेवढीं प्रश्नोत्तरें गाळलीं आहेत. 'ह्यातारीनें कोंबडी झांकली ह्मणून उजाडावयाचें रहात नसतें' ही साधी गोष्ट सासूबाईच्या टोमण्याखालीं घाबरून गेलेल्या सूनबाईच्या लक्षांत न राहणें साहजिक आहे.

## प्राथमिक शिक्षण.

येथील श्रीराम थियेटरांत परवा शुक्रवारीं सांयकाळीं पुण्याचे ना० गोखले यांचे भारतसेवक समाजपैकीं आपले वऱ्हाड प्रांताकरितां मुद्दाम उमरावतीस येऊन राहिलेले रा. रा. नटेश आपाजी द्रविड यांचे "वरिष्ठ कायदे कौन्सिलांतील नामदार गोखले यांच्या सक्तीचें प्राथमिक शिक्षण या बिलाचा मसुदा" या विषयावर एक तासपर्यंत सुश्राव्य भाषण झालें. अध्यक्षस्थान येथील विद्वान नागरिक गुरुवर्य रा. रा. आण्णासाहेब महाजनि यांनीं स्वीकारलें होतें. आपला मुख्य उद्देश लोकमत बनविणें व लोकमत बनल्यानंतर तें सरकारला योग्य रीतीनें कळविणें हें आहे, हें प्रथमतः अध्यक्षांनीं निक्षून सांगितलें. व आपल्या गोड व अधिकारयुक्त वाणीनें दोन उपदेशाचे शब्द सांगितल्यानंतर रा. रा. द्रविड यांचे भाषणास सुरवात झाली. ते ह्मणाले या बिलाचें स्वरूप असें आहे कीं यच. सध्याच्या 'सुशिक्षित ह्मणविणाऱ्या मंडळींना मुळींच फायदा नाहीं कारण शिक्षण हें त्यांच्या अंगीं आतां खिळल्यासारखें झालें. परंतु याचा संबंध बाकी राहिलेल्या शेंकडा ऐशी लोक जे अशिक्षित आहेत त्यांच्याशीं आहे हें बिल आह्मी आतांच पुढें आणिलें आहे कारण आजपर्यंत या बिलासारखी गोष्ट पुढें आणण्यास सरकारनें आह्मास वावच दिली नव्हती. आणि ह्मणूनच आजपर्यंत आह्मा हिंदी लोकांस केवळ टीका करण्याशिवाय दुसरा मार्गच नव्हता. आमची बुद्धि विघातक होती. परंतु नवीन कौन्सिलानें परिस्थिति बदलली व आमची बुद्धि व शक्ति संघायक झाली. या बिलामध्यें आह्मास यश मिळेल किंवा नाहीं हा प्रश्न निराळा परंतु जे आजपर्यंत आह्मी जखडलेलों होतों ते मुक्त होऊन आमची बुद्धि, शक्ति, आणि ऐक्य यांस चांगलें चलन मिळून एकराष्ट्रीयत्वास पोशक असें हें बिल आणल्यानें हिंदुस्थानची जशी बाह्यतः एक आहे तसें अंतरंग ही एकच आहे असें सर्व जगास प्रत्ययास आणून देण्याची आमची उमेद आहे व त्याप्रमाणें आह्मी यत्नही करीत आहोंत. याप्रमाणें सध्याच हें बिल आणण्याचें कारण सांगून त्या बिलाचें स्वरूप त्यांनीं सांगितलें. सरकार ह्मणतें कीं हें जर बिल पास झालें तर त्याची अंमलबजावणी करणें फार जड जाईल. या प्राथमिक शिक्षणाची नीट सोय व्हावी यासाठीं दुय्यम प्रतीचे शिक्षणास सरकार फार मदत करित नाहीं आणि याचमुळें वरील वर्गाची फीही सध्या वाढलेली आहे. सरकारचें ह्मणणें असें आहे कीं जर प्राथमिक शिक्षण सक्तीचें फुकट केलें तर पांच कोट रुपये खर्च लागेल. परंतु शिक्षणाशिवाय इतर खात्यांत ही सरकारची ओढच असल्यामुळें सरकारला इतका पैसा खर्चण्यास पुरेसा खजीना नाहीं. यासाठीं मोफत शिक्षण करण्यास सरकार कांकूं करीत आहे परंतु ज्याअर्थी या नव्या कौन्सिलाची संधी आपणास मिळाली आहे त्याअर्थी आपण ती वाया जाऊं देऊं नये. यासाठीं कांहीं भाग आपण देऊन बाकीचा भाग सरकारनें द्यावा असें ह्मटलें आहे. या पैशाचे वांटणी संबंधीचा भाग मुख्य बिलामध्यें आणिला नाहीं. व असा भाग बिलामध्यें आणिला नाहीं ही फार चूक केली अशा अर्थाची टीका बरीच झालेली आहे. परंतु ही गोष्ट बिलांत न घालण्यास मुख्य कारण ह्मणजे सक्तीचा मुद्दा व खर्चाचा मुद्दा हे दोन मुद्दे पृथक् करण्यापासून फायदा हें होय. कारण खर्चाचा मुद्दा पुढें आणल्यास सक्तीचा मुद्दा मागें पडणार. आणि सक्तीचें शिक्षण ही तर सध्या फार आवश्यक गोष्ट आहे. मग असें [illegible] कीचें शिक्षण देण्यास आह्मास थोडी [illegible] झीज सोसावी लागली तरी आह्मी कबूल आहों. शिवाय या बिलाचा प्रसार सार्वजनिक व्हावयाचा नसून वाटेल त्या शहरानें किंवा डिस्ट्रिक्ट व लोकल बोर्डानें जर तेथें अगोदर शेंकडा ३५ पसत्तीस लोक शिकत असतील तर सरकारास विनंती केल्यास हें बिल त्या शहरास किंवा त्या जिल्ह्यास लागूं करण्यांत येईल. याशिवाय याही स्थलासिमेंत एखाद्या जातीस हें बिल लागूं होणार नाहीं. आणि जरी या कायद्याचें कोणी उल्लंघन केलें तरी त्यास पोलीस मार्फत शिक्षा न होतां ठराविक पंचाकडून शिक्षा होईल. अशा तऱ्हेचें मुद्देसूत भाषण करून त्यांनीं या बिलाचें स्वरूप सांगितलें. पुढील आठवड्यांत या बिलासंबंधीं लोकमत सरकारास कळविण्यास पुनः सभा भरणार आहे.

## वऱ्हाडवृत्त.

**हवामान**—ईश्वरी कृपेनें पर्जन्याला पुनः प्रारंभ होऊन सर्वत्र आनंदीआनंद झाला आहे. गवतचारा लवकरच विपुल मिळूं लागेल व भावी धान्यसमृद्धि सर्व काळजी दूर करील. सार्वजनिक आरोग्य सुधरूं पहात आहे.

**कॉलरा**:— पाऊस नसल्यामुळें आणि निर्दोष व स्वच्छ पाणी पिण्यास मिळत नसल्यामुळें वाख्याचा उपद्रव आज १५ दिवस झाले सुरू आहे. एखाद्या दिवशीं असे मृत्यु आठ पर्यंत मुद्दां होतात. कॉलऱ्यानें लागल्यानंतर रोगी फारच लवकर मृत्युपंथास लागतात. उदकशुद्धीचे प्रयत्न मुनसिपालिटीनें जोरानें चालविले आहेत.

कालपरवांपासून पाऊस चांगला पडत आहे व लोकांस पाणी [illegible] चांगलें मिळून रोग हटेल असें [illegible]तें. लोकांनींही मिताहारी [illegible]जी घ्यावी.

**सत्कार**—आलिशान नामदार क्रॉडाकसाहेब यांनीं आकोल्याचे रावसाहेब केशव गोविंद दामले बी. ए. एल एल. बी., व्हाइसचेअरमन जिल्हा बोर्ड इत्यादि इत्यादि यांस राज्याभिषेकानिमित्त दिल्लीदरबारास निमंत्रण केलें आहे हें आह्मी आनंदानें कळवितों.

रा. रा. रामकृष्ण विठ्ठल आत्रे १ ले आडि. मुनसफ, आकोला यांस येथेंच आफि. सबजज्ज नेमण्यांत आले.

सुधासिंधु

सुख संचारक कंपनी मथुरा यांची तयार केलेलीं व सरकारांतून रजिष्टर झालेलीं औषधें, जीं वीस वर्षांपासून लोकांत अनुभविलीं आहेत.

**सुधासिंधु**

हे कफ, खोकला, दमा, थंडीचा ताप, पटकी, शूळ, संग्रहणी, अतिसार, पोटांत दुखणें, वांत्या, मळमळणें, हात पाय व कंबर दुखणें, मुलांचे हिरवे पिवळे जुलाब, डांग्या खोकला, दूध ओकून टाकणें इत्यादींवर स्वादिष्ट व सुवासिक औषध आहे. किंमत प्रत्येक बाटलीस ०८ आणे.

**दद्रुगज केसरी**

गजकरणास समूळ नाहींसें करणारें हेंच फक्त एक पवित्र औषध आहे. कांहीं सुद्धां जळण अथवा त्रास होत नाहीं. यासच जर दारू अथवा लिंबाचे अर्कांत मिळविलें तर २ बाटल्या अर्क तयार होतो. किंमत प्रत्येक बाटलीस ०४ आणे १२ बाटल्या एकदम मागविल्यानें त्यांस एजंट समजून नोटिशी, हँडबिलें वगैरे फुकट पाठविलीं जातात, व कमिशनही दिलें जातें. चालू सालचें पंचांगही फुकट मिळतें.

मागविण्याचा पत्ताः—
पंडित क्षेत्रपाल शर्मामालक,
न. १९९ सुख संचारक कंपनी, मथुरा.

सुधासिंधु

**अशी संधी पुन्हां येणार नाहीं.**



सहा घड्याळें घेणारांस पोष्टखर्च माफ

एक घड्याळ बक्षीस.

दर एकाची किंमत ३।

**जंटलमन इमिटेशन रास्कोप सिस्टिम**

नांवचें खिशांत ठेवण्याचें घड्याळ दिसण्यांत फार सुरेख आहे. सर्व लोकांस ह्या घड्याळाचा लाभ मिळावा ह्मणून मुद्दाम किंमत रुपये ३। ठेविली आहे; पोस्टेज खर्च माफ. घड्याळा सोबत कांच, कमान, पेटी, गोफ, इतकें सामान फुकट मिळेल. अशी अमुल्य संधी पुन्हां येणार नाहीं. व्ही. पी. नें मागवा.

मिळण्याचा पत्ताः—**खोजा वल्लीभाई इस्माल**
मुक्काम वर्धा. [ मध्यप्रांत ] WARDA.
नो. नं. ४

चिरकालचा खरा लाभ कोणता ?
पैसा व ज्ञान ज्या योगानें मिळेल तो !
महाराज ! ह्या दोन्ही गोष्टी

वार्षिक वर्गणी खर्च रु.१॥ )**कलाशिक्षण**( नमुना अंकास ०२ आ

नांवाच्या विविध हुन्नर, शास्त्रीयज्ञान, व्यापार शेतकी, व इतर शेंकडो विषयांची माहिती शिकविणाऱ्यास वर्गणीदार व्हा. मराठी भाषेंत हें असें एकच पुस्तक आहे. वर्गणी रु. १॥ खरी पण चालू मार्च अखेर आश्रय देणारास रु. १। पडेल. कारागिरांस, विद्यार्थ्यांस तर हें पुस्तक अवश्य हवें शिवाय ग्राहकांस हिप्नॉटिझम [ Hypnotism] ऊर्फ अमेरिकन वशीकरणविद्या—जिनें दुसऱ्यास निद्रा मोहन, आरोगहरण व धनप्राप्ति करतां येते; ती रु. २५ फीची तूर्त रु. ११ न शिकवूं. पैकीं १ रु. प्रथम सही बरोबर पाठवावा बाकीची व्ही. पी. येईल.

ह्या शिवाय नानाप्रकारच्या पोट भरण्याच्या युक्त्या. औषधी. मंत्रतंत्रक्रिया, जडी बुटी, गुप्त प्रयोगाची माहिती वाजवी फी घेऊन शिकवूं सर्व पत्रव्यवहार गुप्त राखला जातो.

व्यवस्थापक—कलाशिक्षण, कार्यालय
नो. नं. ५ बडोदें.

. नोटीस

**विहार आनन्दका सागर रंगीन तसवीरे सहित चारो भाग तथा पांचो अंग सचित्र कोख शास्त्र.**

असली हमसे मंगावो धोकेसे बचो स्त्री पुरुषोंके जात, भेद, लक्षण अनेक देशस्थ स्त्रीनायका, कुमारी प्रकृती, सत्व दुती कुलटा, पतिव्रता, व्यभिचारणी आदिको पहचान, रजोधर्म लक्षण, ऋतुविहार मय सहवास स्थान क्रया, शैथ्यातिथ, कामस्थान सोलासगारे, वर्तासोआमुशण, वत्रतआदिवमधान पुत्रस्त्रीकर्म, नपुंसकविद्या, उपदंश प्रमेह आदि अनेक रोगोंकी चिकित्सा औषधि, पशु भाषा जाननेकी रीती, मंत्रतंत्र, यंत्र, वशीकरण मुद्रा विद्या आदि अमुल्य विषयको. भइर किंमत रु०

पं० गंगाप्रसाद इंजीनियर शहापडा
नो० नं० ७७ अलीगड सिटी.

## नोटीस

रा. नामदेव वल्द नारायण पाटील रा० लामकानी ता० अकोट जि० आकोला

यांसः—

खालीं सही करणार **यांजकडून** नोटीस देण्यांत येतें कीं माझ्या वडील भावाची बायको नामें चंद्रभागा मर्द तुकाराम रा० रामतीर्थ हिनें माझे परवानगीवांचून व माझ्या सल्ल्याविरुद्ध माझ्या मालकीचे बैलांची जोडी [ रंग धामना व लल तोंडावर मोरा ] तुमचे घरीं आणून ठेविली असून तुह्मी तिला अशा सल्ल्याबद्दल अनुमोदन देऊन बैलांची जोडी ठेवून घेतली हें तुमचें करणें अगदीं गैर असून बेकायदेशीर आहे. करितां तुह्मास या नोटिशीनें कळविण्यांत येतें कीं तुमचे घरीं तुह्मीं ठेवून घेतलेली वर वर्णन केलेल्या बैलांची जोडी नोटीस पावल्यापासून ८ दिवसांच आंत आमचे घरीं आणून द्यावी. तसें आपणाकडून न झाल्यास मला तुमचे विरुद्ध फिर्याद करावी लागेल व तुह्मास त्याबद्दल खर्च सोसावा लागेल. कळावें ता० २१-७-११ इ.

दस्तुर रामचंद्र रमाकांत मलकापूरकर
सही
रामू वा। सूर्यभान शेळकी द. खु.
नो. नं. ३१४

## नोटीस

चंद्रभागा मर्द तुकाराम शेळकी रा० रामतीर्थ ता० दर्यापूर

हिस :-

खालीं सही **करणार** यांजकडून नोटीस देण्यांत येतें कीं तूं माझे वडील भावाची बायको **असून तूं माझे** जवळच आहेस. तुझा नवरा तुकाराम **सूर्यभान** माझा प्रत्यक्ष वडील भाऊ होता व त्यानें मृत्युपत्र लिहून देऊन त्या **मृत्युपत्रांत** सर्व जिन्नगी माझे ताब्यांत दिलेली व त्याप्रमाणें त्याच्या **जिन्नगीची** व्यवस्था मीच करीत आहे व त्या जिन्नगीचा मी पूर्ण मालक आहे. असें असतां मला समजतें कीं तूं जिन्नगीची अफरातफर करण्याचे विचारांत आहेस व त्याप्रमाणें घरांतील नगदी पैसा, डागिने, व बैलांची जोडी असें तूं आपले मामे भाचाचे घरीं नेऊन ठेवलें आहे, हें तुझें करणें बरोबर नाहीं. तुझा फक्त अन्नवस्त्राचा हक्क असून दुसरे कोणत्याहि जिन्नगीवर तुझा हक्क नाहीं. तुला जिन्नगी कोणास खरेदी, गहाण, **बक्षीस** वगैरे देण्याचा हक्क नाहीं. इतक्या उपर त जर अशीं कृत्यें केलीस तर त्याबद्दल तुला स्वतःच जबाबदार राहावें लागेल. जिन्नगी कोणत्याहि तऱ्हेनें जबाबदार राहणार नाहीं. करितां तुला मुद्दाम या नोटिशीनें कळविलें जात आहे कीं तूं डागिने, रोकड पैसा व बैलांची जोडी घरांतून नेलेली आहे ती माझ्या स्वाधीन करून माझी पावती घे. नाहीं तर मला तुझे विरुद्ध दावा करावा लागेल आणि त्याबद्दल तुला खर्च सोसावा लागेल. कळावें ता० २१-७-११ इ.

दस्तुर रामचंद्र रमाकांत
सही
रामु वा। सूर्यभान शेळकी द. खु.
नो. नं. ३१५

## नोटीस

रा० सखाराम शिंदे रा० नदखेडा ता० आकोला.

यांसः—

मी हरी वा। मारुती गांवंडे रा० दहिगांव ता० मलकापूर नोटीस देतों कीं माझी बहीण बजी ही तुमची गंधर्वाची बायको असून तिचें मोहतीर होण्यास ५।६ वर्षें झालीं. तिला तुह्मी मुलाबाळासाठीं केलें; परंतु तुमच्या लग्नाचे बायकोचें व तिचे सासवेचें जमत नसल्यानें तुह्मी तिला मारठोक करून काढून दिलें. ती तुमचेजवळ एक वर्ष अजमासें होती. हल्लीं तुह्मी तिला वागवीत नसून अन्नवस्त्र ही देत नाहीं. तिला आह्माला वागविणें जरीतीनें बिकट झालें आहे, त्यामुळें तुह्मास कळवितों कीं ही नोटीस प्रसिद्ध झाल्यावर ८ दिवसांत तिचे टाकून घातलेले मुद्दतीचे रुपये ५०० कर्ज झालेलें देऊन तिला नांदविण्यास तिनी हालअपेष्टा करणार **नाहीं** असें लिहून देऊन घेऊन जावें. नाहीं तर तिला वागविणें नाहीं समजून ही नोटीस फारकत लेखली जाईल. मग तुमचा नवरेपणाचा हक्क तिजवर कोणत्याच प्रकारें राहणार नाहीं. कळावें ता० २९-७-११

सही
हरी वा। मारुती नि० खु० आंगठा
आज मुक्काम आकोला.
नो० नं० ३१६

## नोटीस

सजन मर्द गणपती ताले कुणबी पाटील रा० चान्नी ता० बाळापूर

हिसः—

मी ओंकार वा। झिंगराजी ताले रा० चानी ता० बाळापूर नोटीस देतों कीं गणपती वा। चंद्रभान हा माझा सख्खा चुलता होता व तो मरण्यास अजमासें ८।९ वर्षें झालीं. तो असतांना हि आह्मी वडिलार्जित इस्टेटीची व्यवस्था संगनमतानें करीत होतों. त्याला औरस पुत्रसंतान नाहीं. तूं गंधर्वाची बायको आहेस. त्याला आह्मी कांहीं स्थावर इस्टेट उद्योगधंदा करण्यास दिली होती. तो फक्त वहिवाट करात होता. शेतांचे खातें वगैरे त्याच्या नांवें नाहीं. तो नेहमीं आमच्याच मतानें चालत होता. हें सर्व तुला माहित असून हल्लीं तूं आमच्या मतानें न राहतां उचळपट्टी लावली आहेस. तरी तुला तसें कायदेशीर करतां येत नाहीं. तूं फक्त अन्नवस्त्राची मालकीण आहेस. तें तुला आह्मी पुरविणार आहोंत. तुला कोणतीच स्थावरजंगम इस्टेट आमच्या संमतीवांचून कोणास विकतां, पट्टानें, बक्षीस किंवा गहाण ठेवतां येत नाहीं. तरी या पुढें वे मागें कांहीं आह्मास न विचारतां तूं केलें असल्यास अगर करशील तर तो व्यवहार आह्मास मान्य नसून रद्द समजला जाईल व त्याची सर्वस्वीं जबाबदारी तुजवर राहील. मरत चुलत्याचे त्याच्यांतील इस्टेटीवर कोणत्याहि प्रकारें जबाबदारी राहणार नाहीं. कळावें ता० २९-७ १९११

सही
ओंकार झिंगराजी पटील राहणार चानी
दस्तुर खु०
नो० नं० ३

## नोटीस.

बेशमी— भागाई मर्द गंगाराम राहणार मुकळी ता० आकोट पो० आकोट हिसः——

खालीं सही करणार याजकडून नोटीस देण्यांत येतें कीं तूं माझी साक्षात चुलती असून माझा चुलता नामें गंगाराम याला मरून अजमासें १७-१८ वर्षे झालीं. आमची सगळी इस्टेट एकत्र आहे. व तुझा मीच वारस आहे. असें असतां मला कांहीं एक मिळूं नये या बुद्धीनें तूं सगळी इस्टेट अफरातफर करण्याच्या इरायांत आहेस असें समजतें तर तुला या नोटिशीनें कळवितों कीं माझ्या संमती वांचून तूं इस्टेट कोणाग गहाण, खरेदी, बक्षिस, अगर पट्टयानें देऊं नये. सर्व इस्टेट माझेच ताव्यांत आहे. मी तुला खाण्यापिण्यास देण्यास तयार आहे. या उपर जर तूं कोणाशीं स्थावरजंगम इस्टेटीबद्दल कोणत्याही प्रकारचा व्यवहार करशील तर त्याबद्दल मी अगर आपलीं इस्टेट जोखीमदार राहणार नाहीं. तर त्याची जबाबदारी व्यवहार करणाऱ्याच्या जातीवरच राहील. कोणी फसूं नये ह्मणून सर्वास जाहिर केलें आहे. कळावें. ता० २४।६।१९.१ इ. सही

नामदेव जानजी पाटील राहणार
नो० नं० ३१२ मुकळी द० खु०

## नोटीस

रा० घनःशाम पुरी गोसावी राहणार (संभुचें) टाकरखेडें ता० व जिल्हा उमरावती यांसः—

मी प्रतापभारथी बाप बाळभारथी गोसावी रा० रवंदळ ता. अकोट नोटीस देतों कीं माझी गंधर्वाची बायको सोनी (कृष्णी) हिस आपण बाळंतपणासाठीं नेलें तें आजपावेतों परत केलें नाहीं. तिला माहेरीं जाण्यास अजमासें १३ महिने झाले. या मुदतींत मी १-२ दां घेण्यास ही आलों परंतु आपण पाठविलें नाहीं. ती माझ्या येथून गेली तेव्हां तिच्या अंगावर दागदागिन्यांसह एकंदर अंदाज रु० ३०० शांचा विस्त्यांश होता. तिला आतां ही नोटीस प्रसिद्ध होतांच १५ दिवसांत चीजवस्तांसह परत करावें. नाहीं तर आमच्या डागडागिन्यांची सर्वथैव जबाबदारी आपल्यावर राहील व या एकंदर गोष्टीचा दावाही आणणें भाग पडेल कळावें. तारीख २५ माहे जुलै सन १९११ इ. सही

प्रतापभारथी बाप बाळभारथी गोसावी
नो० नं० ३१३ रा० रवंदळ द० खु०

## नोटीस

बेशमी नागो वा। रावजी सुतार रा० साळोड ता० चांदूर जि० उमरावती यासः—

खालीं सही करणार इजकडून नोटीस कीं, मी गंधर्वाची बायका आहे. तुह्मी माझ्याशीं गंधर्व लावल्यापासून सहा महिने मी तुमचे घरीं होते. त्या सहा महिन्यांत तुह्मी तुमचे लग्नाचे बायकोनें चहाड्या सांगितल्यावरून वारंवार मारहाण करावी. अखेरीस तुह्मी मला जास्त मारून शेवटीं घरांतून काढून दिलें. त्यानंतर माझे भावानें मला तुमच्या येथें २। ३ वेळां आणून घातलें; परंतु तुह्मी मला ठेविलें नाहीं व फारकत मागीतली असतां फारकत हि दिली नाहीं. मी १२ वर्षांपासून माझे बापाच्या घरीं आहे. माझा बाप ह्मातारा असून वरवा गरीब आहे ह्मणून मी आपले बापाचे व भावाचे संमतीनें भंगीरजी वा। आकाजी सुतार रा० हिरपूर, हा बहिणीचा नवरा (माझा जावई) आहे, याचे घरीं सैंपाकपाणी व घरांतील इतर काम करण्याकरितां नोकर राहिले आहे. आजपावेतों माझे अन्नवस्त्राबद्दल जें कर्ज झालें आहे तें तुह्मी देऊन टाकावें आणि या पुढें तुला चांगल्या रीतीनें नांदवीन अशाबद्दल खात्रीलायक जामीन देऊन १५ दिवसांचे आंत मला घेऊन जावें. तसें न कराल तर पुढें तुमचा माझ्यावर नवरेपणाचा हक्क राहणार नाहीं १५ दिवसांनंतर पुढें माझ्या मनीस येईल तो हीच फारकत समजून गंधर्वाचा नवरा करीन तुमची कोणत्याहि प्रकारें तक्रार ऐकली जाणार नाहीं. ता० २३-७ ११

सही

सोनाई मर्द नागोजी सुतार नि० खु० आंगठा आज मु० आकोला.

नो० नं० ३१९

### श्री राधावल्लभाजयाति

## वर्षफल।

हमारे पास सिर्फ १ पोस्टकार्ड पर किसी फल या फूल का नाम लिख भेजो हम आप के एक वर्ष का सुख, दुःख लोभ, हानि, जीवन, मरण, रोग, सन्तान, तेरक्की, मौकूफी, व्यापार में किस वस्तु स लाभ होगा दिसावरी काम में कैसा लाभ होगा और जो महीना हानिकारक उस का उपाय महीनेवार वर्षफल वी० प० द्वारा २। रुपये में भेज देंगे. हमारे हां जन्म पत्रादि उत्तमोत्तम बनते हैं, अनेक प्रशंसा पत्र मौजूद हैं, विशेष परिचय के अर्थ ८॥ आना का टिकट भेज कर सूचीपत्र मगो लीजीये.

मिलने का पत्ता: —
गोस्वामी राधामोहन शर्म्मा
चित्तीखाना आगरा.


### ✻ इकडे लक्ष द्या! ✻

## नाग, नरसे व पिठोरी

आह्मी येथें विक्रीकरितां नाग, नरसे, जिवत्या, पिठोरी, पाठोडा, गणपती बुध, बृहस्पती व तुळशीचें लग्न वगैरे चित्रांचे कागद फारच सुरेख छापले आहेत. चित्रें दर शेंकडा १ रुपया. चित्रें हजार घेतल्यास दर शेंकडा ८१४ आणे प्रमाणें देऊं.

बाळकृष्ण अनोबा दलाल,
कंपॉझीटर वऱ्हाडसमाचार
अकोला.

(पत्रें विठ्ठलमंदीराच्या पत्त्यावर पाठवावीं.)


## जाहिरात

सर्वत्र लोकांस कळविण्यांत येतें कीं माझी भावजय नामें चंद्रभागा मर्द तुकाराम शेळकी रा० रामतीर्थ ता० दर्यापूर जि० उमरवती ही स्थावर जिन्नगीची अफरातफर करीत आहे व त्या जिन्नगीवर माझी स्वतःची मालकी माझे वडाले भावानें करून दिलेल्या मृत्युपत्राचे आधारें आलेली आहे व सर्व जिन्नगी माझे ताव्यांत असून मीच वहिवाट करीत आहे. ह्या स्थावर मालाचें वर्णन मौजे रामतीर्थ ता० दर्यापूर जि० उमरावती येथील

| सर्वे नं० | एकर गुंठे | आकार |
|---|---|---|
| ५७ | ३६८२० | ८० |
| २३ | ५५८२६ | ५४ |
| ७८ | ३४८२९ | ७७ |
| ८१ | १६८३४ | ३६ |

व विरवाड येथील बरडीचें शेत किसन वा। भदु याचे नावें असून त्यांतील एक त्रितियांश हिस्सा आहे व रामतीर्थ येथील घर येणें प्रमाणें स्थावर माल माझे मालकीचा असून माझे ताव्यांत आहे. ह्या स्थावर मालाशीं कोणी गहाण अगर खरेदी व इतर कोणत्या हि तऱ्हेचा व्यवहार माझे सल्ल्या वांचून करूं नये. केल्यास त्याबद्दल स्थावर माल कोणत्याहि प्रकारानें जबाबदार राहणार नाहीं. करितां मुद्दाम ही जाहिरात दिली असे. कळावें. ता० २१=८=११ दस्तुर रामचंद्र रमाकांत मलकापूरकर

सही

रामु वा। सूर्यभान शेळकी द० खु०
नो. नं. ३१८

## जाहिर नोटीस

मी खालीं सही करणार याजकडून— सर्व लोकांस कळविण्यासाठीं प्रसिद्ध करण्यांत येतें कीं माझा चिरंजीव सीताराम लक्ष्मण मुजमदार वकील हा मयत झाला. त्याला पुत्रसंतान कांहीं नाहीं. त्याचे ताव्यांत जी इस्टेट आहे ती माझी आहे व मी व्यवस्थेसाठीं स्वाधीन केलेली होय व त्याशिवाय दुसरी इस्टेट हिचा मी मालक आहे तरी मयत मजकूर याची बायको सरस्वती जवजे सीताराम हिच्याशीं कोणत्याच इस्टेटीबद्दल कोणत्याच प्रकारचा व्यवहार कोणी करूं नये, असें या द्वारें कळविलें जात आहे. याविरुद्ध झाल्यास त्याबद्दलची जबाबदारी तिच्याशीं व्यवहार करणारावर राहील. कळावें. ता० २२-७-११ इ०

सही

लक्ष्मण भास्कर वकील द० खु०
आकोला.

नो० नं० ३२०


# Oriental Govrnment security
# LIFE ASSURANCE COMPANY
## Limited

ESTABLISHED IN 1874.

R. Paterson, Berar manager,
HEAD OFFICE—BOMBAY
HEAD —QUARTER— NAGPUR

**FUNDS Exceed $3\frac{3}{4}$ crores**

CLAIMS PAID FOR OVER 3 CRORES

IMMEDIATES ETTLEMENT OF CLAIMS

If there be one thing of more importance than another in connection with Life Assurance, it is when claims arise, that the amount due under the policy be paid to the Claimants at the earliest possible date. This th Directors of the 'Oriental' keep well before them and act up treating their clients with the utmost liberality.

UNQUESIONABLE SECURITY.

It is not sufficient to read that a Company's funds amount to a given sum, but it is essential to know how such Funds are invested if in miscellaneous and risky investments or how secured.

The Funds of the 'Oriental' are invested in Government Securities and lodged with the Government Official Trustee of Bombay in terms of the Company's Trust Deed, as Security for Claims arising, through decease of assured lives, and endowmenpt policies matured.

Government Officers, professional men, Tradesmen and others by employing portion of their annual income or profits in effecting life policies, create fund equivalent to the savings of many years.

No mān can be sure how long he will live, and although he may save money yet, if he dies early before he had time to save much, his wife and family may be in distress. Life Assurance is a means by which this danger is got over. Life being so uncertain, the sooner a man make up his mind to assure his life the better. Once satisfied of the propriety of the step, do not delay. There are numerous instances in the records of the 'Oriental' where the delay of a month or less, has left the family without the intended provision.

INFLUENTIAL AND ENERGETIC AGENT WANTED. For terms please apply to the undersigned.

Prospectuses, forms and any further information can be obtained on application—

M. DESOUZA.

CHIEF AGENT, Nagpur

CHIEF AGENCY FOR C. P., BERAR & KHANDESH


हें पत्र आकोला येथें कैलासवासी खंडेराव बाळाजी फडके यांच्या वऱ्हाडसमाचार छापखान्यांत नारायण खंडेराव फडके यांनीं सदाशिव आश्रमांत छापून प्रसिद्ध केलें.